किंमत १ रुपया

र. नं. बी. ३४३४

दिवाळी अंक

# अर्थ

दिवाळी अंक

" अर्थ एव प्रधान:" इति कौटिल्य: अर्थमूलौ धर्मकामाविति । —कौटिलीय अर्थशास्त्र

वर्ष १६ | पुणें, बुधवार तारीख ८ नोव्हेंबर, १९५० | अंक ४५

॥ श्री ॥

## दि बृहन्महाराष्ट्र शुगर सिंडिकेट लि०, पुणें २.

आमचे भागीदार व ठेवीदार यांना यंदाची दिवाळी व नूतन वर्ष सुखाचें व भरभराटीचें जावो.

### कंपनीला कोणत्याहि बँकेचें कर्ज नाहीं

नवीन १००० टनांच्या मशिनरीच्या उभारणीला लागणाऱ्या रकमेकरितां न्यायमूर्ति भिडेसाहेब, I. C. S. (Retd.), बॅरिस्टर रामराव देशमुख, अमरावती, सर गुरुनाथ बेवूर, I. C. S. (Retd.), न्यायमूर्ति ढवळेसाहेब, I. C. S. (Retd) अशा सिंडिकेटचे शेअर घेऊन शिवाय ठेवी दिलेल्या, नामवंत भागीदारांच्या भेटी घेतल्या.

भेटीच्या वेळीं मिळालेल्या सूचनांचा आशय:—

(१) नवीन मशिनरीची उभारणी शक्य तितक्या लवकर व्हावयास पाहिजे.
(२) कंपनीच्या भागीदारांना, ठेवीदारांना व हितचिंतकांना नवीन मशिनरीच्या उभारणी-करितां एक वर्ष मुदतीनें ठेव देणें सोयीचें होईल व शेअरपेक्षां ठेवी लवकर मिळतील.
(३) ६ टक्के व्याज बँकेला दिलें तसेंच ठेवीलाहि १ वर्षाला ६ टक्के व्याज ठेवावें.
(४) मशिनरीची उभारणी पूर्ण झाली म्हणजे वरील दराच्या ठेवी घेणें बंद करावें.

### ठेवीची मुदत १ वर्ष : व्याज ६ टक्के

मुदतीच्या ठेवीचे फॉर्म सिंडिकेटच्या पुणें येथील मुख्य कचेरींत मिळतील.

तारीख २०-१०-१९५०.
कॉमनवेल्थ बिल्डिंग,
९८०, सदाशिव पेठ,
लक्ष्मी रोड, पुणें २.

चंद्रशेखर गोविंद आगाशे,
बी. ए., एलएल. बी.,
सी. जी. आगाशे ॲण्ड को.,
मॅनेजिंग एजंटस्.

## परराष्ट्रीय व्यापारांत अनुकूल शिलकेची स्थिति कायम

### १९५० च्या पहिल्या सात महिन्यांतील आंकडेवारी

जुलै १९५० ला संपलेल्या पहिल्या सात महिन्यांत दुर्लभ व सुलभ या दोन्ही चलन विभागांचे बाबतींत भारताच्या परराष्ट्रीय व्यापारांत अनुकूल शिलकेची स्थिति टिकून राहिली आहे. या कालावधींत व्यापारांतील एकूण शिलकेंत ३·४२ कोटी रु. ची वाढ दिसून आली. १९४९ च्या याच कालावधींतील सदरहू शिलकेंत १७०.४४ कोटी रु. तूट होती.

दुर्लभ चलनाच्या देशांतून ८१·६७ कोटी रु. किंमतीची आयात करण्यांत आली, तर या देशांकडे ८४ कोटी रु. किंमतीची निर्यात होऊन २·३३ कोटी रु. अनुकूल शिलक राहिली. १९४९ च्या पहिल्या सात महिन्यांतील ५१·२९ कोटी रु. प्रतिकूल शिलकेशीं तुलना करतां या वर्षीच्या पहिल्या सात महिन्यांतील व्यापाराची स्थिती अधिक चांगली आहे. १९४९ च्या पहिल्या सात महिन्यांत भारतानें ५९·९९ कोटी रु. किंमतीची निर्यात आणि १११·२८ कोटी रु. किंमतीची आयात केली होती.

सुलभ चलनाच्या देशांतून १८७·९२ कोटी रु. किंमतीची आयात झाली असून त्या देशांकडे १८९·९५ कोटी रु. ची निर्यात झाली आणि त्यामुळें २·०३ कोटी रु. ची अनुकूल शिलक दिसून आली. गेल्या वर्षाच्या याच कालावधींत भारताच्या परराष्ट्रीय व्यापारांतील प्रतिकूल शिलक १११.०१ कोटी रु. होती, कारण तेव्हां २८०·११ कोटी रु. आयात आणि फक्त १६९·१ कोटी रु. निर्यात झाली होती.

जुलै १९५० मध्यें अमेरिकेबरोबरच्या भारताच्या व्यापारांत १·५६ कोटी रु. प्रतिकूल शिलक होती. जुलै १९४९ मध्यें सदरहू देशाबरोबरच्या भारताच्या व्यापारांत ४·४३ कोटी रु. प्रतिकूल शिलक होती ही गोष्ट लक्षांत घेतां या वर्षी प्रस्तुत बाबतींत सुधारणा झाली आहे असें दिसून येईल. या वर्षीच्या जुलैमध्यें ग्रेट ब्रिटनबरोबरच्या व्यापारांत २·५१ कोटी रु. ची प्रतिकूल शिलक होती, परंतु गेल्या वर्षांतील जुलैमध्यें ती ७·६३ कोटी रु. होती हें पहातां यंदा सुधारणा झालेली दिसून येते.

पाकिस्तानबरोबरच्या जुलै महिन्यांतील व्यापारांत ७६ लक्ष रु. रु. अनुकूल शिलक दिसून आली. या वर्षाच्या पहिल्या सात महिन्यांतील एकूण व्यापारांतहि ४.३२ कोटी रु. अनुकूल शिलक राहिली आहे. गेल्या वर्षी याच कालावधींत २·७७ कोटी रु. प्रतिकूल शिलक होती.

### को. कंझूमर्स सोसायट्यांची परिषद

मुंबई राज्यांतील को. कंझूमर्स सोसायट्यांची परिषद श्री. टी. ए. रामलिंगम चेट्टियार, एम्. पी., मद्रास यांचे अध्यक्षतेखालीं मुंबई, येथें १५ व १६ ऑक्टोबर ह्या दिवशीं भरणार होती. ती त्या ऐवजीं २९ व ३० ऑक्टोबर ह्या दिवशीं भरेल.

### श्री. दा. वा. पोतदार

मुंबई प्रांतिक सहकारी इन्स्टिट्यूटवर मध्यभागातर्फे श्री. दा. वा. पोतदार ह्यांची निवड झाली आहे. त्याचप्रमाणें, पुणें जिल्हा सहकारी खरेदी विक्री संघाचे ते एकमतानें अध्यक्ष निवडून आले आहेत

### दि कॉसमॉस को-ऑपरेटिव्ह अर्बन बँक, लि. पुणें

सन १९५०-५१ सालाकरितां दि. १०-९-१९५० ला झालेल्या वार्षिक निवडणुकींत निवडून आलेली अधिकारी मंडळें.

**सल्लागार मंडळ**

१. श्री. पांडव नारायण विनायक, बी. ए. (अध्यक्ष)
२. श्री. कानगो श्रीनिवास अमृत (उपाध्यक्ष)
३. श्री. जेजुरीकर गणेश नरहर.
४. श्री. करमरकर मोरेश्वर गोविंद, एम. ए., बी. टी.
५. श्री. मोघे दामोदर मोरेश्वर.

**कार्यकारी मंडळ**

१. श्री. वैद्य जयवंत दत्तात्रय, बी. ए., (कार्याध्यक्ष)
२. श्री. कुंभारे बाळकृष्ण विष्णू, बी. ए. (उप कार्याध्यक्ष)
३. श्री. ओगले शंकर लक्ष्मण, एम्. ए, एलएल. बी., बी. टी.
४. श्री. भट चिन्तामण वासुदेव, बी. ए., एलएल. बी.
५. श्री. दात्ये विनायक नारायण, बी. ए.
६. श्री. कुलकर्णी सदाशिव वामन, बी. ए., एलएल. बी.
७. श्री. देव पांडुरंग रामचंद्र.
८. श्री. हर्डीकर विश्वास लक्ष्मण, जी. डी. सी.
९. श्री. पारखी दत्तात्रय लक्ष्मण, वकील.
१०. श्री. देहाडराय यशवंत बाळकृष्ण, बी. ए., बी. टी.
११. श्री. लेले वामन महादेव.

**आयव्यय निरीक्षक**

१. श्री. जोशी महादेव रामचंद्र, एल्. सी. सी.
२. श्री. सुभेदार पुरुषोत्तम वासुदेव.

### जत सहकारी शिक्षण वर्गाचा समारोप समारंभ

दक्षिण सातारा जिल्हा को. बोर्डाच्या विद्यमानें सुरू असलेल्या सहकारी सेक्रेटरी वर्गाचा "समारोप समारंभ" जत येथें श्री. रामराव विद्यामंदिराच्या हॉलमध्यें ता. १८-१०-'५० रोजीं सायंकाळीं ५ वा. लेफ्टनंट कमांडर हिज हायनेस श्री. विजयसिंहराव रामराव डफळे, राजेसाहेब जत, यांचे अध्यक्षतेखालीं साजरा झाला.

### विद्या प्रसारिणी सभेच्या भारत हायस्कूलची नवी इमारत

विद्या प्रसारिणी सभेनें आपल्या भारत हायस्कूलसाठीं पुणें येथें सुमारें ३ लक्ष रु. खर्चून एक नवी उत्कृष्ट इमारत बांधली आहे. तिचा उद्घाटन समारंभ ना. बा. गं. खेर, मुख्य व शिक्षण मंत्री, ह्यांच्या हस्तें शनिवार दि. २१ रोजीं पार पडला. पुणें व लोणावळें येथील तिच्या इंग्रजी-मराठी शाळांतून सुमारें २,००० विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. ह्या नव्या इमारतीमुळें सभेच्या लौकिकांत व लोकप्रियतेंत उत्कृष्ट भर पडणार आहे.

### प्रकाशाची गति किती?

आतांपर्यंत अमेरिकन संशोधक मि. मायकेलसन ह्यांनीं केलेल्या प्रयोगावरून प्रकाशाची गति दर सेकंदास १,८६,२७१ मैल आहे असें मानण्यांत येत असे. परंतु ब्रिटिश सरकारच्या शास्त्रीय संशोधन खात्यांतील प्रयोगांतीं ही गति १,८६,२८२ मैल आहे असें ठरविण्यांत आलें आहे. ह्या नव्या सुधारलेल्या संशोधनामुळें राडर, अणु विज्ञान आणि ज्योतिर्विज्ञान ह्या विषयांचीं गणितें अधिक बरोबर काढतां येऊं लागतील.

हें पत्र पुणें, पेठ भांबुर्डा घ. नं. ९१५।१ आर्यभूषण छापखान्यांत केशव गणेश शारंगपाणी यांनीं छापिलें व श्रीपाद वामन काळे, बी. ए. यांनीं 'दुर्गाविलास', ४२३ शिवाजीनगर (पो. ऑ. डेक्कन जिमखाना) पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.

किंमत १ रुपया

र. नं. बी. २४३४

# अर्थ

दिवाळी अंक

दिवाळी अंक

" अर्थ एव प्रधानः " इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति । —कौटिलीय अर्थशास्त्र

वर्ष १६ | पुणें, बुधवार तारीख ८ नोव्हेंबर, १९५० | अंक ४४

॥ श्री ॥

## दि बृहन्महाराष्ट्र शुगर सिंडिकेट लि०, पुणें २.

आमचे भागीदार व ठेवीदार यांना यंदाची दिवाळी व नूतन वर्ष सुखाचें व भरभराटीचें जावो.

### कंपनीला कोणत्याहि बँकेचें कर्ज नाहीं

नवीन १००० टनांच्या मशिनरीच्या उभारणीला लागणाऱ्या रकमेकरितां न्यायमूर्ति भिडेसाहेब, I. C. S. (Retd.), बॅरिस्टर रामराव देशमुख, अमरावती, सर गुरुनाथ बेवूर, I. C. S. (Retd.), न्यायमूर्ति ढवळेसाहेब, I. C. S. (Retd) अशा सिंडिकेटचे शेअर घेऊन शिवाय ठेवी दिलेल्या, नामवंत भागीदारांच्या भेटी घेतल्या.

**भेटीच्या वेळीं मिळालेल्या सूचनांचा आशयः—**

(१) नवीन मशिनरीची उभारणी शक्य तितक्या लवकर व्हावयास पाहिजे.
(२) कंपनीच्या भागीदारांना, ठेवीदारांना व हितचिंतकांना नवीन मशिनरीच्या उभारणीकरितां एक वर्ष मुदतीनें ठेव देणें सोयीचें होईल व शेअरपेक्षां ठेवी लवकर मिळतील.
(३) ६ टक्के व्याज बँकेला दिलें तसेंच ठेवीलाहि १ वर्षाला ६ टक्के व्याज ठेवावें.
(४) मशिनरीची उभारणी पूर्ण झाली म्हणजे वरील दराच्या ठेवी घेणें बंद करावें.

### ठेवीची मुदत १ वर्ष : व्याज ६ टक्के

मुदतीच्या ठेवीचे फॉर्म सिंडिकेटच्या पुणें येथील मुख्य कचेरींत मिळतील.

तारीख २०-१०-१९५०.
कॉमनवेल्थ बिल्डिंग,
९८०, सदाशिव पेठ,
लक्ष्मी रोड, पुणें २.

चंद्रशेखर गोविंद आगाशे,
बी. ए., एलएल. बी.,
सी. जी. आगाशे अँण्ड को.,
मॅनेजिंग एजंटस्.

★ ही दीपावली आमचे भागीदारांस व खातेदारांस भरभराटीची जावो. ★

# बँक ऑफ महाराष्ट्र लि.

महाराष्ट्राच्या मानाचें स्थान



२५७२

भांडवल

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल | रु. ५०,००,००० |
| विक्रीस काढलेलें व खपलेलें भांडवल | रु. ३२,००,००० |
| वसूल झालेलें | रु. १६,००,००० |
| रिझर्व्ह व कॉंटिन्जन्सी फंड | रु. ४,७१,००० |
| एकूण खेळतें भांडवल | रु. २॥ कोटींचे वर |

चिं. वि. जोग, मॅनेजर.

हेड ऑफिस - लक्ष्मी रोड पुणें २

मराठी उद्यमदेवतेच्या अंगावरील तळपतें माणिक

—म्हणजे—

# चितळे ॲग्रिकल्चरल प्रॉडक्टस् लि.

रजिस्टर्ड ऑफिस : वेस्टर्न इंडिया हाऊस, सर फिरोजशहा मेथा रोड, कोट, मुंबई.

**वाढत्या धंद्यासाठीं कंपनी खालील दरानें ठेवी स्वीकारते.**

कमी मुदतीनें ठेवी ठेवणारांसाठीं कंपनीनें खास सोय केली आहे.

**ठेवी**

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| कमी मुदतीच्या | मुदत महिने— | ३ महिने | ६ महिने | | ९ महिने |
| | व्याजाचा दर—द. द. शें. | २½ % | ३ % | | ३½% |
| दीर्घ मुदतीच्या | मुदत वर्षे— | १ | २ | ३ | ४ | ५ ते ७ |
| | व्याजाचा दर—द. द. शें. | ४% | ४½ % | ५ % | ५½% | ६ % |

अधिक माहितीसाठीं आजच वरील पत्त्यावर लिहा:—

चितळे ब्रदर्स,
मॅनेजिंग एजंटस्.

## दि प्रेसिडेन्सी इण्डस्ट्रिअल बँक लिमिटेड, पुणें

ऑफिस टे. नं. २७६३. [ शिड्यूल्ड बँक ] मॅनेजिंग डायरेक्टर टे. नं. २६०७

हेड ऑफिस : प्रेसिडेन्सी बँक बिल्डिंग, पुणें २.
मुंबई शाखा : ८२ मेडोज स्ट्रीट, कॉमनवेल्थ बिल्डिंग, फोर्ट, मुंबई १.

| | |
|---|---|
| अधिकृत, विक्रीस काढलेलें व खपलेलें भांडवल | ... रु. १०,००,००० |
| जमा झालेलें भांडवल | ... रु. ७,१८,६३५ |
| खेळतें भांडवल | ... रु. ७५,००,००० |

अध्यक्षः—श्री. ग. रा. साठे उपाध्यक्षः—श्री. द्वा. ग. बापट

— बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात. —

"भागीदार, खातेदार व ठेवीदार होऊन महाराष्ट्राचे उन्नतीस हातभार लावा."

गो. धों. जोगळेकर, बी. ए. (ऑ.), बी. कॉम्., एलएल्. बी. मॅनेजर

चिं. त्रिं. चितळे, मॅनेजिंग डायरेक्टर



## दि व्हल्कन इन्शुअरन्स कं. लि.

—पुणें शाखा—

१७९, कर्वे बिल्डिंग, लक्ष्मी रोड.

आग, मोटार, अपघात व वर्कमेन्स कॉंपेन्सेशन ह्यांचे विमे स्वीकारणारी प्रमुख स्वदेशी कंपनी.

एजन्सी व इतर माहितीसाठीं चौकशी करा :

ब्रँच सेक्रेटरी.



## ही दिवाळी आमचे ग्राहकांस सुखाची जावो.

## पंढरीनाथ ब्रिलियन्टाईन डेपो

मुंबई नं. २८.



ही दिवाळी आमचे ग्राहकांस व हितचिंतकांस सुखाची जावो.

तुमच्या कोणत्याही यांत्रिक गरजा आम्ही भागवितों. पाहिजे त्या मेकचीं उभीं व आडवीं ऑईल इंजिन्स्, पंप्स्, चक्या, हॅलर्स, तेलघाणे, डायनामो, शरद घाणे व इतर सर्व प्रकारच्या मशिनरीचे महाराष्ट्रांतील प्रमुख विक्रेते.

## दि हिंद एजन्सी लि.


## शाहूपुरी, कोल्हापूर.

( भारत पब्लिसिटी )

दीपावली अभिनंदन

# सांडू ब्रदर्स म्हणजेच ब्राम्ही तेल

## रोखीनें व हप्त्यानें विकत मिळतात.



जुनी मशीन देऊन नवी घ्यावयाची असल्यास आम्ही बदली करून देतों.

## पेडणेकर आणि कं. लिमिटेड

शिवण्याच्या यंत्रांचे व्यापारी, १७२ गिरगांव रोड, मुंबई ४.

तारेचा पत्ताः—PEDNECO, Bombay. फोन नं.२२७३८

नूतन वर्ष शुभचिंतन

स्थापना १९१८



ठेवी १ कोटी रुपयांवर बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.

## सारस्वत को-ऑपरेटिव्ह बँक लि.




नवें वर्ष आमच्या हितचिंतकांस सुखाचें जावो.

जीवनाचें अर्थशास्त्र समजण्यासाठी आहारशास्त्राची माहिती देणारें एकमेव मराठी मासिक

# आ हा र

संपादकः— बा. वि. तांबे

वार्षिक वर्गणी ५ रु.

केव्हांही वर्गणीदार होतां येईल. आजच वर्गणीदार झाल्यास दिवाळी अंक मिळेल.

कार्यालय— १७ गिरगांव रोड, मुंबई ४.

ही दिवाळी आमच्या आश्रयदात्यांस सुखाची जावो

# ☆ सरदार गृह ☆

★ मुंबईंत राहण्याची व भोजनाची उत्तम सोय. ★

★ प्रशस्त खोल्या, प्रत्येक खोलीस स्वतंत्र बाथरूम व बालकनी ★

आमच्या बाहेरगांवच्या आश्रयदात्यांना जागेबद्दल अगाऊ कळविणेची विनंती आहे.

सरदार गृह, क्राफर्ड मार्केटजवळ, मुंबई २.

ही दिपवाळी कंपनीचे विमेदार, भागीदार, एजंट
व हितचिंतक यांना सुखाची व आनंदाची जावो.

## दि इंडियन प्रोग्रेसिव्ह इन्शुअरन्स कं. लि., पुणें २.

इंडियन प्रोग्रेसिव्हची विमा पॉलिसी व एजन्सी नेहमीच किफायतशीर असते. विम्याचे हप्ते अत्यंत माफक असून १९४९ अखेरचे मूल्यमापनांत विमेदारांना हयातींतील विम्यास दरसाल दर हजारी रु. ५

व

पश्चातचे विम्यास दरसाल दर हजारी रु. ६ रिव्हर्शनरी बोनस मिळणार. वरील दराने पाऊणपट इंटेरिम बोनसही देण्याची तरतूद.

**भरपूर कमिशनवर एजन्टस नेमणें आहेत.**

माहिती मागवा.

प्रिं. व्ही. के. जोग, एम्. ए.        अ. ना. गाडगीळ.
चेअरमन.        सेक्रेटरी.

पॅगेमाऊंट लि. )

## दिवाळीचा आनंद: सह्याद्रि एजन्सी

"सह्याद्रि" विमा कंपनीचे भागीदार, विमेदार, प्रतिनिधी व हितचिंतक यांना ही दिवाळी आनंदाची, सुखाची व भरभराटीची जावो. सह्याद्रीनें विमाक्षेत्रांत मानाचें स्थान मिळविलें आहे. आपल्या दिवाळीचा आनंद सह्याद्रीची एजन्सी तावडतोब घेऊन द्विगुणित करा.

**सढळ अटी व भरपूर कमिशन.**

**सर्वत्र शाखा आहेत.**

गो. ग. सौंदणकर,

मॅनेजिंग डिरेक्टर, सह्याद्रि विमा कंपनी लि.,
नाशिक.

## बांठिया बँक लिमिटेड

हेड ऑफिस—पनवेल, जि. कुलाबा.

| | |
|---|---|
| अधिकृत व खपलेलें भांडवल | रु. ५,००,००० |
| वसूल झालेलें भांडवल | रु. ४,७८,००० |
| रिझर्व्ह व इतर फंडस | रु. ४१,००० |
| खेळतें भांडवल | रु. ५०,००,००० |

शाखा

| | |
|---|---|
| मुंबई:-६५।६७ झवेरी बझार. (टे. नं. ३४६७८) | पुणें:-१२६८ भवानी पेठ. |
| अहमदनगर:-बझार पेठ. | बेलापूररोड:-पोस्टासमोर, |
| कल्याण:-शिवाजी चौक. | भिवंडी:-बझार पेठ. |

बोर्ड ऑफ डायरेक्टर्स

| | |
|---|---|
| -: चेअरमन :- | -: व्हाइस चेअरमन :- |
| श्री. रतनचंद भिकमदास बांठिया. | श्री. विरदीचंद भूरचंद बांठिया. |
| ,, केशरचंद आनंदराम बांठिया. | ,, जे.एस.कासट, बी. कॉम. |
| ,, गंगाधर विष्णु पुराणिक. | ,, चुनिलाल जसरूप मुनोथ. |
| ,, खिवराज आनंदराम बांठिया. | ,, सोराबजी रुस्तोमजी घासवाला. |
| ,, रवजी भिमजी रंगपरिया. (ऑ. मॅजिस्ट्रेट.) | ,, ताराचंदजी दगडूरामजी भंडारी. |
| ,, केशव गोविंद लिमये बी. ए., एलएल. बी. | -: सेक्रेटरी :- ,, आर. व्ही. एम्. देसाई, B. A. |

★ *बँकिंगचीं सर्व कामें केलीं जातात.* ★

*विशेष माहितीसाठी समक्ष भेटा अगर लिहा.*

बी. आर. पी. जोशी, B. A., Cert. A. I. I. B. मॅनेजर.

## पुणें जिल्हा सहकारी खरेदी विक्री संघ लि.

४११ शनवार पेठ, पुणें २.

तारेचा पत्ता:—सॅनकोसोप.        टेलिफोन नं. ३२१५

(जिल्ह्यांतील शेतकरी व नागरी जनतेस दैनंदिन गरजेच्या वस्तू पुरविणें व शेतकऱ्यांचा माल किफायतशीर विकून देणें, या उद्देशानें स्थापन झालेली जिल्ह्यांतील मध्यवर्ती संस्था)

**संस्थेकडे खालीलसाठी लिहा अगर समक्ष भेटा.**

★ शेतीचीं सर्व प्रकारचीं अवजारें; ऊंस गाळण्याचे चरक; सल्फेट व इतर खतें; पिकांच्या रोगांवरील औषधं; पेंड.

★ शेतकी खात्यामार्फत जिल्ह्यांत होणारें पेंड, खतें व मिक्श्चर यांचें वाटप या संस्थेमार्फतच करण्यांत येतें.

★ पुणें जिल्हा ग्रामसुधारणा मंडळाच्या विद्यमानें चालू असलेल्या नियंत्रित लोखंड, सिमेंट वाटप योजनेंतील—गाड्यांचे आंस, धावपट्ट्या, नळींचे पत्रे, प्लेन पत्रे, वगैरे व सिमेंट.

★ ग्राहक सहकारी संस्थांना लागणारा माल संघाच्या अडत दुकानामार्फत पुरविला जातो.

★ शेतकऱ्यांचा शेतीचा माल संस्थेच्या अडत दुकानामार्फत पुणें येथील बाजारपेठेंत किफायतशीर रीतीनें विकून दिला जातो.

★ जिल्ह्याबाहेरील शेतकरी व सहकारी संस्था यांचा माल पुणें बाजारपेठेंत किफायतशीर रीतीनें विकून दिला जाईल.

संस्थेच्या अडत दुकानाचा पत्ता व टेलिफोन नं. ३२०५.  }  ११५।११६ भवानी पेठ, गूळ आळी, पुणें २.

स्थापना ) **अर्थ** ( १९३५

साप्ताहिक प्रत्येक बुधवारीं प्रसिद्ध होतें.
वर्गणीचे दर : वार्षिक ६ रु. सहामाही ३ रु.
दुर्गाधिवास, पुणें ४.

"अर्था" च्या वाचकांस व हितचिंतकांस नवें वर्ष आनंदाचें व समृद्धीचें जावो.

संपादक.

## अनुक्रमणिका

१ अर्थयोगाचें महत्त्व ( संपादकीय ) ३५५
२ स्वयंपूर्णता आणि नियोजन ह्यासंबंधीं कांहीं विचार ( श्री. बापूसाहेब गुप्ते ) ३५६
३ औद्योगिक संघटनेंतील हिशेबी व्यवस्था ( द. गो. कर्वे ) ३५७
४ हवामान शास्त्राच्या भावी प्रगतीचें स्वरूप ( वि. वि. सोहोनी ) ३५९
५ बँकिंग ट्रायब्यूनलचा निवाडा ( चिं. वि. जोग ) ३६१
६ औद्योगिक लोकशाही ( शं. ज. जोशी ) ३६३
७ आर्थिक संस्थांच्या निवडणुकींसंबंधीं कांहीं विचार ( 'कर्तव्य' ) ३६७
८ लहान बँकांच्या अडचणी व रिझर्व्ह बँक ( गो. वि. सराफ ) ३७१
९ मुंबई राज्यांतील सहकारी मजूर सोसायट्या ( र. गो. काकडे ) ३७३
१० बँकिंगच्या क्षेत्रांतील कांहीं बोलके आकडे ( शं. वि. संझगिरी ) ३७५
११ कॉटन टेक्स्टाइल इन्डस्ट्री वर्किंग पार्टी ( ग. कृ. चितळे ) ३७९
१२ स्वातंत्र्यानंतरचा हिंदी शेतकरी ( द. वि. चितळे ) ३८३
१३ नियोजन समाजशास्त्रदृष्ट्या झालें पाहिजे ( व. वि. लोणकर ) ३८५
१४ औद्योगिक उत्पादन कसें वाढेल ( शं. गो. नरवणे ) ३८७
१५ शिल्लक व भांडवलाची गुंतवणूक यांमधील परस्पर संबंध ( भा. म. काळे ) ३८९
१६ मुंबई प्रांतांतील क्षेत्रपायनिक आकल्प ( न. स. जोशी ) ३९१
१७ लिमिटेड कंपनीचें विसर्जन ( स. वा. दातार ) ३९९

## "अर्था" चा पुढील अंक

दिवाळीनिमित्त "अर्था" चे दोन अंक प्रतिवर्षीप्रमाणें बंद राहून, त्यानंतरचा अंक २९ नोव्हेंबर, १९५० रोजीं प्रसिद्ध होईल.



दीपावलीचे मंगलप्रसंगी

**ओगले ग्लास वर्क्स लि.***

ओगलेवाडी यांचेकडून शुभेच्छा.



* उच्च प्रतीच्या कांचमालाचे, कंदिलाचे, एनॅमल-वेअरचे व निष्कलंक भांड्यांचे कारखानदार

दीपावली शुभचिंतन

आमचे ग्राहक, विक्रेते, शेअरहोल्डर्स, वैद्य-डॉक्टर्स, हितचिंतक आणि इतर सर्व राष्ट्रबांधवांना ही दिवाळी आणि नूतन वर्ष यश-कीर्ति-आरोग्यप्रद जावो !



धूतपापेश्वर इंडस्ट्रीज लि.
पनवेल
मुंबई

**दळणाच्या चक्क्या—टूल ग्राइंडर्स**
**मशीन टूल्स**
कडबा कापण्याचीं यंत्रें—करवत मशीन्स.
या मालाबद्दल आमचेकडे चौकशी करण्यास विसरूं नका.
**केळकर बंधू, लक्ष्मी रोड, पुणें शहर.**

# अर्थ

## दिवाळी अंक

बुधवार, ता. ८ नोव्हेंबर १९५०

"अर्थ एव प्रधानः" इति कौटिल्यः





स्थापना : १९३५

संस्थापक :

प्रो. वामन गोविंद काळे

संपादक :

श्रीपाद वामन काळे

अर्थमूलौ धर्मकामाविति ।

—कौटिलीय अर्थशास्त्र


---

# अर्थयोगाचें महत्त्व

तस्मान्नित्योत्थितो राजा कुर्यादर्थानुशासनम् ।
अर्थस्य मूलमुत्थानमनर्थस्य विपर्ययः ॥
अनुत्थाने ध्रुवो नाशः प्राप्तस्यानागतस्यच ।
प्राप्यते फलमुत्थानाल्लभते चार्थसंपदम् ॥

—कौटिलीय अर्थशास्त्र

( म्हणून, राजानें नित्य उद्योग करून अर्थसाधन करावें. उद्योग हा अर्थप्राप्तीचें मूळ आहे, आणि उलट उद्योगाचा अभाव अनर्थास कारणीभूत होतो. म्हणून उद्योग न झाल्यास जवळ असलेल्या व पुढें मिळावयाच्या संपत्तीचा नाश निश्चित आहे. उद्योगानें फलप्राप्ति होऊन भरपूर संपत्ति मिळते. )

"'अर्था" चा १६ व्या वर्षाचा हा दिवाळी अंक आमचे वाचकांस आम्हांस सादर करण्यास आनंद होत आहे.

भारतापुढें आज अनेकविध प्रश्न उभे आहेत. त्यांत आर्थिक समस्येस अग्रस्थान दिलें पाहिजे. कारण, आर्थिक व औद्योगिक प्रगतीशिवाय आपलें सार्वे जीवन सुद्धां अशक्य होईल आणि लष्करी संरक्षणाचा भक्कम पाया निर्माण होऊंच शकणार नाहीं. भारताच्या नैसर्गिक संपत्तीचा अद्याप आपण उत्पादक रीतीनें पुरेपूर उपयोग केलेला नाहीं आणि ज्या गतीनें आपण जात आहोंत, ती गति आपलें उद्दिष्ट गांठण्यास असमर्थ ठरण्याचीही भीति आहे. लोकसंख्येची वाढ आणि त्या लोकसंख्येंतहि कमकुवत लोकांचा मोठा भरणा, यांत्रिक सहाय्याचा अत्यंत अपुरा उपयोग, दर माणशीं अत्यल्प उत्पादन, इ. गोष्टी आपल्या प्रगतीस आडकाठी आणीत आहेत. राष्ट्रीय स्वरूपाचे हे व्यापक प्रश्न बाजूस ठेवले, आणि नजीकचे प्रश्न विचारांत घेतले, तरी सुद्धां सर्वत्र अडचणी दिसत आहेत. भांडवलाच्या अपुऱ्या पुरवठ्यामुळें कित्येक जुने उद्योगधंदे वाढविता येणें अशक्य झालें आहे, तर नव्या धंद्यांची आतां स्थापना होऊंच शकत नाहीं अशी स्थिति आहे. त्या कारणानें, प्रगतीस व कार्यक्षमतेस पोषक असें वातावरण निर्माण होणें कठीण झालें आहे. अशा वेळींच दूरदृष्टि, कणखरपणा, भवितव्यावर पूर्ण विश्वास, परस्पर सहाय्य, दीर्घोद्योग, सचोटी इत्यादि गुणांची खरी कसोटी असते. तात्कालिक, वैयक्तिक फायद्याकडे पहाण्याचा मोह आवरणें कठीण जातें. म्हणून समाजानें म्हणजे सरकारनें तज्ज्ञांच्या साह्यानें योग्य धोरण आखून त्याची न्याय्य आणि व्यापक हिताच्या दृष्टीनें कडक अंमलबजावणी करणें अगत्याचें होतें. जनतेचा सद्गुणांवरील विश्वास नष्ट होण्यापूर्वींच नेत्यांनीं निर्भीडपणें मार्गदर्शनें केलें पाहिजे आणि संकटें केवळ न लपवितां तीं उघड करून त्यांच्यावर मात करण्याचें सामर्थ्य निर्माण केलें पाहिजे. नाहींतर नेते व सामान्य प्रजा ह्यांच्यांत फरक तो कोणता रहाणार ?

व्यक्तिहिताऐवजीं राष्ट्रहिताला प्राधान्य मिळून समाजाचा घटकावयव ह्या नात्यानेंच व्यक्तींचें महत्त्व आहे. शेती, उद्योगधंदे, व्यापार, इ. व्यवहार हीं अर्थार्जनाचीं साधनें असून त्यांच्या योग्य संघटनेवर व कार्यक्षमतेवर समाजाची सुस्थिति अवलंबून रहाणें अपरिहार्य आहे. ह्याकरितां, राष्ट्राचें नेतृत्व ज्यांच्या हातीं आहे, अशा लोकांनीं जनतेस योग्य शिक्षण देऊन सर्वांच्या अंगीं कार्यक्षमता निर्माण केली पाहिजे.

भारतांत सर्वत्र कार्यक्षम आर्थिक पद्धति आणि संघटन ह्यांचा प्रसार मोठ्या प्रमाणावर होणें आवश्यक आहे. त्याचप्रमाणें, लहानमोठ्या गांवांतून व शहरांतूनहि आर्थिक बुद्धि जागृत झाली पाहिजे. महाराष्ट्रांत तर ह्या अर्थयोगाचें महत्त्व विशेष आहे. आर्थिक लोकजागृति आणि आर्थिक व्यवहारांचें लोकशिक्षण, हाच "अर्था" च्या स्थापनेचा प्रमुख हेतु आहे औद्योगिक उत्साहाची एक मोठी लाट महाराष्ट्रावर कित्येक वर्षांपूर्वी येऊन गेली, आणि गेल्या महायुद्धाचे काळांत बरीच प्रगति झाली; त्यांतून कांहीं अडचणीहि निर्माण झाल्या. ही प्रगति पचनीं पाडून पुन्हां पुढचा पल्ला गांठतांना मागील चुका समजून घेऊन त्या टाळण्याचा प्रयत्न करणें आवश्यक आहे. आर्थिक विषयाच्या ज्ञानावांचून व अनुभवाशिवाय हें शक्य नाहीं. आर्थिक महत्त्वाच्या बाबींची वेळोवेळ माहिती देऊन त्यांचें सुगम्य विवेचन केल्यानें आपली प्रगति टिकाऊ व हितप्रद होण्यास सहाय्य होईल ह्या विश्वासानें "अर्था" चा उद्योग चालू आहे.

"अर्था" नें प्रथमपासूनच प्रगतिपर अशा शुद्ध राष्ट्रीय धोरणाचा पुरस्कार केलेला आहे. देशाच्या खऱ्या आर्थिक उद्धाराची दिशा दाखविण्याचें कार्य त्यानें हितचिंतकांच्या सहाय्यानें व प्रोत्साहनानें सतत १६ वर्षे चालू ठेवलें आहे. अनेक अनुभवी तज्ज्ञ अर्थासाठीं आपुलकीनें व तत्परतेनें लेखन करीत असतात व प्रत्यक्ष उद्योगधंद्यांत गुंतलेले हितचिंतक अन्य मार्गांनें सहाय्य करतात. आर्थिक वाङ्मयांत "अर्था"स त्यामुळें अग्रस्थान प्राप्त होण्यास फारच मोठी मदत झाली आहे. आमच्या ह्या सर्व सहाय्यकांस व हितचिंतकांस हें नवें वर्ष सुखाचें जावो.

# स्वयंपूर्णता आणि नियोजन यासंबंधीं कांहीं विचार

[ श्री. बापुसाहेब गुप्ते ]

मुंबई विधिमंडळांत राज्यपालांच्या भाषणावरून नुकत्याच झालेल्या वादविवादांत सरकारच्या कांहीं टीकाकारांनीं अशी टीका केली कीं, सरकारच्याच अंदाजाप्रमाणें मुंबई राज्याच्या अन्नधान्याच्या तुटीपैकीं, ⅓ तूट भरून येण्यास ५ वर्षें लागणार; म्हणजे या वेगानें या बाबतींत प्रांत स्वयंपूर्ण होण्यास निदान १५ वर्षांचा काळ जाणार! माझ्या मतें ही टीका चुकीची आहे; कारण मुंबई सारखा कारखानदारी प्रांत अन्नधान्याच्या बाबतींत स्वयंपूर्ण करण्याचें धोरणच मुळीं चुकीचें होईल. दुसऱ्या महायुद्धाच्या ग्रहणांतून जग मुक्त होतें न होतें तोंच तिसऱ्या महायुद्धाची अंधुक छाया त्याच्यावर पडलेली आहे. अशा स्थितींत सबंध देश अन्नधान्यासारख्या जिव्हाळ्याच्या बाबतींत लवकरच स्वयंपूर्ण करण्याचें धोरण आंखणें इष्टच आहे; शिवाय हुंडणावळ वगैरे इतर आर्थिक अडचणीमुळें तें धोरण जवळ जवळ अपरिहार्यच झालें होतें, परंतु याचा अर्थ देशांतील प्रत्येक प्रांत स्वयंपूर्ण झाला पाहिजे असा नाहीं. तसें होणें आवश्यक नाहीं व इष्टहि नाहीं. योग्य रीतीनें जितकें उत्पादन वाढवितां येईल तेवढें वाढविलें पाहिजे, यांत शंका नाहीं. पण म्हणून स्वयंपूर्णतेचा हव्यास प्रत्येक प्रांतानें धरतां कामा नये किंवा तें उद्दिष्ट प्रत्येक प्रांतावर केन्द्र सरकारनें लादतां कामा नये. उद्दिष्ट चुकीचें ठरविलें म्हणजे उपाययोजनाहि चुकीची होते व त्यामुळें इच्छित हेतु तर साध्य होत नाहींच पण इतर दुष्परिणाम मात्र भोगावे लागतात. हा झाला उद्दिष्टासंबंधीचा इषारा. पण तेवढ्यानें भागत नाहीं. पद्धतीबद्दलहि काळजी घेतली पाहिजे. स्वयंपूर्णता हें उद्दिष्ट न ठेवितां जास्तींत जास्त उत्पादन हें ठरविलें, परंतु तेंहि योग्य रीतीनें केलें नाहीं तर दुष्परिणाम होतातच. महायुद्धाच्या काळांत आपला अन्नप्रश्न बिकट होऊन बसला. त्यांत युद्धाचा काळ म्हणजे सर्व घबराटी वातावरण. अशा स्थितींत तो बिकट प्रश्न सोडविण्याला घबराटी उपाय-योजना होणें साहजिकच होतें. अधिक धान्य पिकविण्याचा कायदा होऊन जिकडे तिकडे अन्नधान्य पिकविण्याची सक्ति करण्यांत आली, पण जमीन त्या पिकाला लायख असो वा नसो. त्यावेळीं ४२ लाख एकर जमीन कापसाखालीं होती. एका वर्षांत तें क्षेत्र ५० टक्क्यांनीं कमी झालें! परिणाम असा झाला कीं, अन्नधान्याचें उत्पादन फारसें वाढलें नाहींच पण कापसाची मात्र टंचाई झाली. त्यामुळें कापडाचा तुटवडा पडला, एवढेंच नव्हें तर अन्नप्रश्नावरहि त्याचा परिणाम झाला; कारण सरकीच्या टंचाईमुळें दुधाचा कस आणि प्रमाण या दोन्ही गोष्टी कमी झाल्या! आतां दुसऱ्या टोंकाला जाण्याची भीति निर्माण झाली आहे. कारण, आतां देश कापूस आणि ताग या बाबतींतहि स्वयंपूर्ण करण्याचें धोरण आंखण्यांत आलें आहे. हें धोरण चुकीचें आहे असें मला म्हणावयाचें नाहीं. पाकिस्तानची एकंदर वृत्ति पाहतां कांहीं आवश्यक वस्तूंचें भवितव्य त्याच्या हातांत ठेवणें शहाणपणाचें नाहीं हें उघड आहे. पण या बाबतींत प्रथम एक गोष्ट केली पाहिजे ती ही कीं, घबराटी उपाययोजना करण्याची प्रवृत्ति किंवा फाटेल तेथें ठिगळ देण्याचें धोरण आतां सोडून दिलें पाहिजे. महायुद्ध संपलें असलें तरी युद्धोत्तर आर्थिक संकटांत आपण सांपडलेलों आहोंत. देशाच्या फाळणीमुळें तें संकट अधिकच तीव्र झालें आहे. शिवाय आगामी महायुद्धाची तरवार लटकतच आहे. मोठमोठ्या नद्यावरील धरणांच्या योजना पुऱ्या झाल्या म्हणजे भारताच्या शेतकीविषयक परिस्थितींत बराच फरक पडेल. अशा स्थितींत दीर्घकालीन नियोजन करण्याइतकी स्थिरस्थावर झाली आहे असें म्हणतां येत नाहीं. पण तूर्त ५–१० वर्षांच्या मुदतीचें नियोजन करण्यास हरकत नाहीं.

अर्थात् जें नियोजन करावयाचें तें देशव्यापी असलें पाहिजे, देशाच्या सर्व साधनसंपत्तीचा आढावा घेऊन ठरविलेलें असलें पाहिजे. त्यांत प्रत्येक घटकराज्य अन्नधान्याच्या बाबतींत स्वयंपूर्ण झालें पाहिजें हा अट्टहास सोडला पाहिजे. नंतर धोरणाचें मुख्य सूत्र हें असावें कीं जमीन ज्या पिकाकरितां लायख असेल त्या पिकाकरितांच ती उपयोगाकरतां आणली जावी. नाहींतर नैसर्गिक साधन संपत्तीचा अपव्यय होतो आणि अखेरीस निसर्ग आपला सूड उगवितो. एकदां आपण कापसाचें क्षेत्र कमी केलें. आतां कापसाच्या उत्पादनाला खास सवलती जाहीर करण्यांत आल्या आहेत. याचा परिणाम असा होईल कीं, त्या पिकाला चांगल्या नसलेल्या जमिनींतहि त्याची लागवड होईल. शेतकरी काय बिचारा तात्पुरत्या फायद्याकडे पाहतो. सबब सरकारी धोरणच नैसर्गिक संपत्तीचा उत्तम उपयोग करून घेण्याचें असावें. याचा अर्थ उत्पादन वाढविण्याकरितां आधिक खतें, पाणी, चांगलें बी-बियाणें, इत्यादिकांचा उपयोग करूं नये असा नव्हे. तर या साधनांचा उपयोग निसर्गाला मदत करण्याकडे केला जावा, निसर्गाच्या विरुद्ध जाण्याकरिता नव्हे. तसेंच वरील मुख्य सूत्राचा अर्थ असाहि नव्हे कीं तें धोरण अगदीं निरपवाद रीतीनें अंमलांत आणावें. त्या धोरणाला कांहीं अपवाद करावे लागतीलच: आवश्यक असूनहि ते करूं नयेत, असें मला म्हणावयाचें नाहीं. त्या बाबतींतला आग्रह एवढाच कीं ते अपवाद केवळ प्रांतिक परिस्थितीकडे दृष्टी ठेवून करूं नयेत; तर फक्त देशव्यापी योजनेच्या परिपूर्तिकरतांच करावेत. आणि याकरितां प्रथम देशाच्या अन्नधान्य, ऊंस, कापूस आणि ताग या आवश्यक वस्तुविषयक गरजा व साधन संपत्ती यांचा आढावा घेतला पाहिजे. देशांतील जमिनीचा निसर्गानुकूल असा उपयोग केल्यास वरील वस्तूंचें किती उत्पादन होईल याचा अंदाज काढला पाहिजे. त्यांत जें कांहीं कमजास्त आढळून येईल व त्याला अनुसरून निसर्ग-प्रतिकूल उत्पादन करण्याची जी कांहीं जरूरी असेल त्याप्रमाणें योजना आंखून तिच्या अंमलबजावणीचा वांटा सर्व घटक राज्यांना अगर संबंधित घटक राज्यांना वांटून दिला पाहिजे. प्रत्येक राज्यानें आपआपल्यापुरतें मन मानेल तें धोरण आंखून चालणार नाहीं.

घटक राज्यांच्या, सर्वसामान्य नेहमींच्या स्वयंपूर्णतेला मी वर जरी विरोध दर्शविला असला तरी युद्धकालीन संकटाचीहि दखल नियोजन करतांना घेतली पाहिजे. अगदीं नजीकच्या काळांत जरी महायुद्ध सुरू होण्याचा संभव नसला तरी आंतरराष्ट्रीय परिस्थिति इतकी स्फोटक झाली आहे कीं ठिणगी केव्हां पडेल आणि भडका केव्हां उडेल याचा कांहींच नियम सांगता येत नाहीं. आणि युद्ध जर खरोखर सुरू झालें तर त्याचें आधुनिक तंत्र इतकें भयंकर होईल कीं, त्यापासून संरक्षण करण्याची परिणामकारक पूर्वतयारी करणें आपल्यासारख्या दुबळ्या राष्ट्राला अशक्य आहे. तरीसुद्धां केवळ दैवावर हवाला ठेवून स्वस्थ बसतां यावयाचें नाहीं. प्रत्यक्ष युद्धांत गोविलें न जातांहि केवळ उपासमारीनें मेलें असा प्रसंग राष्ट्रावर येणार नाहीं एवढी तरी खबरदारी

घेतली पाहिजे. त्याकरितां अन्नधान्यांच्या बाबतींत घटक राज्यांच्या संकटकालीन स्वयंपूर्णतेची एक कल्पना ठरवून ती प्रत्यक्षांत आणण्याचा प्रयत्न केला पाहिजे. ती कल्पना काय असावी हें अर्थातच वैद्यकीय तज्ञ सल्ल्यावर अवलंबून राहील. उदाहरणार्थ, असें ठरलें कीं सर्व राज्यांत रेशन भागांत प्रत्येकीं निदान ६ औंस एकदल धान्य मिळालें पाहिजे, तर सर्व घटक या कसोटीला उतरतात कीं नाहीं हें लक्षांत घेतलें पाहिजे. ही कसोटी लावण्यांत युद्धाच्या काळांत केवळ ६ औंसावरच गुजराण करावी असा उद्देश नाहीं. तर शक्य तितकें परावलंबित्व कमी व्हावें व वाहतुकीच्या साधनावरचा ताण कमी पडावा एवढाच हेतु आहे.

या संकटकालीन दृष्टीनें याच्या पुढची पायरी म्हणून आणखी एक स्वयंपूर्णता लक्षांत घेणें इष्ट आहे, आणि ती म्हणजे प्रादेशिक स्वयंपूर्णता. सम आहार, सलगपणा व आटोपशीर क्षेत्र ह्या गोष्टी विचारांत घेऊन भारताचे ४१५ विभाग करण्यांत यावेत, आणि घटकांच्या कसोटीपेक्षां वरची कसोटी ठरवून त्या कसोटीनें हे विभाग स्वयंपूर्ण होतात किंवा नाहीं हें पहावें. एखादें घटकराज्य स्वयंपूर्ण नसलें पण त्याचा विभाग मात्र स्वयंपूर्ण ठरला तर घटकाच्या कमतरतेकडे दुर्लक्ष करतां येईल. येणेंप्रमाणें या सर्व गोष्टींचा सारासार विचार करून असेरची योजना लवकर निश्चित केली पाहिजे आणि तिची पद्धतशीर अंमलबजावणी सुरू केली पाहिजे.

अर्थात् आवश्यक वस्तुविषयक नियोजनाचें हें संपूर्ण विवेचन नव्हे. तें करण्याचे हें स्थळ नाहीं किंवा तें करण्याचा माझा अधिकार नाहीं: परंतु केवळ स्वयंपूर्णतेच्या चुकीच्या कल्पनेची विफलता, नियोजनाची आवश्यकता आणि योजनेची स्थूल रूपरेषा यांचें थोडक्यांत दिग्दर्शन करण्याच्या हेतूनें हा लेख लिहिला आहे. त्यामुळें या जिव्हाळ्याच्या विषयाच्या विचाराला चालना मिळावी एवढीच अपेक्षा.

---

# औद्योगिक संघटनेंतील हिशेबी व्यवस्था

[ प्रा. द. गो. कर्वे, एम. ए. ]

'यद्यदाचरति श्रेष्ठः तत्तदेवेतरेजनः', ह्या म्हणींतील आशय व्यवहाराच्या सर्व विभागांस लागू आहे. औद्योगिक प्रगतीच्या क्षेत्रांत आज अमेरिका श्रेष्ठ आहे. इतर राष्ट्रें व त्यांतील उद्योगप्रवीण नागरिक आपापल्या आर्थिक विकासाच्या योजना ठरवितांना अमेरिकेचा अनुभव व उदाहरण ह्यांचा फायदा करून घेण्याची खटपट करीत आहेत. लोकसंख्या देशाच्या विस्ताराच्या मानानें लहान, त्यांतही गेल्या दोनतीनशें वर्षांतच जुन्या राष्ट्रांतून साहसी वसाहतवाले म्हणून आलेल्यांचा मोठा भरणा, आणि लोकसंख्येच्या मानानें उपलब्ध नैसर्गिक साधनांची विपुलता ह्यामुळें अमेरिकेला आपलें आर्थिक प्रगतीचें आजचें उच्च स्थान गांठण्यास सोपें गेलें. ह्या तिन्ही बाबतींत हिंदुस्थानची परिस्थिति भिन्न आहे. मोठी आणि वाढती लोकसंख्या, हजारों वर्षें एकाच जागीं आणि एकाच चाकोरींत राहिलेले लोक, आणि लोकसंख्येच्या मानानें साधनांची कमतरता हे आपले विशेष दीर्घकालपर्यंत आपल्या आर्थिक प्रगतीच्या सीमा ठरविणार हें उघड आहे.

आधुनिक औद्योगिक संघटनेंत जमीनीबरोबर कोळसा व वीज आणि लोखंड हीं साधनें मूलभूत समजलीं जातात. लागवडीच्या जमीनीचें प्रमाण हिंदुस्थानांत माणशीं सव्वा एकर आहे, तेंच रशियांत अडीच व अमेरिकेंत पावणेतीन एकर आहे. वसाहतींत तर तें ह्याहूनही अधिक आहे. कोळशाचा सांठा हिंदुस्थानांत माणशीं ६६ टन, तर रशियांत ६,३०० टन व अमेरिकेंत १७,००० टन आहे. लोखंड हिंदुस्थानांत माणशीं १० टन, तर रशियांत १०० आणि अमेरिकेंत ६० टन आहे. शेतकी अगर कारखाना कोणताही व्यवसाय घेतला तरी आपणांकडे दरमाणशीं साधनांची विपुलता नसून तीव्र टंचाई आहे. विपुलता आहे ती मनुष्यांची आहे. ही विपुलता निव्वळ संख्येची राहिली तर तें मनुष्य"बळ" ठरण्याऐवजीं तो मनुष्य"भार" ठरेल. इतर देशांची ज़मीन, कोळसा अगर लोखंड आपणांस उचलून आणतां येणार नाहीं. परंतु तेथील लोकांचें कसब, धडाडी, संघटनाचातुर्य हे गुण आपला तसा निश्चय असल्यास विनाखर्च आपणांस उचलतां येतील. खर्च काय तो आपल्या सायासांचा, प्रयत्नांचा, दिला पाहिजे.

तुटपुंज्या साधनांत स्वतंत्रतेनें, समाधानानें व अब्रूनें राहण्यास उद्योगशीलतेचे, हिशेबीपणाचे आणि वाकबगारीचे जे गुण व्यक्तींला लागतात, त्यांचीच आपल्या राष्ट्राच्या आर्थिक जीवनांत जरूर आहे. उद्योग, कांटकसर आणि कसब ह्यांची पद्धतशीरपणें सांगड घालण्याचें आधुनिक तंत्र अमेरिका–रशिया आदि राष्ट्रांत निर्माण झालें आहे. त्याचें महत्त्व हल्लीं इतकें वाढलें आहे कीं त्याला व्यवस्था–शास्त्र असें संबोधिलें जातें. ह्या तंत्राचा उगम प्रथम कारखान्यांत झाला. प्रत्येक कामकऱ्याला मग तो लहान–मोठें, यांत्रिक अगर इतर, कोणतेंही काम करीत असो, एकंदर स्वतःची हालचाल किती करावी लागते व त्यांत त्याचा वेळ किती जातो ह्याचा सूक्ष्म अभ्यास सुरू झाला. ह्या अभ्यासाचे दोन फायदे झाले. एक तर हालचाल निष्कारण अगर गैरहिशेबी होत आहे असें आढळून आल्यास कारखान्याची व त्यांतील कामकाजाची व्यवस्था आणि घडण बदलून कामकऱ्याच्या वेळेचा आणि श्रमाचा अधिकाधिक फायदा होण्याच्या दिशेनें सुधारणा करणें शक्य झालें. दुसरें, निरनिराळ्या कामांचें श्रमाच्या, कसबाच्या, व्यग्रतेच्या, जबाबदारीच्या व इतर गुणांच्या मानानें मूल्यमापन करण्यास साधन उपलब्ध झालें. प्रमाण म्हणून एका तासांत एका कामांत कामकरी आपआपल्यापुरतें किती काम करूं शकतो त्याचा हिशेब होऊं लागला. वेतनाचे दर व हें प्रमाण ह्यांचें नातें जोडतां येऊं लागलें म्हणजे कमाई वाढवावयाची असल्यास कामाचें प्रमाण कोणत्या दिशेनें वाढविणें इष्ट व शक्य आहे ह्याचें सर्व कामकऱ्यांस दिग्दर्शन होऊं लागलें.

कारखान्यांतील अगर त्याच्या एका विभागांतील कामाची संघटना व पद्धत ह्यांचा ज्याप्रमाणें हिशेब व गणित करून कार्यक्षमता वाढविण्याचा एकसारखा प्रयत्न चालू असतो, त्याचप्रमाणें खरेदी–विक्री, भांडवल–उधारी, देखरेख व संचलन इत्यादि व्यवहाराच्या सर्व अंगांत तसेंच गणित व हिशेबी तंत्र अवलंबिलें जातें. जुन्या मुख्यतः व्यक्तिनिष्ठ व्यवस्थेंतही ह्या अंगाकडे लक्ष्य देण्यानेंच यशस्वी व्यवस्थापक आपली प्रगति करून घेत. परंतु ज्याप्रमाणें धंदा म्हटला म्हणजे त्यांतील पैशाचा कांटेकोर आणि पद्धतशीर हिशेब ठेवणें आणि त्यावरच दिग्दर्शित


होणाऱ्या सुधारणा करणें हें सर्वत्र हितावह आणि आवश्यक मानलें जातें, तितकें मनुष्यबळ, जागा, यंत्रें व इतर साधनें ह्यांच्या कामाचा हिशेब ठेवून त्याप्रमाणें पद्धतशीर सुधारणा करीत रहाणें शक्य व आवश्यक आहे ही गोष्ट हिंदुस्थानांतच काय, परंतु इतराहि अनेक देशांत अजून पूर्णपणें पटलेली नाहीं.

अमेरिका, रशिया व थोड्या प्रमाणांत इग्लंड ह्या देशांत कामाच्या हिशेबाचें व गणित पद्धतीचें तंत्र आतां सर्वमान्य झालें आहे. जसें पैशाच्या हिशेबाचें व हिशेब तपासनिसाचें काम सर्वत्र मान्य होऊन तें करणारे स्वतंत्र कामकरी, तज्ज्ञ व अधिकारी नेमले जातात त्याचप्रमाणें कामाचा व संघटनेचा हिशेब ठेवणारे व ते हिशेब तपासून सूचना करणारे कामकरी आणि तज्ज्ञ हेही नेमलेले असतात. अशा हिशेबांत सर्वसामान्य तत्त्वांबरोबरच विशिष्ट देशांतील अगर विभागांतील, आणि त्या त्या धंद्यांतील परिस्थिति पूर्णपणें ध्यानांत घ्यावी लागते. इतर देशांतील धंद्यांच्या हिशेबी अनुभवाचें पूर्ण ज्ञान करून घेऊन त्याच्या जोडीस आपल्याइकडील विशिष्ट परिस्थितीचें पूर्ण आकलन असलेला नवा हिशेबी कामकऱ्यांचा व तपासनिसांचा वर्ग निर्माण होणें जरूर आहे. त्या त्या धंद्यांतील यांत्रिक अगर शास्त्रीय तज्ज्ञांस हिशेब व संघटना ह्याचें तंत्र शिकून हें काम करणें शक्य आहे. त्याचप्रमाणें हिशेब व संघटना हें ज्यांचें विशिष्ट क्षेत्र त्यांसही त्या त्या धंद्याच्या यांत्रिक व शास्त्रीय विशेषांची माहिती करून घेऊन नव्या दिशेनें व्यवसाय करणें शक्य आहे. "काम हेंच कामाचा गुरू," असें आपणांकडील एक प्रसिद्ध कारखानदार म्हणत असत, त्या न्यायानें एकदा कामाच्या व संघटनेच्या हिशेबाची प्रथा पडली म्हणजे त्यांत काम करणाऱ्यांचें ज्ञान, अनुभव व कार्यक्षमता हीं वाढत जातील आणि त्यांच्या उपयुक्ततेबद्दल कारखानदार व धंदेवाले ह्यांमध्यें अधिक विश्वास उत्पन्न होईल.

कामाच्या हिशेबी तपासणींतून निर्दिष्ट होणाऱ्या सुधारणा करतांना सामान्य कामकरीवर्गाचा दृष्टिकोण नेहमीं ध्यानांत घेतला पाहिजे. सुधारणा त्याच वेतनावर आपणांकडून अधिक काम करून घेण्याकरितां आहे असा कामकऱ्यांचा ग्रह झाला तर त्यांचा हिशेबी सुधारणेस तीव्र विरोध होतो, असा सर्वच देशांत अनुभव आहे. परंतु मालक व नोकर ह्यांमध्यें धंद्याच्या कमाईची वांटणी कोणत्या प्रमाणांत आणि कोणत्या पद्धतीनें व्हावी हें सर्वमान्य तत्त्वांनुसार ठरलेलें असल्यास सुधारणेला कामकऱ्यांचा विरोध होण्याऐवजीं त्यांचें सक्रिय साहाय्य लाभतें. अनेक देशांत कामकरी संस्था आपलेही तज्ज्ञ बाळगतात व त्यांच्या आणि मालकांनीं नेमलेल्या तज्ज्ञांच्या सहकार्यानें नवी योजना ठरविली जाते. कामकरी संघटना, कामगारविषयक कायदे, हे कायदे लागू करणारीं न्यायमंडळें हीं सर्व आतां वाढत आहेत. त्यांच्या कामांतही सार्वत्रिक कार्यक्षमतेच्या हिशेबानें मदत होईल.

औद्योगिक संघटनेंत चालू चाकोरींतून निर्माण होणाऱ्या सामुग्रीची वांटणी कशी व्हावी हा प्रश्न जितक्या लवकर हाता-निराळा होईल तितका बरा. म्हणजे कामकरी, व्यवस्थापक व तज्ज्ञ ह्या सर्वांचें लक्ष्य विधायक रीतीनें आहे त्यापेक्षां अधिक चांगलें व वाढीचें उत्पन्न कसें काढावें इकडे लक्ष केंद्रित होईल. परंतु ह्या विधायक व विकासात्मक कार्यास आजही पुष्कळ वाव आहे, तिकडे कामकरी, व्यवस्थापक व तज्ज्ञ ह्यांचें अधिक लक्ष जाणें जरूर आहे.

---



# हवामानशास्त्राच्या भावी प्रगतींचें स्वरूप

[ श्री. विश्वनाथ विष्णु सांठ्ये, बी. ए. ( ऑ. ), एम. एस्सी., डायरेक्टर जनरल ऑफ ऑब्झरवेटरीज, दिल्ली ]

मानवाला अगदीं पुरातन काळापासून वातावरणांतील निरनिराळ्या घडामोडींना तोंड द्यावें लागलें आहे. नित्य घडून येणाऱ्या हवामानांतील फेरफारांमुळें त्याच्या एकंदर रहाणीवरहि अनेक महत्त्वाचे परिणाम झालेले आहेत; कित्येक शतकांपासून निरनिराळ्या देशांत रूढ झालेल्या हवामानासंबंधींच्या विविध समजुतींत व वाक्प्रचारांत त्यांचें उत्कृष्ट प्रतिबिंब दिसून येतें. आपल्याहि देशांतील कित्येक पुरातन ग्रंथांतून असले वाक्प्रचार आढळतात. पुष्कळदां, त्यांमध्ये वेडगळ समजुती ( लोकभ्रम ) व हवामानावरील दैवी अथवा अतिमानुष शक्तींच्या प्रभुत्वाबद्दलच्या कल्पना दिसून येतात. तरी पण कांहीं कांहीं मुलभूत मुद्दे मात्र अचुकपणें ताडलेले दिसतात. उदाहरणार्थ, पावसानंतर किंवा पूर्वी आकाशांत अनेकदा दिसून येणारा अर्ध–वर्तुळाकृति किंवा कमानदार सप्तरंगी पट्टा हें इंद्राचें धनुष्यच होय आणि ढगांतील लकाकणारी रेषाकृति वीज ही इंद्राच्या तलवारीची चमक होय, या कविकल्पना होत. तेंच सर्व पर्जन्याला सूर्यच कारणीभूत होत असतो असें जें मनुस्मृतींत म्हटलें आहे तें अगदीं बरोबर आहे; आणि सूर्य–चंद्राभोंवतालचीं खळीं एकदोन दिवसांतच येणाऱ्या पावसाचीं लक्षणें होत असें बृहत्संहितेंत म्हटलें आहे तें देखील अगदीं पायाशुद्ध होय. हवामानांतील आगामी घडामोडींचें भविष्य वर्तविणें हा जरी हवामान शास्त्रांतील एक अत्यंत महत्त्वाचा भाग असला तरी तेवढ्यानेंच तें संपत नाहीं. हवामानाच्या मोजमापनाचीं यंत्रें, त्यांच्या सहाय्यानें घेतलेले वेध व जमविलेली एकंदर माहिती यांचा उपयोग अनेक प्रकारांनीं करून घेतां येतो. उदाहरणार्थ पाणीपुरवठा, शेतकी, जल–विद्युतशक्ति इत्यादिसाठीं; तसाच वायुमापनाच्या माहितीचा उपयोग इमारती, पूल, पवनचक्क्या इत्यादि उभारण्यासाठीं होत असतो. निसर्गोपचारांच्या रुग्णालयांसाठीं योग्य अशी जागा ठरवितांना व एकंदर जनतेच्या दृष्टीनें हवेचें उष्णतामान व आर्द्रता यासंबंधींचीं मोजमापें फार उपयुक्त ठरतात. तरी सुद्धां हवामानांतील आगामी घटनांचें भविष्य वर्तविणें हेंच हवामानशास्त्राचें सर्वांत महत्त्वाचें कार्य होय, असें सर्व लोकांना वाटत असतें. आतां केवळ निरीक्षकाच्या ठिकाणाहून घेतलेल्या वेधांवरून आगामी हवामानाचें भाकित करतां येत नाहीं; कारण आपलें हवामान स्थानिक किंवा आपल्या नेहमींच्या सरावांतील आजूबाजूच्या लहान टापूपेक्षा कितीतरी पटीनें विस्तृत अशा प्रदेशावरील एकंदर वातावरणाच्या अवस्थेवर अवलंबून असतें. शिवाय, हवामानाला आंतरराष्ट्रीय मर्यादांचें बंधन मुळींच नसतें. वातावरणांतील खळगे आणि वादळें यासारख्या स्थलांतर करणाऱ्या घटना एका देशांतून दुसऱ्या देशांत अगदीं स्वैरपणें संचार करतात. थंडीच्या काळांत भारतामध्यें येणारे कांहीं खळगे तर भूमध्य समुद्रावर उद्भवून इराण आणि पाकिस्तान यावरून येत असतात. मोसमी पर्जन्यकाळांतील खळग्यांचा आणि पर्जन्योत्तर काळांतील चक्री वादळांचा मागोवा ब्रम्हदेश, इंडोचायनाच काय पण थेट चिनी समुद्रापर्यंतहि मागें जाऊन घेतां येतो. तेव्हां पृथ्वीच्या अधिकांत अधिक पृष्ठभागावरील वेध एकत्र जमविण्यावर हवामानाचें भविष्य वर्तविणें अवलंबून असतें हें उघड आहे; आणि म्हणूनच शीघ्र दळणवळणाचीं साधनें आपल्याला उपलब्ध झाल्यानंतरच—म्हणजे तारायंत्राचा शोध लागून निरनिराळ्या देशांत त्याचा सार्वत्रिक प्रसार झाल्यानंतरच—या शास्त्रांतील खरी प्रगति झाली आहे. भारतामध्यें हवामानाचें भविष्य वर्तविण्याची मूळ सुरवात होण्यास दोन विध्वंसक चक्रीवादळें कारणीभूत झालीं. इ. स. १८६४ च्या आक्टोबर मधील पहिल्या वादळानें कलकत्त्यांत हाहाकार उडवून दिला व त्यामुळें अदमासें ८०,००० लोक प्राणास मुकले; कांहीं आठवड्यानंतर लोच दुसऱ्या वादळानें मच्छलीपट्टणला अजमासें ४०,००० लोक मेले. बंदरांना आणि समुद्रावरील बोटींना आगामी प्रतिकूल हवामानाच्या धोक्याच्या सूचना देण्याच्या मुख्य उद्देशानें भारताच्या हवामान खात्याला यानंतरच सुरवात झाली.

हवेचें उष्णतामान, दाब, वायुवेग इ. संबंधीचे निरनिराळ्या ठिकाणीं घेतलेले वेध एखाद्या मध्यवर्ती केंद्रांत तारायंत्रें, दूरमुद्रण यंत्रें किंवा बिनतारी यंत्रें यासारख्या शीघ्र दळणवळणाच्या साधनांनीं गोळा करून तेथें त्यावरून काढलेल्या निरनिराळ्या प्रकारच्या नकाशावरच आगामी हवामानाचें भविष्य वर्तविणें अवलंबून असतें तें बहुतेकांना माहीत असेलच. अनेक वर्षेपर्यंत जमिनीलगतच्या हवेचे घेतलेले वेध हेच तेवढें हवामानतज्ज्ञांचें साधन असें. शास्त्रिय प्रगतीमुळें उद्जन वायूनें भरलेल्या फुग्यांचें सहाय्यानें उच्च वातावरणांतील वारे अजमावण्याच्या नवीन पद्धति प्रथम निघाल्या; आणि नंतर वातावरणाचा ठाव घेण्याचीं, निरनिराळ्या थरांतील उष्णतामान व आर्द्रता मोजण्याचीं नवीन यंत्रें बनविण्यांत आलीं. त्यामुळें हवामानतज्ज्ञाची दृष्टि पार बदलून गेली. ज्या प्रदेशावरील हवामानाचें भविष्य वर्तवावयाचें असेल तेथील फक्त जमिनीलगतच्या घटनावरच आपली दृष्टि केंद्रित न करतां जमिनीच्या वर कमींत कमी तीन–चार मैल उंचीपर्यंतच्या वातावरणाची परिस्थिति अजमाविण्याचा तो प्रयत्न करीत असतो, आणि अशा माहितीवरून हवामानांतील विविध घटनांचें ज्ञान त्याला अधिक चांगल्या प्रकारें होतें. रेडार आणि रेडिओ-सॉंड हीं त्याच्या हातीं मिळालेलीं नवीं साधनें होत. रेडिओसॉंडमध्यें एका लहानशा रेडिओच्या प्रेषकाला हवामानाचे वेध घेणारीं नाजुक यंत्रें जोडून एका मोठ्या फुग्याबरोबर आकाशांत उंच नेलीं जातात. हें यंत्र वातावरणाच्या निरनिराळ्या थरांतून जसजसें वर चढत जातें तसतसें तेथील हवेचें बदलणारें उष्णतामान व आर्द्रता यासंबंधींचे संदेश तें आपोआप धाडीत रहातें. जमिनीवरच ठेविलेल्या रेडारमधील प्रेषकाच्या सहाय्यानें फुग्याबरोबर आकाशांत वरवर चढत जाणाऱ्या एका परावर्तक निशाणावर रेडिओच्या तुटक तुटक लहरी टाकल्या जातात व त्या परावर्तन पावल्यानंतर रेडारमधील ग्राहक यंत्रानें त्या ग्रहण केल्या जातात. अशा वेधावरून निशाणाचें निरनिराळ्या वेळचें स्थान कळूं शकतें व वातावरणांतील वारे अजमावितां येतात.

आतां यापुढें आपल्याला नवीन काय करतां येईल बरें ? असा प्रश्न हवामान शास्त्रांतील भावी प्रगतीसंबंधी विचारतां येईल. आज आपले हवामानाचे अंदाज कांहीं शंभर टक्के अचूक नसतात; अदमासें ८० ते ९०% ते बरोबर असतात. आपल्याला आज अगदीं संपूर्ण बरोबर असें पुढील २४ तासांतील घटनांचें भविष्य वर्तवितां येत नाहीं. त्याच्या पुढें ३६ किंवा ४८ तासानंतरच्या परिस्थितीसंबंधी नुसती “ अपेक्षा ” च दर्शवितां येते; व त्यांत चूक होण्याचाहि संभव अधिक असतो. तेव्हां यापुढील प्रगतीची दिशा म्हणजे आपल्याला अधिक दूरवरच्या काळांतील आणि

नमुन्याच्या प्रॉव्हिडंड फंड नियमांतील १२ वा नियम खालील-प्रमाणें बदलण्यांत यावा:—

फंडांस बँकेनें केलेल्या कॉंट्रिब्यूशनची सबंध रक्कम कोणत्याहि नोकरानें नोकरीचीं १० वर्षें पुरीं करण्यापूर्वी किंवा त्याच्या मृत्यूपूर्वी ( जें आधीं घडेल त्यापूर्वी ) त्यास मिळणार नाहीं. दिवाटिया निवाड्याप्रमाणें बँकेची कॉंट्रिब्यूशन हळुहळु वाढत्या प्रमाणांत देण्यांत यावी. उदाहरणार्थ,

| नोकरीचीं वर्षें | बँकेनें यावयाची कॉंट्रिब्यूशन |
|---|---|
| ६ | १/५ |
| ७ | २/५ |
| ८ | ३/५ |
| ९ | ४/५ |
| १० | सबंध |

वरील नियमाप्रमाणें, निवृत्त होणाऱ्या नोकराची जी रक्कम बढेल ती बाकीच्या नोकरांमध्यें यथा-प्रमाण वांटून देण्यांत यावी. आजारीपणामुळें किंवा स्वतःच्या आंवाक्याबाहेरील कारणांमुळें एखाद्या नोकरास बँकेची नोकरी सोडणें भाग पडलें तर मात्र वरीलप्रमाणें वर्षें पुरीं झालीं नसलीं तरी त्यास बँकेची सबंद कॉंट्रिब्यूशन मिळावी. बँकेस नुकसानी आणणाऱ्या गैरवर्तणुकी-बद्दल नोकरास बडतर्फ करण्यांत आलें असेल, तर त्याचे बाबतींत बँकेची कॉंट्रिब्यूशन फंडांत वर्ग व्हावी. कॉंट्रिब्यूशन इतकी रक्कम वसूल करून घेण्याचा अधिकार ट्रस्टींना असावा आणि फंडाच्या ट्रस्टींनीं ही रक्कम बँकेच्या स्वाधीन करावी.

सोमवार ते शुक्रवार कारकुनांनीं ६½ तास व कनिष्ठ नोकरांनीं ७½ तास काम करावें आणि शनिवारीं हेच तास अनुक्रमें ३½ व ४ असावेत, असें ट्रायब्यूनलनें सांगितलें आहे. गुमास्ता कायद्यानें घालून दिलेल्या तासांपेक्षांहि हे कमी आहेत. कामाचे तास कमी केल्यानें बँकांनीं जनतेशीं व्यवहार करण्याची वेळहि कमी होणें अपरिहार्य आहे. हल्लीचे ४ तास ३ किंवा ३½ तास करावे लागतील. व्यापार व उद्योग ह्यांची त्यामुळें गैरसोय होणारच. सरकारी कचेऱ्यांतील कामाचे तास लक्षांत घेऊन ट्रायब्यूनलनें बँकांचे तास ठरवून दिले आहेत. परंतु बँकांचे सर्व व्यवहार पैशाचे असतात आणि पत्रव्यवहार आणि इतर कामें रोजचीं रोज पुरीं करावीं लागतात. त्यांत विलंब झाला तर जनतेची फारच गैरसोय होते. उदाहरणार्थ, एखाद्या खातेदाराच्या खात्यांत रक्कम जमा केली किंवा त्यांतून काढली हें त्याला कळविण्यास उशीर झाला, तर त्याच्या खात्यांतील रकमेविषयीं तो साशंक राहून त्याची पुढील व्यवहारांत अडचण निर्माण होईल. खातेदारांकडून चौकशी होऊं लागून पत्रव्यवहार निष्कारण वाढेल. बँकेंतील नोकरांचें काम डोक्याचें असल्याकारणानें त्यांची गिरणीकामगारांशीं तुलना करणें योग्य होणार नाहीं हें मान्य करूनहि, ठरवून दिलेले तास फार कमी आहेत असेंच म्हटलें पाहिजे. ते किमान सात ( सुट्टी वगळून ) करण्यांत आले पाहिजेत. सरकारी कचेऱ्यांतील कामाचे तास अर्ध्या तासानें वाढविण्यांत आले आहेतच. शनिवारीं कामाचे तास फक्त ३½ तास ठेवले तर त्या दिवशीं कलेक्शनला आलेले चेक त्यानंतरच्या सोमवारीं पाठविले जातील आणि एक दिवस उशीरानें खातेदारांच्या खात्यांत ते जमा होतील. म्हणून, शनिवारीं कामाचे ५ तास असावेत. कनिष्ठ नोकरांच्या कामाचे तास कमी करण्याचें कांहींच प्रयोजन दिसत नाहीं. त्यांचें काम डोक्याचें नसतें, किंवा गिरणी कामगारांसारखें कष्टाचेंहि नसतें. त्यांना झाडलोट, साफसफाई, इत्यादींसाठी अगोदर कचेरींत यावें लागतें आणि मागाहून जावें लागतें. म्हणून त्यांच्या कामाचे तास सोमवार-शुक्रवार ८ व शनिवारीं ६ असावेत.


आर्थिक सुस्थिती साधा
म्हणजे
दिवाळी आनंदाची वाटेल

वेस्टर्न इंडिआ विमा कंपनीची विमा पॉलिसी आपणांस आर्थिक स्वास्थ्याचा लाभ करून देईल.

अधिक माहितीसाठीं भेटा अगर लिहा

पुणें शाखा : १७९ बुधवार पेठ, बेलबाग चौक, पुणें २. फोन नं. ३४०१

मॅनेजर, वेस्टर्न इंडिआ आयुर्विमा कं. लि., सातारा.

शेतकरी सहकारी संघ लि., कोल्हापूर (शाहूपुरी).

(स्थापना २३।१०।१९३९)

हेड ऑफिसः शाहूपुरी, कोल्हापूर.

—: शाखा :—

१ जयसिंगपूर, २ इचलकरंजी, ३ वडगांव, ४ गारगोटी, ५ हुपरी, ६ बांबवडे, ७ गडहिंग्लज

—डेपो—

८ कोडोली, ९ आजरा, १० कळें, ११ मुरगूड, १२ कागल, १३ राधानगरी, १४ रुकडी.

खेळतें भांडवल १५ लक्ष रु. पर्यंत.

संघानें आपले ध्येयानुसार भरीव कामें करून जनता व सरकार यांचा पूर्ण विश्वास संपादन केला आहे व सहकारी औद्योगिक क्षेत्रांत पाऊल टाकण्याचा प्रयत्न चालू आहे. या संस्थेस जरूर भेट यावी अशी विनंती आहे.

आमचे सहकारी बांधवांना पुढील वर्ष सुखाचें जावो.

ता. गो. मोहिते. मॅनेजिंग डायरेक्टर.

एस्. एल्. बेनाडीकर. ( क्षात्रजगद्गुरु ) प्रेसिडेंट.

# औद्योगिक लोकशाही

[ श्री. शंकर अ. जोशी, बी. कॉम., उद्योगमंडळ, मलवाये ( त्रावणकोर-कोचीन ) ]

लोकशाही हा एक समाजजीवनाचा मार्ग आहे.

घटना–कायदा मानण्याची तयारी; निवडणूक पद्धतीनें बहुमतवाल्यांचा कारभार असला तरी अल्पमतवाल्यांच्या मताला मान; भीति वा तमा न बाळगतां निस्पृह कारभार; शासितांच्या विश्वासावर आपलें शासकाचें स्थान अधिष्ठित असल्याची कार्यकर्त्या पुढाऱ्यांना जाणीव आणि तो विश्वास उडाल्याचें दिसतांच माना–अधिकाराच्या जागा खालीं करून देण्याचा मनाचा उमदेपणा; जनतेची स्वतंत्र विचार करण्याची पात्रता व विचार उघडपणें बोलून दाखविण्याची मोकळीक असलेलें वातावरण, हे लोकशाहीचे पंचप्राण आहेत. लोकशाही यशस्वी व्हावयाची तर यांची जपणूक अतिशय कसोशीनें करावयास हवी.

बॅ० रामराव देशमुखांनीं म्हटल्याप्रमाणें "लोकशिक्षणाच्या शाळा असूं शकत नाहींत. लोकशाही नांदण्याचें शिक्षण व्यवहारांतच येतें. या शिक्षणाला अधिकारारूढ लोकांपासून सुरवात व्हावयाची असते. त्यांनीं लोकांमध्यें लोभ, आमिष, लांचलुचपत, स्वार्थीध धोरण न ठेवणें, अधिकारावरून आपपरभाव भाषणांत केवळ नव्हे तर कृतींत न दाखविणें, लोकांना कायदा दाखवून स्वार्थाकरितां तो न मोडणें, अधिकार-समर्थनार्थ किंवा अधिकार टिकविण्याकरितां सरकारी यंत्राचा उपयोग न करणें, सार्वजनिक पैसा किंवा साधनें आपल्या घरगुती सावकारी पेढीची बाब आहे म्हणून त्याचा दुरुपयोग न करणें आणि अधिकार–बळकटीकरितां वर्गकलह न माजविणें वगैरे गुण कृतींत दाखविण्यानें येणार आहेत."

राजकीय आणि औद्योगिक क्षेत्रांतील कामांत एक महत्त्वाचा फरक असतो. तो असा कीं, मंत्री आपल्या खात्याच्या कामांत तज्ज्ञ असलाच पाहिजे असें नाहीं. लोकमताची दखल घेऊन, तज्ज्ञांच्या ज्ञानाचा आणि कायम नोकरींतील अधिकारी मंडळींच्या अनुभवाचा उपयोग करून घेण्याची कला त्याचेजवळ असली तरी पुरतें, चालून जातें.

मोठाल्या धंद्यांबाबत कांहींसें असेंच असलें तरी बहुसंख्य, विविध, लहान व मध्यम धंद्यांत चालकाला स्वतःच्या धंद्याची आमूलाग्र माहिती असावी लागते.

मोठ्या धंद्यांतही असें आढळतें कीं, ज्या गिरण्या–कारखान्यांत चालक मंडळी तज्ज्ञांना व त्यांच्या मतांना मान देऊन त्यांच्या सल्ल्यानुसार कार्य करतात तेथील कामकाज व उत्पादन विशेष कार्यक्षम पद्धतीनें चालतें. औद्योगिक व्यवहारांत सर्व संबंधीयांची संस्था व चालक यांबद्दलची भावना–निष्ठा फार महत्त्वाची असते.

असें असल्यानें औद्योगिक क्षेत्रांत एक चालक बदलून त्याचे जागीं दुसरा येणें तितकेंसें सहज वा श्रेयस्कर नसतें.

व्यक्ति–प्रयत्नांनीं गिरण्या–कारखाने उभारले जात असल्यानें संस्थापकाचें स्थान त्या संस्थांत महत्त्वाचें राहणें क्रमप्राप्तच असतें. तथापि हे प्रयत्न बहुधा लिमिटेड कंपन्यांच्या रूपानें होत असतात आणि अशा कंपन्यांची मूळ बैठक कायद्यानेंच लोकशाहीची आहे.

असंख्य शेअरहोल्डर्स हे कंपनीचे मालक. त्यांचे प्रतिनिधी डायरेक्टर्स. त्यांची नेमणूक निवडणुकीनें होते. त्यांच्या सल्ल्यानें व देखरेखीखालीं मॅनेजिंग एजंट तथा चालक यांनीं काम करावयाचें असतें.

चालक हे तज्ज्ञ, दैनंदिन व्यवहार पाहणारे असे असल्यानें ते कंपनी चालवितात व डायरेक्टर्स त्याला मान डोलावितात, असें कांहींसें होत असल्याचें व्यवहारांत बहुतेक दिसतें.

तसेंच, शेअरहोल्डर्सना मत असून नसल्यासारखें दिसतें. मताचा उपयोग केला तर अशा अल्प मंडळींच्या मताची दखल घेतली जातेच असें नाहीं. अशी मंडळी अधिक असतील तर हुकमी बहुमताच्या आसुडाचा उपयोग चालक मंडळी करतांना आढळतात.

आणि तसें म्हटलें तर बहुतेक शेअरहोल्डर्स कंपनीचा विचार डिव्हिडंड मिळण्या पुरताच करतांना नाहीं का आढळत? कांहीं ठराविक प्रमाणांत प्रतिवर्षी डिव्हिडंड दिलें तर मॅनेजिंग एजन्सी कराराची मुदत साधारण ठरावानें वाढविली जावी अशा अर्थाची शिफारस कंपनी कायद्यांतील सुधारणांबाबत प्रसिद्ध झालेल्या सरकारी पत्रकांत आढळते आणि त्यामुळें वरील विधानांस पुष्टिच मिळते.

तथापि, केवळ डिव्हिडंडच्या वजनानें औद्योगिक प्रयत्नांची यशस्विता तोलणें योग्य आहे का? हें मान्य केलें तर येन केन प्रकारेण नफा दाखविणारे यशस्वी; आणि केवळ धंद्यांतील प्रतिकूल परिस्थितीशीं एकतानतेनें झगडणारे नालायक, असें होईल. देशांत कारखानदारी रुजण्याच्या दृष्टीनें, खरे उद्योगपति निर्माण होण्याच्या दृष्टीनें, या सरकारी शिफारशीचा फेरविचार व्हावयास पाहिजे असें वाटतें.

ठिकठिकाणीं शेअरहोल्डर्स असोसिएशन्स् स्थापन होत आहेत. त्यांचे मार्फत शेअरहोल्डर्सच्या हित–संबंधांची जपणूक होईल असें वाटतें.

अल्पसंख्य शेअरहोल्डर्सनीं आपले डायरेक्टर्स निवडण्याची व्यवस्था सरकारी पत्रकांत सुचविली आहे.

जेथें कंपनीचे व मॅनेजिंग एजंटांचे हितसंबंध एकच असतात, कंपनीच्या यशांत मॅनेजिंग एजंटांचें यश सामावलेलें असतें, मॅनेजिंग एजंट चोख, निस्पृहतेनें काम करीत असतात, तेथें कंपनीची प्रगति झाल्याचें आढळून येतें.

पण जेथें मॅनेजिंग एजंट खरेदी–विक्रीवर कमिशनें व इतर निरनिराळे खर्च कंपनीकडून घेतात तेथें त्यांचें आणि कंपनीचें हितसंबंध परस्परविरोधी होतात; आणि मग कंपनीचें कांहींही झालें तरी मॅनेजिंग एजंटांचें खिसे जड–जडच होत राहतात. अशी स्थिती प्रामुख्यानें अहमदाबादच्या गुजराती आणि कोइमतूरच्या चेट्टियार यांच्या कापड–गिरण्यांत आढळते. अशी कमिशनें व मासिक अलावन्स घ्यावयास यापुढें कायद्यानें बंदी करण्यांत यावी अशी सरकारी योजना आहे.

या ठिकाणीं औद्योगिक आणि उत्पादन प्रश्नांतील एका नवीन घटनेचा उल्लेख करावासा वाटतो. त्रावणकोरचे भूतपूर्व दिवाण श्री. (सर) सी. पी. रामस्वामी अय्यर यांनीं म्हटल्याप्रमाणें, औद्योगिक भारतांत लक्ष्मीच्या सहाय्यानें खेळ करणारांची भुतावळ वाढत आहे. हाडाचे कारखानदार फार कमी आहेत. मला वाटतें, कारखानदारीच्या

## पूर्व खानदेश मध्यवर्ती सहकारी बँक लिमिटेड.

( स्थापना इ. सन १९१६ )

*तार पत्ता* "*EKCOBANK*" *टेलिफोन क्र. ५४.*

**मुख्य कचेरी...जळगांव ( पू. खा. )**

— शाखा —

अमळनेर, भुसावळ, बोदवड, चाळीसगांव, चोपडा, धरणगांव, एरंडोल, फैजपूर, जामनेर, पाचोरा, पारोळा, रावेर, यावल.

-- उपशाखा --

भडगांव, एदलाबाद, नशिराबाद, निंभोरा, सावदा, शेंदुर्णी, वरणगांव.

| | | |
|---|---|---|
| अधिकृत भाग भांडवल | रु. | १५,००,००० |
| वसूल भाग भांडवल | रु. | ९,२८,८०० |
| राखीव गंगाजळी | रु. | ९,७५,००० |
| इतर गंगाजळी | रु. | ६,१६,८१८ |
| ठेवी | रु. | १,५४,८१,८१२ |
| खेळतें भांडवल | रु. | २,०७,६३,१५२ |

सोसायट्यांना दिलेल्या कर्जावरील व्याजाचा दर ४ टक्के

पूर्व खानदेश जिल्ह्यांतील सर्व प्रमुख व्यापारी केंद्रांचे ठिकाणीं बँकेची शाखा अथवा उपशाखा आहे.

बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.

अधिक माहितीसाठी समक्ष भेटा अगर लिहा.

व्यं. रा. शिंदे, ॲडमिनिस्ट्रेटिव्ह ऑफिसर.

जु. शं. पाटील, अध्यक्ष.



ही दिवाळी व नवीन वर्ष असंख्य विमेदार, प्रतिनिधी व हितचिंतक यांना सुख, शांति व समृद्धीचें जावो.

## दि सुप्रीम म्यूच्युअल ॲशुअरन्स कंपनी लि. पुणें.

ठिकठिकाणीं सढळ अटीवर प्रतिनिधी नेमणें आहेत.

जास्त माहितीसाठी लिहा.

मुख्य कचेरी :

पायोनियर हाऊस, ९४७ सदाशिव पेठ, पुणें २.

दि सुप्रीम म्यूच्युअल ॲशुअरन्स कं. लि., पुणें.



सहकार्य हाच भारताचा तरणोपाय !

## दि जमखंडी स्टेट सेंट्रल को-ऑपरेटिव्ह बँक लि., जमखंडी

लवकरच

## दि जमखंडी अर्बन को-ऑपरेटिव्ह बँक लि.

हें नांव धारण करणार !

गेल्या दहा वर्षांतील प्रगती:-

| | |
|---|---|
| शेअर भांडवल ( वसूल ) | १,४४,८६५ |
| रिझर्व व इतर फंडस | १,२०,७६५ |
| एकूण खेळतें भांडवल | २४,८५,००० |
| दहाव्या वर्षाचा निवळ नफा | २९,३०० |

को-ऑपरेटिव्ह डिप्लोमा कोर्स पूर्ण केलेला कार्यक्षम नोकर वर्ग !

भर बाजारपेठेंत स्वतःचे मालकीची उत्कृष्ट दगडी इमारत !

सवलतीचे व्याजाचे दरांत ठेवी घेतल्या जातात व बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.

एस्. एम्. अथणी, आर. जी. दाते, ( मॅनेजिंग डायरेक्टर्स )

व्ही. एस्. आनीखिंडी, चेअरमन.

म. द. खाडिलकर, मॅनेजर.



नगर जिल्ह्याची सर्वांत जुनी सहकारी बँक म्हणजेच

## दि नगर डिस्ट्रिक्ट अर्बन सेंट्रल को-ऑप. बँक लि., अहमदनगर

स्थापना सन १९१०

हेड ऑफिस :—अहमदनगर शहर.

शाखा:— १ संगमनेर ( जि. नगर ). २ बेलापूर रोड. श्रीरामपूर ( जि. नगर ) ३ वांबोरी ( जि. नगर ). ४ भिंगार ( ता. नगर ).

| | | |
|---|---|---|
| (१) अधिकृत व काढलेलें भांडवल | रु. | ५,००,००० |
| (२) भरलेलें भांडवल | रु. | ३,५१,४६० |
| (३) रिझर्व्ह फंड | रु. | १,६१,७०८ |
| (४) इतर फंड | रु. | २,८५,७६६ |
| (५) चालू ठेवी | रु. | ३३,३०,९३० |
| (६) सेव्हिंग्ज ठेवी | रु. | ८,२९,१९० |
| (७) मुदत ठेवी | रु. | १४,७६,३५५ |
| (८) खेळतें भांडवल | रु. | ६४,७७,८०९ |

या बँकेंत मुदतीच्या, सेव्हिंग्ज व चालू ठेवी स्वीकारल्या जात असून सर्व प्रकारचे तारणावर कर्जे दिलीं जातात. तसेच, चेक, हुंडी, सरकारी रोख्यांची खरेदी-विक्री, वगैरे सर्व व्यवहार केला जातो.

जिल्ह्यांतील ठोक कापड वाटपाचें काम बँकेकडून केलें जातें.

दागदागिने, मौल्यवान वस्तू व कागदपत्र सुरक्षित ठेवणेसाठीं सेफ डिपॉझिट व्हॉल्टची व्यवस्था या बँकेंत आहे, तरी गरजूंनीं फायदा घ्यावा.

जास्त माहितीकरतां हेड ऑफिस अगर शाखा कचेऱ्यांकडे लिहा.

तारीख १६ ऑक्टोबर, १९५० } मो. कुं. फिरोदिया, चेअरमन.

मानानें व्यापारांत अधिक पैसा मिळतो हेंही त्याला कारण असेल. आणि हे सटोडिया व्यापारी पैशाच्या जोरावर गिरण्या–कारखाने विकत घेऊन उद्योगपति म्हणून मिरवतांना आणि मानाच्या जागा बळकावून बसलेले आढळतात. खरे कारखानदार दूरच राहतात. ज्यांचा देव केवळ पैसा, ते उत्तम, सुबक, स्वस्त आणि अधिक उत्पादन कसें करणार ? तसें करावयाचें तर त्याकरितां बुद्धि व पैसा खर्च करावा लागतो आणि परतफेडीकरितां कितीतरी वर्षें वाट पहात बसावी लागते ! या सटोडियांना ना गिरणी–कारखान्यांचें प्रेम, ना कामगारांबद्दल आपुलकी. औद्योगिक लोकशाहीचे मारेकरी हे सटोडिया गिरणी–मालकच आहेत. ही उपटसुंभी कारखानदारी गेल्या कांहीं वर्षांत फार बोकाळली आहे. देशाच्या आर्थिक व्यवस्थेंत आणि कंपनी कायद्यांत खऱ्या कारखानदारीला वाव मिळेल अशी तजवीज होणें अत्यंत आवश्यक आहे.

औद्योगिक प्रयत्नांत कामगार हे एक महत्त्वाचे भागीदार, त्यांचें हें स्थान खरें, पण तें त्यांना इतके दिवस मिळालें नव्हतें. परवडेल त्या दरानें घ्यावयाची, नाहीं तर नको म्हणावयाची जणूं कांहीं वस्तूच ! कामगारांनीं आजचें मानाचें स्थान वाढत्या संघटनेच्या जोरावर प्राप्त करून घेतलें आहे. तें टिकविणें हें सर्वथैव कामगारांच्या सुबुद्ध विचारांवर आणि नेत्यांच्या प्रभावी व्यक्तिमत्त्वावर अवलंबून राहील.

दुसरें महायुद्ध आलें आणि गेलें. त्याबरोबर आलेली नवविचारांची, जाणिवांची लाट मात्र परतली नाहीं. भारत स्वतंत्र झाला. लोकराज्य आलें. श्रमिक वर्गाची पिळवणूक थांबवून त्याच्या स्वास्थ्याची, सुखसोईची, योग्य वेतनाची किमान व्यवस्था करण्याची जबाबदारी जनतीय सरकारनें आपलेवर घेतली. भारताच्या घटनेंत तसा स्पष्ट उल्लेख आहे.

आतां संघटित कामगारांचें, धंद्यातील एक भागीदार हें स्थान मान्य करण्यांत आल्याचे बोनसबाबतचे निवाडे असंदिग्ध साक्ष देत आहेत. कामगारांच्या नफ्यांतील भागीबाबत टाटांनीं कायम योजनाच केली असून त्यांत कामगारांना मिळावयाच्या भागांत नुकतीच वाढ करण्यांत आली आहे.

याबाबत सरकारही निश्चित योजना आखीत आहे. नेहरू सरकारनें घडवून आणलेल्या औद्योगिक तहामध्यें कामगाराला त्यानें वर्षांत मिळविलेल्या मूळ वेतनाच्या किमान कांहीं टके बोनस मिळावा असें कलम दाखल करण्यांत आलें आहे.

कामगारांना बोनस, शेअरहोल्डर्सना डिव्हिडंड, चालकांना कमिशन आणि सरकारला उत्पन्नावरील कर ही नफ्याची वांटणी आतां सर्वमान्य झाली आहे.

तसेंच धंद्यांतील निरनिराळ्या जबाबदारीची जाणीव ठेवून त्यांतील महत्त्वाचे प्रश्न सोडविण्याकरितां कामगार प्रतिनिधींना चालकांबरोबरीनें स्थान मिळत आहे. सरकारनें कापड आणि कोळसा या धंद्यांबाबत दोन निरनिराळ्या वर्किंग पार्टीज नेमल्या आहेत. प्रत्येक पार्टीमध्यें सरकार, चालक आणि कामगार या तिघांचे प्रतिनिधि आहेत. पैकीं चालक आणि कामगार यांचे प्रतिनिधि समान संख्येंत ठेवण्याचें कटाक्षानें पाळण्यांत आलें आहे. या पार्टीजनीं उत्पादन कसें वाढवावें, उत्पादन–खर्च कमी कसा करावा, मालाचा दर्जा कसा सुधारावा, धंद्याची एकूण कार्यक्षमता आणि कामगार प्रश्नाबाबत व्यवस्था, उपलब्ध साधनांचा व श्रमाचा अधिकांत अधिक उत्पादक उपयोग, देशांत व परदेशांत माल विक्रीची व्यवस्था, या प्रश्नांचा विचार करावयाचा असून त्याबाबत सूचना करावयाच्या आहेत.

चालक–कामगार संबंध चांगले रहावेत, कारखान्याच्या दैनंदिन व्यवहारांतील प्रश्नांची उभयतांनीं चर्चा करावी व ते सामोपचारानें सोडवावे या करितां कायद्यानें आतां वर्क्स कमिटीची योजना केली आहे. १०० वर कामगार असलेल्या प्रत्येक कारखान्यांत वर्क्स कमिटी असावी असें आहे.

एका अर्थानें वर्क्स कमिटी म्हणजे छोटेखानी पार्लमेंटच ! कारखाना हें राज्य. त्यांतील कारभाराबाबत या पार्लमेंटमध्यें सभासदांनीं टीका करावी. अधिकारी मंडळींनीं यथाशक्ति समर्थन करावें. या पार्लमेंटनें कारखाना–राज्याकरितां कायदे पास करावेत; ते त्याला लागू. अशीं कांहींशीं लोकशाहीचीं तत्त्वें चालक व कामगार जितकीं आचरणांत आणतील तेवढी यशस्विता या वर्क्स कमिटीच्या कामाला लाभेल. कांहीं ठिकाणीं या कमिट्या कार्य करीत नसतील. कांहीं ठिकाणीं दोघांनीं आपापलीं गाऱ्हाणीं मांडावीं पण दुसऱ्यानें तीं समजूनहि घेऊं नयेत असें कांहींसें होत असेल. लोकशिक्षणांतील हे प्राथमिक अनुभव असें म्हटलें पाहिजे ! निदान दोन्ही मंडळी एका ठिकाणीं बसतात व आपापलीं म्हणणीं मांडतात व तीं सर्वजण ऐकतात एवढेंही कांहीं कमी नाहीं. त्याचा इष्ट परिणाम कालान्तरानें का होईना, झाल्याखेरीज राहील का ? आतां हें खरेंच कीं, कामगारांना किमान शिक्षण पाहिजे, स्वतंत्र मत बनविण्याची विचारांची प्रौढता पाहिजे; तसेंच चालकांनींहि कामगारांचें मानाचें स्थान जाणलें पाहिजे—मानलें पाहिजे आणि त्यानुसार वागण्याची तयारी केली पाहिजे.

शेअरहोल्डर्सचे माहितीकरितां प्रतिवर्षीं कंपनी ऑडिटरचे सहीनें नफातोटा पत्रक व ताळेबंद प्रसिद्ध करते. त्यांत शेअरहोल्डर्सनीं दिलेलें भांडवल व त्यांतून केलेल्या विनियोगाच्या व्यवहाराचा तपशील असतो. कामगारांनीं दिलेल्या श्रम-भांडवलाबाबतही असेच कांहीं तपशील ऑडिटरचे सहीनें प्रसिद्ध केल्यास त्याबाबत साशंकता राहणार नाहीं आणि कामगार विषयक प्रश्न सोडवितांना या अधिकृत आंकड्यांचा उपयोग होईल असें वाटतें.

राजकीय लोकशाही बरोबर औद्योगिक लोकशाही वाटचाल करीत आहे. कामगार चळवळ ही राजकीय चळवळीहून अलग ठेवण्यांत कामगार चळवळीचें हित आहे असें तज्ज्ञांचें मत आहे. सरकार, चालक व कामगार यांनीं आपला अधिकार व पैसा, बुद्धि आणि कष्ट एकत्र आणून औद्योगिक क्षेत्रांतील लोकशाही यशस्वी करावयाची आहे. लोकशाहीच्या मूलतत्त्वांच्या पालनावर या महान् प्रयोगाचें यशापयश अवलंबून आहे.

अमेरिका, रशिया, इंग्लंड, जर्मनी, जपान या औद्योगिक पुढारलेल्या देशांतील उद्योगधंद्यांत लोकशाही आहे, कीं हुकूमशाही आहे, कीं झब्बुशाही आहे, याची मला स्पष्टशी कल्पना नाहीं. तथापि कष्ट–त्यागाविना कांहीं कार्य होत असेल, असें नाहीं वाटत मला.

राहणीचें मान वाढून भरपूर अन्न-धान्य, कापड-वस्तू, स्वास्थ्य, सुखसोई मिळावयाच्या तर आजच्या एकाऐवजी दोन कामें करावयास पाहिजेत. अनुत्पादक व्यवहार–व्यवसायांत गुंतलेली जास्तींत जास्त लोकशक्ति उत्पादन कार्याकरितां वापरावयास हवी. विशाल दृष्टि आणि विधायक कार्य समोर नसेल तर लोकशाहीचें तारू परस्पर विद्वेषाच्या खडकावर आदळल्याखेरीज राहील का ?

फोटोग्राफीच्या कोणत्याही गरजेसाठीः
गोवारीकर अँन्ड सन्स
विल्सन रोड, कोल्हापूरः लक्ष्मी रोड, पुणें.

ही दिवाळी व नवें वर्ष बँकेच्या सर्व खातेदारांस, भागीदारांस व इतर संबंधीयांस सुखाचें व भरभराटीचें जावो.

# दी बँक ऑफ औंध लिमिटेड, सातारा.

हेड ऑफिसः–१११–११२ सदाशिव पेठ, सातारा.

शाखाः–औंध, आटपाडी, भवानीनगर व ओगलेवाडी.

—: संचालक मंडळ :—

(१) श्री. नरहर गंगाधर जोशी, बी. ए., एलएल. बी., वकील, चेअरमन, सातारा.
(२) श्री. बाळकृष्ण गणेश चांदोरकर, बी. ए., एलएल. बी. वकील, सातारा.
(३) श्री. शेठ कालिदास माईचंद, बर्मा शेल एजंट, सातारा.
(४) श्री. बाळकृष्ण रामचंद्र वर्तक, व्यापारी, पुणें.
(५) रघुनाथ दिनकर माजगांवकर, व्यापारी, सातारा.

मुंबई, पुणें, सांगली, सोलापूर, कऱ्हाड वगैरे ठिकाणांवर ड्राफ्टस् दिले जातात.

मुदत ठेवी आकर्षक दरानें १ ते ५ वर्षेपर्यंत स्वीकारल्या जातात.

बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.

विशेष माहितीसाठी लिहा अगर भेटा.

वा. वा. घमंडे.
सी. ए. आय. आय. बी.
मॅनेजर.

# दि बँक ऑफ कराड, लि.

—कराड—

( जिल्हा उ. सातारा )

( स्थापना : १९४६ )

| | | |
|---|---|---|
| वसूल भांडवल | ... ... रु. | १,१०,००० |
| खेळतें भांडवल | ... ... रु. | १८,५०,००० |

बोर्ड ऑफ डायरेक्टर्स

श्री. लक्ष्मण महादेव देशपांडे, कराड ( चेअरमन ).
,, विष्णु रामचंद्र वेलणकर, सांगली.
,, शंकरराव प्रभाकर ओगले, ओगलेवाडी.
,, पांडुरंग केशव शिराळकर, कराड.
,, मेजर सरदार बी. एन्. पाटणकर, सातारा.
,, खानसाहेब हाजी अलीमहमद कासम, कराड.
,, डॉ. वामन गोविंद देशपांडे, कराड.
,, विष्णु दत्तात्रय शिराळकर, कराड.
,, रामचंद्र अनंत अराणके, कराड.

ठेवीवरील व्याजाचे दर

चालू ठेव १% सेव्हिंग्ज ठेव १%

मुदतीच्या ठेवी १½% ते ३½%

—बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात—

कराड, ( जिल्हा उ. सातारा ) } म. वि. खंडकर
मॅनेजर

# दि महाड को-ऑपरेटिव्ह अर्बन बँक लि., महाड.

स्थापना १९३१

| | रुपये |
|---|---|
| अधिकृत व विक्रीस काढलेलें भांडवल | १,००,००० |
| खपलेलें भांडवल | ७२,५७५ |
| रिझर्व व इतर फंडस् | ६१,१२० |
| ठेवी | ६,१८,००० |
| खेळतें भांडवल | ७,७७,८५३ |

★ चालू, सेव्हिंग्ज व मुदतीच्या ठेवी स्वीकारल्या जातात.
★ भागीदारांस सर्व प्रकारचे तारणावर कर्ज, कॅशक्रेडिट व ओव्हरड्राफ्ट दिला जातो व हुंडीचे व्यवहार केले जातात.
★ बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.
★ बचतीच्या आकर्षक योजना.

मा. गो. धारप, B. Sc. (Hons.) मॅनेजर
वि. गो. मेहता. B. A., LL. B. मॅ. डायरेक्टर
वृ. न. वैद्य. B. A., LL. B. चेअरमन

# दि कमर्शिअल बँक लि.

—कोल्हापूर—

स्थापना १९३६

हेड ऑफिस—लक्ष्मीपुरी, कोल्हापूर

शाखा—( १ ) पापाची तिकटी, कोल्हापूर
( २ ) इचलकरंजी
( ३ ) हुपरी

| | | |
|---|---|---|
| अधिकृत भांडवल | रु. | ५,००,००० |
| खपलेलें भांडवल | ,, | ३,७३,२४० |
| रिझर्व व इतर फंडस् | ,, | १,६५,९०० |
| खेळतें भांडवल | ,, | ३७,००,००० |

बँकिंगचे सर्व तऱ्हेचे व्यवहार केले जातात.

—भेटा अगर लिहा—

बी. डी. मगदूम अकौंटंट
गणपतराव लक्ष्मणराव साळोखे मॅनेजिंग डायरेक्टर

# आर्थिक संस्थांच्या निवडणुकींसंबंधी कांहीं विचार

["कर्तव्य"]

कोणत्याही सार्वजनिक संस्थेचा कारभार हा त्या संस्थेच्या बहुसंख्य घटकांस संमत होऊन ज्यायोगें त्या संस्थेचे मूळ उद्देश व हेतू हे शक्य तितक्या लवकर साध्य होतील अशाच पद्धतीनें चालला पाहिजे; मग ती संस्था म्हणजे एखाद्या राष्ट्राचें सरकार असो, स्थानिक स्वराज्य संस्था असो, अगर एखादें मामुली "मंडळ" असो. ज्या संस्थेचा कारभार हा कोणत्या पद्धतीनें चालावा तें ठरविण्यासाठी अंतिम सत्ता एखाद्या विशिष्ट व्यक्तीच्या लहरीवर अगर मर्जीवर अवलंबून असते ती संस्था "सार्वजनिक" म्हणून म्हणतां येईल किंवा कसें हा एक वादाचा प्रश्न आहे. सबब अशा तऱ्हेच्या संस्था वगळून इतर संस्थांसंबंधीं या लेखांत विवेचन करण्याचें आम्हीं योजिलें आहे.

सार्वजनिक संस्था चालविण्याच्या ज्या अनेक पद्धती हल्लीं प्रचलित आहेत त्यांचें स्थूलमानानें पुढीलप्रमाणें वर्गीकरण करतां येण्यासारखें आहे:—

सुलतानशाही, बेबंदशाही, झोटिंगशाही, हुकुमशाही, जातीयवादी, धर्माधिष्ठित, विधर्मी, साम्यवादी, समाजवादी, भांडवलशाही, नोकरशाही, लोकशाही, वगैरे वगैरे.

वरील पद्धतींपैकीं अमुकच एक पद्धत पूर्णपणें निर्दोष आहे असें म्हणतां येणार नाहीं. प्रत्येक पद्धतींत कांहीं गुण तर कांहीं दोष हे आहेतच. तथापि या अनेक पद्धतींपैकी "लोकशाही पद्धत" ही सामान्यतः बरी असें समजण्यांत येत असतें. कारण या पद्धतीमुळें संस्थेच्या कारभारावर तिच्या बहुसंख्य घटकांची जास्तींत जास्त हुकमत राहूं शकते. संस्था लहान असल्यास तिच्या कारभारांत सर्वच घटकांना भाग घेणें शक्य असतें व अशा भाग घेणाऱ्या घटकांच्या बहुमतानें जे जे निर्णय ठरतील त्यांची अम्मलबजावणी होत असते. बहुमतवाल्यांचे निर्णयास अल्पमतवाल्यांना मान देऊन त्यांना ते स्वीकारावे लागतात. संस्था मोठी असल्यास सोईप्रमाणें तिच्या घटकांचे वेगवेगळे गट पाडण्यांत येतात. प्रत्येक गट आपआपल्या तर्फे एक अगर अनेक प्रतिनिधी निवडून देतो व या प्रतिनिधींकरवीं त्या संस्थेचा कारभार चालविला जातो; मात्र या योजनेमुळें सर्वच्या सर्व घटकांना संस्थेच्या कारभारांत प्रत्यक्षपणें भाग घेतां येत नसून तो त्यांना अप्रत्यक्षपणें घ्यावयास सापडतो. संस्था फारच मोठी असल्यास गटागटांनीं निवडून दिलेले प्रतिनिधी आपल्यापैकी जरूर तेवढ्यांची पुन्हा निवडणूक करतात व निवडून आलेल्या व्यक्तींकरवीं त्या संस्थेचा कारभार चालविला जातो. वरीलपैकी कोणतीही योजना अमलांत असली तरी त्यामुळें लोकशाही तत्त्वास कांहींही बाध येत नाहीं. कारण, या पद्धतीनुसार चालणारा कारभार हा "लोक" म्हणजे संस्थेचे घटक, अगर "लोक प्रतिनिधी" यांचे करवीं चालविला जात असल्यानें ती पद्धत "लोकशाही"च ठरते.

लोकशाही कारभार हा संस्थेच्या अधिकाअधिक घटकांचें ज्या योगें जास्तींत जास्त हित होईल अशा तऱ्हेनें चालला पाहिजे. कांहीं व्यक्तींचें हित अगर स्वार्थ हा लोकशाहीच्या आड येत नसेल तर वैयक्तिक स्वार्थापेक्षां लोकहित हें अधिक मौल्यवान असल्यानें तें साधण्यासाठीं वैयक्तिक हिताकडे दुर्लक्ष केलें गेलें पाहिजे. जोंपर्यंत संस्था लहान असते तोंपर्यंत सर्वच घटकांना तिच्या कारभाराकडे लक्ष देणें शक्य होत असतें. परंतु संस्था मोठी झाली व तिच्या घटकांची संख्या बरीच वाढली म्हणजे मग त्या संस्थेचा कारभार घटकांनीं निवडून दिलेल्या प्रतिनिधींकरवीं चालविणें भाग पडते. निवडून दिलेले प्रतिनिधी हे गुणवान्, तज्ज्ञ, स्वार्थत्यागी व कामसू असे असावेत. तसे ते असतील तरच त्यांनीं चालविलेला कारभार हा खऱ्या अर्थानें लोकशाही होऊं शकेल. परंतु निवडून येणारे प्रतिनिधी हे स्वार्थत्यागी नसून स्वार्थी असतील तर ते संस्थेचा कारभार चालवितांना लोकशाहीपेक्षा स्वहित, व साधल्यास आपल्या गटाचें हित, म्हणजेच "स्वार्थ" याकडे जास्त लक्ष देतील, हें अधिक संभवनीय दिसतें आणि त्यांनीं तसें वर्तन केल्यास तें सर्वसामान्य मनुष्यस्वभावास सोडून आहे असें कोणीही म्हणूं शकणार नाहीं. उलट, ते तसें वर्तन न करतील तरच त्यांना "व्यवहारचतुर" असें न समजतां "साधु" म्हणून समजावें लागेल.

यावर कांहीं विचारवंत असें म्हणतील कीं, जर प्रतिनिधींची निवडणूक घटकांनींच करावयाची आहे तर त्यांनीं स्वार्थी लोक निवडून न देतां स्वार्थत्यागी निवडून देण्याची खबरदारी घेतली म्हणजे मग ही अडचणच निर्माण होणार नाहीं. तात्त्विक दृष्टीनें ही विचारसरणी चुकीची आहे, असें कोण म्हणेल? परंतु आपल्या देशांतील सर्वसामान्य व्यक्तीचा शैक्षणिक दर्जा, विचार करण्याची त्याची पात्रता, निवडणूक शास्त्राचा त्याचा अभ्यास व त्या विषयासंबंधीचा त्याचा पूर्वीचा अनुभव, हा सर्व लक्षांत घेतां आपल्याकडील मतदार हा इतर पुढारलेल्या देशांतील मतदारांचे मानानें फारच कमकुवत व दुबळा असा आहे, असेंच म्हणावें लागेल. अगदीं अलिकडील आमच्या स्वानुभवावरून आम्ही असें विधान करण्याचें धाडस करतों कीं, खेड्यापाड्यांतील साधाभोळा, अशिक्षित व अज्ञानी असा मतदार तर राहोच, पण पुण्या-मुंबईसारख्या सुधारलेल्या शहरांत राहाणाऱ्या तरबेज, सुशिक्षित व सुज्ञ म्हणून समजल्या जाणाऱ्या मतदारास गुप्त मतदान पद्धतीनें होणाऱ्या निवडणुकींतही 'व्यवहारचतुर' उमेदवारांच्या "खटपटी" "लटपटी" पुढें पुरेपूर हार खावी लागते. आम्हीं आजवर ठिकठिकाणीं पाहिलेल्या अनेक निवडणुकींवरून आम्हास असें वाटत असें कीं, आपल्या खेड्यांतील मतदारांस त्यांच्या मतांची किंमत व त्यांचें खरें महत्त्व हें अद्याप न समजल्यामुळें त्यांचे कडून होणारी निवडणूक ही योग्य अशा इसमांची होतेच असें नाहीं. मात्र आम्हांस असेंही वाटत असें कीं, शहरांतील मतदारांचे बाबतींत अशी परिस्थिति नसावी. परंतु आमची ही कल्पना सर्वस्वी चुकीची आहे असें आम्हांस नुकत्याच आलेल्या अनुभवावरून सिद्ध झालें आहे. आमचे दृष्टीनें अद्याप तरी आपल्या देशांत होणाऱ्या निवडणुकी ह्या उमेदवारांच्या लायकीवरून, अगर त्यांच्या गुणावरून होत नसून, त्या उमेदवारांकडून अगर त्यांच्या हस्तकांकडून केल्या जाणाऱ्या "खटपटी" "लटपटी" वरूनच सामान्यतः होत असतात. ह्या परिस्थितींत जोंपर्यंत सुधारणा होणार नाहीं, तोंपर्यंत आपणाकडे लोकशाही प्रभावी होऊं शकणार नाहीं. कांहीं दिवस तरी आपणांस "सुलतानशाही" नसली तरी "हुकुमशाही", "झोटिंगशाही" अगर "बेबंदशाही" यांचाच अनुभव घ्यावा लागेल.

मतदारसंघास त्याच्या मताचें महत्त्व व राजकारणांत त्यांच्या मतास असलेलें स्थान यांचें यथातथ्य ज्ञान करून देण्याची जबा-

बदारी आमच्या मतें आपल्या पुढाऱ्यांवर आहे. जोंपर्यंत हें ज्ञान प्राप्त झालें नाहीं तोंपर्यंत आपल्या देशांत लोकशाही संस्था उदयास आल्या तरी त्यांची योग्य प्रमाणांत वाढ होऊं शकणार नाहीं, अशी साधारण भीति वाटते. मतदारांस त्यांच्या योग्य त्या जबाबदारीची जाणीव जोंपर्यंत झाली नाहीं तोंपर्यंत त्यांना लोकशाही संस्था चालविण्यास सांगणें हें लोकशाही तत्त्वाचें विडंबन करण्यासारखें आहे. गेलीं शें-दीडशें वर्षें आपणांवर नोकरशाही राज्य करीत असल्यामुळें आपल्याकडील सर्वसामान्य व्यक्तीस खऱ्या लोकशाही तत्त्वाची जाणीव अद्याप झालेली नसणें हें अगदी स्वाभाविकच आहे. आमच्या ह्या लेखाचा अर्थ आम्ही नोकरशाहीचे वकील असून लोकशाहीचे द्वेष्टे आहोंत असा कोणीही लावूं नये. उलट, खऱ्या लोकशाही तत्त्वाचा पुरेपूर प्रसार आपल्याकडील सर्व सार्वजनिक संस्थांतून व्हावा हाच आमच्या ह्या लेखाचा मुख्य हेतु आहे.

आपल्याकडील मतदारसंघ हा वर सांगितल्याप्रमाणें तूर्त तरी कमकुवत व दुबळा असा आहे. त्यास आपल्या मताची खरी किंमत व त्याचें योग्य तें महत्त्व अनुभवाअंतीं समजून येण्यास कांहीं कालावधि लागणें हें अगदी अपरिहार्य आहे. परंतु तोंपर्यंतच्या काळांत आपल्यांतील समंजस लोकांनीं किंवा आपल्या पुढाऱ्यांनीं डोळे मिटून स्वस्थ कां बसावें? आमचे दृष्टीनें त्यांनीं या परिस्थितीची योग्य ती जाणीव भाबड्या मतदारांस करून देण्याची त्यांचेवर नैतिक जबाबदारी आहे आणि जर ही जबाबदारी त्यांनीं स्वीकारली नाहीं तर तें त्यांच्या पराभूतपणाचें लक्षण आहे असेंच मानावें लागेल.

हल्लीच्या संक्रमणावस्थेच्या काळांत नवीन नवीन लोकशाही संस्था उदयास येण्याच्या व त्यांची प्रगति होण्याच्या दृष्टीनें काय काय प्रयत्न करण्यासारखे आहेत व ते कां, याबद्दलच्या आमच्या कांहीं सूचना व आमचे कांहीं विचार खालीं आम्ही देत आहोंत.

आपल्या देशांत लोकशाही तत्त्वावर चाललेल्या हल्लीं अनेक प्रकारच्या संस्था असून त्या एखाद्या लहानशा खेड्यापासून तो थेट दिल्लीसारख्या राजधानीच्या शहरापर्यंत ठिकठिकाणीं पसरलेल्या आहेत आणि मामुली सहकारी पतपेढीच्या कारभारापासून तों राष्ट्राच्या शासनसंस्थेच्या जबाबदारीपर्यंतची हरतऱ्हेची कामगिरी त्या आपआपल्या कुवतीप्रमाणें आज पार पाडीत आहेत. खेडेगांवांतील लहानसहान पतपेढ्या, तालुका, जिल्हा व प्रांतिक सहकारी बँका, सामुदायिक भांडवलाच्या वेगवेगळ्या कंपन्या अगर बँका, ग्रामपंचायती, लोकल बोर्डस, लहान मोठ्या म्युनिसिपालिट्या व कार्पोरेशन्स, विद्यापीठें, प्रांतिक व मध्यवर्ती विधिमंडळें, वगैरेंचें कामकाज हल्लीं लोकशाही पद्धतीनें चालत असतें. या वेगवेगळ्या संस्थांना जाणवत असलेल्या अनेक अडचणींचा तपशीलवार विचार ह्या लहानशा लेखांत करणें अशक्य असल्यानें त्यापैकीं फक्त सहकारी संस्थांना जाणवत असलेल्या अनेक अडचणींपैकीं फक्त कांहींचाच उल्लेख या लेखांत करण्याचें आम्हीं योजिलें आहे. ज्या अडचणी सहकारी संस्थांना जाणवतात त्याच थोड्याफार भिन्न प्रमाणांत व थोड्याफार फरकानें इतरांस भासत असतात व म्हणून खालीं नमूद केलेल्या सूचना अगर विचार इतर संस्थांचे बाबतींतही जरूर त्या फेरफारासह लागू पडण्यासारखे आहेत.

वर वर्णन केलेल्या संस्थांपैकीं अनेकांच्या कामकाजाशीं आमचा प्रत्यक्ष अगर अप्रत्यक्ष थोडाफार संबंध आजवर आल्या आहे हें आत्मश्लाघेचा दोष पतकरूनही येथें नमूद करणें आम्हांस जरूर वाटतें. खालीं उल्लेख केलेल्या अडचणी ह्या काल्पनिक नसून त्या आम्हीं प्रत्यक्ष अनुभवलेल्या आहेत.

हल्लीं पुणें-मुंबई सारख्या शहरांतून होणाऱ्या सहकारी बँकांच्या डायरेक्टरांच्या निवडणुकी फार हिरिरीनें लढविल्या जात असतात हें त्याबाबतच्या वर्तमानपत्रांत प्रसिद्ध होणाऱ्या बातम्या व लिखाणावरून वाचकांच्या लक्षांत आलें असेलच. पूर्वी या निवडणुकीस जरूरीपेक्षा क्वचितच जास्त उमेदवार उभे राहात असल्यामुळें ह्या निवडणुकींकडे कोणाचें फारसें लक्ष जात नसे. परंतु हल्लीं कार्यकारी मंडळावर निवडून द्यावयाच्या डायरेक्टरांच्या संख्येच्या दुप्पट, तिप्पट व क्वचित् वेळीं चौपटीपर्यंतही उमेदवार उभे असल्याचें दिसून येतें. ही परिस्थिति संस्थेची प्रगति दर्शवणारी आहे किंवा कसें तें ठरविणें कठीण आहे. तें कांहींही असो, ह्या निवडणुकी वेगवेगळ्या व्यक्ती-व्यक्तींत होत नसून त्या वेगवेगळे पक्ष अगर गट ह्यांचेमध्यें होत असल्याचें दिसून येतें. गटामार्फत होणाऱ्या निवडणुकींत वेगवेगळ्या उमेदवारांच्या गुणांची अगर कर्तबगारीची पारख न होतां, वेगवेगळे पक्षप्रमुख अगर गटप्रमुख यांनीं केलेल्या बऱ्या-वाईट "खटपटी"-"लटपटी"च्या तीव्रपणाची अगर प्रभुत्वाची त्यामुळें कसोटी ठरत असते. ह्या पद्धतींत उमेदवाराला आपलीं मतें अगर बुद्धि पक्षाकडे अगर गटाकडे गहाण ठेवावी लागते, व म्हणून पक्षातर्फे एकदां एखाद्या व्यक्तीची निवड झाली म्हणजे मग त्या व्यक्तीस आपली सामान्य कामगिरी सुद्धा बजावीत असतांना ती आपल्या स्वतःच्या बुद्धिनुसार करतां येत नसून ती पक्षाकडून अगर पक्षप्रमुखाकडून सुटणाऱ्या हुकुमानुसार अगर सूचनानुसार पार पाडावी लागत असते. ह्या पद्धतीनुसार निवडून आलेले उमेदवार हे केवळ म्युनिसिपल कमिटीच्या दिव्यांचे खांब असतात असा लोकापवाद आहे. ही परिस्थिति खऱ्या लोकशाही तत्त्वास पोषक आहे असें आम्हांस तरी वाटत नाहीं. ह्या वेगवेगळ्या पक्षप्रमुख किंवा गटप्रमुख किंवा स्पष्टच बोलावयाचें झाल्यास झब्बू लोकांना—म्हणजे दुष्परिणामाचे वेळीं नामानिराळे राहणाऱ्या व स्वार्थाचे वेळीं आपली मान पुढें करणाऱ्या लोकांना—एकत्र आणून त्यांच्या ह्या कोंबडी झुंजविण्याच्या महत्त्वाकांक्षेचा परिणाम खऱ्या लोकशाहीस सुरुंग लावण्याकडे कसा होतो याची त्यांस जाणीव करून देईल इतका वजनदार जो कोणी समाजाचा पुढारी असेल त्यानें ती करून द्यावी अशी आमची त्यांस नम्र विनंति आहे. आमचे दृष्टीनें हें जिकिरीचें आणि वाईटपणा देणारें पण समाजाच्या खऱ्या हिताचें काम करण्याची नैतिक जबाबदारी ह्या पुढाऱ्यांवर आहे. मात्र सदर पुढारी आपण होऊन हें काम करण्यास सहसा पुढें येत नाहींत याची आम्हांस जाणीव आहे. सबब आमची ह्या वेगवेगळ्या गटप्रमुखांसच अशी विनंति आहे कीं, त्यांनीं लोकहिताकडे थोडें लक्ष पुरवून आपणहूनच एकत्र जमावें व सर्वांस संमत होईल अशा एखाद्या पुढाऱ्याची (लवादाची) निवड करावी आणि त्या पुढाऱ्यासमोर आपलीं सर्व गाऱ्हाणीं व सूचना मांडाव्या; तसेंच कार्यकारी मंडळावर निवडून देण्यास त्यांचे दृष्टीनें लायक असतील अशा उमेदवारांचीं नांवेंही सुचवावींत. त्या सर्वांचा योग्य तो विचार करून या पुढाऱ्यानें अधिकांत अधिक लायक अशा उमेदवारांचीं नांवें अखेर पसंत करावींत व तेच उमेदवार सर्वमान्य समजून सर्वांनीं त्यांस पाठिंबा द्यावा आणि नंतर मग या गटप्रमुखांनीं त्या निवडणुकींत प्रत्यक्ष अगर अप्रत्यक्ष असा कोणताही भाग घेऊं नये. अशा तऱ्हेनें पसंत केल्या जाणाऱ्या

उमेदवारांना संस्थेनें फार मोठ्या सभासदांचा पाठिंबा मिळण्यासारखा असल्यानें तें कार्यकारी मंडळ अधिक प्रभावी व कार्यक्षम ठरण्याचा बराच संभव आहे; शिवाय या योजनेमुळें पक्षाभिनिवेशानें निवडणुकी लढवून झाल्यानंतर वेगवेगळ्या कार्यकर्त्यांत जी मतभिन्नता, कटुता अगर द्वेष उत्पन्न होण्याचा संभव असतो तोही कदाचित् टाळतां येईल.

आपल्याकडील सर्वसाधारण मतदार हा केवळ दुबळाच आहे असें नसून तो उदासीनही असल्याचें दिसून येतें. आपल्या मताचा एकदां बरावाईट उपयोग करून आपण जो प्रतिनिधी निवडून देतों तो आपली कामगिरी कशी व कितपत पार पाडीत आहे याबद्दल मतदार पुन्हा कधींही चोकशी करण्याची तसदी घेत नाहीं. तसेंच निवडून आलेले प्रतिनिधी आपली बरीवाईट कामगिरी आपल्या मतदारांच्या कानावर घालण्याची काळजीही घेत नाहींत. त्यामुळें मतदार व त्यांचा प्रतिनिधि यांचा निवडणुकीच्या दिवसांनंतर जी एकदां फारकत होते ती पुनः नवीन निवडणुकीचा दिवस उजाडेपर्यंत कायम टिकते. ही परिस्थिति म्हणजे मतदारांची निर्विकार उदासीनता व प्रतिनिधींची बेछूट बेपर्वाई लोकशाहीस पर्यायानें मारकच ठरते.

निवडणुकीस उभे राहणाऱ्या उमेदवारांच्या लायकीबाबत कांहीं निश्चितपणाचे निर्बंध नसल्यामुळें निवडून येणारा प्रत्येक प्रतिनिधि, मग तो नागरी असो वा ग्रामीण असो, आपापली जबाबदारी पूर्णपणें पार पाडण्यास सर्वस्वी लायक असा असतोच असें म्हणतां येत नाहीं. नागरी प्रतिनिधि हा ग्रामीण प्रतिनिधींपेक्षा बहुशः अधिक शिक्षित, अनुभवी व माहितगार असा असण्याचा संभव असतो; सबब त्याचेवर स्वाभाविक अधिक जबाबदारी असते. तसेंच ग्रामीण प्रतिनिधींपैकीं कांहीं शिक्षणालंकृत नसले तरीही ते अधिक धूर्त व व्यवहारी असे असूं शकतात.

अलिकडे वेगवेगळ्या नागरी सहकारी संस्थांचे अगर मध्यवर्ती सहकारी बँकांचे चालकमंडळावर जे नागरी लोक निवडून येत आहेत ते त्यांच्यावर पडणाऱ्या जबाबदारीचे मानानें कमी प्रतीचे असतात असें दृष्टीस पडतें. अशी अधोगति कां होत चालली आहे त्याचें निदान करतां येण्यासारखें असलें तरी तें अद्याप कोणीही निर्भीडपणें केल्याचें आढळत नाहीं. तथापि ही वस्तुस्थिति मात्र बहुतेक सर्व विचारवंतांच्या नजरेस स्पष्टपणें आलेली आहे. अशी परिस्थिति असल्यानें या संस्थांचा सरकार-दरबारीं अगर समंजस समाजांत पूर्वी जो आदर व बोज होता तो अलीकडे कमी कमी होत चालला आहे.


मध्यवर्ती सहकारी बँकांच्या चालकमंडळावर कांहीं प्रमाणांत ग्रामीण व कांहीं प्रमाणांत नागरी डायरेक्टर्स असतात. बहुतेक बँकांत ग्रामीण डायरेक्टरांची संख्या नागरी डायरेक्टरांपेक्षा अधिक असते; तथापि बँकेचें प्रत्यक्ष कामकाज, हें नागरी डायरेक्टरांच्याच सल्ल्यानें व मार्गदर्शनानें आजवर होत आलेलें आहे असें दिसतें. अलिकडील नागरी डायरेक्टर हे वर नमूद केल्याप्रमाणें अव्वल दर्जाचे नसल्यानें त्यांच्या व ग्रामीण डायरेक्टरांच्या कर्तबगारींत आतां फारसा भेद राहिलेला नाहीं. अशा परिस्थितीमुळें या बँकांचें कामकाज यापुढें ग्रामीण डायरेक्टरांचे मार्गदर्शनाखालीं चालण्यास काय हरकत असावी असा प्रश्न ग्रामीण डायरेक्टरांचे मनांत आल्यास तो चुकीचा आहे असें म्हणतां येणार नाहीं. एवढेंच नव्हे, तर या बँकांचें धुरीणत्व, म्हणजे अध्यक्ष, उपाध्यक्ष वगैरे जागा ग्रामीणांनीं विभूषित कां करूं नयेत अशीही विचारसरणी प्रसरित होऊं लागली आहे. अनेक लोकलबोर्डांचे अध्यक्ष हल्लीं ग्रामीणांपैकीच आहेत व ते आपापली जबाबदारी पार पाडीत आहेत. असें असतां मध्यवर्ती सहकारी बँकांचे अध्यक्ष हे ग्रामीणपैकींच झाल्यास काय हरकत असावी, असा प्रश्न सहाजिकच उत्पन्न होतो. परंतु त्यास आमचें असें उत्तर आहे कीं, या बँका आणि लोकल बोर्डस व तत्सम संस्था यांची भूमिकाच भिन्न भिन्न आहे. सर्वसामान्य जनतेचा पैसा विश्वासानें आकर्षण करून तो सुरक्षित ठेवण्याची जबाबदारी बँकांवर असते, तर कराचे रूपानें जनतेकडून सरकारनें गोळा केलेला पैसा फक्त खर्च करण्याची कामगिरी लोकल बोर्डस व तत्सम संस्था यांचेवर सोपविलेली असते. सहकारी मध्यवर्ती बँका या केवळ लोकांच्या विश्वासावर चालत असतात. जनतेचा पैसा आकर्षित करून त्याचा विनियोग त्यांना ग्रामीण भागाकडे करतां येतो. अशी वस्तुस्थिति असल्यानें या बँकेचा प्रमुख म्हणजे अध्यक्ष हा नागरी समाजाचा प्रतिनिधि असणें हें अधिक उपयुक्त ठरतें. लोकल बोर्डस व तत्सम संस्था यांची बाब याहून अगदीं भिन्न आहे, आणि म्हणून बँका व लोकल बोर्डस यांची प्रस्तुत विषयाचे बाबतींत तुलना करणें हें चुकीचें ठरेल.

प्रत्येक सार्वजनिक संस्थेचें कामकाज लोकशाही तत्त्वानुसार चाललें पाहिजे याच मताचे आम्ही आहोंत. परंतु जोंपर्यंत मतदार संघ हा पूर्ण सुजाण व जबाबदार असा झालेला नाहीं तोंपर्यंत कांहीं विशिष्ट प्रकारच्या संस्था, उदाहरणार्थ बँका, यांचें काम निर्भेळ लोकशाही पद्धतीनें चालविणें हें धोक्याचें ठरेल असें आम्हांस वाटतें. कारण, असल्या प्रकारच्या संस्थांना भिन्न भिन्न अगर विषम अशा तत्त्वांचा समन्वय करावयाचा असतो. बँकांकडे ठेवी ठेवणारा धनको वर्ग व त्या पैशांचा उपयोग करणारा ऋणको वर्ग अशा दोन भिन्न हितसंबंध असलेल्या वर्गांचा समन्वय करण्याची जबाबदारी बँकांवर असते. म्हणून त्यांच्या कार्यकारी मंडळांत या दोन्ही वर्गांचे प्रतिनिधी शक्य तितक्या समप्रमाणांत असावयास पाहिजेत. नाहींतर त्या संस्थांचा कारभार एकारेल व कदाचित तो बंदही पडेल. सबब अशा संस्थांचा कारभार कांहीं वर्षें तरी लोकशाहीस थोडीफार मुरड घालून चालवावा असें आमचें मत आहे. आमचे दृष्टीनें या बँकांच्या कामास स्थैर्य प्राप्त व्हावें म्हणून त्यांचे चालक मंडळांत कांहीं प्रमाणांत तज्ज्ञ मंडळी नेमणूक पद्धतीनें (by nomination) येऊं शकतील अशी तजवीज असावी. आमची ही सूचना निर्भेळ लोकशाही तत्त्वाविरुद्ध आहे याची पूर्ण जाणीव असूनही ती आम्ही करण्याचें धाडस करीत आहोंत.

बँकांचें संचालक मंडळ हें बँकांचें सर्वसाधारण धोरण ठरविण्यासाठीच नेमलेलें असतें; व प्रत्यक्ष व्यवहाराची जबाबदारी त्या संस्थेच्या नोकरवर्गावर टाकण्यांत आलेली असते; आणि म्हणून सालोसाल होणाऱ्या निवडणुकींचे परिणाम दैनंदिन कारभारावर केव्हांही होतां कामा नयेत. या बाबतींत इंग्लंडचें उदाहरण नजरेसमोर ठेवण्यासारखें आहे. तेथें पार्लमेंटमध्यें कोणताही पक्ष अधिकारारूढ झाला तरी राज्यकारभाराच्या दैनंदिन व्यवहारांत अधिकारारूढ पक्षाकडून सहसा ढवळाढवळ केली जात नाहीं. बँकेच्या चालकमंडळांत वरचेवर फेरफार होत गेल्यास त्या बँकेंतील नोकर लोकांना आपापलें काम निर्भय, निर्भीड व निर्विकारपणें करणें कठीण जातें, असा आमचा अनुभव आहे. नोकरांना पगार, बढती, वगैरे देण्याची सत्ता ज्या संचालकांकडे असते त्यांच्याच आर्थिक व्यवहारासंबंधीं विचार करण्याचा प्रसंग आल्यास नोकरांची फारच केविलवाणी स्थिति होते. आपलें मत

स्पष्ट द्यावें तर संचालकांची गैरमर्जी होऊन स्वतःची आर्थिक हानि होईल अशी नोकरास भीति वाटते; मत स्पष्ट न द्यावें तर खुद्द संस्थेचीच हानि होईल असें त्याच्या सद्सद्विवेकबुद्धिस वाटत असतें व त्यामुळें तो या शृंगापत्तींत सांपडतो. नोकरास आपलें मत निर्भयपणें व निर्भीडपणें मांडण्याची पूर्ण संधि मिळेल, तसेंच त्यानें प्रकट केलेल्या मतावरून त्यास शासन अगर बक्षीस मिळणार नाहीं, असा त्यास दृढ विश्वास वाटेल अशा प्रकारची कांहींतरी तजवीज व्हावयास पाहिजे. तसेंच, संस्थेनें ठरविलेलें धोरण व नियम यांस अनुसरून एकदां नेमण्यांत आलेल्यां नोकरास आपापल्या कर्तबगारीप्रमाणें व बुद्धीप्रमाणें संस्थेच्या दैनंदिन कारभारांत सुधारणा करण्याची आणि त्यांत वाढ करण्याची पूर्ण मोकळीक व पुरेसा वाव राहील अशीही कांहींतरी तजवीज असावयास पाहिजे.

यापुढील नजिकच्या काळांत आपल्या देशांत अनेक आर्थिक स्थित्यंतरें होण्याचा संभव पुष्कळच दिसत आहे. लढाईचे दिवसांत आलेला नाण्याचा फुगवटा आतां हळू हळू ओसरूं लागला आहे. वेगवेगळ्या देशांतील नाणें-बाजाराकडे पहातां सरकारी कर्जरोख्यांच्या किंमती हळू हळू उतरत चालल्याचें दिसून येतें, आणि म्हणून सर्वसाधारण व्याजाचे दर थोडे थोडे वाढूं लागले आहेत. वेगवेगळ्या जिनसांच्या भरमसाट वाढलेल्या किंमती हळू हळू उतरूं लागल्या आहेत. या सर्व परिस्थितीवरून सार्वत्रिक मंदीचे दिवस पुन्हा लवकरच येतील अशीं चिन्हें दिसूं लागलीं आहेत. याचा परिणाम कदाचित् बँकांतील ठेवी घटण्याकडे होईल. तसेंच वरील परिस्थितीमुळें, बँकांनीं गुंतविलेल्या रकमा वेळच्यावेळीं परत देतील किंवा कसें याबद्दल शंका निर्माण होईल अशी भीति वाटते. सारांश, सन १९२९–३१ च्या सार्वत्रिक मंदीमुळें त्या वेळीं बँकांच्या व्यवहारावर जसे अनिष्ट परिणाम झाले तसे ते पुन्हां होण्याचा संभव आहे आणि म्हणून बँकांच्या चालकवर्गांत वरचेवर फेरफार होणें हें तूर्त तरी अनिष्ट आहे. केवळ लोकशाही तत्त्वांचा उदोउदो करून निवडणुकींचा खेळ खेळण्यास हा काल अनुकूल नाहीं. सबब अशा वेळीं ज्या ठेवीदार मतदारांनां आपल्या निढळाच्या घामानें मिळविलेला व सांचविलेला पैसा सुरक्षिततेसाठीं अशा बँकांत ठेवलेला आहे त्यांनीं पूर्ण जागरूकता ठेवून व आपला पैसा याहीपुढें सुरक्षित रहावा म्हणून आपल्या मताचा योग्य तो उपयोग करून या नागरी अगर ग्रामीण "व्यवहारचतुर" लोकांचा डाव हाणून पाडला पाहिजे. वर मांडलेले विचार व केलेल्या सूचना ह्या केवळ भावनेमुळें केल्या नसून आर्थिक व्यवहार करणाऱ्या सार्वजनिक संस्था व त्या संस्थांत ज्यांचे पैसे गुंतलेले असतात अशा सर्वसामान्य घटकांचे हिताच्या दृष्टीनें व आम्हांस आलेल्या अनुभवावरून आम्हीं त्या केल्या आहेत, हें सूज्ञ वाचक तेव्हांच जाणतील.



डोंगरे यांचे बालामृत

—सर्व प्रांतांतील—
सुती–गरम–रेशमी
—खादीचें माहेरघर—

खादी मन्दिर

२६१, बुधवार पेठ
दमडेरे बोळाजवळ,
पुणें २.

पनवेल तालुका सहकारी खरेदी विक्री युनियन लि. पनवेल.
(कुलाबा)

"कुलाबा जिल्ह्यांतील क्रमानें व गुणानें पहिला खरेदी विक्री संघ"

"नवीन वर्ष संघाच्या सर्व सभासदांस व हितचिंतकांस सुखाचें जावो."

वि. गं. वैद्य, मॅनेजर.
त्र्यं. ना. बेडेकर, चेअरमन.

आयुष्याच्या विम्याकरतां व एजन्सीकरतां—

गुडवुइल ॲशुअरन्स कं. लि.

टेलिफोन नं. ३०५६८

११३ महात्मा गांधी रोड, क्लॉक टॉवर समोर,
फोर्ट, मुंबई १.

# लहान बँकांच्या अडचणी व रिझर्व्ह बँक

[ श्री. गो. वि. सराफ बी. ए., एल्एल्. बी., चेअरमन, दि बेळगांव बँक लि., बेळगांव. ]

राष्ट्राच्या अर्थव्यवस्थेंत मोठ्या बँकांइतकेंच लहान बँकांचें स्थान वैशिष्ट्यपूर्ण असून, देशांतील व्यापारवृद्धि व आर्थिक उलाढाली होण्यास त्यांची चांगलीच मदत होत असते. विशेषतः बँकिंगचें क्षेत्र देशाच्या कानाकोपऱ्यापर्यंत विस्तृत करण्यास अशा बँका फार उपयुक्त ठरतात. या बँकांचें कार्यक्षेत्र एकदोन जिल्ह्यापुरतेंच मर्यादित राहून एकूण भांडवलाचें मान एका कोटीचें आसपास असतें. असा लहान बँकांचा कारभार चोख पद्धतीनें चालवून सुद्धां त्यांच्यापुढें कायम स्वरूपाच्या अशा कांहीं अडचणी उभ्या आहेत. त्या दूर करणें त्यांना स्वतःला शक्य होत नसल्यानें त्यांच्या प्रगतीस अडथळे येतात. अशा परिस्थितींत रिझर्व्ह बँकेसारख्या मध्यवर्ती सत्ताधारी संस्थेनें त्या दूर करण्याचे दृष्टीनें जरूर त्या योजना करणें क्रमप्राप्त होतें. तरी या अडचणी कोणत्या आहेत याचा निर्देश करून त्या निवारण्यास रिझर्व्ह बँकेस काय करतां येईल याचें विवेचन स्थूल मानानें करणें हा या लेखाचा हेतु आहे.

स्थानिक बँका आपला शाखा-विस्तार तालुक्याच्या ठिकाणीं किंवा व्यापाराचे दृष्टीनें महत्त्वाच्या अशा लहान गांवींही करतात. अशा शाखा उघडल्यानंतर रकमांची ने-आण सुरक्षितपणें करण्याबाबत प्रश्न उभा रहातो. तालुक्याचे ठिकाणीं असल्यास सरकारी ट्रेझरी मार्फत कांहीं सोय होऊं शकते. परंतु ती अपुरी पडते. त्यामध्यें जरूर ती वाढ होऊन मिळणें आवश्यक आहे. तसेंच याबाबत घेण्यांत येणारा आकारही सवलतीचा असावा. कांहीं गांव व्यापारी उलाढालीचे दृष्टीनें फार महत्त्वाचे असतात. निपाणीचेंच उदाहरण घेऊं. ही सर्व हिंदुस्थानची तंबाखूची व्यापारी पेठ असून दरवर्षी कोट्यवधी रुपयांची उलाढाल येथें होत असते. परंतु तेथें सरकारी ट्रेझरी नसलेनें वरील अडचण जास्त वाटते. अशा ठिकाणीं सबट्रेझरी उघडून बँकांना मदत करणें योग्य होणार नाहीं काय ?

रिझर्व बँकेनें शेड्यूल्ड बँकांना, आठवड्यांत एक वेळ मुंबईस रकम मोफत पाठविणेची सोय, सरकारी ट्रेझरीमार्फत करून दिलेली आहे. याचा उद्देश सदर बँकांना त्या बँकेकडे ठेवाव्या लागणाऱ्या किमान निधीची भरपाई करणें शक्य व्हावें हाच असावा. त्याच बरोबर मुंबईहून इकडे रकम आणण्याची सोय मात्र उपलब्ध नाहीं. अशी तजवीज झाल्यास लहान बँकांना चांगलीच मदत होणार असून, बँकिंगची सोय वाढविण्याचे दृष्टीनें रिझर्व बँकेनें ती करणें आवश्यक आहे.

लहान बँकांची दुसरी अडचण म्हणजे, ठेवीदारांना द्याव्या लागणाऱ्या व्याजाच्या बोजाबाबतची. स्थानिक बँकांकडे तेथील परिस्थितीनुसार करंट ठेवींपेक्षां, मुदत व सेव्हिंग्ज ठेवी बऱ्याच जादा प्रमाणांत येत असल्यामुळें देणें व्याजाचें प्रमाण मोठ्या बँकांचे मानानें जास्त पडतें. त्यांतच आतां सावकारी कायद्यामुळें व्याजाचे दरावर नियंत्रण आल्यानें एखादे ठिकाणीं किफायतशीर दर माल तारणावर मिळणें अशक्य झालें आहे. बँकिंग कंपनीज ॲक्टचे लवकरच अंमलांत येणाऱ्या अटीनुसार एकूण भांडवलाच्या वीस टक्के इतकी रकम अलग ठेवण्याची सक्ति, मोठ्या बँकांना झेपण्यासारखी असली तरी लहान बँकांना जास्त अडचणीची होणार आहे. या बाबतींत फेर विचार होऊन हें प्रमाण लहान बँकांपुरतें तरी कमी करणें योग्य होणार आहे.

अशाच स्वरूपाची आणखी एक अडचण म्हणजे मोठ्या बँकांकडून लहान बँकांना मिळावयाच्या सवलतींचा अभाव. बऱ्याच जिल्ह्यांचे ठिकाणीं इंपीरियल बँकेच्या शाखा आहेत. त्यांचेकडून बँकांना म्हणून कमिशनच्या किंवा व्याजाच्या दरांत विशिष्ट सवलती मिळणें उचित दिसेल. परंतु त्यांची वृत्ति, या उलट व्यक्तिगत गिऱ्हाइकांप्रमाणेंच वागवून चढाओढ करण्याची दिसून येते. लहान बँकांचे खर्चाचें प्रमाण वाढण्यास हेंही एक कारण आहे.

या दोन्ही अडचणींबाबत रिझर्व बँकेकडून बरीच मदत होण्याजोगी आहे. लहान बँका, आपलें कार्यक्षेत्र जिल्ह्यांच्या विभागापुरतेंच मर्यादित करीत असल्यानें, व स्थानिक परिस्थितीनुसार मोठ्या बँकांपेक्षा किंवा सहकारी बँकांपेक्षां जास्त उपयुक्त व व्यापक प्रमाणांत जनतेच्या सोयीच्या ठरत असल्यानें, मोठ्या बँकांना अशा ठिकाणीं शाखा उघडण्यास मुभा ठेवूं नये. विशेषतः, इंपीरियल बँक ही शाखा विस्ताराबाबतच्या करारानुसार रिझर्व बँकेची प्रतिनिधीच ठरत असल्यानें, तिनें जिल्ह्याच्या ठिकाणीं केवळ "बँकर्स बँक" नात्यानें बँकांशींच व्यवहार करावा. व्यक्तींना कर्जें न देतां, लायक बँकांना सवलतीच्या दरानें कर्जाऊ रकमा द्याव्या. कमिशनच्या दरांतही शक्य ती सवलत द्यावी. केवळ आपला फायदा वाढविण्याची वृत्ति न दाखवितां, लहान बँकांना सवलती देऊन बँकिंगचें क्षेत्र मजबूत व विस्तृत करण्याचें धोरण ठेविल्यास- लोकशाहीस अनुरूप दिसणार आहे. बँकांना कर्जें देतांना त्यांचे कार्यपद्धतीची छाननी करणें इंपीरिअल बँकेस आवश्यक झाल्यानें रिझर्व्ह बँकेकडील तपासणीचें कामहि तिचेमार्फत आपोआप होऊन कांहीं लहान बँकांतून चाललेल्या गैर-व्यवस्थेस आळा बसेल. मोठ्या बँकांच्या नफ्याचें प्रमाण शेंकडा १४ टक्के पडत असून लहान बँकांचे बाबतींत तें ९ व ५ दरम्यान पडतें. नवीन पगाराच्या श्रेणींमुळें वरील प्रमाण आणखी कमीच होईल. तरी वर दर्शविल्याप्रमाणें योजना झाल्यास लहान बँकांवरील व्याजाचा व खर्चाचा बोजा कमी होऊन त्या जास्त कार्यक्षम होतील व इंपीरियल बँकेचेंही प्रत्यक्षपणें राष्ट्रीयीकरण झाल्यासारखें होईल.

या शिवाय, महागाईमुळें खर्चाचें प्रमाण वाढतें आहे, त्यांतच किमान वेतनश्रेणीसारखे निर्बंध कायद्यानें जारी करून नवीन अडचणी निर्माण करण्यापेक्षां, स्थानिक परिस्थितीनुसार स्वाभाविक व व्यावहारिक वेतनश्रेणी सोयीची ठरणार आहे. या बाबत जास्त दूरवर विचार होणें आवश्यक आहे.

रिझर्व्ह बँकेचें सध्यांचें धोरण, निर्बंध घालण्याचे स्वरूपाचेंच जास्त दिसून येतें. बँकांची कार्यपद्धती शास्त्रशुद्ध होण्याचे दृष्टीनें व ठेवीदारांचें हित साधण्याकरितां हें ठीकच आहे. परंतु हे निर्बंध पाळण्यांत बँकांकडून कांहीं कसूर होत नाहीं असें दिसून आल्यावर व त्यांचे कार्यपद्धतीस इष्ट तें वळण लागल्यावर त्यांच्या अडचणी दूर करण्याकरितां जरूर त्या सवलती देण्याची जबाबदारी रिझर्व्ह बँकेवर पडते व दृष्टीनें या बाबतच्या योजना शक्य तितक्या लवकर अमलांत येतील अशी अपेक्षा अनाठायीं होणार नाहीं. देशांत सर्व ठिकाणीं बँकिंगची सोय उपलब्ध करून देणें हा रिझर्व्ह बँकेचा प्रमुख उद्देश आहे. तो साध्य करण्यास लहान बँका या एक महत्त्वाचा दुवा ठरत आहेत. तरी लहानांना मोठ्यांनीं किंवा मागासलेल्यांना पुढारलेल्यांनीं सवलती देऊन, त्यांचे उन्नतीस हातभार लावणें, या सर्वसामान्य तत्त्वानुसारच वरील सूचनांचा सहानुभूतिपूर्वक विचार होणें जरूर आहे.

सरकारनें रु. दोन लाख दर्शनी किंमतीचे शेअर्स घेऊन पुरस्कारिलेली

**अिंडस्ट्रियल बँक लिमिटेड,**

**सांगली.**

मेनरोड, सांगली.

—बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात—

सेक्रेटरी अँड अकौण्टंट

महादेव अण्णाजी कुलकर्णी

कुसनाळकर, B. A., LL. B.

वाढत्या व्यापाराकरतां मुदतीच्या थोड्या ठेवी घेणें आहेत. व्याजाचा दर दरसाल दरशेकडा ६ टक्के. रक्कम कायम गुंतवावयाची नसले कारणानें हुकमी परत मिळते.

केळकर बंधु, यांत्रिक विभाग, लक्ष्मीरोड.

मुख्य दुकान, बुधवार चौक, पुणें २.

**महाड तालुका सहकारी खरेदी विक्री संघ, लि.**

**महाड, कुलाबा.**

( स्थापना १९४८ )

अधिकृत भांडवल :— रु. ५०,०००

वसूल झालेलें भांडवल :— रु. २७,३६०

नवीन वर्ष संस्थेचें सभासदांस व हितचिंतकांस समृद्धीचे जावो.

म. मो. चांदे, B. Com. मॅनेजर.

सुं. मे. बुटाला, B. A., LL. B. चेअरमन.

**पेण तालुका सहकारी खरेदी विक्री संघ, लि.**

**पेण, (कुलाबा).**

नूतन संवत्सर संघाच्या सर्व शेतकरी आणि नागरिक सभासदांना आणि हितचिंतकांना सुखाचें आणि समाधानाचें जावो.

ग. वि. गोखले, मॅनेजर.

ग. ह. मनोहर, चेअरमन.

मोटारीचे सर्व प्रकारचे विमे अल्प दरांत उतरविणारी महाराष्ट्र-कर्नाटकांतील प्रमुख विमा कंपनी म्हणजेच—

**इन्व्हेस्टमेंट ट्रस्टी अँन्ड इन्शूअरन्स कॉर्पो. लि.**

हेड ऑफिस—फोर्ट रोड, बेळगांव. पो. बॉ. नं. ५९.

शाखाः—पुणें, कोल्हापूर; नासीक व हैद्राबाद (द.)

— आमचीं वैशिष्ट्यें —

प्रिमियमचे दर अत्यंत माफक, हप्त्यानें प्रिमियम भरणेची सोय, इतर अनेक सवलती. विशेष माहितीसाठीं विमेच्छू व एजंट्स यांनीं भेटावें अगर लिहावें.

आमच्या सर्व ग्राहकांना, एजंट्सना व हितचिंतकांना ही दिवाळी आनंदाची व सुखाची जावो.

मॅनेजर.

( जयेंद्र )

**दि न्यू ओरिएंटल बँक लि. कोल्हापूर.**

( स्थापना १९२६ )

बँकिंगचा सर्व प्रकारचा व्यवहार करणारी कोल्हापुरांतील आद्य बँकिंग संस्था.

बँकेनें नवीनच सुरू केलेल्या अभिनव व आकर्षक अशा शॉर्ट टर्म डिपॉझिट योजनेबद्दल व इतर बँकिंग व्यवहारासाठीं समक्ष भेटा.

ऑफिसः—

गवळी बिल्डिंग, लक्ष्मी रोड, कोल्हापूर.

बी. बी. पाटील, मॅनेजर.

बी. जी. देवगांवकर. मॅ. डायरेक्टर.

# मुंबई राज्यांतील सहकारी मजूर सोसायट्या

[ डॉ. द. गो. काकडे, एम. ए., एल्एल्. बी., पीएच्. डी., सर्व्हंटस ऑफ इंडिया सोसायटी, पुणें. ]

रिझर्व्ह बँकेनें कांहीं महिन्यांपूर्वी प्रसिद्ध केलेल्या सहकारी चळवळीच्या समालोचनाप्रमाणें, जून १९४८ अखेर मुंबई राज्यांत जंगल कामगारांच्या एकूण ११ सहकारी सोसायट्या अस्तित्वांत होत्या. त्यानंतर, गेल्या दोन वर्षांत हीच संख्या ५० पर्यंत गेली आहे. ही भरीव प्रगति जंगल कामगारांच्या सोसायट्यापुरतीच मर्यादित नव्हती. इतर प्रकारच्या मजुरांच्याही ४० पर्यंत सहकारी सोसायट्या गेल्या २–३ वर्षांत नोंदविल्या गेल्या असल्याचें कळतें. म्हणजे, मुंबईनें हिंदुस्थानांतील इतर राज्यांपेक्षा ह्या विशिष्ट क्षेत्रापुरता तरी उच्चांक गांठला आहे असें म्हणावयास बिलकूल हरकत नाहीं. नोंदविलेल्या ह्या सुमारें ९० मजूर सहकारी सोसायट्यांपैकीं बहुसंख्य सोसायट्या प्रत्यक्ष कार्य करीत होत्या, ही त्यांतल्यात्यांत समाधानाची गोष्ट होय.

सबंध सहकारी चळवळीच्या दृष्टीनें २–३ वर्षांचा काळ हा जरी अल्प असला, तरी त्या काळांत मजूर सोसायट्यांना जे कांहीं बरेवाईट अनुभव आले, नवे प्रश्न उपस्थित झाले अगर निरनिराळ्या प्रकारच्या अडचणी भासल्या त्यांचा, स्थूलमानानें कां होईना, आतांच विचार होणें जरूर आहे. अशा प्रकारच्या विचारामुळें, सहकारी मजूर चळवळींतील कमकुवतपणा अगर दोष वेळींच काढून टाकणें शक्य होणार आहे. केलेली प्रगति टिकविण्याच्या व ह्यापुढें अधिक प्रगति करण्याच्या अशा दोन्ही दृष्टीनें असा विचार महत्त्वाचा ठरतो. म्हणून प्रस्तुत लेखांत वरीलपैकीं कांहीं महत्त्वाच्या बाबींचा थोडक्यांत उहापोह करण्याचें योजिलें आहे.

सहकारी मजूर सोसायट्यांचे दोन प्रकार कल्पितां येतील; पण प्रत्यक्षांत ते एकमेकापासून अगदीं अलग करतां येणार नाहींत. रस्ते करणें, विहिरी खोदणें वगैरेसारख्या कामांचे ठेके घेऊन ते आपल्या देखरेखीखालीं आपल्या सभासदांकडून करवून घेणाऱ्या सोसायट्यांचा पहिला प्रकार कल्पितां येईल. ह्या ठिकाणीं मजुरांच्या श्रमानें तयार झालेल्या कामाची विक्री करण्याचा प्रश्न उपस्थित होत नाहीं. ह्याउलट, दुसऱ्या प्रकारच्या सोसायट्यांनी केलेलें काम कोंणत्या ना कोणत्या तरी मालाच्या स्वरूपांत होतें, व तयार झालेल्या मालाची विक्री करण्याची जरूरी निर्माण होते. जंगल कामगार सोसायट्यांचें काम, तयार केलेला कोळसा व कापलेलें इमारती लाकूड यांचे स्वरूपांत दिसतें. वडर सोसायट्यांचें काम त्यांनीं खणून काढलेल्या दगडाच्या स्वरूपांत मिळतें. जंगलांतील मध, हिरडा वगैरे पदार्थ गोळा करणाऱ्या सहकारी सोसायट्यांचे बाबतींत वरील दोन प्रकारच्या सोसायट्यांप्रमाणें प्रत्यक्ष उत्पादन नसलें, तरी जमविलेल्या मालाच्या विक्रीचा प्रश्न तेथें उपस्थित होतो. दुसऱ्या प्रकारच्या ह्या सोसायट्या खरोखरी उत्पादक सोसायट्या होत. पण त्यांना इतर मजूर सोसायट्यांप्रमाणें कार्य करण्याची मुभा असल्यामुळें व त्यांचे सभासद हे प्रत्यक्ष मजूर असल्यामुळें त्यांचा समावेश मजूर सोसायट्यांत करण्यांत येत असावा. त्यांना उत्पादक–मजूर ( Producer-cum-Labour ) सोसायट्या म्हणून संबोधणें योग्य ठरेल. मुंबई राज्यांतील एकूण मजूर सोसायट्यांपैकीं जवळ जवळ ¾ सोसायट्यांना उत्पादक-मजूर सोसायट्यांचे प्रकारांत घालावे लागेल. राहिलेल्या सोसायट्या ह्या खरोखरी मजूर ठेकेदार सोसायट्या होत.

नुसत्या मजुरांच्या दृष्टीनें पहावयाचें झाल्यास, सहकारी सोसायट्यांमुळें त्यांचा फायदाच झाला आहे. सोसायट्यांत काम केल्यामुळें त्यांना आतां पूर्वीपेक्षां जास्त व वेळेवर मजुरी मिळूं शकते, चांगली वागवणूक मिळते व इतर सुखसायी उपलब्ध होतात. सोसायट्यांना फायदा झाला तर तो त्यांना, त्यांच्या कामाच्या प्रमाणांत, मिळण्याची शक्यता असून नुकसानीची तितकीशी झळ प्रत्यक्षांत लागत नाहीं. असें असूनही सोसायटीशी वागण्याच्या त्यांच्या पद्धतींत पूर्वीपेक्षां कांहीं विशेष फरक पडला आहे असें अद्यापपर्यंत म्हणतां येत नाहीं, ही दुर्दैवाची पण खरी गोष्ट आहे. त्यांच्या दृष्टीनें, पूर्वीच्या खाजगी ठेकेदारांच्या ऐवजीं आतां सहकारी सोसायट्या उत्पादनाची जबाबदारी अंगावर घेण्यासाठीं पुढें आल्या एवढाच फरक ! सोसायट्या आपल्या आहेत, त्यांचेशी सचोटीचा व्यवहार केला पाहिजे, त्यांना अडचणींत टाकतां उपयोगी नाहीं, अशी भावना अद्याप मजुरांमध्यें यावी तशी दिसून येत नाहीं. ह्याला कांहीं अपवाद नाहींत, असें नाहीं. तथापि सर्वसाधारणपणें वरील विधान वस्तुस्थितिनिदर्शक आहे. प्रत्यक्ष व्यवहारांत, वरील भावनेचा अभाव दोन गोष्टींवरून दिसून येतो. पहिली गोष्ट म्हणजे केलेल्या कामाचें मोजमाप सोसायटीला वाढवून सांगणें व सोसायटीकडून जास्त मजुरी मिळविण्याचा प्रयत्न करणें ही होय. कमीजास्त प्रमाणांत व निरनिराळ्या स्वरूपांत हा प्रयत्न निरनिराळ्या प्रकारच्या उत्पादक–मजूर सोयसाट्यांतून आढळून येतो. ह्याला आळा घालण्यासाठीं विशेष देखरेख ठेवणें जरूरीचें होतें. ठेकेदारांच्याप्रमाणें आपल्या सहकारी सोसायटीकडून हातउचल म्हणून वारंवार पैशाची मागणी करणें ही गोष्ट पहिलीपेक्षा जास्त प्रमाणांत सर्वत्र आढळते. जंगल कामगार सोसायट्यांचा १९४८–४९ सालचा जो अहवाल प्रसिद्ध झाला आहे त्यावरून त्या एका वर्षांत २८ सोसायट्यांची मिळून मजुरांकडे एकूण रु. ७६,७६० बाकी येणें होती असें दिसतें. वडर सोसायट्यांचा अनुभव ह्याच प्रकारचा आहे. पावसाळ्यांत किंवा इतर वेळीं काम नसतांना अगर कमी असल्यास उदरनिर्वाहासाठी पैशाची जरूरी मजुरांना लागणार हें स्पष्ट आहे. पण सध्यां त्यांचेमध्यें आढळून येणारी, पैसे वारंवार मागण्याची प्रवृत्ति जरूरीपेक्षां जास्त प्रमाणांत आहे. ज्या लोकांच्या मजूर सोसायट्या बनविण्यांत आल्या आहेत, त्यांना वरील दोन्ही गोष्टी, अनेक कारणांमुळें, फार वर्षांपासून सरावाच्या झाल्या असून त्या हळूंहळूं नाहींशा होतील हें अगदीं खरें. पण सोसायटीच्या बाबतींत मजूर त्या अद्याप उपयोगांत आणतात ही गोष्ट नाकारतां येणार नाहीं.

मजुरांना पुरेसें काम नि वेतन मिळवून देऊन, उत्पादक-मजूर नि ग्राहक यांच्यामधील अनावश्यक मध्यस्थ अगर दलाल यांचें उच्चाटन करण्याचा हेतु ह्या मजूर सोसायट्या काढण्यामागें जर असेल तर तो मात्र अद्याप सफळ झालेला नाहीं हें कबूल करणें भाग आहे. तयार झालेल्या बहुतेक मालाची विक्री सध्यांतरी पूर्वीच्या खाजगी ठेकेदारांमार्फत अगर इतर मध्यस्थांमार्फत करावी लागत आहे. जंगल कामगार आणि वडर सोसायट्या यांच्याबाबत वरील गोष्ट खरी असल्याचें दिसतें. सहकारी पद्धतीनें उत्पादन झालेला माल त्याच पद्धतीनें प्रत्यक्ष ग्राहकांच्या

हातांत पडणें ही अत्यंत नमुनेदार व्यवस्था होय. म्हणजे मजुरांप्रमाणें ग्राहकांनाही सहकारी पद्धतीचा पुरेपुर फायदा मिळूं शकेल. आतां, मध्यस्थांचा अगर दलालांचा फायदा कायम राहिला, पण उत्पादनाचा त्यांचा त्रास चुकला. दोन्हीही दृष्टीनें त्यांचा फायदा झाला आहे. ग्राहकांच्या दृष्टीनें किंमतींत अगर मालाच्या प्रतींत म्हणण्याजोगा असा कांहीं फरक पडलेला नाहीं. वहातुकीच्या अडचणी, गिऱ्हाईक येईपर्यंत माल सांठविण्याच्या अडचणी व त्यावरील खर्च, तयार झालेल्या मालाच्या जादा किंमती, धंद्याच्या पुरेशा माहितीचा अभाव, बाजारांतील किंमतींत होणारे चढउतार, पुरेशा भांडवलाचा अभाव, वगैरे अनेक कारणांमुळें उत्पादक-मजूर सोसायट्यांना आपल्या मालाची विक्री, दलालांच्या मदतीशिवाय करतां आली नाहीं. मुंबई प्रांतिक सहकारी मार्केटिंग सोसायटीनें ह्या दिशेनें मार्गे प्रयत्न केला पण तो यशस्वी होऊं शकला नाहीं. सहकारी उत्पादक-मजूर सोसायट्यांचें यश त्यांनीं केलेल्या मालाच्या विक्रीवरून अजमावयाचें झाल्यास, ह्यापुढें तरी अशा सोसायट्या व ग्राहक सोसायट्या ह्यांचे प्रत्यक्ष संबंध घालून देण्याचे जास्त पद्धतशीर प्रयत्न होणें आवश्यक आहे.

जंगल कामगार सोसायट्या ह्या सरकारमान्य अशा सामाजिक कार्य करणाऱ्या संस्थांमार्फत काढण्यांत व चालविण्यांत येत असल्यामुळें त्यांना आपल्या तक्रारींची वा गाऱ्हाण्यांची सरकारकडे दाद लावून घेणें सुलभ होतें. इतर सोसायट्यांचे बाबतींत ही बाब फार महत्त्वाची ठरते. रु. २०,००० पर्यंतची ठेक्यांचीं कामें बयाणा रक्कम न घेतां सहकारी मजूर सोसायट्यांना देण्यांत यावींत असा सरकारी हुकूम असतांना कांहीं सरकारी नि निम-सरकारी कचेऱ्यांतून मजूर सोसायट्यांकडून बयाणा रक्कम मागण्यांत येते. अशी रक्कम ठेवण्याइतकी सर्वसाधारण मजूर सोसायट्यांची आर्थिक परिस्थिति चांगली नसल्यामुळें, एक तर त्यांना कर्जाच्या रूपानें ती रक्कम उभारावी लागते किंवा ठेक्यानें काम घेण्याचा मोह आवरावा लागतो. रस्ता-बांधणीचीं, दुरुस्तीचीं किंवा इतर कामें करून घेतांना सहकारी मजूर सोसायट्यांची अद्याप दखल घेतली जात नाहीं. ज्याप्रमाणें जंगल कामगार सोसायट्यांना सरकार एका ठरीव दरानें कूप देतें, त्याचप्रमाणें इतर मजूर सोसायट्यांनाही ठराविक दरानें काम अगर जागा देण्यांत यावी; व हे दर प्रतिवर्षी सोसायट्यांचे प्रतिनिधी, पी. डब्ल्यू. डी. इंजिनियर, सरकारी व निम-सरकारी संस्थांचे प्रतिनिधी ह्यांनीं मिळून ठरवावेत. ह्याबाबतचेंही सरकारी धोरण निश्चित करून त्याची प्रत्यक्ष अम्मलबजावणी केली जाईल अशी कांहींतरी व्यवस्था होणें अगत्याचें आहे. दुसरी एक गोष्ट येथें नमूद करावीशी वाटते. सरकार ज्यावेळेस सरकारी इमारती ठेकेदारांकडून बांधून घेते किंवा निम-सरकारी संस्थांना इमारतीसाठीं मदत करतें त्यावेळीं मजूर सोसायट्यांना, त्यांना झेपेल असें व इतकें काम मिळेल अशी कांहीं तरी व्यवस्था व्हावयास पाहिजे. सोसायट्यांकडून स्वतः माल घेऊन तो ठेकेदारांना ठराविक दरानें सरकारनें पुरवावा किंवा सोसायट्यांचा माल ठेकेदारांनीं ठराविक दरानें विकत घ्यावा अशा तऱ्हेची कांहीं तरी अट करारनाम्यांत सरकारनें घालावी. मजुरी काम करणाऱ्या सोसायट्यांना काम मिळेल अशा बाबतही योग्य अशी तरतूद करारनाम्यांत करण्यांत यावी. सध्यां मजूर सोसायट्यांना काम देणें न देणें, त्यांचा माल विकत घेणें अगर न घेणें, हें ठेकेदारांच्या मर्जीवर अवलंबून आहे. सोसायट्यांना जरूर असल्यास त्यांना मूळ ठेकेदारांपासून कमी दरानें काम घ्यावें लागतें अगर माल पुरवावा लागतो. सोसायट्यांची आर्थिक ताकद फार नसल्यामुळें, सध्यांच्या पोट-ठेकेदारीच्या पद्धतीनें त्यांचेवर मोठी जबाबदारी पडत नाहीं हें खरें. पण त्यांना त्यांच्या कामाबद्दल पुरेसा मोबदला मिळूं शकत नाहीं ही गोष्ट दृष्टीआड करतां येत नाहीं. तेव्हां, वरील सूचनांचा सरकारकडून सहानुभूतीनें विचार झाल्यास, सध्यां काम नसणाऱ्या अशा मजूर सोसायट्यांना तावडतोब काम मिळूं शकेल व त्यांच्या सभासदांवर संपूर्ण अगर अंशतः बेकारीचा प्रसंग ह्यापुढें येणार नाहीं. नोंदविल्या जाणाऱ्या सहकारी मजूर सोसायट्यांना कार्यशील करणें सरकारच्याच हातांत आहे. सोसायट्या नोंदविल्यानंतर त्यांना काम न मिळालें तर सहकारी पद्धतीबद्दल त्यांना आस्था कधींही वाटणार नाहीं, ही गोष्ट लक्षांत घेणें जरूर आहे. अशा तऱ्हेची जबाबदारी घेणें सरकारला अवघड अगर अशक्य वाटल्यास, जंगल कामगार सहकारी सोसायट्या नोंदविण्याबाबत जे सरकारी संकेत पाळण्यांत येतात तेच इतर प्रकारच्या मजूर सोसायट्या नोंदवितांना पाळण्यांत यावेत. म्हणजे सहकारी सोसायटींत असून काम नाहीं असें म्हणण्याची पाळी मजुरांवर येणार नाहीं व त्यांचा सहकारी चळवळीबद्दल अपेक्षाभंग होणार नाहीं. कांहीं सोसायट्यांबाबतचा हा अनुभव लक्षांत घेऊन वरील अप्रिय सूचना करावीशी वाटते.

ज्याप्रमाणें जंगल कामगार सोसायट्यांचें एक फेडरेशन बनविण्यांत आलें आहे, त्याप्रमाणें इतर मजूर सोसायट्यांचें—अशा सोसायट्या १०-१५ असल्या तर—फेडरेशन बनविणें जरूर आहे. म्हणजे त्यांच्या तक्रारी-गाऱ्हाण्यांची दाद लावून घेणें सोपें होईल व सर्वांना लागूं पडणाऱ्या अशा कांहीं प्रश्नांचा साकल्यानें वेळोवेळीं विचार करतां येईल. अशा तऱ्हेच्या फेडरेशनला, त्यांतील मजूर सोसायट्यांच्या सहकार्यानें व मदतीनें, निरनिराळ्या जिल्ह्यांत निरनिराळ्या प्रकारचीं कामें ठेक्यानें घेतां येतील व त्याला लागणारें भांडवल उभें करतां येईल. आतांपर्यंत नोंदविल्या गेलेल्या बहुतेक सोसायट्या ह्या बिन-कसबी समजल्या जाणाऱ्या अशा कामगारांच्या आहेत. मजूर सोसायट्यांच्या फेडरेशननें ठेक्याचीं कामें घेतल्यास, त्याला कसबी कामगारांची गरज भासेल. तसें झाल्यास कसबी कामगारांनाही, इतर देशांतल्याप्रमाणें, कालांतरानें सहकारी क्षेत्रांत आणणें सोपें होईल.

मजूर सोसायट्यांची मुंबई राज्यांतील चळवळ थोड्या काळांत जरी जोरांत फोफावली असली तरी ती अद्याप नवी आहे. आदिवासी लोकांना मदत करण्याच्या हेतूनें जंगल कामगारांच्या सोसायट्या प्रथम सुरूं करण्यांत आल्या व सरकारी मदतीमुळें व सामाजिक कार्य करणाऱ्या कांहीं संस्थांच्या पुढाकारामुळें त्यांची प्रगति होऊं शकली. इतर सोसायट्यांच्या बाबतींत तसें कांहीं झालेलें दिसत नाहीं. त्यांच्या व्यवहारांत कांहीं सहकारी कार्यकर्त्यांनीं ह्यापुढें जास्त लक्ष घातल्याशिवाय त्या व्यवस्थितपणें चालूं शकणार नाहींत. सरकारी धोरण कितीही सहानुभूतीचें व मदतीचें असलें तरी त्याचा पुरेसा उपयोग सहकारी मजूर सोसायट्यांना, सहकारी कार्यकर्त्यांच्या मदतीशिवाय, करून घेतां येणार नाहीं अशी सध्यांची तरी परिस्थिति दिसते.

---

# बँकिंगच्या क्षेत्रांतील कांहीं बोलके आंकडे

[ श्री. शं. वि. संझगिरी, बी. कॉम्, सेक्रेटरी, सारस्वत को-ऑपरेटिव्ह बँक लिमिटेड, मुंबई ]

रिझर्व्ह बँकेनें नुकतेंच "स्टॅटिस्टिकल टेबल्स रिलेटिंग टु बँक्स इन इंडिया फॉर दि इयर १९४८" हें पुस्तक प्रसिद्ध केलें आहे. त्यांत हिंदुस्थानांतील सर्व बँकांच्या व्यवहारासंबंधीं तुलनात्मक आंकडे प्रसिद्ध झाले आहेत. ते जर आपण बारकाईनें पाहिले तर आपणांस बँकांसंबंधीं बरीच उपयुक्त व उद्बोधक माहिती मिळते.

सर्व बँकांची बँक म्हणजे रिझर्व्ह बँक. त्या खालोखाल इंपीरिअल बँक येते. रिझर्व्ह बँक १९३५ सालीं स्थापन झाली; त्यापूर्वी इंपीरियल बँक रिझर्व्ह बँकेचें काम करीत होती व अजूनही रिझर्व्ह बँकेच्या जेथें शाखा नाहींत तेथें ती त्या बँकेची एजन्ट म्हणून काम करते व तिच्या व्यवहारासंबंधीं स्वतंत्र कायदा आहे.

त्यानंतर बँकिंगच्या क्षेत्रांत (१) शेड्यूल्ड बँका (२) परदेशी एक्स्चेंज बँका (३) बिगर शेड्यूल्ड बँका (४) सहकारी बँका हे मुख्य घटक होत. मुलतानी लोक हा सुद्धां महत्त्वाचा घटक आहे; पण त्याच्या व्यवहारासंबंधीं आंकडे प्रसिद्ध झालेले दिसत नाहींत. ते आंकडे उपलब्ध झाले तर मुलतान्यांच्या व्यवहारासंबंधीं बरीच उपयुक्त माहिती मिळेल.

रिझर्व्ह बँकेच्या १९३४ च्या कायद्याप्रमाणें दुसऱ्या परिशिष्टांत नमूद केलेल्या बँका ह्यांना शेड्यूल्ड बँका म्हणतात. (१) त्यांचें शेअर भांडवल व गंगाजळी मिळून ५ लाख रुपयांच्यावर असलें पाहिजे. (२) त्या इंडियन कंपनीज ॲक्ट खालीं नोंदलेल्या असल्या पाहिजेत. (३) त्यांना रिझर्व्ह बँकेची मान्यता मिळाली पाहिजे.

वरील अटींपैकीं (१) व (३) अटी प्रमाणें नसलेल्या बँका बिगर शेड्यूल्ड बँका होत.

परदेशी एक्स्चेंज बँका ह्या मुख्यतः आयात व निर्यात व्यापारासंबंधीं बँक व्यवहार करतात.

सहकारी बँका हा एक स्वतंत्र गट आहे व त्या सहकारी कायद्याखालीं नोंदलेल्या आहेत.

आतां आपण वरील बँकांसंबंधीं जें तौलनिक आंकडे प्रसिद्ध झाले आहेत त्यांचें विवेचन करूं.

रिझर्व्ह बँकेचे दोन विभाग आहेत.

(१) इश्यु डिपार्टमेंट—नोटा काढणें.

(२) बँकिंग डिपार्टमेंट—इतर बँकांना मदत करणें व सरकारचा बँक व्यवहार करणें.

रिझर्व्ह बँक नोटा काढते त्याला तारण असतें. तें तारण चार प्रकारचें असतें.

(१) सोनें व सोनें नाणें (२) परदेशी कर्जरोखे, विशेषतः स्टर्लिंग कर्जरोखे (३) रुपये-नाणें (४) सरकारी कर्जरोखे. त्यासंबंधींचे १९३५ व १९४९ चे तौलनिक आंकडे फारच मनोरंजक आहेत.

१९३५ सालीं एकंदर नोटा : १९३ कोटी रुपये होत्या.
त्याला तारण :

| | | |
|---|---|---|
| सोनें : | ४४ कोटी रुपये. | |
| स्टर्लिंग रोखे : | ६६ | ,, ,, |
| रुपये-नाणें : | ५७ | ,, ,, |
| सरकारी रोखे : | २६ | ,, ,, |

आतां १९४९ चे आंकडे पहा :

एकंदर नोटा : ११८६ कोटी रुपये.
त्याला तारणः

| | | |
|---|---|---|
| सोनें : | ४० कोटी रुपये. | |
| स्टर्लिंग रोखे : | ६८५ | ,, ,, |
| रुपये-नाणें : | ४७ | ,, ,, |
| सरकारी रोखे : | ४१४ | ,, ,, |

ह्या आंकड्यांवरून आपल्याला काय बोध होतो? नोटांची वाढ १९३ कोटी रुपयांपासून ११८६ कोटी रु. झाली आहे. **ह्या वाढीबरोबर सोन्याची वाढ मुळींच झालेली नाहीं.** (४ कोटी रुपये कमीच झालेली आहे व त्याचें कारण हिंदुस्थानची फाळणी व पाकिस्तानला दिलेला वाटा.) तारणाला वाढ म्हणजे मुख्यतः स्टर्लिंग रोखे. ह्याचें कारण म्हणजे हिंदुस्थान ब्रिटिशांच्या ताब्यांत होतें. चलनवाढीला सुरवात १९४२ पासून झाली असें कोष्टकावरून दिसतें. त्याला कारण म्हणजे ब्रिटिश सैनिकांचा हिंदुस्थानांतील खर्च चलनवाढ करून चालविला व त्या चलनवाढीला तारण काय, तर ब्रिटिश सरकारचे स्टर्लिंग रोखे व स्टर्लिंग रोख्यांना तारण काय, तर ब्रिटिश सरकारची हमी, कारण ब्रिटिश सरकारचा सोन्याचा साठा संपुष्टांत आला होता. चलनवाढीचे आपल्या देशाच्या आर्थिक परिस्थितीवर काय परिणाम झाले आहेत हा इतिहास सर्वश्रुत आहे. ते परिणाम अजूनही आपण भोगत आहोंत. हिंदुस्थान स्वतंत्र झाल्यानंतर एवढ्या मोठ्या स्टर्लिंग गंगाजळीचें भवितव्य काय होणार आहे हा मोठा प्रश्न अजून तसाच भिजत पडला आहे. चलनवाढीचा उच्चांक १९४८ मध्यें झाला त्यावेळीं एकंदर चलन १३५१ कोटी रुपये होतें व त्याचें तारण खालील प्रमाणें विभागलें होतें:

| | | |
|---|---|---|
| सोनें : | ४४ कोटी रुपये. | |
| स्टर्लिंग रोखे : | ११३५ | ,, ,, |
| रुपये-नाणें : | ४४ | ,, ,, |
| सरकारी रोखे : | १२८ | ,, ,, |

आतां आपण इतर बँकांकडे वळूं. त्यासंबंधीं आंकडे १८७० पासून मिळतात. १८७० सालीं काय परिस्थिति असेल ह्याबद्दल वाचकाला सहाजिकच कुतुहल असेल. त्यासालीं एकंदर बँकांचा आंकडा फक्त २ होता. शेअर भांडवल व गंगाजळी मिळून १२ लाख रुपये. त्यांच्या ठेवी जवळजवळ १४ लाख रुपये होत्या. हीं एकंदर २६ लाख रुपयांची रक्कम कशी गुंतविली होती त्यासंबंधीं आंकडे दिलेले नाहींत. तेव्हां ते उपलब्ध नाहींत असें धरून चालावें लागतें. १९०० सालीं बँकांचा आंकडा ९ झाला. शेअर भांडवल व गंगाजळी : १ कोटी २७ लाख रुपये, ठेवी : ८ कोटी ७ लक्ष रुपये. १९३५ सालीं (रिझर्व्ह बँक अस्तित्वांत आल्यावर) एकंदर बँका १०० होत्या. त्यांचें शेअरभांडवल व गंगाजळी १४ कोटी रुपये, ठेवी : ८९ कोटी रुपये. ह्यांत इंपीरियल बँकेचे आंकडे मिळविले नाहींत, ते शेअर भांडवल व गंगाजळी : ११ कोटी रुपये व ठेवी : ७९ कोटी रुपये, असे आहेत.

नवीन वर्ष आमच्या सर्व सभासदांना व गिऱ्हाइकांना सुखाचें जावो.

## दि कराड अर्बन को-ऑपरेटिव्ह बँक लि., कराड

( स्थापनाः २४ जानेवारी. १९१७ )

चेअरमनः—श्री. पु. पां. गोखले, बी. ए., एम्. एल. ए.

| | रुपये |
|---|---|
| भाग वसूल भांडवलः | १,४५४८० |
| गंगाजळी व इतर निधीः | १,०९,५०० |
| एकूण ठेवींची रक्कमः | २४,५१,१५० |
| एकूण खेळतें भांडवलः | २९,००,००० |

समासद प्रॉ. फंड ह्या अभिनव योजनेंत सभासद उत्साहानें भाग घेत आहेत.

ठेवींचे दरः—( १ ) चालू ठेवः रु. ०-१२-० ( २ ) सेव्हिंग्ज ठेव : रु. १-११-० ( ३ ) मुदत ठेव रु ३%

सतत १९ वर्षे ' अ ' वर्गात दाखल असलेली ही बँक ठेवीदारांचा विश्वास व सभासदांचें सहकार्य यांचे बळावर स्वातंत्र्याचे काळांत जनतेची सेवा अधिक प्रमाणांत करण्याची उमेद बाळगते.

शं. पु. कुलकर्णी
मॅनेजिंग डायरेक्टर.

नवीन वर्ष आमच्या सभासदांना, ठेवीदारांना व हितचिंतकांना सुखाचें जावो !

• सतत सतरा वर्षे लोकादरास पात्र झालेली

## दि कोल्हापूर मराठा को-ऑप. बँक लि., कोल्हापूर.

( स्थापना १९३३ )

| | |
|---|---|
| अधिकृत शेअर भांडवल | २,००,००० रु. |
| शेअर भांडवल वसूल | ८४,००० रु. |
| रिझर्व्ह व इतर फंडस् | ६६,९३८ रु. |
| खेळतें भांडवल | ५५०,००० रु. पर्यंत |

बँकिंगचे सर्व प्रकारचे व्यवहार केले जातात.

व्ही. एन्. यादव, मॅनेजर. डी. डी. ब्रम्हपुरे, ऑ. सेक्रेटरी भाऊसो. सा. पाटील प्रेसिडेंट.

## दि बेळगांव बँक लिमिटेड

हेड ऑफिसः— बेळगांव.

स्थापना १९३०.

( दक्षिण महाराष्ट्र व मुंबई-कर्नाटकमधील पहिली शेड्यूल्ड बँक )

शाखाः—संकेश्वर, होसूर, गोकाक, कँप ( बेळगांव ), वेंगुर्ला, मालवण, नंदगड, गडहिंग्लज, रामदुर्ग, चिकोडी, नरगुंद, शिरोडा, चिपळूण, कणकवली, निपाणी, बैलहोंगल, मिरज, अथणी देवगड, सावंतवाडी, ठळकवाडी, सौंदत्ती.

### भांडवल

| | |
|---|---|
| खपलेलें व वसूल झालेलें भांडवल | रु. ६,००,००० |
| रिझर्व्ह व इतर फंडस | रु. १,५०,००० |
| एकूण ठेवी | रु. ६५,००,००० |
| खेळतें भांडवल | रु. ७५,००,००० |

### बँकेचीं वैशिष्ट्यें

१. चोख व काटकसरीची व्यवस्था.
२. ठेवीच्या व्याजाचे आकर्षक दर व सर्व वर्गांना परवडतील अशा नव्या योजना.
३. डिव्हिडंडची शाश्वति.
४. उत्तरोत्तर होणारी समाधानकारक व निश्चित प्रगति.

सर्व तऱ्हेचे बँकिंगचे व्यवहार चोख, काळजीपूर्वक व योग्य मोबदल्यांत केले जातात.

विशेष माहितीसाठीं लिहा अगर वरीलपैकीं कोणत्याही शाखेंत चौकशी करा.

ह. सी. कुलकर्णी, बी. ए. मॅनेजर.
गो. वि. सराफ. बी. ए., एलएल. बी. चेअरमन.

## दि कॉसमॉस को-ऑपरेटिव्ह अर्बन बँक, लि., पुणें २.

( स्थापना : १८ जानेवारी १९०६ )

कामाची वेळ—सकाळीं ८॥ ते ११॥ सायंकाळीं ५॥ ते ७

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल | रु. १,२५,००० |
| वसूल झालेलें भांडवल | रु. १,०७,८२० |
| गंगाजळी | रु. ६५,१४८ |

हप्तेबंद ( रिकरिंग ) व कायम ठेवींवरील व्याजाचा दरः— एक वर्ष १॥ टक्का, २ वर्षे २ टक्के व ३ वर्षे २॥ टक्के.

बँक आपल्या सभासदांनाच दोन जामीन, घर, सरकारी कर्जरोखे, कायम ठेव, सोनें, पोस्टल पॉलिसी अगर बँकेनें पसंत केलेल्या विमा कंपन्यांच्या पॉलिसी वगैरे तारणावर कर्ज देतें. सोन्याच्या तारणावर व्याजाचा दर ४॥ टक्केप्रमाणें आहे. तसेंच माफक व्याजाच्या दरानें सभासदांना ओव्हरड्राफ्ट देण्यांत येतात. सरकारी नोकरांचा पगार, पेन्शन, बिलेंवसुली इत्यादि बँकिंगचे व्यवहार बँक करते. तसेंच सभासदांस नियमितपणा, काटकसर व शिलक ठेवणेची सवय लागावी या हेतूनें बँकेनें नवीन हप्तेबंद ठेव घेणेस सुरवात केली आहे. बँकेनें सुरक्षिततेसाठीं सेफ कस्टडी खातेंहि नवीनच सुरू केलें आहे. नियमासंबंधीं कचेरींत चौकशी करावी.

य. श्री. शाळिग्राम कार्यवाह
ज. व. वैद्य, बी. ए. कार्याध्यक्ष

१९४८ साली एकंदर बँकांचा आंकडा ९५३ व त्यांच्या शाखा ५,२५०. त्यांची वर्गवारी येणेप्रमाणे:

| बँका (संख्या) | | शाखा | शेअर भांडवल व गंगाजळी कोटी रुपये | ठेवी कोटी रुपये | शेकडा प्रमाण | ठेवींची गुंतवणूक: सरकारी रोखे कोटी रु. | ठेवींची गुंतवणूक: कर्जे वगैरे कोटी रु. |
|---|---|---|---|---|---|---|---|
| इंपीरियल बँक | १ | ३६७ | १२ | २८० | २४ | १६० | ९७ |
| परदेशी एक्स्चेंज बँका | १५ | ६२ | — | १६० | १४ | — | ११३ |
| शेड्यूल्ड बँका | ७७ | २४७२ | ५० | ५९३ | ५० | २८० | २७० |
| बिगर शेड्यूल्ड बँका | ५४१ | १७६६ | १२ | ७६ | ६ | २३ | ५२ |
| सहकारी बँका (१ लाखावर शेअर भांडवल व गंगाजळी असलेल्या) | ३१९ | ५८३ | १३ | ७१ | ६ | २७ | ४३ |
| | ९५३ | ५,२५० | ८७ | ११८० | १०० | ४९० | ५७५ |

वरील आंकड्यांवरून इंपीरियल बँकेचें आपल्या देशाच्या बँकिंग क्षेत्रांत किती प्रभावी स्थान आहे, हें कळतें. ११८० कोटी रुपयांच्या ठेवींपैकीं २४ टक्के ठेवी एकट्या इंपीरियल बँकेकडे व तिच्या ३६७ शाखांमध्यें विभागल्या आहेत.

त्यानंतर परदेशी एक्श्चेंज बँका. एकंदर १५ बँका पण त्यांच्या ६२ शाखांमधून १६० कोटी रुपये एकत्रित झालेले. ह्या १५ बँकांपैकीं ७ बँका ब्रिटन मधल्या, २ अमेरिकेंतल्या, ४ युरोपमधील व २ इतर

शेड्यूल्ड बँका एकंदर ७७ व त्यांच्या २,४७२ शाखा धरून ५९३ कोटी रुपये ठेवी. पण ह्या ठेवींची आणखी छाननी केली तर असें आढळतें कीं प्रत्येकी २५ कोटी वर ठेवी असलेल्या फक्त ७ बँका आहेत (इंपीरियल बँक धरून) व ह्या ७ बँकांच्या ठेवी ६३५ कोटी रुपयांच्या आहेत. ह्यांतील इंपीरिल बँकेच्या २८० कोटी रुपयांच्या ठेवी वजा केल्यावर ६ बँकांमध्यें ३५५ कोटी रुपयांच्या ठेवी रहातात. तेव्हां बँकांचें ठेवीप्रमाणें वर्गीकरण केल्यास आपल्यास खालील चित्र आढळतें:—

| | | |
|---|---|---|
| १ इंपीरियल बँक | : २८० कोटी | रुपये |
| ६ शेड्यूल्ड बँका | : ३५५ " | " |
| ७१ शेड्यूल्ड बँका | : २३८ " | " |
| १५ परदेशी एक्स्चेंज बँका | : १६० " | " |
| ५४१ बिगर शेड्यूल्ड बँका | : ७६ " | " |
| ३१९ सहकारी बँका (१ लाखावर शेअर-भांडवल व गंगाजळी असलेल्या) | : ७१ " | " |
| ९५३ | ११८० कोटी रु. | |

एकंदर ११८० कोटी रुपये ठेवींपैकीं १०३३ कोटी रुपयांच्या ठेवी ९३ शेड्यूल्ड बँका व परदेशी बँका ह्यांच्या जवळ आहेत; व त्या ९३ बँकांपैकीं ७ बँकांकडे ६३५ कोटी रुपयांच्या ठेवी आहेत ह्यावरून ७ बँकांचें एकंदर बँकिंग व्यवहारावर किती प्रभुत्व आहे याची कल्पना येते. त्याबरोबर दुसरीही गोष्ट सिद्ध होते ती ही कीं, आपल्या देशांत २ प्रकारच्या बँका आहेत.

(१) फार मोठ्या, (२) फार लहान.

बहुतेक सर्व मोठ्या बँका शेड्यूल्ड बँकांच्या सदरांत आहेत असें म्हणणें चुकीचें होणार नाहीं. लहान बँकांचा भरणा नॉन्–शेड्यूल्ड बँकांच्या सदरांत येतो. नॉन्–शेड्यूल्ड बँकांची संख्या ५४१ आहे. त्यापैकीं १४१ बँका १ लाख रुपयांच्या खालीं ठेवी असलेल्या आहेत व १८५ बँका १ ते ५ लाख रुपयांच्या दरम्यानच्या ठेवींच्या सदरांत येतात. ह्या १४१ + १८५ = ३२६ बँकांच्या एकंदर ठेवी ५ कोटी, २४ लाख रुपये भरतात; व त्यापैकीं ४ कोटी, ८४ लाख रुपये लोकांना दिलेल्या कर्जांत गुंतविलेले आहेत. म्हणजे ठेवींच्या ९० टक्क्यांच्या वर पैसे कर्जांत गुंतविलेले आहेत. ह्यावरून ठेवीदारांना सामान्यत: काय सुरक्षितता मिळते ह्याची वाचकांनींच कल्पना करावी. दुसरें म्हटलें म्हणजे ह्या बकांचे ठेवीदार मध्यमवर्ग व त्याच्याखालील वर्गाच्या लोकांतील आहेत त्यांचा पैसा बहुतेक स्वकष्टार्जित असतो व त्या पैशांची सुरक्षितता अशा तऱ्हेनें असणें हें त्यांचें दुर्दैवच म्हणावयास पाहिजे ! अर्थात, लहान बँकांतहि कांहीं बँका नमुनेदार असूं शकतात, हें स्पष्ट केलें पाहिजे.

मोठ्या व लहान बँकांचे ठेवीचे आंकडे व त्यांची गुंतवणूक पाहिली तर त्यांच्या व्यवहारासंबंधी उपयुक्त माहिती मिळते. ठेवी तीन प्रकारच्या असतात:—(१) चालू (२) बचतीच्या (३) मुदतीच्या. मोठ्या बँकांच्या ठेवींचें वर्गीकरण केलें तर त्यांत चालू ठेवींचा जास्त भरणा दिसतो. एकंदर ८७४ कोटी रुपये ठेवींपैकीं ४७३ कोटी रुपयांच्या ठेवी चालू खात्यांच्या आहेत व ३२६ कोटी रुपये बचतीच्या व मुदतीच्या आहेत. लहान बँकांकडे पाहिलें तर त्यांच्यांत बचतीच्या व मुदतीच्या ठेवी चालू ठेवीपेक्षां जास्त आहेत. त्यांच्या ७६ कोटी रुपयांच्या एकंदर ठेवींपैकीं २५ कोटी रुपये चालू व ४७ कोटी रुपये बचतीच्या व मुदतीच्या ठवी आहेत. (वरील आंकड्यांत सहकारी बँकांचा समावेश केलेला नाहीं.)

मोठ्या बँकांची पैसे गुंतविण्याची पद्धत पाहिली म्हणजे त्यांत ठेवीदारांना सुरक्षितता असते असें दिसून येईल. उदाहरणार्थ, एकंदर ८७४ कोटी रुपये ठेवींपैकी ३९३ कोटी रुपये सरकारी रोख्यांत व ३७० कोटी रुपये कर्जे देण्यांत गुंतविले आहेत.

**सहकारी बँकांचे आकडे पाहिले तर त्यांची कार्यपद्धति साधारणपणें मोठ्या बँकांच्या धर्तीवर दिसते, ही खरोखर समाधानकारक गोष्ट आहे.** १ लाख रुपयांच्या ठवीवर शेअर–भांडवल व गंगाजळी असलेल्या सहकारी बँकांचे आंकडे प्रसिद्ध केलेले आहेत, त्यांत परत दोन भाग केले आहेत.

(१) १ ते ५ लाख रुपये पर्यंत शेअर भांडवल व गंगाजळी असलेल्या. (२) ५ लाख रुपयांच्या वर शेअर भांडवल व गंगाजळी असलेल्या. दुसऱ्या भागांत ५५ सहकारी बँका येतात. त्यांच्या ठेवी ४८ कोटी रुपये आहेत व त्यांची गुंतवणूक २० कोटी रुपये सरकारी रोख्यांत व २८ कोटी रुपये कर्जे देण्यांत. पहिल्या भागांत २६४ सहकारी बँका येतात. त्यांच्या

ठेवी २२ कोटी रुपये आहेत व त्यांची ... [illegible] ोटी रुपये सरकारी रोखे व १५ कोटी रुपये कर्जे वै[illegible]

आता आपण हिंदुस्थानांतील बँका व परदेशांतील ( विशेषतः अमेरिका व इंग्लड ) बँका ह्यांची तुलना करूं. उदाहरणासाठीं इंग्लंड मधील "लॉयड्स बँक" व अमेरिकेंतील "नॅशनल सिटी बँक ऑफ न्यूयॉर्क" या दोन बँका घेऊं. त्यांचें शेअर भांडवल, गंगाजळी, ठेवी वगैरेचे आंकडे खालीलप्रमाणें आहेत.

| | लॉयड्स बँक | | नॅशनल सिटी बँक | |
|---|---|---|---|---|
| | कोटी पौंड | कोटी रुपये | कोटी डॉलर्स | कोटी रुपये |
| शेअर भांडवल | १·५ = | २० | ७·७ = | ३६ |
| गंगाजळी | १·३ = | १७ | २० = | ९५ |
| ठेवी | ११२ = | १४५६ | ४२० = | १९१५ |
| सरकारी रोखे, वगैरे | ६६ = | ८५८ | १९९ = | ९४५ |
| कर्जे, वगैरे | २३ = | २९९ | १४२ = | ६७४ |

हिंदुस्थानांतील सर्व बँकांच्या ठेवी घेतल्या तर ११८० कोटी रुपये होतात. त्यामानानें एकट्या लॉयडस बँकेच्या एकंदर ठेवी १४५६ कोटी रुपये आहेत व नॅशनल सिटी बँकेच्या १९१५ कोटी रुपये आहेत ह्यावरून हिंदुस्थानांतील बँकांचें क्षेत्र किती लहान आहे त्याची कल्पना येते. लॉयडस बँक अगर नॅशनल सिटी बँक यांना गलिव्हरची उपमा दिली तर आपल्या देशांतील बँका लिलिपुटच्या शहरवासी ठरतात! बँकिंग क्षेत्रांत आपल्याला अजून किती पल्ला गांठावयाचा आहे याची कल्पना येते.

---

### पाकिस्तानच्या चलनाचें मूल्य

इंटर नॅशनल मॉनेटरी फंडातर्फे पाकिस्तानच्या चलनाचें अवमूल्यन चालू नोव्हेंबरमध्यें करण्यांत येण्याचा संभव आहे असें भारताचे अर्थमंत्री श्री. देशमुख ह्यांनीं बोलून दाखविलें. नोव्हेंबरमध्यें अवमूल्यन करण्यांत आलें नाहीं तर भारताचा प्रतिनिधी हा प्रश्न पुन्हां उपस्थित करणार आहे असेंही त्यांनीं सांगितलें. भारतांत परकीय भांडवल कां गुंतविलें जात नाहीं ह्या प्रश्नास उत्तर देतांना ते म्हणाले कीं, अमेरिकन भांडवलाला भारतापेक्षां अमेरिकेंतच अधिक नफा होतो.

### कॅनडाच्या डॉलरची किंमत

न्यूयॉर्क आणि कॅनडा ह्या देशांत कॅनेडियन डॉलर्सचा भाव जसा खुल्या बाजारांत ठरत आहे तसाच तो आतां लंडनच्या नाणेबाजारांतहि ठरणार आहे. उत्तर अमेरिकेंतील बाजारांत कॅनेडिअन डॉलरचा भाव मागणी-पुरवठ्याप्रमाणें ठरूं लागल्या-पासून, ब्रिटनमध्यें त्याचा बँक ऑफ इंग्लंड भाव ठरवत असे. युद्ध संपल्यानंतर परकीय चलनाचा भाव खुल्या बाजारांत ठरण्याचा हा पाहिलाच प्रसंग आहे.

### वृत्तपत्राच्या कागदाची किंमत

अमेरिकन कॉंग्रेसच्या एका कमिटीचे अध्यक्ष मि. सेलर ह्यांनीं कागदाच्या कारखान्यांना असा इषारा दिला आहे कीं, त्यांनीं अमेरिकन वृत्तपत्रीय कागदाची किंमत वाढविल्यास त्यांच्यावर खटले भरण्यांत येतील. कॅनेडियन रिव्हर पेपर कंपनीनें आपल्या सर्व वृत्तपत्रीय ग्राहकांना कागदाची दर टनी किंमत १०० डॉलर्स ऐवजीं ११० डॉलर्स पडेल असें कळविलें आहे. ह्या कंपनीचें अनुकरण अमेरिकन कंपन्या करतील अशी भीति मि. सेलर ह्यांना वाटत आहे.

---


श्री लक्ष्मी

**सेंट्रल को-ऑपरेटिव्ह बँक लि., फलटण.**

( स्थापनाः—१ फेब्रुवारी १९१६ )

| | | |
|---|---|---|
| भागांचें भांडवल | रु. | ८४,००० |
| बँकेचे स्वतःचे फंड | रु. | १,७९,००० |
| ठेवींच्या रकमा | रु. | १२,००,००० |

संचालक मंडळ

श्री. वि. शं. शिरपे, बी. ए., एल एल बी. अध्यक्ष.
श्री. ग. रा. केंजळे, उपाध्यक्ष.
श्री. बा. बा. माळी, संचालक.
श्री. सा. मा. बोंद्रे, संचालक.

व्यवस्थापक

श्री श्री. ह. तळवलकर, ए. सी. आर. ए.

— बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात —

बँकेनें रजत-महोत्सवाच्या वर्षांत पदार्पण केलेलें असून रजत-महोत्सव वर्षांतील ही 'दीपावली' व नूतन संवत्सर बँकेचे सर्व भागीदार, ठेवीदार, आणि हितचिंतक यांना आनंदाचे, भरभराटीचें व भाग्याचें जावो अशी मनःपूर्वक इच्छा आहे.

**अर्बन को-ऑपरेटिव्ह बँक लि., सांगली**

( स्थापनाः-१९३५ )

( ३०-९-१९५० रोजीं )

| | | |
|---|---|---|
| अधिकृत भांडवल | रु. | ५,००,००० |
| वसूल भांडवल | रु. | १,१६,११० |
| रिझर्व्ह फंड | रु. | ४६,९५९ |
| इतर फंड | रु. | ५१,७०७ |
| ठेवी | रु. | १३,३७,६५८ |
| एकूण खेळतें भांडवल | रु. | १५,९१,६३८ |

डायरेक्टर्स

(१) श्री. ग. कों. गोडबोले, B. A., LL. B. चेअरमन.
(२) ,, के. वि. भिडे.
(३) ,, गं. गो. बिनीवाले.
(४) ,, रा. ल. कुलकर्णी, उदगांवकर.
(५) ,, म. ह. गोडबोले, B. A., LL. B.
(६) ,, अ. बि. इनामदार.
(७) ,, ल. वृ. भिडे.
(८) ,, वा. वि. वाटवे, B. A., LL. B.
(९) ,, ग. का. वांडेकर.

बँकिंगचीं सर्व कामें केलीं जातात.

ल. य. लागू, B. A., LL. B.,
मॅनेजर.

ठेवी २२ कोटी रुपये आहेत व त्यांची ... ोटी रुपये सरकारी रोखे व १५ कोटी रुपये कर्जे वे

आता आपण हिंदुस्थानांतील बँका व परदेशांतील ( विशेषतः अमेरिका व इंग्लड ) बँका ह्यांची तुलना करूं. उदाहरणासाठीं इंग्लंड मधील "लॉयड्स बँक" व अमेरिकेंतील "नॅशनल सिटी बँक ऑफ न्यूयॉर्क" या दोन बँका घेऊं. त्यांचें शेअर भांडवल, गंगाजळी, ठेवी वगैरेचे आंकडे खालीलप्रमाणें आहेत.

| | लॉयड्स बँक | | नॅशनल सिटी बँक | |
|---|---|---|---|---|
| | कोटी पौंड | कोटी रुपये | कोटी डॉलर्स | कोटी रुपये |
| शेअर भांडवल | १·५ = | २० | ७·७ = | ३६ |
| गंगाजळी | १·३ = | १७ | २० = | ९५ |
| ठेवी | ११२ = | १४५६ | ४२० = | १९१५ |
| सरकारी रोखे, वगैरे | ६६ = | ८५८ | १९९ = | ९४५ |
| कर्जे, वगैरे | २३ = | २९९ | १४२ = | ६७४ |

हिंदुस्थानांतील सर्व बँकांच्या ठेवी घेतल्या तर ११८० कोटी रुपये होतात. त्यामानानें एकट्या लॉयडस बँकेच्या एकंदर ठेवी १४५६ कोटी रुपये आहेत व नॅशनल सिटी बँकेच्या १९१५ कोटी रुपये आहेत ह्यावरून हिंदुस्थानांतील बँकांचें क्षेत्र किती लहान आहे त्याची कल्पना येते. लॉयडस बँक अगर नॅशनल सिटी बँक यांना गलिव्हरची उपमा दिली तर आपल्या देशांतील बँका लिलिपुटच्या शहरवासी ठरतात! बँकिंग क्षेत्रांत आपल्याला अजून किती पल्ला गांठावयाचा आहे याची कल्पना येते.

---

### पाकिस्तानच्या चलनाचें मूल्य

इंटर नॅशनल मॉनेटरी फंडातर्फे पाकिस्तानच्या चलनाचें अवमूल्यन चालू नोव्हेंबरमध्यें करण्यांत येण्याचा संभव आहे असें भारताचे अर्थमंत्री श्री. देशमुख ह्यांनीं बोलून दाखविलें. नोव्हेंबरमध्यें अवमूल्यन करण्यांत आलें नाहीं तर भारताचा प्रतिनिधी हा प्रश्न पुन्हां उपस्थित करणार आहे असेंही त्यांनीं सांगितलें. भारतांत परकीय भांडवल कां गुंतविलें जात नाहीं ह्या प्रश्नास उत्तर देतांना ते म्हणाले कीं, अमेरिकन भांडवलाला भारतापेक्षां अमेरिकेंतच अधिक नफा होतो.

### कॅनडाच्या डॉलरची किंमत

न्यूयॉर्क आणि कॅनडा ह्या देशांत कॅनेडियन डॉलर्सचा भाव जसा खुल्या बाजारांत ठरत आहे तसाच तो आतां लंडनच्या नाणेबाजारांतहि ठरणार आहे. उत्तर अमेरिकेंतील बाजारांत कॅनेडिअन डॉलरचा भाव मागणी-पुरवठ्याप्रमाणें ठरूं लागल्यापासून, ब्रिटनमध्यें त्याचा बँक ऑफ इंग्लंड भाव ठरवत असे. युद्ध संपल्यानंतर परकीय चलनाचा भाव खुल्या बाजारांत ठरण्याचा हा पहिलाच प्रसंग आहे.

### वृत्तपत्राच्या कागदाची किंमत

अमेरिकन कॉंग्रेसच्या एका कमिटीचे अध्यक्ष मि. सेलर ह्यांनीं कागदाच्या कारखान्यांना असा इषारा दिला आहे कीं, त्यांनीं अमेरिकन वृत्तपत्रीय कागदाची किंमत वाढविल्यास त्यांच्यावर खटले भरण्यांत येतील. कॅनेडियन रिव्हर पेपर कंपनीनें आपल्या सर्व वृत्तपत्रीय ग्राहकांना कागदाची दर टनी किंमत १०० डॉलर्स ऐवजीं ११० डॉलर्स पडेल असें कळविलें आहे. ह्या कंपनीचें अनुकरण अमेरिकन कंपन्या करतील अशी भीति मि. सेलर ह्यांना वाटत आहे.

---


श्री लक्ष्मी

## सेंट्रल को-ऑपरेटिव्ह बँक लि., फलटण.

( स्थापनाः—१ फेब्रुवारी १९२६ )

| | | |
|---|---|---|
| भागांचें भांडवल | रु. | ८४,००० |
| बँकेचे स्वतःचे फंड | रु. | १,७९,००० |
| ठेवींच्या रकमा | रु. | १२,००,००० |

संचालक मंडळ

श्री. वि. शं. झिरपे, बी. ए., एल एल् बी· अध्यक्ष.
श्री. ग. रा. केंजळे, उपाध्यक्ष.
श्री. बा. बा. माळी, संचालक.
श्री. सा. मा. बोंद्रे, संचालक.

व्यवस्थापक

श्री श्री. ह. तळवलकर, ए. सी. आर. ए.

— बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात —

बँकेनें रजत--महोत्सवाच्या वर्षांत पदार्पण केलेलें असून रजत–महोत्सव वर्षातील ही 'दीपावली' व नूतन संवत्सर बँकेचे सर्व भागीदार, ठेवीदार, आणि हितचिंतक यांना आनंदाचे, भरभराटीचें व भाग्याचें जावो अशी मनःपूर्वक इच्छा आहे.


---


## अर्बन को-ऑपरेटिव्ह बँक लि., सांगली

( स्थापनाः-१९३५ )

( ३०-९-१९५० रोजीं )

| | | |
|---|---|---|
| अधिकृत भांडवल | रु. | ५,००,००० |
| वसूल भांडवल | रु. | १,१६,९१० |
| रिझर्व्ह फंड | रु. | ४६,९५९ |
| इतर फंड | रु. | ५१,७०७ |
| ठेवी | रु. | १३,३७,६५८ |
| एकूण खेळतें भांडवल | रु. | १५,९१,६३८ |

डायरेक्टर्स

(१) श्री. ग. कों. गोडबोले, B. A., LL. B. चेअरमन.
(२) ,, के. वि. भिडे.
(३) ,, गं. गो. बिनीवाले.
(४) ,, रा. ल. कुलकर्णी, उद्‌गांवकर.
(५) ,, म. ह. गोडबोले, B. A., LL. B.
(६) ,, अ. वि. इनामदार.
(७) ,, ल. वृ. भिडे.
(८) ,, वा. वि. वाटवे, B. A., LL. B.
(९) ,, ग. का. वांडेकर.

बँकिंगचीं सर्व कामें केलीं जातात.

ल. य. लागू, B. A., LL. B.,
मॅनेजर.

# टेक्स्टाइल इन्डस्ट्री वर्किंग पार्टी

[ श्री. ग. कृ. चितळे, बी. कॉम्, मुंबई २४ व पुणें ४ ]

मध्यवर्ती सरकारनें कापड गिरण्यांची चौकशी करण्यासाठीं सर रामस्वामी मुदलियार यांच्या अध्यक्षतेखालीं एक कमिटी नेमली आहे. या कमिटीला कमिटी न म्हणतां, "वर्किंग पार्टी" असें नांव दिलें आहे ही एक लक्षांत ठेवण्याजोगी गोष्ट आहे. सर मुदलियार यांनीं नुकताच परदेशांत दौरा काढला व तिकडील गिरण्यांची माहिती मिळविली. या पार्टींत गिरण्यांची खडानखडा माहिती असलेले श्रीयुत डी. पी. जोशी यांचेसारखे तज्ज्ञ आहेत, त्यामुळें जनतेची अपेक्षा वाढली आहे व गेल्या चार-पांच वर्षांच्या गडबडगुंड्यांतून आतां कापड-गिरण्यांच्या धंद्याला, ही "वर्किंग पार्टी" आपल्या सल्ल्याचा हात देऊन चक्रीभोंवऱ्यांतून बाहेर काढील असा भरवसा वाटतो.

सर मुदलियार यांनीं म्हटल्याप्रमाणें या "पार्टीच्या" "टर्मस् ऑफ रेफरन्स" फार विस्तृत आहेत. कापडाचें उत्पादन वाढेल कसें? उत्पादनाचा खर्च कमी कसा करतां येईल? त्याचप्रमाणें, यंत्राप्रमाणें मजुरांच्या संख्येचें प्रमाण कसें बसवावें व त्यासाठीं काय परिस्थिति तयार करावी? त्याशिवाय सध्यांची कापडाच्या व्यापाराची पद्धति कशी असावी, यासारखे विस्तृत व किचकट परंतु कापड गिरणीच्या धंद्याला फार महत्त्वाचे असे प्रश्न सोडविण्याचें फार कठीण काम या पार्टीला करावयाचें आहे.

"पार्टी" नेमल्यावर तेथें उपपार्ट्या-सब् कमिट्या-नेमून त्यांनीं कापडगिरण्यांचे चालकांसाठीं एक विस्तृत प्रश्नावली तयार केली आहे. कांहीं व्यापारी संस्थांकडेहि ती मतप्रदर्शनासाठीं रवाना झाली आहे. सुरवातीस सर मुदलियार यांनीं मालकांना आश्वासन दिलें आहे कीं, ही चौकशी त्यांचें (मालकांचें) भलें करण्यासाठीं, त्यांच्या अडचणी दूर करण्यासाठीं आहे, अडचणींत भर घालण्यासाठीं, कन्ट्रोल वाढविण्यासाठीं नाहीं. सर मुदलियार यांनीं सर्व गिरणीमालकांना आग्रहाची विनंति केली आहे कीं त्यांनीं शक्य त्या सर्व मार्गांनीं या पार्टीबरोबर सहकार करून पार्टीची विस्तृत अशी प्रश्नावली असली तरी शक्य तेवढीं उत्तरें व माहिती देऊन पार्टीला तिच्याकडे सोंपविलेल्या कामगिरींत मदत करावी.

**प्रश्नावली**—ही फार विस्तृत आहे. तिचे निरनिराळे भाग पाडले आहेत. एक कापसाबाबत, एक मजूर, त्यावर देखरेख करणारे. दुसरा यंत्रांचेबाबत. यंत्रांची खुलासेवार माहिती मागविली आहे. यावरून दिसून येईल कीं साधारणपणें कापड उत्पादनाचे सर्व प्रश्न ही पार्टी योग्य रीतीनें हाताळील. अशी आशा आहे कीं, या पार्टीला तरी कापड उत्पादनाचा धंदा सरळ व योग्य मार्गावर आणण्यांत यश येईल.

या प्रश्नावलींत पुष्कळ खुबीदार व खोचक प्रश्न आहेत व ते इतर कारखानदारांनां अभ्यास करण्याजोगे आहेत. म्हणून ही प्रश्नमालिका, महाराष्ट्रांतील सर्व कारखानदारांनीं वाचून मनन करावी अशी या लेखकाची आग्रहाची विनंति आहे. सर्व कारखाने चालविण्याचे मुळाशीं कांहीं समान तत्त्वें असतात व तीं साधारणपणें सर्व कारखान्यांना लागू पडतात. म्हणून ज्यांचा ज्यांचा कारखानदारीशीं डायरेक्टर, एजन्ट अथवा मॅनेजर म्हणून संबंध येतो त्यांनीं एकदा ती वाचून त्यांतील प्रश्नांचा नीट अभ्यास करावा व स्वतःचे कारखान्याबाबत त्यावर विचार करावा म्हणजे त्यांना दिसून येईल कीं त्यांचे कारखान्याचेबाबत त्यांनीं कच्चा माल, पक्का माल, मजूर, देखरेख करणारे, कॉस्टिंग्, वगैरे अनेक गोष्टींत काय करावयास पाहिजे. ही प्रश्नावली महत्त्वाची आहे व म्हणूनच तिजकडे, प्रस्तुत लेखक महाराष्ट्रांतील सर्व कारखानदारांचें लक्ष वेधूं इच्छितो.

बारीकसारीक व खुद्द कापड गिरण्यांना लागू पडणारे प्रश्न बाजूस ठेवून, व सर्व कारखान्यांना लागू पडणाऱ्या प्रश्नांपैकीं थोडेसे प्रश्न, याकडे लक्ष वेधण्यासाठीं विचारांत घेऊं.

**कच्चा माल**—गिरण्यांचा कच्चा माल म्हणजे कापूस. त्याबाबत बारा प्रश्न आहेत. एक प्रश्न सँपलप्रमाणें सर्व माल मिळाला कां, हें पहाण्याबाबत. त्याचप्रमाणें कापसाचा म्हणजे कच्च्या मालाचा तुटवडा असल्यास काय करावें असे प्रश्न कोणतेही कारखानदारास उपयुक्त वाटतीलच.

**मजूर**—मजुरांची कार्यक्षमता कशी वाढेल वगैरे प्रश्नहि कोणतेही कारखानदाराला जिव्हाळ्याचे वाटतीलच.

रॅशनॅलझेशन हा एक फार मोठा प्रश्न आहे. त्याखालीं मजुरांचे धरून ४१ प्रश्न आहेत व ते सर्व महत्त्वाचे आहेत. तें मुळांतून वाचून आपआपल्या कारखान्याना लागू करून पहावे. ते विचार करण्याजोगे आहेत. एकच उदाहरण देतों. कारखान्यांतील यंत्रें सुव्यवस्थित व कार्यक्षम ठेवण्याबाबत यंत्रा-यंत्रामध्यें अंतर किती असावें, कारखान्यांत आंत रंग कोणते द्यावे, घरघर व आवाज कमी कसा करावा, वगैरे. यंत्रांची घरघर व आवाज कमी झाल्यास त्याचा मजुरांवर इष्ट व चांगला परिणाम होतो.

लढाईंत स्टोअर्स् दुसऱ्या देशांतून फार कमी येऊं लागला त्यामुळें आपल्या देशांत गिरण्यांना लागणाऱ्या अनेक वस्तू तयार होऊं लागल्या. अशा सुमारें पाऊणशें वस्तूंबाबत प्रश्न आहेत. त्यांच्या किंमती, टिकाऊपणा, सारखेपणा वगैरेवर मत मागविलें आहे. इतर कारखानदारांनीं हाही विचारांत घेण्याजोगा प्रश्न आहे व त्यांनीं अशी यादी आपले कारखान्यासाठीं करून शक्य तितका आपल्या देशांत तयार होणारा "स्टोअर" वापरावा व तो कमी दर्जाचा असल्यास त्याचा दर्जा सुधारण्याची कोशीस करावी.

**उत्पादन**—उत्पादन वाढविण्याबाबत कांहीं महत्त्वाचे प्रश्न आहेत. मजुरांचें काम नियमित करून त्यांचें "वर्कलोड" ठरवावें व त्यांना योग्य प्रमाणांत मजुरी ठरवून द्यावी. "वर्कलोड" बसविल्यावर मजुरांना थोडी जास्त मजुरी देऊनही कारखानदारांना ती परवडेल का, प्रश्न आहे. "वर्कलोड" ठरविण्याबाबत हा एक मूलभूत प्रश्न असल्यामुळें इतर कारखानदारांना हा प्रश्न महत्त्वाचा व विचार करण्यासारखा आहे. त्याचप्रमाणें "वर्कस् कमिट्या" "किंवा "उत्पादन कमिट्या" स्थापण्याबाबत हाही सर्वच कारखानदारांच्या जिव्हाळ्याचा प्रश्न होणार आहे.

तेव्हां मथितार्थ एवढाच, कीं महाराष्ट्रांतील सर्व कारखानदारांनीं ही महत्त्वाची प्रश्नावली काळजीपूर्वक अभ्यासून आपापले कारखाने सुधारण्याबाबत विचार करावा. त्यांचाच फायदा आहे व म्हणूनच "दिवाळीच्या" शुभदिवसांत याकडे मी लक्ष वेधूं इच्छितों.

# टेक्स्टाइल इन्डस्ट्री वर्किंग पार्टी

[ श्री. ग. कृ. चितळे, बी. कॉम, मुंबई २४ व पुणें ४ ]

मध्यवर्ती सरकारनें कापड गिरण्यांची चौकशी करण्यासाठीं सर रामस्वामी मुदलियार यांच अध्यक्षतेखालीं एक कमिटी नेमली आहे. या कमिटीला कमिटी न म्हणतां, "वर्किंग पार्टी" असें नांव दिलें आहे ही एक लक्षांत ठेवण्याजोगी गोष्ट आहे. सर मुदलियार यांनीं नुकताच परदेशांत दौरा काढला व तिकडील गिरण्यांची माहिती मिळविली. या पार्टीत गिरण्यांची खडानुखडा माहिती असलेले श्रीयुत डी. पी. जोशी यांचेसारखे तज्ज्ञ आहेत, त्यामुळें जनतेची अपेक्षा वाढली आहे व गेल्या चार-पांच वर्षांच्या गडबडगुंड्यांतून आतां कापड-गिरण्यांच्या धंद्याला, ही "वर्किंग पार्टी" आपल्या सल्ल्याचा हात देऊन चक्रीभोंवऱ्यांतून बाहेर काढील असा भरवसा वाटतो,

सर मुदलियार यांनीं म्हटल्याप्रमाणें या "पार्टीच्या" "टर्मस् ऑफ रेफरेन्स" फार विस्तृत आहेत. कापडाचें उत्पादन वाढेल कसें? उत्पादनाचा खर्च कमी कसा करतां येईल? त्याचप्रमाणें, यंत्राप्रमाणें मजुरांच्या संख्येचें प्रमाण कसें बसवावें व त्यासाठीं काय परिस्थिति तयार करावी? त्याशिवाय सध्यांची कापडाच्या व्यापाराची पद्धति कशी असावी, यासारखे विस्तृत व किचकट परंतु कापड गिरणीच्या धंद्याला फार महत्त्वाचे असे प्रश्न सोडविण्याचें फार कठीण काम या पार्टीला करावयाचें आहे.

"पार्टी" नेमल्यावर तेथें उपपार्ट्या-सब् कमिट्या-नेमून त्यांनीं कापडगिरण्यांचे चालकांसाठीं एक विस्तृत प्रश्नावली तयार केली आहे. कांहीं व्यापारी संस्थांकडेहि ती मतप्रदर्शनासाठीं रवाना झाली आहे. सुरवातीस सर मुदलियार यांनीं मालकांना आश्वासन दिलें आहे कीं, ही चौकशी त्यांचें (मालकांचें) भलें करण्यासाठीं, त्यांच्या अडचणी दूर करण्यासाठीं आहे, अडचणींत भर घालण्यासाठीं, कन्ट्रोल वाढविण्यासाठीं नाहीं. सर मुदलियार यांनीं सर्व गिरणीमालकांना आग्रहाची विनंति केली आहे कीं त्यांनीं शक्य त्या सर्व मार्गांनीं या पार्टीबरोबर सहकार करून पार्टीची विस्तृत अशी प्रश्नावली असली तरी शक्य तेवढीं उत्तरें व माहिती देऊन पार्टीला तिच्याकडे सोंपविलेल्या कामगिरींत मदत करावी.

**प्रश्नावली**—ही फार विस्तृत आहे. तिचे निरनिराळे भाग पाडले आहेत. एक कापसाबाबत, एक मजूर, त्यावर देखरेख करणारे. दुसरा यंत्रांचेबाबत. यंत्रांची खुलासेवार माहिती मागविली आहे. यावरून दिसून येईल कीं साधारणपणें कापड उत्पादनाचे सर्व प्रश्न ही पार्टी योग्य रीतीनें हाताळील. अशी आशा आहे कीं, या पार्टीला तरी कापड उत्पादनाचा धंदा सरळ व योग्य मार्गावर आणण्यांत यश येईल.

या प्रश्नावलींत पुष्कळ खुबीदार व खोचक प्रश्न आहेत व ते इतर कारखानदारांनां अभ्यास करण्याजोगे आहेत. म्हणून ही प्रश्नमालिका, महाराष्ट्रांतील सर्व कारखानदारांनीं वाचून मनन करावी अशी या लेखकाची आग्रहाची विनंति आहे. सर्व कारखाने चालविण्याचे मुळाशीं कांहीं समान तत्त्वें असतात व तीं साधारणपणें सर्व कारखान्यांना लागू पडतात. म्हणून ज्यांचा ज्यांचा कारखानदारीशीं डायरेक्टर, एजन्ट अथवा मॅनेजर म्हणून संबंध येतो त्यांनीं एकदा ती वाचून त्यांतील प्रश्नांचा नीट अभ्यास करावा व स्वतःचे कारखान्याबाबत त्यावर विचार करावा म्हणजे त्यांना दिसून येईल कीं त्यांचे कारखान्याचेबाबत त्यांनीं कच्चा माल, पक्का माल, मजूर, देखरेख करणारे, कॉस्टिंग, वगैरे अनेक गोष्टींत काय करावयास पाहिजे. ही प्रश्नावली महत्त्वाची आहे व म्हणूनच तिजकडे, प्रस्तुत लेखक महाराष्ट्रांतील सर्व कारखानदारांचें लक्ष वेधूं इच्छितो.

बारीकसारीक व खुद्द कापड गिरण्यांना लागू पडणारे प्रश्न बाजूस ठेवून, व सर्व कारखान्यांना लागू पडणाऱ्या प्रश्नांपैकीं थोडेसे प्रश्न, याकडे लक्ष वेधण्यासाठीं विचारांत घेऊं.

**कच्चा माल**—गिरण्यांचा कच्चा माल म्हणजे कापूस: त्याबाबत बारा प्रश्न आहेत. एक प्रश्न सॅंपलप्रमाणें सर्व माल मिळाला कां, हें पहाण्याबाबत. त्याचप्रमाणें कापसाचा म्हणजे कच्च्या मालाचा तुटवडा असल्यास काय करावें असे प्रश्न कोणतेही कारखानदारास उपयुक्त वाटतीलच.

**मजूर**—मजुरांची कार्यक्षमता कशी वाढेल वगैरे प्रश्नहि कोणतेही कारखानदाराला जिव्हाळ्याचे वाटतीलच.

रॅशनॅलझेशन हा एक फार मोठा प्रश्न आहे. त्याखालीं मजुरांचे धरून ४१ प्रश्न आहेत व ते सर्व महत्त्वाचे आहेत. तें मुळांतून वाचून आपआपल्या कारखान्यांना लागू करून पहावे. ते विचार करण्याजोगे आहेत. एकच उदाहरण देतों. कारखान्यांतील यंत्रें सुव्यवस्थित व कार्यक्षम ठेवण्याबाबत यंत्रा-यंत्रामध्यें अंतर किती असावें, कारखान्यांत आंत रंग कोणते द्यावे, घरघर व आवाज कमी कसा करावा, वगैरे. यंत्रांची घरघर व आवाज कमी झाल्यास त्याचा मजुरांवर इष्ट व चांगला परिणाम होतो.

लढाईत स्टोअर्स् दुसऱ्या देशांतून फार कमी येऊं लागला त्यामुळें आपल्या देशांत गिरण्यांना लागणाऱ्या अनेक वस्तू तयार होऊं लागल्या. अशा सुमारें पाऊणशें वस्तूंबाबत प्रश्न आहेत. त्यांच्या किंमती, टिकाऊपणा, सारखेपणा वगैरेंवर मत मागविलें आहे. इतर कारखानदारांनीं हाही विचारांत घेण्याजोगा प्रश्न आहे व त्यांनीं अशी यादी आपले कारखान्यासाठीं करून शक्य तितका आपल्या देशांत तयार होणारा "स्टोअर" वापरावा व तो कमी दर्जाचा असल्यास त्याचा दर्जा सुधारण्याची कोशीस करावी.

**उत्पादन**—उत्पादन वाढविण्याबाबत कांहीं महत्त्वाचे प्रश्न आहेत. मजुरांचें काम नियमित करून त्यांचें "वर्कलोड" ठरवावें व त्यांना योग्य प्रमाणांत मजुरी ठरवून द्यावी. "वर्कलोड" बसविल्यावर मजुरांना थोडी जास्त मजुरी देऊनही कारखानदारांना ती परवडेल का, प्रश्न आहे. "वर्कलोड" ठरविण्याबाबत हा एक मूलभूत प्रश्न असल्यामुळें इतर कारखानदारांना हा प्रश्न महत्त्वाचा व विचार करण्यासारखा आहे. त्याचप्रमाणें "वर्कस् कमिट्या" "किंवा "उत्पादन कमिट्या" स्थापण्याबाबत हाही सर्वच कारखानदारांच्या जिव्हाळ्याचा प्रश्न होणार आहे.

तेव्हां मथितार्थ एवढाच, कीं महाराष्ट्रांतील सर्व कारखानदारांनीं ही महत्त्वाची प्रश्नावली काळजीपूर्वक अभ्यासून आपापले कारखाने सुधारण्याबाबत विचार करावा. त्यांचाच फायदा आहे व म्हणूनच "दिवाळीच्या" शुभदिवसांत याकडे मी लक्ष वेधूं इच्छितों.

[ दिवाळीचें ] अभिनव योजना [ शुभचिंतन ]

## "दि रेखा इंडस्ट्रीज् लि., नासिक.

[ मोठ्या प्रमाणावर अनेक उद्योगधंद्यांचें एकीकरण ]

एकूण शेअर भांडवल ५ लाख रुपये.

जंगलांतील टाकाऊ मालापासून रेयॉन्, प्लायवुड, डांबर, सुगंधी तेलें, सेंटस्, निरनिराळ्या प्रकारचे रंग व औषधीं, तसेच अनेक प्रकारच्या उपयुक्त वस्तू तयार केल्या जातात.

आपल्या दिवाळीचा आनंद "रेखा इंडस्ट्रीज्" ची एजन्सी व शेअर्स घेऊन द्विगुणित करा.

[ प्रत्येक शेअरची किंमत २५ रुपये ]

गांवोगांव एजंटस् व प्रचारक नेमणें आहेत.

अधिक माहितीकरितां लिहा.

मॅनेजिंग एजंटस्

दि रेखा इंडस्ट्रीज् लि.

५०५ रविवार पेठ, नासिक सिटी.

## दक्षिण सातारा जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि., सांगली.

स्थापना १९२७

हेड ऑफिसः--हायस्कूल रोड, सांगली.

शाखा:—१ जत, २ मिरज.

| | | |
|---|---|---|
| अधिकृत भांडवल | रुपये | १०,००,००० |
| खपलेलें ,, | रुपये | २,२१,००० |
| वसूल झालेलें भांडवल | रुपये | १,४२,००० |
| फंडस् | रुपये | १,२३,००० |
| खेळतें भांडवल | रुपये | १५,००,००० चेवर |

### बोर्ड ऑफ डायरेक्टर्स

सरकारतर्फेः —

मे. म. अं. दप्तरदार, B. A., चेअरमन.

मे. असि. रजिस्ट्रार को. सो. सातारा.

मे. रा. बा. आरवाडे, B. A., LL. B.

मे. ज. वि. करमरकर, सराफ.

सोसायट्यां तर्फे:—

मे. के. आ. चौगुले, B. A., LL. B.

मे. हिं. म. पाटील.

मे. रा. म. पाटील.

वैयक्तिक सभासदांतर्फेः--

मे. म. ह. गोडबोले, B. A., LL. B.

मे. सु. आ. पाटील.

करंट, सेव्हिंग्ज व कायम ठेवी स्वीकारल्या जातात.

बँकिंगचे इतर सर्व व्यवहार केले जातात.

ना. पां. ठाणेदार, मॅनेजर. म. अं. दप्तरदार, बी. ए. चेअरमन.

## दि बँक ऑफ सिटिझन्स लि.

मुख्य कचेरीः १५१४ मारुती गल्ली, बेळगांव.

स्थापना १९३७

बँकेचीं वैशिष्ट्यें

१ सुरक्षितपणा, सचोटी, सेवा, या त्रयींवर अधिष्ठित असलेली.

२ स्थानिक बँकांमध्यें सर्वांत जास्त रिझर्व्ह फंड असलेली. स्टॅच्युटरी रिझर्व्ह १ लाख, अनकॉल्ड रिझर्व्ह ३॥ लाख, एकूण ४॥ लाख.

३ श्रीयुत जी. डी. सराफ व इतर सन्मान्य व जबाबदार व्यापारी यांच्या नेतृत्वाखालीं चाललेली.

४ चालू खात्यावर द. द. १, सेव्हिंग्ज बँकेवर द. द. २, सहामाही, एक वर्ष व दोन वर्षें मुदतीच्या ठेवींवर अनुक्रमें द. द. अडीच, तीन व साडेतीन टक्के व्याज देणारी.

५ सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार करणारी.

६ बेळगांव, धारवाड, विजापूर व कारवार जिल्ह्यांतील प्रमुख शहरीं शाखा असलेली एकमेव बँक.

व्ही. एम्. पाटकर

जनरल मॅनेजर,

बँक ऑफ सिटिझन्स लिमिटेड, बेळगांव.

आयुष्य, आग, मोटार, वर्कमेन कॉम्पेन्सेशन, वगैरे सर्व प्रकारचे विमा काम करणारी महाराष्ट्रीय विमा कंपनी

## कॉमनवेल्थ विमा कंपनी लि., पुणें

एजंटस् व ऑर्गनायझर नेमणें आहेत.

श्री. म. जोशी

मॅनेजिंग डायरेक्टर

**कांहीं उणीवा**—या प्रश्नावलींत कांहीं मुद्दे कळत वा न कळत डावले गेले आहेत. त्याकडे पार्टीचें व इतरांचें लक्ष वेधण्यासाठीं थोडे मुद्दे खालीं देत आहे.

**कंपनी कायदा**—कंपनी कायद्याचा उपयोग वा दुरुपयोग करण्यांत आला त्याबाबत या प्रश्नावलींत एकहि प्रश्न नाहीं. मॅनेजिंग एजन्टस् बरोबरचे करार, त्यांचें एकंदर वागणें व खर्चाला कांहीं सुमार नसणें, त्यांचीं कमिशनें ( खरेदी कमिशनें, विक्री कमिशनें, बिल्डिंग सुपरव्हिजन कमिशनें ) वगैरे बाबत खुलासेवार प्रश्न पाहिजे होते. त्याचप्रमाणें "ऑफीस अलावन्स" बाबत प्रश्न नाहीं. त्यांचे करारावाबतही प्रश्न नाहीं. ही एक मोठी उणीव राहिली आहे.

**फेरफार**—कंपनी कायद्यांत होणारे फेरफार याबाबतही वर्किंग पार्टीनें प्रश्न विचारणें फार जरूर होतें. नवीन होऊं घातलेल्या फेरफारांचा कंपनी चालविण्यावर काय काय परिणाम होतील, त्यामुळें नवे प्रश्न काय उत्पन्न होतील वगैरेबाबत विचारणा जरूर हवी होती. नवीन बदलांचा कंपन्या चालविण्यावर फार दूरवर व खोलवर परिणाम होणार आहेत. कारखानदारांनीं वेळेवर सावध व्हावें.

**बोनस शेअर्स**—पुष्कळशा गिरण्यांनीं आपल्या भागीदारांना बोनस शेअर्स देऊन भांडवलांत सुमारें दीड पटीनें वाढ केली. अर्थात एका खिशांतून दुसऱ्या खिशांत पैसे जरी गेले असले तरी पुढील व्याजावर ( डिव्हिडन्डवर ) फार मोठा परिणाम होणार आहे. म्हणजे भावी भांडवल घालणारावर. त्याबाबत पार्टीचें लक्ष गेलेलें नाहीं.

**मशिनरीचे तक्ते**-एकंदर बारा आहेत. त्यांत मजुरीबाबत माहिती विचारली आहे पण स्टोअर्स बाबत-स्टोअर्स किती लागला—एकही प्रश्न नाहीं. हें एकदम नजरेसमोर येतें. त्याचप्रमाणें तक्ता ४ ( वाइंडिंग ) मध्यें वेस्ट किती निघाली तें विचारले आहे पण इतर खात्यांत वेस्ट किती निघाली व ती दिवसपाळींत किती व रात्रपाळींत किती हें कोठेंही विचारलें नाहीं. दुसरी एक उणीव दिसते ती मशीनची• यंत्राची चाल ( स्पीड ) किती हें विचारलें नाहीं. यंत्रावर आठ तासांत माल किती निघाला हें विचारलें पण तें यंत्र फार जोरांत चाललें कां योग्य चालीवर होते, कां चालावें त्यापेक्षा हळू चाललें हें विचारावयास पाहिजे होतें. त्याचप्रमाणें एका माणसास किती माग हे विचारले पण एका बाईला रीलिंग वाइंडिंगमधें किती स्पिंडल्स ( सुया ) दिल्या आहेत हें विचारलें नाहीं. मशिनरींत क्रॉजसचे साइज विचारले नाहींत तें विचारावयास पाहिजे होतें.

**हिशोबाचे बॅलन्स शीटस**—मागविलेले आहेत पण पुष्कळशा हिशोबांत निरनिराळे खर्च एकत्र करून दाखविले जातात. त्याबाबत माहिती मागविल्याशिवाय वर्किंग पार्टीला मागणार नाहीं. म्हणजे पुन्हा पत्रव्यवहार वाढला. प्रश्नावलींत ते विचारता आले असते. त्याप्रमाणें स्टोअर्सबाबतची मुग्धता आक्षेपार्ह आहे, असें कोणी म्हटल्यास तें फारसें चूक होणार नाहीं. माशिनरीचें उत्पादन विचारलें त्या उत्पादनासाठीं मजुरी किती पडली हें विचारलें तर त्या उत्पादनासाठीं स्टोअर्स किती वापरला व कोणता किती हें विचारण्यांत कांहीं गैरवाजवी ठरलें नसतें. पण हें न विचारल्यामुळें मात्र वर्किंग पार्टीच्या अनुमानांत बरीच कमतरता राहणार आहे.

**कांहीं सूचना**—प्रस्तुत लेखकानें कंपनी कायद्याबाबत आपले पत्रांत लिहिलेल्या एका लेखांत सुचविल्याप्रमाणें सर्व गिरण्यांचे हिशोब एका दिवशीं पुरे करावे म्हणजे निरनिराळ्या गिरण्यांचा कारभार एकमेकांबरोबर ताडून पाहता येईल. सूचना कीं, गिरण्यांचे हिशोबाचें वर्ष १ सप्टेंबर पासून सुरू करावें म्हणजे ३१ ऑगस्टला वर्ष पुरें करावें. कापसाचें उत्पादन वगैरे १–९ पासून ३१–८ पर्यंत एक वर्ष धरलें जातेंच. तेंच गिरण्यांनाही लागू करावे.

गिरण्यांचे हिशोबांत स्टॉक दाखविण्याबाबत व कापूस, स्टोअर्स वगैरे दाखविण्याची पद्धति सर्व गिरण्यांत एक असावी. चांगल्या चांगल्या नांव असणाऱ्या गिरण्या अशी माहिती सविस्तर देतात. सर्वांनाच सविस्तर माहिती देणें कायद्यानेंच बांधलेलें असावें. त्याशिवाय कापूस, स्टोअर्स, कापड, टूलस वगैरेचा स्टॉक ( सांठा ) देतांना तो हिशोबांचे वर्षांत खरीदलेला किती, त्याचे आधीचे एका वर्षांतला किती व त्याही मागचा किती, व "न वापरतां येणारा" किती हें निरनिराळे आकडे देऊन दाखविलें पाहिजे. म्हणजे शेअरहोल्डर्सना मॅनेजमेंटच्या कारभाराबाबत आपोआपच माहिती मिळेल.

शेवटीं एक आग्रहाची सूचना. शेअरहॉल्डर्सचें हितरक्षण कसें होईल व तसें हितरक्षण केल्यास नव भांडवल कितपत वाढेल, याबाबतही विचार व्हावयास पाहिजे.


सुंदर बनारसी पातळें,
नवीन जरीचीं लुगडीं व फॅन्सी कापड.
—: यांकरितां :—
शाहाडे आठवले लिमिटेड, दादर.
टेलिफोन ] शाहाडे बिल्डिंग, एन्. सी. केळकर रोड, दादर [ ६०५५४

# दि रत्नाकर बँक, लि.

( कोल्हापूर येथें नोंदलेली व भागीदारांची जबाबदारी मर्यादित असलेली )

स्थापना : १९४३

मुख्य कचेरीः भाऊसिंगजी रोड, कोल्हापूर

शाखा—सांगली, शाहूपुरी, मिरज, जयसिंगपूर.

| | | रु. |
|---|---|---|
| अधिकृत भांडवल | ... | २०,११ ००० |
| विक्री केलेलें शेअर भांडवल | ... | १०,०६,६०० |
| रोख वसूल शेअर भांडवल | ... | ५,०२,००० |
| रिझर्व्ह फंड | ... | ५१,००० |
| खेळतें भांडवल (अंदाजें) | ... | ४७,६६,००० |

—अद्यायत् बँकिंग व्यवहार केले जातात—

श्री. बी. बी. पाटील, श्री. गंगाराम सिद्दाप्पा चौगुले,

B. A., LL. B., वकील सांगली, चेअरमन

कोल्हापूर, व्हा. चेअरमन

एल. एन्. शहा,

B. COM., C. A. I. I. B.

मॅनेजर



दी

# बँक ऑफ कोल्हापूर, लि.

एच. एच. दी छत्रपति महाराजा ऑफ कोल्हापूर यांचे सरकारचे आश्रयाखालील व त्यांचा फार मोठा पाठिंबा मिळत असलेली.

[ कोल्हापूर येथें नोंदलेली व भागीदारांची जबाबदारी मर्यादित असलेली. ]

स्थापनाः १९२६.

मुख्य कचेरी :

सर वर्डवुड रोड, लक्ष्मीपुरी, कोल्हापूर.

तार : BANKOP फोन : २८९

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल | ४०,०६,५०० रु. |
| विक्रीस काढलेलें व खपलेलें | २०,२६,००० रु. |
| वसूल | १०,१३,००० रु. |
| रिझर्व्ह फंड | ७,८६,००० रु. |
| खेळतें भांडवल | १,८८,००,००० रु. हून अधिक |

शाखा :

(१) गुजरी (२) शाहूपुरी–कोल्हापूर (३) मलकापूर (४) पेठ वडगांव (५) जयसिंगपूर (६) इचलकरंजी (७) गडहिंग्लज (८) निपाणी (जि. बेळगांव) (९) मुंबई–फोर्ट–(१०) मुंबई–मांडवी.

—बँकिंगचे सर्व प्रकारचे व्यवहार केले जातात—

मुख्य कचेरींत सेफ डिपॉझिट लॉकर्सची उत्तम व्यवस्था.

व्ही. प. सावंत, जनरल मॅनेजर.



# दि बॉम्बे प्रॉव्हिन्शिअल को-ऑपरेटिव्ह बँक लिमिटेड

९ बेंक हाऊस लेन, कोट, मुंबई,

स्थापन साल १९११

चेअरमनः–श्री. आर. जी. सरैय्या, ओ. बी. ई.

| | |
|---|---|
| भागांचें भांडवल | रु. ४८,२६,००० |
| गंगाजळी फंड | रु. ३३,४१,००० |
| ठेवी | रु. ८,६१,९७,००० |
| खेळतें भांडवल | रु. १०,४३,९३,००० |

## १५ जिल्ह्यांत ६५ शाखा

भारतांतील प्रमुख शहरीं हुंड्या, बिलें वगैरे वसुलीची व्यवस्था आहे. सर्व प्रकारच्या ठेवी स्वीकारल्या जातात. शर्तीबद्दल चौकशी करावी.

व्ही. पी. वर्दे,

ऑ. मॅनेजिंग डायरेक्टर.



पो. बॉक्स नं. ५११ टेलिफोन नं. २४८३

# पुणें सेंट्रल को-ऑपरेटिव्ह बँक लिमिटेड, पुणें.

## लक्ष्मी रोड, पुणें २.

भोर, पौड व वडगांव (मावळ) येथें बँकेनें आपल्या नवीन शाखा कचेऱ्या उघडल्या आहेत. येथें व इतर शाखांतही सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार व सहकारी सोसायट्यांना शेतीसाठी कर्जें देणें, सोनें चांदीचे तारणावर कर्जें देणें, वगैरे व्यवहार सुरू केले आहेत.

चालू, सेव्हिंग्ज, ठेवी स्वीकारल्या जातात.

एक वर्ष व दोन वर्षें मुदतीच्या ठेवीही स्वीकारल्या जातात.

एक वर्ष मुदतीस दीड टक्का.

दोन वर्षें अगर जास्त मुदतीस दोन टक्के.

वरीलप्रमाणें सर्व व्यवहार पुणें येथें मुख्य कचेरींत व इतर शाखांमध्यें होत असून त्याखेरीज पुणें येथें सेफ डिपॉझिट व्हॉल्ट व सेफ कस्टडी (सीलबंद पेट्या) चा व्यवहार सुरू आहे. सर्वांनीं त्याचा फायदा घ्यावा.

मो. वि. रबडे,

मॅनेजिंग डायरेक्टर.

# स्वातंत्र्यानंतरचा हिंदी शेतकरी

[श्री. द. वि. चितळे, सेवानिवृत्त मॅनेजिंग डायरेक्टर व सध्या सल्लागार, पुणे सें. को. बँक लि.]

भारत हा मुख्यतः शेतीप्रधान देश आहे हें नव्यानें सांगण्याची आतां आवश्यकता राहिली आहे काय? गेलीं अनेक शतकें बहुसंख्य भारतीयांचा मुख्य व्यवसाय शेती हाच होता व अद्यापही आहे. प्राचीन काळीं प्रत्येक भारतीयाच्या वाट्यास येणाऱ्या लागवडीखालील क्षेत्राचें प्रमाण हें हल्लींच्या मानानें कितीतरी पट अधिक असे. शिवाय त्याकाळीं जमीनही वहितीखालीं नवीनच आली असल्यानें ती पीक पुष्कळच देत असे. लोकसंख्येचे मानानें त्यावेळीं जमिनींची विपुलता असल्यानें ज्या जमिनीस पाणी सहजीं मिळण्यासारखें असेल ती वहितीखालीं प्रथम येणें स्वाभाविक होतें आणि म्हणून त्या परिस्थितींत जमिनींचें उत्पन्न हल्लींचे मानानें पुष्कळच जास्त येत असे.

"उत्तम शेती, मध्यम व्यापार, कनिष्ट नोकरी" ही म्हण त्याकाळीं सार्थ होती.

### लोकसंख्येंत वाढ

भारताची लोकसंख्या हळूं हळूं वाढूं लागली; परंतु त्यामानानें वहितीखालीं येणारे क्षेत्रांत वाढ होईना. याचा परिणाम सहाजिकच असा झाला कीं, वाढत्या लोकसंख्येस धंदा मिळावा म्हणून पिकाचे दृष्टीनें अयोग्य असलेली जमीन वहितीखालीं आणणें क्रमप्राप्त झालें. तसेंच पूर्वीपासून लागवडीखाली असलेल्या जमिनींत सालोसाल पुन्हा पुन्हा पीक काढणें भाग पडूं लागलें. या सर्वांचा स्वाभाविकच असा परिणाम झाला कीं लागवडीच्या क्षेत्राचे मानानें त्या जमिनींतून उत्पन्न होणाऱ्या पिकाचें प्रमाण दिवसेंदिवस कमी पडूं लागलें. बहुजन समाजास केवळ शेतीवर पूर्वीप्रमाणें सुखासमाधानानें जगणें कठीण होऊं लागलें व त्यामुळें समाजांतील बुद्धिमान व हरहुन्नरी लोक हळूंहळूं शेतीखेरीज इतर उद्योगधंद्यांकडे आपलें लक्ष वळवूं लागले. लोकसंख्येंत वाढ होत राहिली होतीच. या सर्व परिस्थितीमुळें शेती हा धंदा दिवसेंदिवस आतबट्ट्याचा होऊं लागला. शेतकऱ्यास शेतीच्या धंद्यांतून पुरेशी प्राप्ति होईना. एवढेंच नव्हे तर तो धंदा चालूं ठेवणेसाठी इतरांकडून कर्जाऊ भांडवल आणणें शेतकऱ्यास भाग पडूं लागलें; व तो दिवसेंदिवस कर्जांत रुतूं लागला. शेतकऱ्याच्या मालकीच्या जमिनी हळूंहळूं सावकारांच्या मालकीच्या होऊं लागल्या व जे मूळचे जमिनीचे मालक होते असे अनेक शेतकरी आपल्याच जमिनींत सावकाराचे मजूर म्हणून राबूं लागले. या विपरीत परिस्थितीमुळें समाजांत वर्गवैषम्य वाढून अस्वस्थता निर्माण झाली.

### स्वातंत्र्यापूर्वी

त्या कालखंडांत भारतांत अनेक राजकीय स्थित्यंतरें घडून आलीं; त्यांचाही बरावाईट परिणाम भारताच्या मुख्य व्यवसायावर म्हणजे शेतीवर घडत असे. विशेषतः गेलीं दीडदोनशें वर्षें भारतावर ज्या लोकांची राजसत्ता चालूं होती ते सर्वस्वी परकीय असल्यामुळें व शिवाय त्यांचा मुख्य व्यवसाय व्यापार आणि उद्योगधंदे हा असल्याकारणानें ते भारतीयांच्या या मुख्य व्यवसायाकडे म्हणजे शेतीकडे जरूर तितकें लक्ष पुरवीत नसत, एवढेंच नव्हे तर ते त्या धंद्याची जाणून बुजून अनेकदां उपेक्षाही करीत.

### "मार्जार-मूषक" न्याय

भारतीय शेतकरी सधन व संपन्न झाल्यास त्यांच्यावर राज्य करणें हें कठीण जाईल; तसेंच ते कायमचे नष्ट झाल्यास आपल्या गरजेप्रमाणें व मन मानेल तसें रक्तशोषण करण्यास आपणास जरूर तें साधनच भारतांत रहाणार नाहीं अशा द्विधा मनोवृत्तींत इंग्रज लोकांना आपला राज्यकारभार चालवावा लागत असे. या "मार्जार-मूषक" न्यायाचा स्वाभाविक तोच परिणाम घडला. बहुसंख्य भारतीय हे शेतीच करीत राहिले होते आणि तो धंदा करीत असतांना ते नकळत पण हळूंहळूं पूर्ण दरिद्री, निर्बल, अशिक्षित व परावलंबी असे बनले. शेतकऱ्यांची उन्नति करण्यासाठीं आपण हर प्रयत्न करीत आहोंत, त्यांचें हित व्हावें या बुद्धिनें आपण अनेक कायदे-कानू मंजूर करीत आहोंत, हें जगास दिसून यावें म्हणून सर्व प्रकारचा वरकांती देखावा करण्यांत मात्र इंग्रज सदैव तत्पर असत.

### आमचे पुढारी

शेतकऱ्यांची ही शोचनीय परिस्थिति पाहून आपले माजी व आजी पुढारी फार कष्टी होत. भारतांतील शेतकरीवर्ग हा निष्कर्जी झाल्याशिवाय, तसेंच त्यास आपला मुख्य व्यवसाय म्हणजे शेती हा फायदेशीर रीतीनें करतां येईल अशी त्याच्या भोंवतालची परिस्थिति निर्माण झाल्याशिवाय, तो समाज स्वावलंबी, स्वाभिमानी, सुसंस्कृत आणि सुशिक्षित असा होऊं शकणार नाहीं, आणि तो तसा झाल्याशिवाय भारतीयांस जगांत कांहींही मानाचें स्थान प्राप्त होऊं शकणार नाहीं याची जाणीव आपल्या पुढाऱ्यांस पूर्णपणें होतीच व त्यादृष्टीनें ते यथामति प्रयत्नही करीत होते. परंतु त्यांच्या प्रयत्नांस जरूर तें प्रोत्साहन व सहानुभूति राजकर्त्यांकडून मिळूं न शकल्यानें त्या प्रयत्नांस जें यश सहजीं यावयास पाहिजे होतें तें येऊ शकलें नाहीं.

### स्वातंत्र्यानंतर

आतां आपला देश स्वतंत्र झाला असल्यामुळें शेतकऱ्यांची ही दुःखद परिस्थिति सुधारण्याचे वेगवेगळे प्रयत्न आपले मध्यवर्ती सरकार व राज्य सरकार आपापल्या समजदारीप्रमाणें व गरजेप्रमाणें करीत असून त्या दृष्टीनें जरूर ते वेगवेगळे कायदेकानू मंजूर करीत आहेत

### नवीन कायदे

मुंबई राज्याचे दृष्टीनें विचार करतां आपल्या राज्यांत मुख्यतः खालील नवीन कायदे मंजूर करण्यांत आले असून आतां त्यांची अम्मलबजावणी हळूं हळूं सुरू झाली आहे.

(१) शेतकऱ्यांवर असलेला जुन्या कर्जाचा बोजा हलका करून शक्य तितक्या लवकर ते निष्कर्जी व्हावेत या हेतूनें केलेला "शेतकरी कर्जनिवारण" कायदा.

(२) 'कसेल त्याची जमीन' हें तत्त्व पर्यायानें अमलांत यावें व जे लोक जमिनींत कष्ट करून ती पिकवितात अशा खंडकऱ्यांना अगर कुळांना समाजांत स्थैर्य प्राप्त व्हावें व त्यांचेकडून जमीन अधिक आत्मियतेनें कसली जावी व ती वहितीखाली यावी ह्या हेतूनें केलेला "कूळ" कायदा.

(३) शेतकऱ्यांस पुन्हा पुन्हा कर्ज काढण्याचा सहजी मोह होऊं नये, तसेंच त्यांच्या अज्ञानाचा फायदा घेऊन त्यांची पिळवणूक सावकारांस सहजीं करतां येऊं नये ह्या हेतूनें केलेला "सावकारी नियंत्रण" कायदा.

नमूद केलेले कायदे हे नवीनच असून त्यांची अम्मलबजावणी आपल्या राज्यांत नुकतीच सुरू झाली आहे. सदर कायद्यांमुळें शेतकऱ्यांच्या आर्थिक जीवनावर काय परिणाम झाला, व ते ज्या हेतूनें मंजूर केले आहेत ते हेतू कितपत साध्य झाले अगर होण्याचा संभव आहे, तें आपल्या अनुभवास अद्याप यावयाचें आहे.

**कायद्यांचा परिणाम**

समाजाच्या रचनेंत अगर त्याच्या व्यवहारांत कांहीं विशिष्ट प्रकारचे फेरफार व्हावेत या हेतूनें प्रत्येक कायद्याची मांडणी केलेली असते, परंतु अनेकदां असें आढळून येतें कीं कायद्यांची अम्मलबजावणी सुरू झाली म्हणजे मग अपेक्षित फेरफार प्रत्यक्ष घडून येत असतांना अनपेक्षित अशा कित्येक नवीन नवीन अडचणी समाजापुढें निर्माण होऊं लागतात, व त्या दूर करण्यासाठी पुन्हा नवीन नवीन उपाय योजावे लागतात. उदाहरणार्थ, वर नमूद केलेल्या कायद्यांमुळें तूर्त तरी बाजारांत शेतकऱ्यांची पत घसरत चालली असल्याचें दिसून येतें. त्यांना आपल्या दैनंदिन गरजा भागविण्यासाठी पूर्वी— मग कांहीं अयोग्य अशा अटी घालून कां होईना—स्थानिक सावकारांकडून थोडेंफार कर्ज सहजीं मिळूं शकत असे; अशा कर्जास त्यांना कदाचित् फार मोठें व्याज द्यावें लागत असेलहि; परंतु त्यांची गरज स्थानिक सावकारांकडून तात्काळ भागविली जात असे हें मात्र निश्चित. "कूळ" कायद्यामुळें जमिनीची विक्री करण्याचे कामीं अनेक बंधनें निर्माण केलीं गेल्यामुळें जमिनींच्या किंमती स्वाभाविकच उतरल्या. "सावकारी नियंत्रण" कायद्याची अद्याप विशेष काटेकोर रीतीनें अम्मलबजावणी सुरू झालेली नाहीं. तरीहि, परवान्यासाठी फारच थोड्या लोकांची मागणी येत आहे यावरून असे परवाने घेऊन सावकारी करणें हें हल्लींच्या सावकारांना परवडत नाहीं असाच निष्कर्ष निघतो. स्थानिक सावकारांची जागा घेणारा दुसरा कोणीतरी—मग ती एकादी व्यक्ति असो, नोंदलेली संस्था असो, अगर खुद्द सरकार असो—निर्माण झाल्याशिवाय शेतकऱ्यांना शेतीसाठी नेहमींच लागणाऱ्या भांडवलाचा योग्य तो पुरवठा होऊं शकणार नाहीं. याचा परिणाम असा होईल कीं, भांडवलाचे अभावीं शेती पडून राहील व त्यामुळें वैयक्तिक शेतकऱ्यांचें नुकसान होऊन शेवटीं राष्ट्रीय उत्पन्नांत घट येईल. ही भीति काल्पनिक नसून ती प्रत्यक्ष अनुभवास येऊं लागलेली आहे.

**बेकायदेशीर सावकारी**

परवाने न घेतलेले अनेक सावकार बेकायदेशीर रीतीनें आपली सावकारी पूर्वीप्रमाणेंच अद्याप करीत आहेत. हा व्यवहार कायदा मोडून व्हावयाचा असल्यानें अर्थातच तो कुळांना पूर्वीपेक्षां महाग पडतो; एवढेंच नव्हे तर गरजू शेतकऱ्यास आपली तात्कालिक गरज भागविली जावी म्हणून सावकार ज्या ज्या जाचक अटी घालील व जेवढें जबर व्याज तो मागील त्या त्या अटी पत्करणें व तें व्याज देण्याचें कबूल करणें हें निरुपायास्तव भाग पडतें. शिवाय, हा व्यवहार बेकायदेशीरपणें होत असल्यानें तो उभयतांनाही अंधारांत करावा लागतो; त्यास जरूर ती वाचा फुटत नाहीं.

**गाडगीळ समिति**

शेतकऱ्यांची होणारी ही कुचंबणा थांबावी, तसेंच त्यांना शेतीसाठी लागणारें जरूर तें भांडवल त्यांच्या ऐपतीच्या मानानें त्यांस सहजीं मिळावें व त्यांना आपली शेती पूर्वीप्रमाणेंच करतां यावी यासाठीं कोणती उपाययोजना करावी ह्याचा विचार करून त्याबाबतच्या आपल्या शिफारशी करण्यासाठी मध्यवर्ती सरकारनें श्री. धनंजय रामचंद्र गाडगीळ यांचे अध्यक्षतेखाली एक खास समिति नेमली होती, हें आपल्या वाचकांपैकीं अनेकांस माहिती असेलच. त्या समितीनें या बाबतींत असें सुचविलें कीं, शेतकऱ्यांस लागणाऱ्या बाजवी त्या भांडवलाचा पुरवठा करण्यासाठी स्वतंत्र अशा शेतकऱ्यांच्या बँका प्रत्येक प्रांतासाठीं निर्माण करण्यांत याव्यात व त्या बँकांकरवीं हें भांडवल शेतकऱ्यांस पुरविण्यांत यावें. अशा बँकांवर सवन समाजाचा विश्वास बसावा म्हणून सरकारनें त्या बँकांच्या कारभारांत विशेष लक्ष घालावें, त्यांस हरतऱ्हेनें प्रोत्साहन द्यावें, त्यांच्या स्थैर्याबद्दल हमी पतकरून त्या लोकांच्या आदरास व विश्वासास पात्र होतील अशी तजवीज करावी. या बँकांनीं राज्यांतील सर्व ऐपतवान शेतकऱ्यांस शेतीसाठी लागणारें सर्व प्रकारचें कर्ज—म्हणजे पिकासाठीं लागणारें हंगामी कर्ज व पिकाशिवाय इतर बाबींसाठीं परंतु शेतीव्यवसायासाठी लागणारें मध्यम व लांब मुदतीनें फेड केलें जाणारें इतर कर्ज—अत्यंत अल्प व्याजाचे दरानें द्यावें. व्याजाचा बोजा हा "शेती" या व्यवहारास झेपेल तेवढाच असावा; जास्त असूं नये. नाहींतर "शेती" हा व्यवसाय करीत रहाणें भारतीय शेतकऱ्यास परवडणार नाहीं. भारतीयांचा मुख्य व्यवसाय शेती हाच असल्यानें तो त्यांना किफायतशीर रीतीनें करता आला तरच त्यांना या पुढें मानानें जगतां येईल व आपल्या राष्ट्रास जगाचे पाठीवर स्वाभिमानानें रहातां येईल.

**सहकारी संस्था**

आपल्या राज्यासाठीं वर उल्लेख केल्याप्रमाणें स्वतंत्र अशी शेतकऱ्यांची बँक स्थापन करावी किंवा कसें त्यांचा आपल्या पुढाऱ्यांनीं व तज्ज्ञांनीं फार तपशीलवार विचार केला; व सर्व विचाराअंतीं अशी स्वतंत्र बँक आपल्या प्रांतासाठीं स्थापन न करतां तें काम वेगवेगळ्या सहकारी संस्थांनीं पतकरावे असा त्यांनीं निर्णय घेतला. हा निर्णय मुंबई सरकारास संमत झाला असून आतां हें काम सहकारी पतपेढ्या व मध्यवर्ती सहकारी बँका यांचेकडे सोपविण्यांत आलें आहे. या निर्णयानुसार आतां मुंबई राज्यांतील सर्व लहान-मोठ्या ऐपतवान शेतकऱ्यांना शेतीसाठी लागणारें जरूर तें हंगामी मुदतीचें व मध्यम मुदतीचें भांडवल स्थानिक सहकारी पतपेढ्या अगर स्थानिक मध्यवर्ति सहकारी बँका यांचेकडून पुरविण्यांत येणार आहे. मात्र शेतकऱ्यास पुरविल्या जाणाऱ्या या भांडवलास निश्चित असें तारण असावें, तसेंच या भांडवलाची ठराविक मुदतींत परतफेड व्हावी यासाठी सहकारी कायद्यांत योग्य त्या दुरुस्त्या करण्यांत आल्या आहेत. या योजनेमुळें आपल्या राज्यांत तरी शेतकऱ्यांना आधीं उल्लेख केल्याप्रमाणें करावे लागणारे बेकायदेशीर कर्जाचे व्यवहार यापुढें अंधारांत करण्याची मुळींच गरज राहिली नाहीं. शेतीसाठी लागणारें योग्य तें भांडवल मिळण्याची आतां सुलभ अशी कायदेशीर सोय झाली असल्यानें आपल्या शेतकऱ्यांना शेतीचा व्यवसाय फार मोठ्या प्रमाणावर करतां येण्यासारखी सुसंधी प्राप्त झाली आहे. पारतंत्र्यांतील हिंदी शेतकऱ्याची केविलवाणी परिस्थिति होती. आपला शेतकरी लवकरच सधन, संपन्न, सुशिक्षित, स्वावलंबी व स्वाभिमानी असा होईल अशी सबळ आशा बाळगण्यासारखी परिस्थिति आतां निर्माण झाली आहे. सहकार्याची कास धरून त्यानें जरूर ते प्रयत्न केल्यास त्यास आपली उन्नति करून घेण्यास फारसा कालावधी लागणार नाहीं. आलेल्या सुसंधीचा पूर्ण फायदा न घेण्याइतका अज्ञानी व अडाणी आपला शेतकरी अजून राहिला आहे काय?

# नियोजन समाजशास्त्रदृष्ट्या झालें पाहिजे.

[ श्री. वसंत विष्णु लोणकर, एम्. ए., बी. कॉम् ]

सर्वसाधारणत: असें दिसत कीं, आपली नियोजन समिति देशाच्या आर्थिक प्रगतीचाच मुख्यत: विचार करणार आहे. देशाची सर्वांगीण प्रगति देशाच्या आर्थिक भरभराटीवरच मूलत: अवलंबून असली तरी तेवढ्यावरच भागणार आहे असें नाहीं. आतापर्यंत योजना हातीं आल्या, कांहीं पार पडल्या, नवीन होत आहेत आणि कांहीं अर्धवट सोडल्या जात आहेत, त्या देशाच्या नैसर्गिक संपत्तीचा व मनुष्यबळाचा आणि गरजांचा विचार करून या योजनांचा मिलाफ घडविणें हें कामच आज नियोजन समिति प्रथम हातीं घेईल असें दिसतें. अर्थात तें जरूरीचें तर आहेच, पण तें करीत असतांना आर्थिक प्रगतीला भक्कमपणा आणविण्याच्या दृष्टीनें समितीनें आणखी कांहीं समाजशास्त्रीय प्रमेयांचा विचार करणें जरूर आहे.

आजवर मनुष्याचा विचार करतांना तत्वज्ञ, मानसशास्त्रज्ञ आणि शिक्षणनेते यांनीं व्यक्तीवरच जास्त भर दिला आहे. समाजशास्त्रज्ञांनीं जी मुख्य कामगिरी केली आहे ती ही कीं, त्यांनीं व्यक्ति ही ज्या समाजांत वागत असते त्या समाजासहित व्यक्तीच्या वागणुकीवर भर देऊन कांहीं कायमचे सिद्धांत मांडले आहेत. समाजांत विशिष्ट गुणयुक्त पोटसमाजही असतात आणि या पोटसमाजांत व्यक्ति राहते व वाढते आणि समाजाचा परिणाम पोटसमाजावर आणि पोटसमाजाचा परिणाम व्यक्तीवर, अशी परिणती होऊन व्यक्ति बनत असते. तसेंच व्यक्ति ही एकटी असतांना वेगळ्या पद्धतीनें वागते आणि समाजापुढें, मेळाव्यापुढें असतांना वेगळी वागते. म्हणजे, व्यक्ति केवळ स्वत:-पुरताच विचार करते येवढेंच नव्हे, तर सामाजिक बंधुभावाचाही विचार करत असते. अशी ही व्यक्ति आणि समाज यामध्यें सुसूत्रता आणणें हें देशव्यवस्थापकांचें काम ठरतें. व्यक्ति प्रथम घरामध्यें बाल, शाळेमध्यें शिशु—विद्यार्थी, विवाहयोग्य तरुण, पुढें पिता आणि नंतर नागरिक अशा क्रमानें परिणत पावून तिला 'व्यक्तिमत्व' प्राप्त होतें; आणि ही परिणति होत असतांना व्यक्तीच्या पाठीमागें समाज, पोटसमाज वळण लावण्याकरतां सिद्ध असतात.

रूढीप्रमाणें चालत येणाऱ्या समाजाला प्रथम औद्योगिक उत्क्रांति आणि नंतर शहरांची वाढ यांनीं धक्का दिला आणि तत्पूर्वीची संथपणें चालणारी समाजव्यवस्था ढासळूं लागली आणि विचारवंतांना कुठेतरी, कांहींतरी चुकतें आहे याची जाणीव होऊं लागली. ज्यावेळेस व्यक्ति आणि समाज यांची सांगड घातली गेली त्यावेळेसच सामाजिक दु:स्थिती सुधारण्याचा मार्ग सांपडला. समाजसुधारकांनीं आपापल्या कल्पनेप्रमाणें सुधारणेचे प्रयत्न आजवर केले पण त्यांनीं विशिष्ट सुधारणाच हातीं घेतल्या. त्यामुळें पूर्ण प्रगती होऊं शकली नाहीं. आतां हें कळून चुकलें आहे कीं, समाज सुधारकांनीं व्यक्ती आणि समाज यांचा एकसमयावच्छेदें विचार केल्याखेरीज एकूण जनतेचे प्रश्न सोडवितां येणार नाहींत. म्हणून नियोजनाची जरूरी उत्पन्न होते.

पण नियोजनयुगारंभ झाला तरी त्यावर आर्थिक कल्पनांचाच पगडा दिसत आहे. आतां हें सांगण्याची वेळ आलेली आहे कीं निव्वळ आर्थिक योजना म्हणजे नियोजन नव्हे, तर सर्व समाजाचा साकल्येकरून विचार म्हणजेच खरें नियोजन. आपलें सरकार घरें बांधण्याच्या योजना करीत आहे पण नुसत्या बराकी बांधून भागणार नाहीं; तर त्या घरांत येऊन रहाणाऱ्या लोकांच्या दैनंदिन गरजा, त्यांचे व्यवसाय, चालीरीती, या सर्वांचा विचार करण्यांत आला पाहिजे. नाहींतर आपल्या इकडे बराकींत डांबून टाकलेले निर्वासित जसे बाहेर पळून जाऊं पहातात, तसे योजना म्हणून बांधलेल्या घरांतून लोक निघून जातील. तेव्हां नियोजन हें लोकप्रधान* झालें पाहिजे. सध्यांचें सरकार हम-करेसो वृत्तीनें कायदे करून समाजाला धक्के देऊन समाज व्यवस्था पालटूं पहात आहे. त्यांत हेतू कितीही चांगला असला तरी तो लोकपसंतीस कितपत उतरत आहे याबद्दल शंकाच आहे. त्याला नियोजनाचें स्वरूप नसून हुकूमशाहीचें स्वरूप येऊं पहात आहे. लोकांच्या दैनंदिन जीवनांत निष्कारण लुडबूड अशीच चालू कायद्यानें लादलेल्या सुधारणांची स्थिति होऊन राहिलेली आहे. उलट, नियोजनाचें खरें स्वरूप असें रहावयास हवें कीं जेणें करून सध्याच्या अफाट समाजविस्तारामुळें लोकांना आपण कुठें जात आहोंत, कुठें आहोंत, हें न समजल्यामुळें बावरलेली स्थिति आलेली आहे. त्यांतून योग्य मार्ग त्यांना सांपडेल आणि नियोजनानें दाखविलेल्या मार्गानें त्यांना हळूहळू स्वत:चें स्थान सांपडेल.

नियोजनाचें साध्य निश्चित केल्यावर नियोजन ज्या साधनांनीं गांठावयाचें त्यालाही महत्त्व तितकेंच आहे. मध्यवर्ती समितीनें एवढी मर्यादा आंखून दिल्यावर अम्मलबजावणी करतांना सुद्धां त्यांत लोकशाहीला पूर्ण वाव देण्यांत आला पाहिजे. म्हणजे, अम्मलबजावणींत विकेंद्रीकरण झालें पाहिजे. देशांतील सर्वांत लहान अशा लोकसमाजालाही ही नवीन घडण बनविण्याची संधी मिळाली पाहिजे. कारण, अंतीं व्यक्ति ही या लहान लहान समाजांतच परिणत होत रहाणार आहे.

* लोकप्रधान नियोजनासंबंधीं विस्तारपूर्वक विवेचन 'धिस चेंजिंग वर्ल्ड' या जे. आर. एम. ब्रुमवेल संपादित पुस्तकांत कार्ल मॅनहेम या लेखकाच्या 'डेमोक्रॅटिक प्लॅनिंग अॅण्ड न्यू सायन्स ऑफ सोसायटी' या लेखांत फारच सुंदर रीतीनें केलेलें सांपडेल. पृ. ७१

मोकाशीकर लकी फोटो (रजि०)
तुमच्या गृहसौंदर्यांत भर टाकेल.
विलसन रोड, कोल्हापूर : लक्ष्मी रोड, पुणें.

सुरक्षित व आकर्षक दरानें ठेवी ठेवण्यासाठी
—कोल्हापुरांतील प्रतिष्ठित व्यापारी व सन्मान्य नागरिक यांनीं चालविलेली—
दि युनियन बँक ऑफ कोल्हापूर लि.
शिवाजी चौक, कोल्हापूर
येथे चौकशी करा अगर भेटा. —जी. जी. श्रीखंडे, मॅ. डायरेक्टर

# पुणें शहर म्युनिसिपल सर्व्हंट्स को-ऑपरेटिव्ह अर्बन बँक लिमिटेड.

७३, बुधवार पेठ, पुणें शहर.

( स्थापना १९१४ )

| | | |
|---|---|---|
| अधिकृत भांडवल | रु. | ५०,००० |
| वसूल भांडवल | रु. | ४२,००० |
| रिझर्व्ह फंड | रु. | २२,६९० |
| ठेवी. | रु. | १,६२,८०८ |

चालूं, सेव्हिंग्ज व मुदतींच्या ठेवी स्वीकारल्या जातात. याशिवाय बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.

माहितीसाठी व व्याजाचे दरांसाठी समक्ष भेटा अगर लिहा.

नारायण कृष्ण कुलकर्णी सेक्रेटरी | भीमाशंकर महादेव कुलकर्णी चेअरमन.

—१३—

# श्री महावीर को. बँक लि., कोल्हापूर

ह्या बँकेचे दृष्टीनें १३ हा आंकडा औचित्यपूर्ण आहे.

तिच्या तेरा वर्षांच्या सेवेच्या, वाढीच्या आणि प्रगतीच्या कालखंडानें युद्ध व शांतता हीं दोन्हीं अनुभवलीं आहेत.

ही बँक

★ पूर्णपणें अनुभवी होण्याइतकी जुनी आहे.
★ सतत प्रगतिपथावर असण्याइतपत नवी आहे.
★ सभासदांच्या सर्व गरजा भागविण्याइतकी मोठी आहे.
★ सभासदांचा तांतडीची व कार्यक्षम सेवा करण्यास लवचीकपणा असण्याइतकी व सर्वांशीं स्नेहभावानें सहकार्य करण्यास योग्य त्या बेताच्या आकाराची आहे.

मुख्य कचेरी : कोल्हापूर. शाखा : जयसिंगपूर.

डी. वा. शेटे. मॅनेजर. बी. वाय. आवटे. प्रेसिडेंट. बी. बी. सुलताने. मॅनेजिंग डायरेक्टर.

# दि सराफ बँक ऑफ कोल्हापूर, लि. कोल्हापूर.

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल | १०,००,००० रु. |
| विक्रीस काढलेलें व विक्री झालेलें भांडवल | ५,८०,००० रु. |
| वसूल भांडवल | २,५०,००० रु. |
| खेळतें भांडवल | ५ लाखांचे वर |

★ चालूं, सेव्हिंग्ज व मुदतीच्या ठेवी आकर्षक दरानें स्वीकारल्या जातात.

★ मंथली फिक्स्ड डिपॉझिटची अभिनव योजना.

★ बँकिंगचे सर्व प्रकारचे व्यवहार केले जातात.

४७४ सी, भाऊसिंगजी रोड, कोल्हापूर. रा. म. कदम, मॅनेजिंग डायरेक्टर.

# दी युनायटेड वेस्टर्न बँक लिमिटेड, सातारा सिटी

( स्थापना : १९३६ )

( शाखा:-मुंबई फोर्ट, मुंबई गिरगांव, पुणें, नाशिक व बार्शी )

ता. ३०—६—१९५० अखेरचे आकडे

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल | रु. १०,००,००० |
| वसूल भांडवल | रु. ५,००,००० |
| रिझर्व्ह व इतर फंडस | रु. १,५८,००० |
| ठेवी | रु. ७१,००,००० |
| एकूण खेळतें भांडवल | रु. ८१,००,००० |

बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.

कंट्रोलर ऑफ कॅपिटल इशूज यांजकडून नुकतीच प्रत्येकी रु. ५० चा एक या प्रमाणें रुपये ३,००,००० चे ६,००० शेअर्सची विक्री करणेस व प्रत्येक शेअरवर रु. २५ प्रमाणें मागणी करणेस परवानगी मिळाली आहे. शेअरबद्दलची मागणी वरील पत्त्यावर करावी.

बँकेनें ३०—६—१९५० अखेर सहामाही इंटेरिम डिव्हिडंड दरसाल दर शेकडा ६ प्रमाणें दिलेलें आहे.

("Consent of the Central Government has been obtained to this issue by an order of which a complete copy is open to public inspection at the Head Office of the Company. It must be distinctly understood that in giving this consent the Government of India do not take any responsibility for the financial soundness of any schemes or for the correctness of any of the statements made or opinions expressed with regard to them.")

S. H. Joshi, B. A., B. Com. Manager.

W. G Chirmule, B. A. LL. B. Chairman.

# औद्योगिक उत्पादन कसें वाढेल ?

[ श्री. शं. गो. नरवणे, एम. ई. ( कोलंबिया ), एम. एम. जी आय., एल. एम. एम. आय. ए., ऑनररी मॅ. डायरेक्टर, नाणेघाट फ्युनिक्युलर ट्रॅम्वे अँड ट्रॅन्सपोर्ट कं. लि , पुणें]

कांग्रेसनें सरकारच्या आर्थिक धोरणाचें निश्चित मार्गदर्शन केलें पाहिजे, असा तिचे अध्यक्ष बाबू टंडनजी ह्यांचा आग्रह आहे. विलिनीकरणाचे यशस्वी पोलादी पुरुष आणि हिंदुस्थान मजदूर सेवक संघाचे प्रमुख, सरदार पटेल ह्यांनींहि जनतेला उत्पादनवाढीची निकड लावली आहे. एकीकडे भांडवलदार, नफेबाज आणि काळाबाजारवाले आणि दुसरीकडे कामचुकार आणि दिशाभुलीला बळी पडलेला कामगार वर्ग ह्यांच्या कारवायांत सामान्य मनुष्य मात्र असहायपणें भरडला जात आहे. सरकारचे भगीरथ प्रयत्न आणि अधिकाधिक जमिनींची लागवड ह्यामुळे शेतीचें उत्पादन वाढीच्या मार्गावर आहे, परंतु स्वयंपूर्णता अद्याप दूरच आहे आणि सामान्य नागरिकाची अधिकाधिक उपासमार चालू आहे.

औद्योगिक उत्पादन घटत आहे. मजूरविषयक कायद्यांनीं मालकवर्गावर कामगारांना सुस्थिति देणाऱ्या अनेक योजना लादल्या आहेत. त्यांचा नफ्यावर अत्यंत प्रतिकूल परिणाम झाला आहे. ह्या सुधारणा कामगार गृहीत धरूनच चालतात. त्याबद्दल त्यांना साधा संतोषहि व्यक्त करावासा वाटत नाहीं. उत्पादनाच्या खर्चीतील मजुरीचा खर्च आणखी वाढण्यास आतां वावच उरलेला नाहीं, परंतु कामगारांच्या मजुरीवाढीच्या मागण्या अखंड चालूच आहेत. महागाई एकसारखी वाढत जात आहे, त्यानें कामगारांना भरपूर वेतन मिळण्याचा प्रश्न सुटलेला नाहीं. मध्यम वर्गास आपलें जुनें राहणीचें मान टिकविणें कठीण झालें आहे. रहाणीचा दर्जा तरी त्याला उतरविणें भाग आहे किंवा त्यानें आपल्या बचतीवर गुजराण केली पाहिजे, अशी त्याची स्थिति आहे. मालकवर्ग किंवा कामगारवर्ग ह्यांच्यासाठी कायदे करण्यापलीकडे सरकार जास्त कांहीं करूं शकत नाहीं. चलनवाढ व महागाई ह्यास आळा घालण्याचा त्याचा स्वतःच्या कल्पनेप्रमाणें प्रयत्न चालू आहे, तर भरडली जाणारी जनता कोठल्यातरी शाहीवांचून प्रश्न सुटणार नाहीं असें सांगूं लागली आहे.

चलनविस्तार कमी करा म्हणजे किंमती उतरतील, असें अर्थशास्त्रज्ञ सांगत आहेत. लोकसंख्येच्या वाढीस आळा घालण्याचा उपाय दुसरे कांहीं सुचवीत आहेत. आशियांत समाधान नांदलें नाहीं तर कम्युनिझमचा प्रसार थांबणार नाहीं, असें पं. कुंझरू ह्यांनीं सांगितलें आहे, तर कम्युनिझमची लाट थांबविण्यास आणि जागतिक शांतता प्रस्थापित होण्यास साम्यवादच उपयोगी पडेल असें मि. ॲटली हे म्हणतात. पुष्कळ वेळां योग्य उपाययोजना सुचविली जाते, परंतु अखेर तें अरण्यरोदन ठरतें. लांचलुचपत थांबल्याखेरीज राष्ट्राचा तरणोपाय नाहीं, असें अर्थमंत्री श्री. चिंतामणराव देशमुख ह्यांनीं अर्जवून सांगितलें आहे. कामगारांच्या मजुरींत ज्या प्रमाणांत वाढ झाली आहे, त्या प्रमाणांत त्यांची कार्यक्षमता सुधारलेली नाहीं, असें एका इंग्रज गिरणी चालकानें नुकतेंच नमूद केलें आहे. सरकाराच्या मजूरविषयक धोरणावर कामगार संघटना जी कडेक टीका करतात तिला उत्तर देण्यासाठी हिंदी पार्लमेंटांत लेबर रिलेशन्स बिल मांडण्यांत आलेलें आहे. हिंदी उद्योगधंदे आणि त्यांची पार्श्वभूमि हीं यासंबंधांत समजून घेणें अगत्याचें आहे.

ब्रिटिशांचें आणि लोखंड-पोलादाचें युग हिंदुस्थानांत जवळ जवळ एकाच वेळीं सुरू झालें. हिंदुस्थानाशीं व्यापार करण्यासाठीं वास्तविक ईस्ट इंडिया कंपनीची स्थापना झाली. तिच्यावर दैवी घटनेनें राजकीय सत्ता लादलीच, असें म्हणतां येईल. व्यापाराच्या दृष्टीनें ही गोष्ट पोषक अशीच झाली. कंपनी आणि तिचे नोकर ह्यांच्या हवरेपणामुळेंच कंपनीचा अधःपात व अस्त झाला आणि ब्रिटिशांचा अंमल सुरू होऊन शांतता व सुव्यवस्था नांदूं लागली. हिंदी लोकांना शांततेचा काळच हवा होता आणि तो त्यांना लाभला. इंग्रजांना व्यापारवृद्धीसाठी वहातुकीचीं साधनें हवीं होतीं, म्हणून त्यांनीं रेल्वे व कालवे ह्यांत भांडवल गुंतविण्यास प्रारंभ केला. रेल्वेजच्या मागोमाग कोळशाच्या खाणी, कपास व ताग ह्यांचे प्रेसेस, निळीचा धंदा, चहाचे मळे, इत्यादि आले. परंतु, हिंदी लोकांना त्यांच्या श्रमाचा मोबदला म्हणून मजुरी फक्त मिळाली; भांडवल गुंतविणारांना निश्चित व्याज मिळालें आणि उद्योगपतींना नफा मिळाला.

वाढत्या व्यापाराला जहाजें आवश्यक झालीं आणि तीं बांधण्याच्या उद्योगांत केवळ मजुरीपेक्षां ज्यास्त प्राप्ती स्थानिक तरबेजांना मिळूं लागली. सुरत आणि नवसरी येथील पारशी लोकांनीं ह्या व्यवसायांत बराच नफा मिळविला आणि चीनशीं व्यापारी दळणवळण सुरू केलें. टाटा आणि वाडिया ह्यांच्या घराण्यांचा दृष्टिकोन बदलला, त्याचा संबंध भारतासच फायदा मिळाला. त्यांनीं पुष्कळ प्रवास केला आणि येथें गिरण्या स्थापन करण्यांत पुढाकार घेतला. ब्रिटिश यंत्रसामुग्रीस मोठें गिऱ्हाईक निर्माण झालें. गोदी, रेल्वेज, खाणी, गिरण्या, इत्यादींसाठी ब्रिटिश यंत्रसामुग्री मोठ्या प्रमाणावर लागूं लागली. ह्या उद्योगांत बऱ्याच लोकांना काम मिळालें व त्यांना मजुरीच्या स्वरूपांत प्राप्ती होऊं लागली. इंग्रजांचे व भारतीयांचे हितसंबंध ह्यांत विरोध निर्माण झाला, तशी हिंदी कापडावर एक्साइज ड्यूटी, साखर कारखानदारांना वाया जाणाऱ्या जिनसांपासून स्पिरिट करण्यास आडकाठी, इत्यादि गोष्टी आल्या. इंग्रजांच्या आगबोट कंपन्यांना वहातुकीचें काम मिळावें म्हणून जर्मनी-भारत आयात-निर्यात व्यापारास उत्तेजन देण्यांत आलें ! अर्थात्, हें केलें म्हणून राज्यकर्त्या इंग्रजांना दूषण देण्यांत कांहींच अर्थ नाहीं; ते आपल्या भांडवलावरील नफ्याकडे व हितसंबंधांकडे पहात होते. परंतु, त्याबरोबरच शेतीसुधारणा, शिक्षणप्रसार, न्यायदानाची पद्धति, इत्यादि उपकारक गोष्टीहि इंग्रजांनीं केल्या. ब्रिटिश शिक्षण संस्थांतून शिकून बाहेर पडलेली मंडळीच हिंदी नामवंत पुढारी आहेत ! दुसऱ्या महायुद्धानंतर इंग्रजांचें येथील भांडवल फार कमी झालें, त्यावेळीं त्यांनीं राहिलेल्या गोष्टी कायम ठेवल्या, उधळून दिल्या नाहींत, म्हणून आज आपणांस इतकी तरी आशादायक स्थिति प्राप्त झाली आहे.

आपल्या स्वातंत्र्यप्राप्तीच्या वेळच्या परिस्थितीचा आतां आढावा घेऊंया. १९२० च्या पूर्वीपर्यंत हिंदी भांडवलदारांनीं कामगारांना पुष्कळच पिळून काढलें. इंग्लंडमध्यें पुढें मजूर सरकार अधिकारारूढ झालें व मजूर पक्षाचें महत्त्व पुष्कळच वाढलें. हिंदी कामगारांस देशाच्या आर्थिक संसारांतील त्याच्या स्थानाची जाणीव झाली आणि कॉंग्रेसच्या सहाय्यानें कामगार-

वर्गानें भांडवलदारांची उद्योगधंद्यावरील पकड कमी करण्यास प्रारंभ केला. १९०७ मध्यें स्वदेशी चळवळीनें त्याला चालना दिली आणि १९३९ मध्यें दुसरें महायुद्ध सुरू झालें तेव्हां हा असंतोष पराकोटीस गेला होता.

हिंदी औद्योगिक उत्पादन वाढविण्याची तातडीची गरज ब्रिटिश सरकारास १९३९ मध्यें एकदम पटली आणि १९४४ अखेर वेगवेगळी २९ पॅनेल्स निर्माण करण्यांत आलीं. पुढें उत्पादन वाढीच्या कार्यक्रमांत पं. नेहरू व बाबू राजेंद्रप्रसाद हेहि सामील झाले. पंडितजी हे कांहीं पॅनेल्सचे सभासद होते, तर बाबूजी बिहारमधील मजूर चौकशी समितीचे अध्यक्ष होते. सर अर्देशिर दलाल ह्यांचीहि 'मुंबई योजने' च्या स्वरूपांत मदत झाली. सध्यां जे सरकारांत अधिकारारूढ आहेत, त्यांनींच १९३९ ते १९४४ ह्या काळांत उत्पादन ५०% वाढवून दाखविलें. आतां आपण स्वतंत्र झाल्यावर तें कां शक्य होत नाहीं? आणीबाणीच्या प्रसंगीं हुकूमशाही पद्धतीनेंच जर्मन हुकूमशाहीचा बीमोड करण्यांत आला. कर्जें, ब्रिटिशांचें भारतांतील गुंतलेलें भांडवल उपलब्ध होणें, एक्सेस प्रॉफिट टॅक्स, इन्कम टॅक्स वाढ, इत्यादि मार्गांनीं पैसा उभारण्यांत आला.

सध्या भांडवलदार आपली मिळकत लपवून ठेवून दबा धरून बसले आहेत. मजुरांच्या सुखसोयीच्या व वेतनाच्या योजना सर्वांनीं अवलंबिल्या असून, कांहींनीं तर आवश्यक त्या मर्यादेपलीकडे जाऊन कामगारांना खूष करण्याचा प्रयत्न चालविला आहे. कित्येकांना त्यामुळें नफा उरणेंच अशक्य झालें आहे, तर कांहीं जणांची गिऱ्हाइकांना पिळून काढून मिळणारी भरमसाट मिळकत कमी झाली आहे. कांहींना खेळतें भांडवल अपुरें पडूं लागलें आहे, तर कांहींना सुधारणा घडवून आणण्यास पैसा नाहीं.

कामगारांची संघशक्ति एकसारखी वाढत चालली आहे. दीर्घकाळपर्यंत त्यांची पिळवणूक झालेली असल्यामुळें त्याचा ते सूड घेऊं पहात आहेत. अर्थात, हें सर्व मनुष्य स्वभावास धरूनच आहे. कॉंग्रेसपक्षीय अधिकारी सुद्धां अशा दोषापासून अलिप्त नव्हते. त्यांना जुन्या राजवटींत जे अपमान सहन करावे लागले, त्याचा बदला घेण्याचा कांहींनीं प्रयत्न केला आणि ब्रिटिश अधिकाऱ्यांना मुद्दाम बाहेर थांबवून रहावें लागलें असें म्हणतात. सुरवातीस किरकोळ वाटणाऱ्या गोष्टी पुढें वाढत जाऊन त्यांतूनच असंतोष निर्माण होतो. प्रस्तुत लेखकाला असे कित्येक प्रसंग माहीत आहेत. फराळाच्या दालनांत पंखे फार थोडे आहेत अशी कामगारांनीं तक्रार केली, कीं कंपनीच्या एकाद्या दुय्यम अधिकाऱ्यानें विचारावें कीं तुझ्या घरीं किती पंखे आहेत? "कामगारांचा अपमान झाला" असें कोणी तरी उठून सांगावें की झालाच गोंधळ सुरू! "भांडवलवाल्याचा मुर्दाबाद" म्हणून घोषणा लागलीच निघावयाचीच.

आपल्या वडिलांच्या मृत्युनिमित्त एका कामगारानें रजा मागितली. सहा महिन्यांपूर्वीं त्याच कामगारास त्याच कारणासाठीं रजा दिली होती, म्हणून वेल्फेअर ऑफिसरकडे हें प्रकरण चौकशीसाठीं सोपविण्यांत आलें. ह्या अधिकाऱ्यानें कामगाराशीं बोलतांना वेडेवाकडे शब्द उच्चारतांच, कामगारानें चाकू बाहेर काढला व अधिकाऱ्याचें पोट फाडलें. एक स्त्री कामगार कामावरून दोन तास गैरहजर होती. गैरहजेरीचें कारण विचारतां, मोरीवर गेली असल्याचें तिनें सांगितलें. कॅशिअरला नीट चौकशी करणें साधलें नाहीं आणि "हिंद माता का इज्जत लिया; मारो" ची गर्जना उठली आणि त्याला जीव बचावण्यासाठीं पळ काढावा लागला. ही अशी किती तरी उदाहरणें देतां येतील. काम कमी करण्याबाबत प्रचार हरतऱ्हेनें करण्यांत येतो. मालकवर्ग कंटाळून गेला आहे, त्याला कांहीं करतां येत नाहीं; बघत बसावें लागतें. औद्योगिक क्षेत्रांतील सर्वच ठिकाणीं किमान सचोटीहि आढळत नाहीं; तेव्हां कामगारांना उपदेश करून काय साधणार?

उत्पादनांतील घट ही राष्ट्रीय आपत्ती आहे व तिचेवर उपाययोजनाहि जालीम पाहिजे. सरकार कोणतेंहि असो व त्याचा कार्यक्रम कांहींहि असो, १९३९ ते १९४४ ह्या काळांत ज्या पद्धतींचा अवलंब केला, त्यांचा पुनः करता येण्याजोगा आहे. औद्योगिक उत्पादनाच्या रथास भांडवल व कामगार हे सक्तीनें जुंपण्यांत आले पाहिजेत.

ह्या विवेचनाचा निष्कर्ष असा:--

(१) उपासमारीविरुद्ध आणि राष्ट्राच्या नाशाविरूद्ध जणूं काय आपणांस युद्धच करावयाचें आहे, अशा भूमिकेवरून औद्योगिक परिस्थितीवर उपाययोजना केली पाहिजे.

(२) न्यायमंदिरानेंच भांडवलदार व कामगार ह्यांचेमधील तंटे सोडविले पाहिजेत. त्यापैकीं कोणत्याहि पक्षास स्वतःच हातीं कायदा घेतां येणें अशक्य झालें पाहिजे.

(३) साटेबाज व नफेबाज ह्यांचेविरुद्ध कडक उपाययोजना आवश्यक आहे.

(४) ज्यांना तीन किंवा तीनपेक्षा जास्त अपत्यें आहेत, अशांनीं स्वतः होऊन शस्त्रक्रियेस तयार होऊन संततीवाढ अशक्य करावी. अशा शस्त्रक्रियेची पुढें सक्ती करावी लागेल. त्याविना लोकसंख्या आटोक्यांत रहाणार नाहीं.

(५) वाढत्या आणि उपयुक्त जनावरांना पुरेसा चारा मिळेल ह्या दृष्टीनें त्यांची संख्या नियंत्रित केली पाहिजे. पांजरपोळांत म्हातारी–कोतारीं जनावरें नुसतीं जगविण्यांत कांहीं अर्थ नाहीं.

कर्ज उभारणी ही युद्धकाळांतील कर्ज उभारणीच्या पद्धतीची असावी, कर्जें अल्प मुदतीची असावीत, त्यावर इन्कमटॅक्स माफ असावा. दबा धरून बसलेलें भांडवल त्यामुळें बाहेर पडेल. इंटर नॅशनल फंडाच्या कर्जाचा विनियोग भांडवली व उत्पादक कामासाठींच करावा.

काम करणाऱ्या प्रत्येकास कारखान्यांत नफ्याचा वाटा मिळेल, असें एक प्रकारचें अविभक्त कुटुंब म्हणजेच आदर्श कारखाना होय. भांडवलदारांनीं स्वतः कामगारांबरोबर किमान एक वर्ष कामगार म्हणून काम केलें तर त्यांना कामगारांच्या जीवनाची व मनोवृत्तीची जाणीव, खरी जाणीव होईल. कामगारांनाहि आपण कारखान्यांत अंशतः मालक आहोंत असें वाटलें पाहिजे. मजूर, यंत्रज्ञ, कारकून, ह्या सर्वांना प्रारंभी सारखाच पगार असावा. नंतर त्यांच्या लायकीप्रमाणें वेगवेगळ्या श्रेणींत त्यांना सामील करून घेण्यांत यावें. पगारवाढ ही कार्यक्षमतेच्या प्रमाणांत व्हावी. एका श्रेणींतून दुसऱ्या श्रेणींत बढती म्हणजेच उत्तेजक बोनस होय. त्यांतील कांहीं रक्कम व प्रॉव्हिडंड फंडांतील कांहीं रक्कम कारखान्याच्या शेअर भांडवलांत गुंतविण्यांत यावी. भांडवलदारांइतकेच कामगारांचेहि डायरेक्टर बोर्डावर प्रतिनिधी असावेत. अविभक्त कुटुंबाप्रमाणें कारखाना चालतो ह्याची चालकांनीं दक्षता बाळगावी. म्हणजे, कामचुकारपणास वावच रहाणार नाहीं. कामगारच अशा चुकारास सहन करणार नाहींत.

# शिल्लक व भांडवलाची गुंतवणूक यांमधील परस्पर संबंध

[ श्री. भास्कर महादेव काळे, एम्. ए., बी. टी. ]

समाजामध्यें खरी उपयोगी पडणारी बचत केव्हां होऊं शकते याचे अर्थशास्त्राच्या विचारसरणीच्या दृष्टीनें सुप्रसिद्ध लेखक मि. जी. डी. एच्. कोल यांनीं असें उत्तर दिलें आहे कीं, बचत केलेला पैसा सर्वच्या सर्व ज्यावेळीं उत्पादन कार्यांत गुंतविला जातो त्यावेळीं. मि. कोल यांच्या विचारसरणीचा आशय स्पष्ट आहे व तो असा कीं, सर्वच्या सर्व बचत किंवा शिल्लक जर नवीन उत्पादन कार्यांत गुंतविली जाऊन त्यामुळें उत्पादनाला चालना मिळून विक्री माल त्या देशांत अंतर्गत रीत्या किंवा परराष्ट्रीय व्यापाराच्या दृष्टीनें विकला जाईल तरच ही समाजांत झालेली बचत परिणामीं उपयुक्त ठरते. शिल्लक टाकलेला पैसा बँकांतून किंवा इतर शिल्लक साठविणाऱ्या संस्थांतून नुसता शिल्लक म्हणून पडून राहील तर मात्र अर्थव्यवहाराचीं चक्रें फिरण्याच्या दृष्टीनें त्या पैशाचा कांहींच उपयोग होऊं शकणार नाहीं, व हा शिल्लक पडलेला पैसा जणू कांहीं समाजाच्या व्यवहारांत एक प्रकारची मंदी निर्माण करील. त्यामुळें उत्पादन कमी होऊन बाजारभाव उतरतील व बाजारभाव उतरल्यामुळें मजुरीचे दर व नफ्याचें प्रमाण यामध्येंहि फार मोठी घट येईल व ही घट आल्यामुळें समाजाच्या व्यवहारावर त्याचे चांगले परिणाम होणार नाहींत. यामुळें मि. कोल यांच्या विचारसरणीचा मुख्य आशय असा स्पष्टपणें दिसतो कीं, जितकी बचत समाजांत होईल ती सर्वच्या सर्व उत्पादन करणाऱ्या व्यवसायांमध्यें किंवा मोठमोठ्या कारखान्यांमध्यें गुंतविली गेली पाहिजे व ती तशी गुंतविली गेली म्हणजेच आर्थिक स्थैर्य प्राप्त होईल.

वरील विचारसरणी स्थूलमानानें खरी आहे यांत मुळींच संशय नाहीं. परंतु अर्थशास्त्रांतील सर्व तत्त्वें किंवा विचारप्रणाली परिस्थितीवर अवलंबून असतात हेंहि तितकेंच खरें आहे, व त्यामुळें वरील विचारसरणी आजच्या हिंदच्या परिस्थितीबद्दल कोणत्या गोष्टी स्पष्ट करूं शकते याबद्दल याठिकाणीं थोडासा विचार केला आहे.

बचत व गुंतवणूक या दोहोंच्याहि बाबतींत गेलीं तीन वर्षें हिंदची परिस्थिति असावी तितकी समाधानकारक नाहीं. गेल्या तीन वर्षांतील निरनिराळ्या घटना कीं ज्यांच्यामुळें बचत व गुंतवणूक यांच्यामध्यें असमाधानकारक परिस्थिति निर्माण झालेली आहे, ती परिस्थिति सर्वांच्या परिचयाची असल्यामुळें त्या परिस्थितीची जास्त चर्चा करण्याचें येथें कारण नाहीं. बचतच कमी होत असल्यामुळें उद्योगधंद्यांत भांडवल गुंतविलें जाण्याची परिस्थिति समाधानकारक नाहीं. जी कांहीं थोडीशी समाजांत बचत होऊं शकते तीहि आजच्या परिस्थितींत पूर्णपणें नवीन उद्योगधंद्यांत गुंतविली जात नाहीं. असें होण्याला मुख्य कारणें म्हणजे गेलीं तीन वर्षें वस्तूंचे सतत वाढत जाणारे बाजारभाव, उत्पादनासाठीं निरनिराळ्या कारणांमुळें होणारा जास्ती खर्च, व नेहमीं बदलत जाणाऱ्या आर्थिक परिस्थितीमुळें निर्माण झालेलें असमाधानकारक व अविश्वासाचें वातावरण. यामुळें उद्योगधंद्यांत भांडवल गुंतविण्यास फारसे कोणी धजावत नाहीं. याचा सहाजिकच असा एक परिणाम होत असावा कीं, कांहीं लोकांनीं थोडीफार बचत केली तरी देशाच्या अर्थव्यवस्थेला जरूर तितक्या प्रमाणांत ती उपयोगी पडूं शकत नाहीं. म्हणजेच उपलब्ध असणारा कांहीं पैसा व त्या पैशाच्या योग्य उपयोगामुळें निर्माण होणारी क्रयशक्ति यांचा लाभ आज तरी हिंदच्या समाजाला मिळूं शकत नाहीं. या परिस्थितीला जबाबदार कोण, याची येथें चर्चा करण्याचें कांहींच कारण नाहीं.

याच बरोबर दुसरी एक महत्त्वाची गोष्ट म्हणजे जें कांहीं भांडवल म्हणून गुंतविलें जात आहे तेंहि सर्वच्या सर्व उत्पादनशक्तीच्या वाढीच्या दृष्टीनें आज उपयोगीं पडूं शकत नाहीं. दिल्लीच्या ईस्टर्न एकॉनॉमिस्टनें हें स्पष्टपणें दाखवून दिलें आहे कीं गेल्या दोन-तीन वर्षांत यंत्रसामग्रीच्या झालेल्या आयातीमुळें उद्योगधंद्यांची उत्पादनशक्ति योग्य प्रमाणांत वाढलेली नाहीं. कारण, यंत्राचे बाजारभाव भरमसाट होते, व हातीं आलेलीं यंत्रेंहि ताबडतोब उपयोगांत आणलीं जाऊन उत्पादनशक्तीला चालना देऊं शकलीं नाहींत. याचें कारण म्हणजे यंत्रज्ञांचा तुटवडा, कारखान्याला बांधकामासाठीं कराव्या लागणाऱ्या खर्चाचा अपुरेपणा व यासाठीं लागणाऱ्या साधनांचा तुटवडा, कांहीं वस्तूंच्या बाबतींत परराष्ट्रांतून होणाऱ्या आयातीनें निर्माण झालेली स्पर्धा, इ. गोष्टी होत. या सर्वांचा स्पष्ट अर्थ असा कीं, हिंदमधील गेल्या दोन-तीन वर्षांतील परिस्थिति अशी चमत्कारिक झाली आहे कीं हिशोबाच्या किंवा अंदाज करण्याच्या दृष्टीनें गुंतविण्यासाठीं तयार करण्यांत आलेलें भांडवलहि आज अंदाजाप्रमाणें फलदायी किंवा कार्यक्षम ठरत नाहीं. असें असल्यामुळें बचत व भांडवलाची गुंतवणूक या दोहोंच्या मध्यें निर्माण झालेली विसंगति आजच्या कालांत जास्तच तापदायक ठरत आहे. कारण, जें कांहीं थोडेंसें भांडवल गुंतविलें जात आहे तेंहि परिणामाच्या दृष्टीनें असें निःसत्व बनत आहे कीं त्या भांडवलावर निश्चितपणें व्याज मिळूं शकत नसल्यामुळें ज्यांच्याजवळ कांहीं शिल्लक असेल असेहि लोक आपली शिल्लक किंवा बचत औद्योगिक भांडवलांत गुंतविण्यास धजावत नाहींत.

अशा प्रकारच्या विचित्र परिस्थितींत शिल्लक व भांडवलाची गुंतवणूक या दोहोंच्याहि बाबतींत जितक्या लौकर समाधानकारक किंवा समतोलपणा निर्माण करणारी परिस्थिति प्राप्त होईल तितक्या लौकर हिंदची आर्थिक परिस्थिति सुधारण्यास मदत होणार आहे, असें स्पष्टपणें दिसतें.

याप्रमाणें मि. कोल यांची विचारसरणी सामान्यपणें खरी आहे. हिंदमध्यें अशीच परिस्थिति निर्माण झाली आहे कीं त्यामुळें भांडवल गुंतविण्याची स्थिति असाधानकारक झाली आहे. शिल्लक टाकण्याची किंवा बचत करण्याची परिस्थिति ही सुद्धां एकंदर भांडवल गुंतविण्याच्या सोईस्करपणावरच अवलंबून असते. भांडवल गुंतवणूक व शिल्लक टाकण्याची प्रवृत्ति या दोनहि गोष्टी कात्रीच्या दोन पात्यांप्रमाणें एकाच वेळीं योग्य तें काम करीत असतात. एका पात्याची धार कमी झाली कीं त्याचा परिणाम दुसऱ्या पात्याच्या कार्यावर होतो. त्याचप्रमाणें भांडवल गुंतवणुकीची परिस्थिति असमाधानकारक झाली म्हणजे त्याचा त्वरित परिणाम शिल्लक टाकण्याच्या किंवा बचत करण्याच्या परिस्थितीवर होतो. तेव्हां बचत करणें व भांडवल गुंतविलें जाणें या दोनहि बाबतींत जितक्या लौकर कार्यक्षमता प्राप्त करून घेतां येईल तितक्या लौकर ती प्राप्त करून घेतली पाहिजे. कारण, शिल्लक टाकणें व सर्वच्या सर्व शिल्लक उत्पादनकार्यांत खर्च करणें या दोन गोष्टींची आजच्या परिस्थितींत विशेष आवश्यकता आहे.

मि. कोल यांच्या विचारसरणींतून दुसरें एक अनुमान निघतें तें

असें कीं, बचत करण्याची शक्ति व उद्योगधंद्यांत भांडवल गुंतविण्याची परिस्थिति या दोनहि गोष्टी पूर्णत्वानें अनुभवावयाच्या असल्यास इतर सर्व बाबतींतील परिस्थिति पूर्णपणें स्थिर म्हणजेच ज्यामुळें कोणत्याहि प्रकारचा बदल होणार नाहीं अशी किंवा सर्वप्रकारें समाधानकारक अशीच राहिली पाहिजे. कोणत्याहि प्रकारचा लहानसा उपद्रव किंवा धक्का आर्थिक वातावरण अस्थिर करावयास कारण होतो. युद्ध होईल ही भीति, किंवा कदाचित् संप होईल ही शंका, किंवा आयातीवरील नियंत्रणें घट्ट किंवा सैल केलीं जातील ही शक्यता, या सर्व गोष्टी अशा प्रकारच्या असतात कीं त्यांच्यामुळें आर्थिक जीवनाला धक्का पोंचतो व तो धक्का सर्व परिस्थिति असमाधानकारक करावयास, निदान कांहीं प्रमाणांत संकटें निर्माण करावयास तरी कारण होतो. तेव्हां बचत करणें व योग्य प्रकारें उद्योगधंद्यांत तेवढ्याच भांडवलाची गुंतवणूक साधणें या गोष्टी सामान्य प्रकारांनीं सहजासहजीं साध्य होण्यासारख्या नसतात, परंतु त्या साध्य व्हावयाच्या असतील तर इतर सर्व बाबतींत परिस्थिति किंवा परिस्थिति निर्माण करणाऱ्या गोष्टी यांच्या बाबतींत पूर्णपणें समाधानकारक किंवा स्थिर परिस्थिति निर्माण झाली पाहिजे.

अशा तऱ्हेची परिस्थिति समाजांत कधीं निर्माण होणें संभवनीय आहे काय? पूर्वीचा इतिहास याचें उत्तर जवळ जवळ नकारार्थीच देईल. कारण अशा प्रकारें स्थिर किंवा शाश्वत वाटणारी परिस्थिति समाजांत कोठेंच शेंकडों वर्षे सतत नांदत असल्याचा इतिहासाचा दाखला नाहीं. ही सर्व परिस्थिति नेहमीं थोडीफार बदलतच असावयाची. फरक पडेल तो मात्र इतकाच कीं ही परिस्थिति अल्प प्रमाणांत किंवा मंद गतीनें बदलते, कीं जीवनविषयक मूल्यांत व शास्त्रीय संशोधनानें साध्य झालेल्या गोष्टींत फरक पडल्यामुळें फार जोरदार रीतीनें बदलते, एकदाच. अलिकडच्या परिस्थितीवरून असें दिसतें कीं, निरनिराळ्या आंतरराष्ट्रीय संस्था जागतिक जीवनांत एकवाक्यता निर्माण करण्याचा निदान दृश्य प्रयत्न तरी करीत आहेत. परंतु या प्रयत्नांना कितपत खरें यश येतें यावरच या संस्थांचें भवितव्य अवलंबून आहे.

वरील सर्व विवेचनावरून असें स्पष्टपणें दिसून येतें कीं, मि. कोल यांची तात्त्विक विचारसरणी खरोखरच आर्थिक जीवनाच्या व व्यवहाराच्या दृष्टीनें बरीचशी मार्गदर्शक आहे. प्रत्यक्ष योग्य प्रकारच्या गुंतवणुकीच्या कार्याप्रीत्यर्थ जी शिल्लक किंवा बचत उपयोगी पडते तीच सर्व प्रकारें समाजकार्याला व अर्थव्यवहाराला अंतिम दृष्ट्या उपकारक ठरते. ही विचारसरणी आज सर्वांना स्पष्टपणें पटली व ती कृतींत उतरवितां आली तर आर्थिक दृष्ट्या हिंदचाच नव्हे तर सर्व मानवी समाजाचा फायदा होणार आहे. अर्थशास्त्रांतील कांहीं सिद्धांत किंवा विधानें हीं लाईट हाऊस प्रमाणें मार्गदर्शन करणारीं असतात. आर्थिक जीवन सुखकर करण्यासाठी पुढें मांडलेले हे जणूं कांहीं सूचनात्मक इशारे असतात. ही विचारसरणी आजच्या हिंदच्या परिस्थितींत व्यावहारिक दृष्ट्या फायदेशीर ठरण्यासारखी आहे. कारण, योग्य प्रकारें उद्योगधंद्यांत भांडवल गुंतविण्यास समर्थ करणारी शिल्लक किंवा बचत ज्यावेळीं निर्माण करतां येईल त्याच वेळीं हिंदच्या आर्थिक जीवनाचे प्रश्न सुटण्यास मदत होईल. इतर अनेक प्रश्न देशापुढें असले तरी 'शिल्लक टाकणें' व 'भांडवल गुंतविणें' या दोहोंत समन्वय साध्य करणारी परिस्थिति ज्याच्यामुळें निर्माण होऊं शकेल असें वातावरण निर्माण करणें आज आवश्यक दिसतें. सर्वच्या सर्व शिल्लक योग्य प्रकारें नवीन संपत्ति निर्माण करण्यांत खर्ची टाकली जाणें आवश्यक आहे व या दोनहि गोष्टी साध्य होण्यासाठीं अनुकूल वातावरण निर्माण झालें पाहिजे.

---

"रेखा फर्निशर्स"
३२४ सदाशिव, पुणें २.
सर्व प्रकारच्या सुबक फर्निचरचे कारखानदार.

मेसर्स सामंत वालावलकर आणि कं.
१२, लक्ष्मी चाळ, मोहन बिल्डिंग्ज, मुंबई नं. ४.
'ऑलिव्हेटि' टाइपरायटर्सचे अधिकृत विक्रेते, मशिनरीचे विक्रेते, कमिशन एजंटस्, बुकसेलर्स आणि प्रकाशक.
तपशीलासाठी वरील पत्त्यावर लिहावें.

जनतेला चोख काटकसरीची व्यवस्था दाखविणारी संपूर्ण तुमच्याच मालकीची
( स्थापना १९४२ )
श्री शिवाजी नॅशनल बँक लि., कोल्हापूर
( पाटगांवकर बिल्डिंग, लक्ष्मीपुरी )
ब्रँच
मिरज ( सीनियर )
भांडवलाची सुरक्षितता, पैशाचा योग्य मोबदला, कर्जावरील व ठेवीवरील व्याजाचे आकर्षक दर, वैशिष्ट्यपूर्ण मंथली फिक्स डिपॉझिटची नाविन्यपूर्ण योजना.
"स्वराज्य बॉन्ड"ची दामदुपटीची अभिनव कल्पना.
शिवाय
बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.
समक्ष भेटा अगर लिहा.
नारायणराव हणमंतराव साळोखे,
कोल्हापूर, लक्ष्मीपुरी. मॅनेजिंग डायरेक्टर

# मुंबई प्रांतांतील क्षेत्रपायनिक आकल्प व सर्व–साधारण जनतेवर पडणारा बोजा.

[ रा. ब. म. स. जोशी, बी. ई. ( सिव्हिल ), एम्. आय. ई., एम्. आर. सॅन. आय.; से. नि. सुपरिंटेंडिंग इंजिनिअर, पी. डब्ल्यू. डी. मुंबई, पुणें ]

( सूचना:—वाचकांनीं प्रथम उपसंहार व तालिका क्र. १ ते ४ यामधलि आकडे वाचून मग संपूर्ण लेख वाचावा अशी विनंती आहे. )

( १ ) क्षेत्रपायनिक आकल्पांचे उद्देश:—सर्व प्रांतांतील जनतेच्या खर्चानें म्हणजे वार्षिक उत्पन्नांतून वा कर्ज उभारून सरकार जी लहान–मोठीं क्षेत्रपायनिक ( Irrigation ) कामें हातीं घेतें त्यामागलि उद्देशा–संबंधीं बरेच गैरसमज आढळून येतात. अशीं धरणें, कालवे व पाट–बंधारे बांधण्याबाबत निरनिराळ्या लोकांच्या मतें खालीलपैकीं एक वा अनेक उद्देश असतात.

( १ ) दुष्काळी भागांतील धान्य पिकास संरक्षण देण्याकरतां.

( २ ) आपल्या तुटीच्या प्रांतांत ( मुख्यत: दुष्काळी जिल्ह्यांत ) धान्य–वाढ व्हावी म्हणून.

( ३ ) साखर, गूळ, कपास वगैरे द्रव्योत्पादक पण आवश्यक वस्तूंच्या उत्पन्नास मदत व्हावी ( व त्या योगें जनतेला ते जिन्नस योग्य भावांत मिळावे ) म्हणून.

( ४ ) दुष्काळी कामें म्हणून; अर्थात् दुष्काळ–पीडितांना, दुष्काळी वर्षांत काम पुरवून त्यांच्या जीवनाची त्या काळापुरती व्यवस्था करण्याकरतां.

( ५ ) एकंदरींत शेतकऱ्यांस मदत म्हणून.

( ६ ) सरकारनें चालविलेला, सरकारी उत्पन्नांत भर पाडणारा व लोकोपयोगी असा धंदा म्हणून.

सर्वच क्षेत्रपायनिक आकल्प सरकारी ( सार्वजनिक ) खर्चांतून केले जात नाहींत, इतकेच नव्हे तर मुंबई प्रांतांतलि क्षेत्रपायनिक आकल्पांनीं भिजणाऱ्या जमिनींपैकीं ( Total Irrigated in the Province ) जवळ जवळ २/३ क्षेत्राचें आकल्प खाजगी भांडवलावर अर्थात् खाजगी मालकांचें असून फक्त १/५ क्षेत्राचेच सरकारी खर्चातून केले गेले, हें तालिका क्र. १ मधील आंकड्यांवरून दिसून येईल. आकडे " Irrigation Enquiry Committee 1938 " च्या अहवालावरून मुद्दाम घेतले आहेत.

वरील अहवाल लिहिल्यापासून, वरील प्रकल्पांच्या संख्येंत*—सरकारी वा खाजगी—म्हणण्यासारखी भर पडलेली नाहीं. अलीकडे महाराष्ट्रांत गंगापूर, कर्नाटकांत घटप्रभा, व गुजराथमध्यें मेशवा–माही व मुख्यतः तापी या नद्यांवर जीं कामें होऊं घातलीं आहेत, त्यामुळें होणारी वाढ पदरांत पडण्यास अजून पुष्कळच अवकाश आहे, व म्हणून त्यांचा विचार आज करण्याची आवश्यकता नाहीं. इतकेंच नव्हे तर १९३८ च्या आंकड्यावरून निघणाऱ्या निष्कर्षांवरून या नवीन प्रकल्पासंबंधीं आपणांस बऱ्याच गोष्टी शिकावयास मिळतील.

( २ ) उद्देशांची योग्यता व छाननीबाबत कांहीं माहिती व विचार:—

वर निर्दिष्ट केलेल्या उद्देशांची छाननी करतांना, तालिका १ मधील आंकड्यांचा आपणांस उपयोग होणार आहे. एकंदर क्षेत्रफळापैकीं, शेकडा फक्त २·५ टक्के क्षेत्रास व पिकांखालील जमिनीपैकीं सुमारें ४ टक्के क्षेत्रांतील पिकांसच पाणीपुरवठ्याच्या सोयी आहेत. पैकीं, " सरकारी खर्चानें " बांधलेल्या कालव्या खालीं भिजणारें क्षेत्र पिकाखालील सर्व क्षेत्राच्या मानानें शेकडा १ पेक्षांही कमी असून त्यापैकीं बहुतेक सर्व कालवे व जलाशय ( Reservoirs ) ब्रिटिश राजवटींत सरकारी पैशानें बांधले गेले. याशीं तुलना करतांना, निव्वळ खाजगी खर्चानें बांधलेल्या विहिरीखालील भिजणारें क्षेत्र २½ टक्के असून, जुने बंधारे व तळीं धरून खाजगी भांडवलानें बांधलेल्या सर्व प्रकल्पावर मिळून ३¼ टक्के पीकास पाणी मिळतें. म्हणजे खाजगी प्रकल्पावरील पिकाचें क्षेत्र सरकारी प्रकल्पाखालील क्षेत्राच्या ४¾ पट आहे.

( २ क ) सरकारी कालव्यांचा फायदा प्रांतांतील किती जनतेला होतो ?

अशा प्रकारच्या सर्वच प्रकल्पांचे बाबतींत फक्त " व्याज किती सुटतें " एव्हढीच दृष्टी ठेवणें बरोबर ठरणार नाहीं. उदाहरणार्थ, लागवडीखालील ८० टक्के जमिनीस पाणी मिळण्याची सोय होत असेल, तर व्याज न सुटलें तरी फारसें बिघडणार नाहीं; कारण खर्च होणार सर्व जनतेच्या नांवानें व त्याचा फायदाही बहुतेक सर्वांस मिळणार. अशा प्रकल्पांवर भरपूर फायदा पडला तर राज्यांतील ( State ) तिजोरींत जमा होऊन सर्वांनाच त्याचा उपयोग होणार. ( अविभक्त ) पंजाब प्रांतांतील क्षेत्रपायनिक प्रकल्पांची अशी स्पृहणीय स्थिति होती.

बरें, मूळ रकमेवरील व्याजाइतकीही बाकी ( खर्च–वेंच वजा जातां) सुटली नाहीं, तरी तुटीचा भार सरकारी तिजोरीवर पडणार व त्यांत अयोग्य कांहीं नाहीं; कारण ८० टक्के लोकांना त्या कालव्यांचा फायदा मिळतो व १०० टक्के जनतेला तोटा सोसावा लागतो पण हें अंतर फारच थोडें आहे. त्याला अन्याय म्हणतां येणार नाहीं.

वरील विवेचनांत एक सहज लक्षांत न येणारें कलम ( Factor ) आहे. ८० टक्के जमिनीला पाणी मिळालें म्हणजे ८० टक्के लोकांचा फायदा होतो असें जें वर म्हटलें आहे, तें अर्धसत्य ( Half truth ) आहे; कारण कित्येक लोकांना मालकीची वा कूळ म्हणून जमीन नसते. अर्थात १०० जमीन मालकांत ( त्यांत त्यांच्या घरांतील माणसें आलीं ) २० ते ४० टक्के बिगरजमीन म्हणजेच कामकरी ( Landless workers ) मिळविले पाहिजेत. म्हणजे वरील उदाहरणांत कालव्यांचा फायदा फक्त ५६ ते ६६ टक्के लोकांसच मिळणार. तरी सुद्धां ६० टक्के लोकांना मिळणाऱ्या फायद्याकरितां बाकी ४० टक्के जनतेला थोडा तोटा सोसावा लागल्यास तें क्षम्य समजावें लागेल.

पण या उलट मुंबई राज्यांत शेंकडा ¾ टक्के जमिनीलाच सरकारी कालव्यांचें पाणी मिळूं शकतें व त्यातलें ७५ टक्के पाणी शेंकडा ३/२० टक्के ( १००० एकरांतील १॥ एकराला ) क्षेत्रालाच जातें. १० ते २० टक्के वार्षिक नफा मिळविणारे साखर गूळ कारखाने ज्यावर चालतात, ते कालवे तोट्यांत चालवून त्यांचा भार अखिल जनतेवर लादणें उघडच अयोग्य व असमर्थनीय होय.

( २ ख ) कालव्याखाली किती जमीन भिजूं शकेल ?

दुसऱ्या एका बाबतींतही पूर्ण माहितीच्या अभावीं भलतेच निष्कर्ष काढण्यांत येतात. पुष्कळांची अशी कल्पना झालेली आहे

* Irrigation Enquiry Committee च्या अहवालानंतर, पिकाच्या क्षेत्रांत मात्र थोडी वाढ झाली आहे.

११

कीं, सध्या अस्तित्वांत असलेल्या कालव्यांनीं शेकडा सुमारें १½ टक्केच जमीन भिजते. हें खरें असलें, तरी नवीन नवीन क्षेत्रपायनिक प्रकल्प होत गेले, तर मुंबई राज्यांतील एकंदर जमिनींपैकीं ५०–६० टक्के जमिनीस कालव्याचें पाणी मिळूं शकेल, ही कल्पना चुकीची आहे.

मुंबई प्रांतापैकीं, महाराष्ट्र व कर्नाटक येथील ठेवणच अशी आहे कीं, खोलांत नदी व बाजूस चढाची जमीन. प्रत्येक नदीवर कालवे बांधण्यास कुबेरानें द्रव्य दिलें तरीही २५ टक्के जमिनीससुद्धां कालव्याचें पाणी मिळूं शकणार नाहीं. ह्या २५ टक्के जमिनीला पाणी पुरविण्याच्या बाबतींतील मुख्य गोम (Secret) सध्यांच्या पीक व पाण्याच्या वांटणीपद्धतींत (Pattern of Irrigation and its distribution) आहे. सध्यांचीच पद्धत कायम राहिली तर हें प्रमाण ५ टक्क्यांच्या आसपासच राहील. कर्नाटकांतील कांहीं भागांत हें प्रमाण बरेंच जास्ती होण्याची शक्यता आहे; परंतु द्रव्याचें पाठबळ व पीक व पाणी-वांटप पद्धतीचे बाबतींत लोकांची निस्वार्थी दृष्टि, यांचा समन्वय होऊन ही शक्यता प्रत्यक्षांत आणणें कितपत साध्य होईल हे सांगणें कठीण. गुजराथेंतील सपाट प्रदेशांत हा समन्वय होण्याचा संभव आहेसें वाटतें, पण तेथेंही पीक–पाणी–वांटप–पद्धत (Pattern of Irrigation Sanctions to Crops) कोणती ठेवली जाईल यावरें सर्व अवलंबून राहील.

सारांश, प्रांतांतील शेंकडा ५ ते ७ टक्क्यांपेक्षां जास्ती जमिनीस क्षेत्रपायनास पाणी मिळण्याचा संभव आज तरी दिसत नाहीं. पीक व पाण्याच्या वांटप पद्धतींत आमूलाग्र (Revolutionary) बदल केला तर हें प्रमाण फार तर १५ टक्केपर्यंत जाऊं शकेल. अर्थात् मुंबई राज्यांत शेंकडा ६० टक्के जमिनीला आपण कालव्याचें पाणी पुरवूं शकूं ही कल्पना अशक्य कोटींतील आहे याची जाणीव जितकी लौकर होईल तितकें बरें.

(२ ग) सरकारी कालव्यांवरील तोटा कोण सोसतो व फायदा कोणास व किती प्रमाणांत होतो आहे ही स्थिति योग्य आहे काय?

आपल्या मुंबई प्रांतांतील कालवे व उत्तर हिंदुस्तानांतील कालवे यांत एक मोठा फरक आहे तो असा. उत्तर हिंदुस्तानांतील पुलिनमय (Alluvial) जमीन सपाट असून नदीच्या मानानें बाजूच्या पठारी भागाची (Ridge) उंची फार नसते. यामुळें बहुतेक सर्व प्रदेशास कालव्याचें पाणी जाऊं शकतें. शिवाय तेथल्या नद्यांचा प्रवाहही मोठा असतो. मुख्य गोष्ट म्हणजे "कनालचें पाणी शक्य त्या सर्व जमिनीला मिळावें" हीच अशा प्रकल्पांच्या मांडणींत व आंखणींत मुख्य कल्पना असते. त्यामुळें प्रत्येक शेतांत पाणी जाईल अशीच प्रकल्पांत सोय असते, व तसा कायदाही असतो. त्यामुळें कालव्याखाली भिजूं शकणारें क्षेत्र व प्रत्यक्ष भिजणारें क्षेत्र यांत फारशी तफावत नसते. म्हैसूर, मद्रास व हैद्राबाद या राज्यांतील क्षेत्र–पायनिक प्रकल्पामध्येंही हीच व्यवस्था उद्दिष्ट आहे व अंमलांतही येते. मुंबईंत मात्र तसें नाहीं. येथें कनालचें वंशागत क्षेत्र (Commanded Area) १७ लाख एकर, तर प्रत्यक्ष पायनित (Irrigated) क्षेत्र ३ लाख म्हणजे वंशागताच्या (Commanded) फक्त १८ टक्केच!! ह्याचीं कारणेंही अनेक व त्यामुळें परिणामही अनेक. कांहीं चांगले, कांहीं वाईट. त्याची कल्पना तालिका क्रमांक २ व ४ मधील आंकड्यांवरून येईल.

तालिका क्रमांक २ व ४ मधील आकडे अभ्यासले तर परिस्थितीची जाणीव उत्तम तऱ्हेनें होईल. त्यावरून दिसेल कीं, कनाल व धरणें बांधलीं गरीब शेतकऱ्यांकरतां अथवा अन्न–धान्यास पाणी मिळावें म्हणून; प्रत्यक्षांत मात्र ७५ टक्के पाणी जातें उसाला. त्यांतील निम्मे म्हणजे ४० टक्के (सुमारें) १० साखर गिरण्यांना, २० टक्के पाणी १००० मोठ्या गूळवाल्यांना, व बाकी राहिलेल्या १५ टक्क्यांत ८–१० हजार बागाईतदार १ ते १½ एकर ऊंस करणारे. अशा प्रकारें ८० टक्के पाणी वाटलें जाऊन उरलेलें २० टक्के धान्य–पिकांस मिळूं शकतें. उसाला दिलेल्या सवलती (उदाहरणार्थ, ओव्हरलॅप) धान्य-तूट भरून काढण्याकरितां किंचित् कमी करून, धान्यपीक वाढवा म्हटलें, तर साखरवाले व गूळवाले त्रागा करतात. पाण्याचे दर कमी ठेवावे म्हणून आग्रह धरतांना नांव गरीब शेतकऱ्यांचें; पण प्रत्यक्षांत त्या कमी दराचा फायदा मिळतो ८।१० गिरण्यांना व १००० बड्या बागाईतदारांना. गिरण्यांना वार्षिक फायदा (Dividend) १० ते २० टक्के तर कनालचे खर्चावरील व्याज सुद्धां मागत नाहीं!! प्रांतांतील दोन कोट जनतेनें ११ कोटी रुपये भांडवल घालून ते कालवे बांधले व शिवाय मागील ८० वर्षांत वर १० कोटी रुपये तोटा सोसला! दोन कोट जनतेला त्यापासून फायदा काय, तर काळ्या बाजारांत ३ रु. शेर साखर आणि पांढऱ्या बाजारांत १॥ रु. शेर गूळ!! हा प्रकार योग्य आहे काय, याचा प्रत्येकानें निर्विकार बुद्धीनें विचार करावयास नको काय?

बरें, गुळाचा धंदा, ही काय शिक्षणासारखी बाब आहे? का गुळाचा व साखरेचा धंदा ही दूरेक्षण (Television) वा अणुध्वम्च्या अभ्यासासारखी नवी गोष्ट कीं जिला उदार आश्रय देण्यास गरीब जनतेनें तोटा सोसणें योग्य ठरेल? साखर कारखाने उत्तर हिंदुस्थानांत आज कैक वर्षे चालूं असून त्यांची सर्वांगीण माहिती व शिक्षण अनेकांस मिळालेलें आहेच. गुळाच्या धंद्याला तर तीही सबब सांगण्यासारखी नाहीं. मग हे ११ कोटी रुपये भांडवल घालून, वर १० कोटींच्या तोट्याचा भुर्दंड मुंबईच्या जनतेला कां सोसावा लागला?

(२ घ) मुंबई राज्यांतील क्षेत्रपायनिक प्रकल्पांचे–पाटबंधाऱ्यांचे–मुख्य प्रकार :–

क्षेत्रपायनित प्रकल्पांचे मुंबई प्रांतांत मुख्य तीन प्रकार आहेत. ६ कोटी रुपयांचे वर ज्यास मूळ खर्च लागला व जे १६,००० एकर ऊंस व सुमारें १ लाख एकर इतर पिकें (मुख्यतः धान्य पिकें) ज्यावर भिजतात त्या नीरा प्रकल्पापासून तो निव्वळ १५० एकर धान्य पिकांसाठी बांधलेल्या कासुर्डी प्रकल्पापर्यंतच्या पाटबंधाऱ्यांना "प्रथम श्रेणींतले" (First class) म्हणून संबोधण्यांत येतें; असे प्रथम श्रेणींतले मोठे ६ व छोटे ३७ प्रकल्प मुंबई प्रांतांत अस्तित्वांत आहेत.

त्याचप्रमाणें ४७५ जुने (ब्रिटिश अमदानीच्या आधींचे) बंधारे व सुमारें १२,००० छोटीं तळीं अस्तित्वांत आहेत; त्यांस "द्वितीय श्रेणी"तले (Second Class) प्रकल्प म्हणतात. याशिवाय कासुर्डी तळ्यापेक्षांही अत्यंत लहान व १०–२० एकरांपासून ते १००–२०० एकरांपर्यंत क्षेत्रास, मध्यम पाऊसकाळाच्या सालीं एकादें–दुसरें पाणी देऊं शकणारे अनेक छोटे दगड–चुन्याचे बंधारेही सरकार सध्यां बांधीत आहे. या सर्व प्रकारच्या प्रकल्पासंबंधीं उपलब्ध असलेली माहिती तालिका क्र. ३ मध्यें दिली आहे.

तालिका क्रमांक ३ वरून तीन महत्त्वाच्या गोष्टी लक्षांत येतील, त्या अशा:–

१. मागील ८० वर्षांत बांधलेल्या व ज्यांच्या प्रथम निर्मितीच्या खर्चाचा आंकडा माहीत आहे असे, प्रथम श्रेणींतले

(first class) क्षेत्रपायनिक प्रकल्प मोठे वा छोटे असोत, त्यावरील खर्चवेंच वजा जातां व्याज सुद्धां सुटत नाहीं.

मूळचा सुमारें ११ कोटींचा खर्च तर झालाच पण वर्षें-वर्षींच्या तुटीचा बोजा जवळ जवळ आणखी तितकाच जनतेला भरावा लागला !!!

२. एकंदर वशागत क्षेत्राचा (Commanded Area) चा आकडा मोठा दिसला तरी ज्या जमिनीला पाणी मिळतें तें क्षेत्र वशागत क्षेत्राच्या १/२ पेक्षां कमी म्हणजे सुमारें १८ टक्केच असतें.

३. उसाचें क्षेत्र धान्याच्या मानानें सुमारें १/३ पडतें. मात्र ऊस गाळायला (Crushing) ला येईपर्यंत त्यास ४० पाण्याच्या पाळ्या लागतात, तर धान्यास सरासरी दोनच. यावरून हिशेब केल्यास दिसेल कीं प्रथम श्रेणींतील (ब्रिटिश अंमदानीत बांधलेल्या) कालव्यांच्या पाण्यापैकीं शेकडा ७५ टक्के पाणी ऊस पिकास जातें व फक्त २५ टक्केच धान्यास मिळतें. सरकारी कालवे मुख्यत: धान्योत्पत्तीस पाणी पुरवितात ही समजूत किती खोटी आहे हे वरील आंकड्यांवरून कळून येईल.

(२ क.): —धान्यवाढीच्या दृष्टीनें कोणत्या प्रकारचा प्रकल्प उत्तम ?

तालिका क्रमांक ३ मध्यें जे ३–४ प्रकार दिले आहेत त्यांपैकीं उत्तम कोणता हें ठरविण्यास, कनाल बांधण्यामागें हेतु काय तो ठरविणें अगत्याचें आहे. धान्य (त्यांतल्या त्यांत तांदूळ) वाढ हें धोरण असल्यास निराळ्याच नमुन्याचे प्रकल्प करावे लागतील. ह्या विषयाचा विचार करणें अवश्य असलें तरी स्थलाभावास्तव तो येथें करतां येत नाहीं.

या प्रांतांतील प्रथमश्रेणींतील क्षेत्रपायनिक प्रकल्पांत वशागत क्षेत्र १७ लक्ष एकर असतांना पाणी फक्त ३ लक्ष एकरांनांच कां मिळतें ? जास्ती क्षेत्र भिजवून जास्ती लोकांच्या जमिनीला धान्य-वाढीला पाणी देतां येणार नाहीं का ? असा प्रश्न अनेकांना सुचतो. त्याचें उत्तर असें.

कनालवर जोपलेलें ४५,००० एकर ऊस पीक जर नसतें तर वशागत १७ लक्ष एकरांपैकीं निदान १२–१३ लक्ष-एकर जमिनीला धान्याला पाणी देणें शक्य आहे. त्याच बरोबर "मांजराच्या गळ्यांत घांट बांधण्या" इतपतच त्याची शक्यता आहे, हा इषारा देणें जरूर आहे.

नुसतीं धान्यपिकें करण्यापेक्षां ऊस पिकास फायदा चांगलाच पडतो म्हणून पहिल्यापासून ऊस पिकास जोराची मागणी आली. कर्तबगार बागाइतदारांच्या मागणीमुळें उसाचें क्षेत्र सारखें वाढत गेलें, व द्वितीय महायुद्धांत "ऊस पीक वाढूं द्यावयाचें नाहीं व धान्यपिकांना पाणी द्यावयाचें" ही सरकारी प्रतिज्ञा बागाइतदारांच्या जोरापुढें पुरती अंमलांत येऊं शकली नाहीं.

कोणत्या कां कारणानें होईना, सरकारी कनालचें ७५ टक्के पाणी उसास जातें ही गोष्ट मात्र तितक्याशा प्रामुख्यानें लोकांच्या मनावर बिंबलेली दिसत नाहीं. त्याचें कारण असें दिसतें कीं, उसाखालील क्षेत्राचा आंकडा (सुमारें ४५,००० एकर) दिसावयास लहान व त्यामानानें धान्यपिकाचा आंकडा ३ लक्ष हा डोळ्यांत भरण्याइतका मोठा.

निदान पूर्वानुभवानें उसाची जोरदार मागणी लक्षांत घेतां "नीरेचा उजवा कालवा" १०० मैल बांधून ५ लक्ष एकर क्षेत्र वशागत करण्याऐवजीं कनाल ७० मैलांतच थांबवला असता तर निदान १ कोटी (कदाचित १ १/२ कोटी) रुपये खर्च वांचला असता. हीच चूक प्रत्येक प्रकल्पांत त्यापूर्वीं झालेली आढळते. नकाशावर वशागत क्षेत्राचा पट्टा दिसावयाला मोठा पण तो निव्वळ फसवा देखावा!!! त्या पट्ट्यापैकीं २०–२५ टक्के क्षेत्रासही पाणी मिळत नाहीं, कारण दिसावयाला लहान क्षेत्रांतील ऊस पीक ७५ टक्के पाणी पिऊन जातें. यापुढें तरी या बाबतींत बोध घेतला जावा !!

याशिवाय खरी फसवणूक होते ती निराळीच. वशागत क्षेत्राचा पट्टा इलाख्याच्या पूर्व हद्दीपर्यंत दिसल्यामुळें बघणाऱ्याची समजूत होते कीं तेथलें सर्व क्षेत्र रक्षित (Protected) आहे. पण तसें नसून त्या दुष्काळी मुलुखांतील ५ टक्के क्षेत्रासही धान्यपिकांस पाणी मिळूं शकत नाहीं.

शिवाय दुष्काळी भागाचें संरक्षण होणार म्हणून सरकार पाण्याचा दर कमी ठेवतें. तसेंच धान्यपिकाबरोबरच उसाचा दरही कमी ठेवण्यांत येतो. कारण छोट्या बागाइतदारास मदत व्हावी म्हणून! पण तोच दर १०–२० टक्के वार्षिक फायदा वाटणाऱ्या गूळ साखर कारखान्यांच्या व बागाईतदारांच्या उसासही लागू !! हीं स्थिति सालोसाल चालू आहे व २ कोटी जनता तोटा सोशीत आहे. त्याचा परिणाम तालिका ४ मध्यें दाखविला आहे.

(३) उपरिनिर्दिष्ट उद्देश सफल झाले का, किंवा होतील का ?

आतां आपण प्रारंभीं दिलेल्या ६ उद्देशांपैकीं कोणते व किती सफल झाले हें पाहूं.

उद्देश क्र. १:—दुष्काळी भागांतील पिकांस संरक्षण देणें : आपण वर पाहिलेंच आहे कीं सरकारी कनाल मधील शेंकडा ७५ टक्के पाणी ऊस पिकास जातें व २० टक्केंच धान्योत्पादनास जातें, ७५ टक्के उसास जाणाऱ्या पाण्यापैकीं ४० टक्के साखर कारखानदारांना व २० टक्के उसाचा मोठ्या प्रमाणावर व्यापार करणाऱ्यांच्या उसाला जातें. खाजगी भांडवल घालून विहिरीवर मोटेनें वा पंपानें पाणी उपसण्यास एकरीं जितका खर्च येतो त्याच्या १/६ दरानें उसास पाणी देण्यांत येतें. याचीं कारणें वर दिलींच आहेत. खरें पाहिलें असतां ऊस पीक म्हणजे कांहीं दुष्काळी भागांतील पीक नव्हें, कीं ज्याला संरक्षण देणें, वाजवी वा जरूर आहे. कनालच्या वशागत क्षेत्राच्या १/१० हिश्शावर कनालमधील ७५ टक्के पाणी देण्यानें दुष्काळी भागांतील पिकांचें संरक्षण होतें असें कोणीही मानणार नाहीं. सर्व प्रकल्पांतील मिळून फक्त २० टक्के पाणीच धान्य पिकांस जातें. याच्या उलट स्थिति असती म्हणजे ८० टक्के पाणी दुष्काळी प्रांतांतील धान्य पिकांना व २० टक्के द्रव्योत्पादक पिकांना, तरी उद्देश सफल झाला असें म्हणतां आलें असतें. उपमाच द्यावयाची झाल्यास अशी देतां येईल.

गोर–गरीबांना अन्न–दान करावें ह्या उद्देशानें गांवांत वर्गणीनें पैसे जमविले; पण त्यापैकीं शेंकडा ८० टक्के खर्च श्रीखंड, बासुंदी व लाडू यावर करून ती आग्रह करकरून वाढली आप्तेष्टांस व श्रीमंत नागरिकांस; त्यांनीं टाकलेले पानांवरील खरकटें बाहेरील भिकाऱ्यांस दिलें. अशा रीतीनें गरीबांस अन्न–दान केल्याचें समाधान मानणें वरील क्षेत्रपायनिक प्रकल्पाइतकेंच स्तुत्य ठरेल व दुष्काळी भागांस संरक्षण दिलें म्हणणें तितकेंच सत्य ठरेल.

दुसरी उपमा अशी देतां येईल.

धर्मशाळा बांधण्याकरतां फंड काढला व त्या पैशानें बांधला मुंबईच्या मलबार हिलवरील इमारतीच्या थाटाचा राजवाडा. त्यांत उतरूं द्यावयाचें लक्षाधिशांना; गरीब वाटसरूंना आंत मज्जाव; पण त्यांतल्या कांहींनाच या इमारतीच्या सावलींत बसावयास

परवानगी! धर्मशाळेस भाडें माफ किंवा फार कमी ठेवावयाचें, कारण ती गरिबांकरतां बांधली हें; व तिची डागडुजी करण्याकरतां पुन्हां गांवकऱ्यांकडून फंड! त्यांतलाच वरील प्रकार नव्हे काय?

उद्देश क्र. २:—

आपल्या तुटीच्या प्रांतांत ( मुख्यतः दुष्काळी जिल्ह्यामध्यें ) धान्यवाढ करणें :

वस्तुस्थिती अशी आहे कीं, आपला प्रांत धान्याच्या बाबतींत तुटीचा आहे, म्हणजेच जोंधळा-बाजरी आपल्या प्रांतांत भरपूर होत नाहीं, ही समजूतच चुकीची आहे. ह्या बाबतींत "नृसिंह" यांनीं लिहिलेला 'सह्याद्री सप्टेंबर १९४९' अंकांतील 'हिंदुस्थानांतील धान्य परिस्थिती : मुंबई प्रांतानें काय केलें पाहिजे' हा लेख वाचकांनीं अवश्य वाचावा.

सरकारी आंकड्यांवरून बघतां मुंबई प्रांतांतील धान्यनिपज प्रतिदिन प्रतियुवक १८ ते २० औंस धान्य मिळावें इतकी आहे. पण जुने आंकडे फारच अंदाजी, अर्थात चुकीचे असा प्रवाद होता. अलीकडे मुंबई सरकारनें हिंदुस्थान सरकारच्या तज्ञ अधिकाऱ्यांच्या देखरेखीखालीं अगदीं पूर्ण शास्त्रीय पद्धतीनें धान्याची मोजदाद ४-५ वर्षे केली व त्याबाबत अहवाल नुकताच प्रसिद्ध केला आहे. त्यावरूनही वरील गोष्ट म्हणजे " प्रांतांतील धान्य प्रतिदिन प्रतियुवक १८ ते २० औंस देण्यास पुरेसें आहे" हेंच सिद्ध होतें.

वरील "नृसिंह" यांच्या लेखांत असेंही दाखविण्यांत आलें आहे कीं, ज्यास आपण "दुष्काळी जिल्हा" म्हणतो तेथील ज्वारीसारख्या धान्याचें उत्पादन तर प्रतिदिन प्रतियुवक एक शेरा ( २ पौंड ) इतकें आहे! अशा जादा धान्याच्या प्रदेशांत आणखी धान्य ( मुख्यतः ज्वारी ) वाढविणें हा उद्देशच मुळीं चुकीचा नव्हे काय?

परंतु तो उद्देश बरोबर आहे असें घटकाभर धरल्यास तो तरी साध्य होतो कां? कनालच्या पाण्यापैकीं ८० टक्के पाणी धान्याला मिळत असतें तर तो उद्देश साध्य झाला असें म्हणतां आलें असतें. पण बरोबर त्याच्या उलट स्थिती आहे, हें आपण वर पाहिलेंच आहे.

शिवाय त्यांतही गोम अशी कीं, मोठमोठ्या कनालांच्या शेवटचा जो अगदी दुष्काळी भाग तेथील धान्यपिकांस पाणी जवळजवळ मिळतच नाहीं. ७५ टक्के पाणी उसास जाऊन राहिलेल्या २५ टक्क्यांपैकीं १० ते १५ टक्के या उसाच्या क्षेत्रांतील धान्य व धान्येतर पिकांस जातें; व खुद्द दुष्काळी भागांतील क्षेत्रापैकीं ५ टक्के क्षेत्रासमुद्धां धान्योत्पत्तीस पाणी मिळत नाहीं.

मुंबई प्रांतांत बाहेरून धान्य येतें वार्षिक ८ लाख टन; तर सर्व सरकारी कनाल मिळून जादा धान्योत्पत्ति होते सुमारे ७० हजार टनच! त्यामधून धान्यवसुली होत असणार १५ ते २० टक्केच म्हणजे १०-१२ हजार टन! ( नक्की आंकडा माहीत नाहीं ). अर्थात यांत ८ लाख टन तुटीच्या मानानें १०-२० हजार टन कांहींच नाहीं. डोंगर पोखरून उंदीर काढल्याची जी दंतकथा आपण ऐकतो ती वरील उदाहरणापुढें फिकी पडेल!!

उद्देश क्रमांक ३:—

गूळ, साखर, कपास वगैरे द्रव्योत्पादक पण आवश्यक वस्तूंचे उत्पादनास मदत करणें :

मुंबई प्रांतांत उत्पन्न होणारी ९० टक्के साखर सरकारी कनालच्या पाण्यावर होण्याऱ्या उसावरच होते. मुंबई प्रांतांत होणाऱ्या गुळापैकीं शेंकडा फक्त २५ टक्के गूळ कनालवरील पाणी वापरून होतो. बाकीचा विहिरी वगैरे अन्य साधनांच्या पाण्यावर होतो. थोडी फार कपास, मिरची, हळद वगैरेही कनालचे पाण्यावर होते; परंतु बहुतेक कनालबाहेर होते.

ह्या परिस्थितीची बरोबर कल्पना येण्यास तालिका २ मध्यें दिलेल्या आकड्यांचा उपयोग होईल.

तालिका २ मधील आकड्यांवरून खालील गोष्टी दिसून येतील.

( १ ) सरकारी कालव्यांतील पाण्याचा ४० टक्के भाग साखर कारखान्यांच्या उसास जातो. प्रांतांत उत्पन्न होणारी ९० टक्के साखर त्यावरच होते.

( २ ) प्रांतांत उत्पन्न होणाऱ्या गुळापैकीं सुमारे २५ टक्केच सरकारी कनालच्या पाण्यावर होतो, तर त्याच्या तिप्पट खाजगी क्षेत्रपायनाच्या साधनांनीं ( मुख्यतः विहिरीच्या पाण्यावर ) होतो.

( ३ ) सरकारी कनालच्या पाण्यावर होणाऱ्या धान्य पिकांचें उत्पादन सर्व प्रांताच्या उत्पादनाच्या मानानें अत्यल्प म्हणजे सुमारे ३ टक्केच आहे. खाजगी मालकीच्या साधनांवर ( उदा. विहिरी वगैरे ) वर हें उत्पादन कनालच्या २३ पट म्हणजे प्रांताच्या उत्पादनाच्या ८ टक्के आहे. बाकी सुमारे ९० टक्के धान्य कोरडवाहू शेतींतूनच निर्माण होतें.

सारांश, सालोसाल २० ते ३०* लाखाचा तोटा सोसून चालविलेले कालवे यांचा उपयोग काय, तर सालोसाल १० ते २० (वा जास्ती) टक्के फायदा मिळविणाऱ्या साखर, गूळ कारखान्यांना स्वस्तांत पाणी!!

विहिरींवर ऊंस करणाऱ्यांना उसाच्या एकरामागें पाणी उपसण्यास दरवर्षी ३०० ते ४०० रु. खर्च येतो, तर बुडीत खर्चांत चाललेल्या कालव्याच्या पाण्यावर साखर व गूळ करणाऱ्या बागाइतदारांना एकरी ५० रु. ला पाणी देण्यांत येतें. बरें, इतकें करून गूळ स्वस्त मिळतो म्हणावा तर तो १॥ रु.† शेर!! म्हणजे साखरेच्या उघड दराच्या जवळ जवळ दुप्पट!! व काळ्या बाजारांत साखर ३ रु. शेर!!

उद्देश क्रमांक (४)

दुष्काळी कामें म्हणून, अर्थात् दुष्काळपीडित क्षेत्रांतील लोकांना काम पुरवून त्यांना इतर ठिकाणांहून अन्न-वस्त्र आणून दुष्काळी वर्षांत पोसण्याकरतां :

कांहीं क्षेत्रपायनिक आकल्पांचीं कामें हातीं घेतल्यानें हा उद्देश साध्य झाला हें खरें; पण अशीं उदाहरणें लहान तलावांचींच व थोडीं; बहुतेक व त्यांतल्यात्यांत मोठीं कामें कंत्राटानें देऊन वा योग्य वेतनावर घट्टीकट्टी माणसें व कारागीर लावूनच केलीं गेलीं.

पहिल्या प्रकारचीं म्हणजे ज्यांचीं दुष्काळ पीडितांना मदत झाली अशीं उदाहरणें म्हणजे साताऱ्यांतील पिंगळी नेहर वगैरे छोटे तलाव; येथील निम्मीं-शिम्मीं कामें दुष्काळग्रस्त लोकांकडून करून घेतलीं व उरलेलें काम नेहमींप्रमाणें कंत्राटानें वगैरे पुरें केलें.

या उलट भाटघर धरण, नीरेचा उजवा कालवा, किंवा सध्यां चालूं असलेलें गंगापूर धरण ( नाशिक ) व घटप्रभेचा डावा कालवा यांसारखीं मोठ्या किंमतींचीं कामें कंत्राटानें किंवा मजूर व कारागीर

*मागील २५-३० वर्षांतील सरासरीचा हा आंकडा आहे.

† हा लेख छापित असतांच, गुळाच्या भावाचे नियंत्रणाचा हुकूम सुटून सर्व गूळ भूमिगत झाला आहे. पुढें जरी तो गूळ २१ रु. मण मिळाला तरी विहिरी व कनाल यांवरील दर सारखाच रहाणार व चांगला गूळ काळ्या बाजारांत १॥ रु. शेर दरानें मिळणार हें पूर्वानुभवावरून दिसतच आहे.

रोजंदारीवर वा मासिक वेतनावर लावूनच करून घेतली व सध्यां घेत आहेत.

लक्षांत ठेवण्याची गोष्ट म्हणजे एकंदर ११ कोटी रुपयांपैकीं, दुष्काळी काम म्हणून ५ टक्के सुद्धां उपयोगांत आली नसावींत. अर्थात् हा कांहीं प्रमुख उद्देश नव्हे व तो साध्य झाला असें मानणेंही चूक ठरेल.

उद्देश क्रमांक (५):—एकंदरींत शेतकऱ्यास मदत म्हणून : मुंबई इलाख्यांत एकंदर शेतीखालील (लागवड जिच्यांत होते अशी) जमीन २९३ लक्ष एकर. त्यांतील नवीन (ब्रिटिश अमदानींत केलेल्या) कालव्यानीं भिजते सुमारें ३ लाख एकर; म्हणजे एकंदर लागवडीखालील क्षेत्राच्या मानानें शेंकडा १ टक्का.

त्या मानानें पाहतां खाजगी भांडवलानें विहिरी, तळीं, वगैरे बांधून, २½ ते ३ टक्के जमीन भिजते. तेव्हां सरकारी कालव्यांनीं सर्वसाधारण शेतकरी वर्गास मदत होते म्हणणें चूक. बरें, साखर व गूळ कारखान्यावर जे लोक पोट भरतात त्यांची संख्याही एकंदर जनतेच्या मानानें अत्यल्प!

उद्देश क्रमांक (६):— सरकारी उत्पन्नांत भर पडावी म्हणून:—

हा उद्देश उलट्या अर्थानेंच साधला आहे!!! उत्पन्नांत भर पडण्याऐवजीं जनतेनें (यांत जमीन नसणारा कामकरी वर्ग व कारकुनी वर्ग यांचा समावेश होतो.) दरसाल २० ते ३० लाख तोटा आजवर सोसला. मूळ सुमारें ११ कोटी भांडवल व त्यावर साठत गेलेल्या वार्षिक तोट्याची बेरीज जवळ जवळ १० कोटी इतका तोटा २ कोटी लोकसंख्येनें सोसला. या जुन्या २१ कोट रुपयांची आजच्या रुपयांत किंमत ५० कोटी रुपये तरी होईल!!

(४) थोडी नवीन माहिती:—या प्रकारें सालोसाल फायदा तर दूरच राहिला, पण २०–३० लाख रुपये तोटा दर वर्षी उत्पन्नांतून भरावा लागतो, ही गोष्ट सरकारच्या नजरेस आज अनेक वर्षे आली. पूर्वीच्या सरकारनें कर वाढविल्यास आपणावर टीका होते म्हणून पाण्याच्या दरांत वाढ करण्याचें टाळलें. आतांच्या सरकारनें निदान तोटा येऊं नये या उद्देशानें एक नवीन बिल कायदेमंडळापुढें आणलें असून तें अजून मंजूर व्हावयाचें आहे. मध्यंतरीं 'पाण्याचे दरांत पुढील सालापासून शेंकडा ३३⅓ व त्यापुढील सालापासून शेंकडा ५० वाढ करण्यांत येणार आहे. म्हणजे ब्लॉकांतील उसास (Cane in Blocks) एकरीं दरसाल ९० रु. पाणीपट्टी बसेल. १९३४–३९ सालीं हा दर ४५ रुपये होता.

आतांच्या रुपयाच्या भाषेंत लढाई पूर्वीच्या रुपयाची किंमत ३ ते ४ रु. भरते व सर्व वस्तूंचे दरही लढाई पूर्वीच्या मानानें तिप्पट ते चौपट झाले आहेत. त्या मानानें पाण्याचा दर फक्त दुप्पटच केला आहे (व तोही २ वर्षानंतर) हें लक्षांत घरण्यासारखें आहे.

शिवाय "यापुढें व्हावयाच्या" कालव्याखालील जमिनीवर "सुधारपट्टी" व "पायनकर" (Betterment Levy and Irrigation Cess) बसविण्याची तरतूद बिलांत आहे. तें बिल अद्याप मंजूर झालें नसल्यामुळें त्यावर आतांच मत देणें बरोबर नव्हे.

(५) उपसंहार:—

सर्व दृष्टीनें विचार करतां सरकारी खर्चानें केलेल्या क्षेत्रपायन आकल्पांबाबत सर्व प्रकारच्या समाजामध्यें (सुशिक्षित, अर्धशिक्षित वा अशिक्षित) मोठी गैरसमजूत किंवा अज्ञान आढळून येतें.

(१) बहुतेकांची समजूत कालव्यावर दरसाल पुष्कळच फायदा होतो.

(२) तोटा येत असलाच तर त्यावर होणाऱ्या धान्योत्पत्तीच्य दृष्टीनें अखिल जनतेनें तो सोसावा इतका थोडा असणार अशी समजूत. अर्थात् कनालवर धान्य होतें प्रांतांतील एकंदर उत्पादनाच्या ३ टक्केच, हें कोणाच्याच लक्षांत येत नाहीं!!

(३) प्रांतांतील एकंदर लागवडी खालील जमिनीपैकीं सुमारें १ टक्का जमिनीलाच, ब्रिटिश अंमदानींत केलेल्या सरकारी कालव्याचा फायदा मिळतो ही गोष्ट फारच थोड्यांना माहिती आहे.

(४) या एक टक्का जमिनीकरतां बांधलेल्या कालव्याच्या स्वस्त पाण्याचा फायदा मिळतो मुख्यतः ४५,००० एकर ऊसवाल्यांना, म्हणजे प्रांतातील एकंदर जमिनीपैकीं १/६० इतक्या जमिनीला.

(५) आजपर्यंतचा मूळ खर्च व वार्षिक तूट मिळून सरकारी क्षेत्रपायन प्रकल्पांवरील बेरीज होते सुमारें २० कोटी रुपये. आजच्या रुपयाच्या भाषेंत त्याची किंमत सुमारे ५० कोटी रुपये भरेल.

(६) दोन वर्षांनीं अंमलांत येणारे वाढविलेले उसाच्या पाण्याचे दर लढाई पूर्वीच्या मानानें दुप्पट होतील पण हल्लींच्या रुपयाच्या मानानें लढाई पूर्वीच्या रुपयाची किंमत आहे निदान ३! म्हणजेच, दोन वर्षांनीं होणारे दर, लढाई पूर्वीच्या दरापेक्षा कमीच!

(७) कनालवरील साखर व गूळ कारखानदार व बागाइतदार यांचा एकंदर ऊंस ४५,००० एकर, तर विहिरीवर होतो ६०,००० ते ७०,००० एकर. विहिरीवर उसास पाणी देण्यास खर्च येतो दर एकरीं ३०० ते ४०० रुपये तर कनालवरील वाढलेला पाण्याचा दर फक्त ९० रुपये.

(८) सरकारी कनालखालीं ज्यांच्या जमिनी भिजतात त्यांना निवळ स्वस्तांत पाणी मिळाल्यामुळें कनालवर ऊस बागाईत करणाऱ्या दर कुटुंबामागें दरसाल ३०० ते ५,००० रु. मदत होते. कनाल वरील वार्षिक तूट भरून काढण्याकरतां सर्व प्रांतांतील ३४ लक्ष कुटुंबांना प्रत्येकीं वार्षिक २½ रुपये यावे लागतात.

प्रांतांतील अखिल जनतेच्या दृष्टीनें बघतां ¼ टक्के लोकांना भरपूर फायदा होण्याकरतां बाकीच्या ९९¾ टक्के लोकांनीं ही झीज सोसणें योग्य कां अयोग्य व ती थांबवून अखिल जनतेचा फायदा होण्यास काय करावें याचा विचार पुन्हां केव्हां तरी करतां येईल. येथें एवढेंच सांगितलें म्हणजे पुरें कीं साखर-गूळ कारखानदारांना जर १० ते २० टक्के फायदा मिळतो तर तो धंदा ज्या कालव्यांच्या जिवावर चालतो त्यावर खर्च झालेल्या सार्वजनिक भांडवलावर म्हणजे २० कोटींवर १० टक्के (किंवा या पुढें ज्या त्या वर्षी साखर—गूळ कंपन्यांना जितका फायदा पडेल तितका) तरी निव्वळ उत्पन्न जनतेला मिळावें व मागील तोटा भरून निघावा अशी अपेक्षा केल्यास ती योग्यच होईल; व तसें करण्यास लागणारी पाणीपट्टीची वाढ करणें योग्य नव्हे, जरूर ठरेल. मात्र ही चर्चा सरकारनें नवीनच आणलेलें Irrigation Act Amendment Bill विधिमंडळांत कोणत्या रूपांत मंजूर होते, तें पाहून मगच केलेली बरी.

## तालिका क्रमांक १.

| मुंबई प्रांतांतील जमिनीचे क्षेत्र | | लक्ष एकर | शेंकडेवार–प्रमाण: एकंदर क्षेत्रावर ¶ | शेंकडेवार–प्रमाण: पिकाखालील क्षेत्रावर † | शेंकडेवार–प्रमाण: सर्व प्रांतांतील पायनित (Irrigated) क्षेत्रावर |
|---|---|---|---|---|---|
| एकंदर क्षेत्र. ¶ | | ४८७ | १०० | | |
| शेतीस योग्य क्षेत्र. | | ३४५ | ७२ | | |
| पिकाखालील क्षेत्र † | | २९४ | ६० | १०० | |
| पायनित (Irrigated) क्षेत्र. | | १२.२ | २.५ | ४.२ | |
| प्रांतांतील पायनित (Irrigated) क्षेत्राचा फोड. | | | | | |
| सरकारी : | नवीन | २.३ | ... | ३/४ | १९ } १०० |
| .............. | | | | | |
| खाजगी : | जुनीं.* | २.२ | ... | ३/४ | १८ } ८१ } १०० |
| | विहिरी. | ९.८ { ७.३ | ... | } २.५ | ६० } ८१ |
| | इतर. | ०.३ | ... | | ३ |

* Irrigation Inquiry Committee नें हीं कामें सरकारी या शीर्षकांत दाखविलीं आहेत, त्याचें कारण त्यांची डागडुजी सध्यां सरकार करतें, हेंच आहे. तीं ३०० वर्षांपूर्वी बांधली तीं सरकारी खर्चानें नव्हे; ज्या त्या गांवच्या लोकांनीं वर्गणी जमवून वा श्रमविभागणी करून तीं बांधलीं, असें माहितगार इसम सांगतात.

सारांश, Irrigation Inquiry Committee च्या १९३८ सालच्या अहवालांत तीं "सरकारी" म्हणून दाखविली याचा अर्थ त्यांच्या बांधण्याचा खर्च प्रांतातील सर्व जनतेच्या पैशानें झाला असें नव्हे.

## तालिका क्रमांक २.

सरकारी कालव्यांचा मुख्य उपयोग कोणत्या पिकांस होतो व त्या पिकांचे प्रांतांतील एकंदर उत्पन्नाशीं प्रमाण दाखविणारा तक्ता.

| वस्तूचें नांव | प्रांतांतील एकंदर उत्पन्नाचे मानानें क्षेत्र-पायनावर होणाऱ्या पिकांचें उत्पादन: एकूण पायनिक टक्के | खाजगी विहिरी वगैरे टक्के | सरकारी कालवे वगैरे टक्के | सरकारी कालव्यांतील पाण्यापैकीं किती पाणी या प्रकारच्या पिकास जाते टक्के | टीप |
|---|---|---|---|---|---|
| साखर | १०० | १० | ९० | ४० | |
| गूळ | ९९ | ७४ | २५ | ३५ | |
| धान्येतर पिकें. उदा: कपास, हळद | ३ | ३ | * | * { | *अलिकडील १० वर्षांत या व असल्या धान्येतर पिकांना कनालचें पाणी देत नसतः किंवा त्याचें क्षेत्र तरी कमी केलें होतें म्हणून हा आकडा दिला नाहीं. |
| डाळी वगैरे धान्य पिकें | ११ | ८ | ३ | ३<br>२० | |
| | | | | एकूण १०० | |

## तालिका क्रमांक ३

मुंबई प्रांतांतील निरनिराळ्या प्रकारच्या क्षेत्रपायनिक (सरकारचे ताब्यांतील) प्रकल्पांसंबंधीं कांहीं ठळक माहिती.

| प्रकल्पाचा प्रकार | प्रत्येक प्रकाराखालील एकूण क्षेत्र | | | | प्रकल्पावरील खर्च | | प्रकल्पावरील वार्षिक तूट (व्याजासुद्धां), आजवरची बेरीज (अंदाजी) | खर्चवेच वजा जातां पण व्याज न आकारतां वार्षिक उत्पन्न | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | लागवडीस योग्य व वशागत क्षेत्र | पायनित क्षेत्र | | | मूळच्या दरानें | आजच्या दरानें | | १९३८ | १९४७ |
| | | ऊस वगैरे | इतर | एकूण | | | | | |
| | लक्ष एकर | लक्ष एकर | लक्ष एकर | लक्ष एकर | लक्ष रु. | लक्ष रु. | लक्ष रु. | लक्ष रु. | लक्ष रु. |
| **ज्यांच्या निर्मितीचा सर्व खर्च सरकारनें केला (व दुरुस्तीही सरकारच करते) असे प्रकल्प. (प्रथम श्रेणी)** | | | | | | | | | |
| प्रथम-श्रेणींतील मोठीं First Class Major (संख्या ६) | १२.८ | ०.४३ | २.३ | २.७ | ९०० | ३,७०० | ८०० | ११ | ३५ |
| प्रथम-श्रेणींतलि छोटीं First Class Minor (संख्या १७) | ४.२ | †०.०४ | ०.५ | ०.५४ | १५० | ७०० | २५० | २ | ४ |
| **ज्यांचा मूळ खर्च गांवकऱ्यांनीं वा व्यक्तिसमूहांनीं केला, पण ज्यांची दुरुस्ती सरकार करते असे प्रकल्प. (द्वितीय श्रेणी)** | | | | | | | | | |
| द्वितीय-श्रेणी* Second Class संख्या. बंधारे. ४७५, तळीं ११,२२५, एकूण ११,७०० अंदाजी | ३ | | | २.८० | *६ | ८० | | २ | |
| छोटे बंधारे | **अनामिक-श्रेणी** जुन्या पण वापरांत असणाऱ्या मातीच्या बंधाऱ्यांचे जागीं दगडी बंधारे बांधण्याचीं हीं कामें अलीकडे हातीं घेतलीं आहेत. त्यांवर भिजणारें व मूळचें क्षेत्र, बंधारा दगडी बांधल्यामुळें भिजणारें जादा क्षेत्र व वरील बंधारा पक्का केल्यामुळें त्याच नाल्यावरील खालील बाजूच्या बंधाऱ्यावर कमी पडणारें पायनित क्षेत्र, वगैरे आकडे तसेंच त्यांवर झालेला खर्च वगैरे आकडे उपलब्ध नाहींत. परंतु प्रथम वा द्वितीय श्रेणींतल्या कामांच्या मानानें दोन्हीं अत्यल्प आहेत. | | | | | | | | |

* हे दगडी चुनेगच्चीचे बंधारे (व तळीं) १०० ते ७०० वर्षांपूर्वी बांधले. पण ते सरकारी खर्चानें बांधले नसून लोकांनीं स्वतःच्या खर्चानें बांधले. त्यावर होणाऱ्या पिकांस बागाइत आकार देण्याच्या अटीवर नद्या-नाल्यांचें पाणी वापरण्यास परवानगी दिली.

† या प्रकारच्या कनालवरील उसाला पाणी वर्षभर मिळत नाहीं. पण तळ्यांत असेतोंपर्यंत देण्यांत येतें. उन्हाळ्यांत हीं छोटीं तळीं बहुतेक कोरडीं पडतात.

## तालिका क्रमांक ४.

सरकारी खर्चानें ब्रिटिश अमदानींत कालवे बांधले, त्यामुळें फायदा कोणाचा व किती झाला व तोटा कोणी व किती सोसला हें दाखविणारी तालिका.

| क्रम-संख्या | सार्वजनिक पैशानीं सरकारी कालवे बांधल्यानें फायदा वा तोटा सोसणाऱ्या समाजांतील समूहाचें (गटाचें) नांव व वर्णन. | ज्या त्या गटाची मालकीची जमीन (लागवडी-खालील) एकर. | ज्या त्या गटाची लोक-संख्या | ज्या त्या गटांतील कुटुंबें | तोट्याची बाजू: क्षेत्रपायन प्रकल्पांवर झालेला व होणारा सार्वजनिक खर्च — मूळ कर्ज | आजवर झालेला तोटा | वार्षिक तोटा | नफ्याची बाजू: पाणी विहिरींतून उपसण्याऐवजीं कनालमधून मिळाल्यामुळें वार्षिक फायदा | | ज्या त्या गटास होणारा वार्षिक फायदा वा तोटा | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | रुपये | एकूण रुपये | रुपये | रुपये | रुपये | रुपये | |
| | **तोटा सोसणारे** | | | | | | | | | | |
| | | | | | दर | प्रांतांतील कुटुंबामागें | तोटा | | | | |
| १ | ज्यांच्या नांवावर कर्ज उभारून अथवा ज्यांच्याकडून मिळालेल्या करांतून ब्रिटिश अमलांत सरकारी कालवे बांधले ती मुंबई प्रांतांतील प्रजा. | | २,००,००,००० | ३४,००,००० | ३३ | ३० | †१ | | | तोटा ७५,००,००० | |
| | जमीन-मालक तसेंच जमीन नसलेली | २,९४,००,००० / ००,००० | | | | | *१·२० / २·२० | | | | |
| २ | सरकारी कनालच्या वशागत क्षेत्राचे मालक वा कसणारे. | १७,००,००० | १५,००,००० | २,५०,००० | | | | | | | |
| | **फायदा मिळविणारे** | पायनित क्षेत्र (Irrigated areas) | | | | | | (३) अ,ब,क, | ड पहा. | | |
| | | | | | | | | दर गटास वार्षिक एकंदर फायदा | गटांतील दर कुटुंबास वार्षिक फायदा | | |
| ३ | सरकारी कालव्यांच्या वशागत क्षेत्रापैकीं ज्यांना प्रत्यक्ष पाणी मंजूर होतें त्यांचा गट: याची फोड खालील-प्रमाणें:— | ३,००,००० | ४,८०,००० | ८०,००० | | | | | | | |
| | (अ) ज्यांना फक्त धान्य पिकांना पाणी मिळतें अशांचा गट. | २,६०,००० | ४,२०,००० | ७०,००० | | | | ३०,००,००० | ४० | फायदा १,३०,००,००० | |
| | (ब) सरासरी १ एकर उसाचे बागाइतदार. | १०,००० | ६०,००० | १०,००० | | | | २५,००,००० | २५० | | |
| | (क) उसाचें जास्ती क्षेत्र असणारे बागाइतदार. | १०,००० | ३,००० | १००० | | | | २५,००,००० | २५,०० | | |
| | (ड) सरासरी प्रत्येकीं २,००० एकर उसापासून साखर व गूळ करणारे कारखाने. | २०,००० | | १० | | | | ५०,००,००० | ५,००,००० | | † प्रत्यक्ष तोटा. * अप्रत्यक्ष तोटा:—३० रुपये रकमेवरील ४ रु. शेकड्याप्रमाणें व्याज. |

टीप:—(१) प्रत्येक गटाच्या जमिनीचें क्षेत्र, लोकसंख्या, कुटुंबसंख्या वगैरे आकडे थोडेफार अंदाजी व म्हणून निरग्र (Rounded) दिले आहेत. तसेंच आजवरच्या तोट्याची बेरीजही अंदाजी व निरग्र आहे. मुख्य मुद्दा योग्य रीतीनें मांडण्यास व परिस्थितीची खरी जाणीव देण्यापुरते ते आंकडे बरोबर आहेत. अलीकडे बरेच वर्षांत सरकारनें काटकसरीमुळें वार्षिक अहवाल प्रसिद्ध न केल्यामुळें पूर्वीच्या अहवालावरून अप्रत्यक्ष रीतीनें ते आकडे काढावे लागले.

(२) विहिरींतून मोटेनें वा पंपानें पाणी काढून उसास दिल्यास दर एकरीं ३०० रु. चे वर तरी खर्च येईल. त्यांतून ओव्हाळ्यापुरसह ५० ते ६० रु. कॅनालची पाणीपट्टी सोडल्यास एकरीं २५० रुपये उसवाल्याचे वाचतात. म्हणजे कनाल नसता तर त्यास एकरीं निदान २५० रुपये जादा पडले असते. या हिशोबानें "नफ्याची बाजू" या स्तंभांतील आंकडे काढले आहेत.

# लिमिटेड कंपनीचें विसर्जन

[ श्री. सदाशिव वामन दातार, बी. एससी., एलएल. बी. ]

मर्यादित जबाबदारीच्या कंपन्यांचें विसर्जन ( Liquidation ) हें कांहीं साधें व सोपें काम नाहीं. त्यामुळें कित्येक वेळा कंपनीचा कारभार गुंडाळून ( Windiug up ) तिचें विसर्जन सर्व दृष्टींनीं अगत्याचें असूनहि तें कसें घडवून आणावें असा मोठा प्रश्न उत्पन्न होतो. कंपन्यांचें विसर्जन तीन प्रकारांनीं होऊं शकतें:— ( १ ) कोर्टाकडून, ( २ ) स्वखुषीनें व ( ३ ) कोर्टाच्या देखरेखीखालीं. ह्या तीनहि प्रकारांच्या विसर्जनपद्धतींचीं विशिष्ट तंत्रें आहेत व त्यांचें थोडक्यांत दिग्दर्शन ह्या ठिकाणीं करण्याचा विचार आहे.

**( १ ) कोर्टाकडून विसर्जन**—कोर्टाकडन कंपनीचें विसर्जन घडवून आणावयाचें तर तें खालील परिस्थितींत शक्य असतें. ( १ ) कोर्टाकडून कंपनीचा कारभार गुंडाळला जावा असा खास ठराव ( स्पेशल रेझोल्यूशन ) करून कंपनीनें ठरविलें असल तर. ( २ ) कंपनी कायद्यानें आज्ञापिलेला अहवाल ( स्टॅटच्युटरी रिपोर्ट ) दाखल करण्यांत किंवा आज्ञापित सभा ( स्टॅटयुटरी मिटिंग ) भरविण्यांत कसूर झाली असेल तर. ( ३ ) कंपनी नोंदविल्यापासून एका वर्षाच्या आंत तिनें आपला उद्योगधंदा सुरू न केला तर अथवा एक पूर्ण वर्षभर कंपनीनें आपला धंदा–उद्योग तहकूब ठेवला तर. ( ४ ) कंपनीच्या भागदारांची संख्या खाजगी कंपन्यांचे बाबत दोनपेक्षां आणि सार्वजनिक कंपन्यांचे बाबत सातपेक्षां कमी झाली तर. ( ५ ) कंपनी आपलीं देणीं देण्यास असमर्थ ठरली तर. ( ६ ) कंपनीचा कारभार गुंडाळणें न्यायाचें व हिताचें ( इक्विटेबल ) आहे असें कोर्टाचें मत झालें तर.

**अर्ज करण्याचा अधिकार**—कोर्टाकडून कंपनीचें विसर्जन व्हावयाचें तर त्यासाठीं कोर्टाकडे कोणीतरी अर्ज दाखल करावा लागतो. असा अर्ज रजिस्ट्रार किंवा कंपनी; किंवा तिचे विद्यमान अथवा संभाव्य सावकार; किंवा ज्यांचेवर विशिष्ट मर्यादेपर्यंत कंपनीस भांडवल पुरविण्याची जबाबदारी असते ते भागिदार–भरपाईदार ( कॉन्ट्रिब्यूटरी ) ह्यांना व्यक्तिश: स्वत: किंवा ह्यांच्यापैकीं कांहींनीं मिळून करण्याची परवानगी असते; परंतु त्याबाबतहि स्पष्ट निर्बंध कायद्यानें घातलेले आहेत. ( अ ) भागदार–भरपाईदार ह्यांना ( १ ) कंपनीच्या भागदारांची संख्या कायद्यानें ठरवून दिलेल्या किमान मर्यादेपेक्षां कमी झाली तरच व ( २ ) कंपनीचा कारभार गुंडाळण्यास सुरवात होण्यापूर्वीच्या अठरा महिन्यांपैकीं निदान सहा महिने तरी त्यांना कंपनीचे भाग ( शेअर्स ) मंजूर करून दिलेले असले तर अथवा त्यांच्या नांवावर नोंदलेले असले तर अथवा वारशानें त्यांना मिळालेले असले तरच कंपनीचे विसर्जनाबद्दलचा अर्ज कोर्टाकडे करण्याचा अधिकार आहे; एरवी नाहीं. ( आ ) रजिस्ट्रार ऑफ कंपनीज ह्यांना कंपनी विसर्जनासाठीं अर्ज देतां येतो तो कंपनीच्या ताळेबंदावरून अथवा कंपनी कायद्याखालीं नेमलेल्या हिशेब तपासणीदारानें पाठविलेल्या अहवालवरून कंपनीची आर्थिक स्थिति कंपनीच्या ठेवी यावयास असमर्थततेची दिसून आली तरच देतां येतो आणि तो सुद्धां आधीं मध्यवर्ती सरकारची संमति घेऊन मग द्यावा लागतो व मध्यवर्ती सरकार कंपनीची बाजू मांडण्यास कंपनीस सवड दिल्याशिवाय अशी संमति देऊं शकत नाहीं. ( ब ) स्टॅटच्युटरी रिपोर्ट दाखल करण्यांत किंवा स्टॅटच्युटरी मीटिंग भरविण्यांत कसूर केल्यावरून विसर्जनाचा अर्ज करण्याचा अधिकार फक्त कंपनीच्या भागदारासच आहे; परंतु सभा भरविण्यास असलेल्या मुदतीचा शेवटचा दिवस संपल्यानंतर चवदा दिवस उलटून गेल्याशिवाय भागदारास असा अर्ज देतां येत नाहीं आणि ( क ) कंपनीच्या सावकारानें दिलेला विसर्जनाचा अर्ज कोर्टाच्या खर्चासाठीं कोर्ट मागील त्या रकमेचा जामीन आधीं सावकारानें दिल्याशिवाय व प्रथमदर्शनीं पुरेशीं कारणें असल्याचें कोर्टास पटवून दिल्याशिवाय कोर्टानें विचारांतच घ्यावयाचा नसतो.

**( २ ) स्वखुषीनें विसर्जन**—कंपनीचें स्वखुषीचें विसर्जन दोन प्रकारचें असतें. पहिल्या प्रकारास ‘ भागदारांच्या खुषीचें विसर्जन ’ ( मेंबर्स व्हॉलंटरी वाइंडिंग–अप ) आणि दुसऱ्या प्रकारास ‘ सावकारांच्या खुषीनें विसर्जन ’ ( क्रेडिटर्स व्हॉलंटरी वाइंडिंग अप ) असें म्हणतात. स्वखुषीचें विसर्जन खालील परिस्थितींत होऊं शकते. ( १ ) कंपनीसाठीं जी कालमर्यादा घटने ( आर्टिकल्स ) मध्यें ठरवून घेतलेली असेल ती पूर्ण झाल्यावर अथवा ज्या कांहीं गोष्टींच्या पूर्ततेनंतर कंपनी विसर्जन करावयाची असें ठरविलेलें असेल तिची परिपूर्तता झाल्यानंतर कंपनीच्या आम सभे ( जनरल मीटिंग ) नें विसर्जनाचा साधारण ठराव केला तर. ( २ ) स्वखुषीनें विसर्जन करावें, असा खास ठराव कंपनीनें मंजूर केला तर. ( ३ ) देणीं थकल्यामुळें धंदा–उद्योग चालू ठेवणें कंपनीला शक्य नाहीं व म्हणून ती विसर्जन करणें योग्य आहे असा असाधारण ( एक्स्ट्रॉऑर्डिनरी ) ठराव कंपनीनें मंजूर केला तर. विसर्जनाचे हे ठराव मंजुरीपासून दहा दिवसांचे आंत सरकारी गॅझेटमध्यें व स्थानिक वृत्तपत्रांत जाहीर करावे लागतात.

**पतीचें जाहीर आश्वासन**— ( डिक्लेरेशन ऑफ सॉल्व्हन्सी ) कंपनीचें स्वखुषीनें विसर्जन व्हावयाचें तर विसर्जनाचा ठराव ज्या सभेंत मंजूर व्हावयाचा त्या सभेची नोटीस काढण्या-



# लिमिटेड कंपनीचें विसर्जन

[ श्री. सदाशिव वामन दातार, बी. एससी., एलएल. बी. ]

मर्यादित जबाबदारीच्या कंपन्यांचें विसर्जन ( Liquidation ) हें कांहीं साधें व सोपें काम नाहीं. त्यामुळें कित्येक वेळा कंपनीचा कारभार गुंडाळून ( Windiug up ) तिचें विसर्जन सर्व दृष्टींनीं अगत्याचें असूनहि तें कसें घडवून आणावें असा मोठा प्रश्न उत्पन्न होतो. कंपन्यांचें विसर्जन तीन प्रकारांनीं होऊं शकतें:— ( १ ) कोर्टाकडून, ( २ ) स्वखुषीनें व ( ३ ) कोर्टाच्या देखरेखीखालीं. ह्या तीनहि प्रकारांच्या विसर्जनपद्धतींचीं विशिष्ट तंत्रें आहेत व त्यांचें थोडक्यांत दिग्दर्शन ह्या ठिकाणीं करण्याचा विचार आहे.

( १ ) **कोर्टाकडून विसर्जन**—कोर्टाकडून कंपनीचें विसर्जन घडवून आणावयाचें तर तें खालील परिस्थितींत शक्य असतें. ( १ ) कोर्टाकडून कंपनीचा कारभार गुंडाळला जावा असा खास ठराव ( स्पेशल रेझोल्यूशन ) करून कंपनीनें ठरविलें असल तर. ( २ ) कंपनी कायद्यानें आज्ञापिलेला अहवाल ( स्टॅटच्युटरी रिपोर्ट ) दाखल करण्यांत किंवा आज्ञापित सभा ( स्टॅटच्युटरी मिटिंग ) भरविण्यांत कसूर झाली असेल तर. ( ३ ) कंपनी नोंदविल्यापासून एका वर्षाच्या आंत तिनें आपला उद्योगधंदा सुरू न केला तर अथवा एक पूर्ण वर्षभर कंपनीनें आपला धंदा–उद्योग तहकूब ठेवला तर. ( ४ ) कंपनीच्या भागदारांची संख्या खाजगी कंपन्यांचे बाबत दोनपेक्षां आणि सार्वजनिक कंपन्यांचे बाबत सातपेक्षां कमी झाली तर. ( ५ ) कंपनी आपलीं देणीं देण्यास असमर्थ ठरली तर. ( ६ ) कंपनीचा कारभार गुंडाळणें न्यायाचें व हिताचें ( इक्विटेबल ) आहे असें कोर्टाचें मत झालें तर.

**अर्ज करण्याचा अधिकार**—कोर्टाकडून कंपनीचें विसर्जन व्हावयाचें तर त्यासाठीं कोर्टाकडे कोणीतरी अर्ज दाखल करावा लागतो. असा अर्ज रजिस्ट्रार किंवा कंपनी; किंवा तिचे विद्यमान अथवा संभाव्य सावकार; किंवा ज्यांचेवर विशिष्ट मर्यादेपर्यंत कंपनीस भांडवल पुरविण्याची जबाबदारी असते ते भागिदार–भरपाईदार ( कॉन्ट्रिब्यूटरी ) ह्यांना व्यक्तिशः स्वतः किंवा ह्यांच्यापैकीं कांहींनीं मिळून करण्याची परवानगी असते; परंतु त्याबाबतहि स्पष्ट निर्बंध कायद्यानें घातलेले आहेत. ( अ ) भागदार–भरपाईदार ह्यांना ( १ ) कंपनीच्या भागदारांची संख्या कायद्यानें ठरवून दिलेल्या किमान मर्यादेपेक्षां कमी झाली तरच व ( २ ) कंपनीचा कारभार गुंडाळण्यास सुरवात होण्यापूर्वीच्या अठरा महिन्यांपैकीं निदान सहा महिने तरी त्यांना कंपनीचे भाग ( शेअर्स ) मंजूर करून दिलेले असले तर अथवा त्यांच्या नांवावर नोंदलेले असले तर अथवा वारशानें त्यांना मिळालेले असले तरच कंपनीचे विसर्जनाबद्दलचा अर्ज कोर्टाकडे करण्याचा अधिकार आहे; एरवी नाहीं. ( आ ) रजिस्ट्रार ऑफ कंपनीज ह्यांना कंपनी विसर्जनासाठीं अर्ज देतां येतो तो कंपनीच्या ताळेबंदावरून अथवा कंपनी कायद्याखालीं नेमलेल्या हिशेब तपासणीदारानें पाठविलेल्या अहवालवरून कंपनीची आर्थिक स्थिति कंपनीच्या ठेवी यावयास असमर्थततेची दिसून आली तरच देतां येतो आणि तो सुद्धां आधीं मध्यवर्ती सरकारची संमति घेऊन मग द्यावा लागतो व मध्यवर्ती सरकार कंपनीची बाजू मांडण्यास कंपनीस सवड दिल्याशिवाय अशी संमति देऊं शकत नाहीं. ( ब ) स्टॅटच्युटरी रिपोर्ट दाखल करण्यांत किंवा स्टॅटच्युटरी मीटिंग भरविण्यांत कसूर केल्यावरून विसर्जनाचा अर्ज करण्याचा अधिकार फक्त कंपनीच्या भागदारासच आहे; परंतु सभा भरविण्यास असलेल्या मुदतीचा शेवटचा दिवस संपल्यानंतर चवदा दिवस उलटून गेल्याशिवाय भागदारास असा अर्ज देतां येत नाहीं आणि ( क ) कंपनीच्या सावकारानें दिलेला विसर्जनाचा अर्ज कोर्टाच्या खर्चासाठीं कोर्ट मागील त्या रकमेचा जामीन आधीं सावकारानें दिल्याशिवाय व प्रथमदर्शनीं पुरेशीं कारणें असल्याचें कोर्टास पटवून दिल्याशिवाय कोर्टानें विचारांतच घ्यावयाचा नसतो.



( २ ) **स्वखुषीनें विसर्जन**—कंपनीचें स्वखुषीचें विसर्जन दोन प्रकारचें असतें. पहिल्या प्रकारास ' भागदारांच्या खुषीचें विसर्जन ' ( मेंबर्स व्हॉलंटरी वाइंडिंग–अप ) आणि दुसऱ्या प्रकारास ' सावकारांच्या खुषीनें विसर्जन ' ( क्रेडिटर्स व्हॉलंटरी वाइंडिंग अप ) असें म्हणतात. स्वखुषीचें विसर्जन खालील परिस्थितींत होऊं शकते. ( १ ) कंपनीसाठीं जी कालमर्यादा घटने ( आर्टिकल्स ) मध्यें ठरवून घेतलेली असेल ती पूर्ण झाल्यावर अथवा ज्या कांहीं गोष्टींच्या पूर्ततेनंतर कंपनी विसर्जन करावयाची असें ठरविलेलें असेल तिची परिपूर्तता झाल्यानंतर कंपनीच्या आम सभे ( जनरल मीटिंग ) नें विसर्जनाचा साधारण ठराव केला तर. ( २ ) स्वखुषीनें विसर्जन करावें, असा खास ठराव कंपनीनें मंजूर केला तर. ( ३ ) देणीं थकल्यामुळें धंदा–उद्योग चालू ठेवणें कंपनीला शक्य नाहीं व म्हणून ती विसर्जन करणें योग्य आहे असा असाधारण ( एक्स्ट्रॉऑर्डिनरी ) ठराव कंपनीनें मंजूर केला तर. विसर्जनाचे हे ठराव मंजुरीपासून दहा दिवसांचे आंत सरकारी गॅझेटमध्यें व स्थानिक वृत्तपत्रांत जाहीर करावे लागतात.

**पतीचें जाहीर आश्वासन**— ( डिक्लेरेशन ऑफ सॉल्व्हन्सी ) कंपनीचें स्वखुषीनें विसर्जन व्हावयाचें तर विसर्जनाचा ठराव ज्या सभेंत मंजूर व्हावयाचा त्या सभेची नोटीस काढण्या-




पूर्वी कंपनीच्या डायरेक्टरांनी, अथवा, दोनपेक्षां अधिक डॉयरेक्टर्स असतील तर बहुसंख्य डायरेक्टरांनीं सत्यप्रतिज्ञेवरील ( ॲफिडेव्हिट ) जबाबासह असें आश्वासन जाहीर करावें कीं त्यांनीं कंपनीच्या सर्व कारभाराची पूर्ण चौकशी केली असून तीवरून कंपनी आपलीं सर्व देणीं ३ वर्षांत पूर्णपणें देऊन टाकण्यास समर्थ होईल असें त्यांचें मत झालेलें आहे. या आश्वासनाच्या जोडीला कंपनीच्या ऑडिटरांचाहि अहवाल असला पाहिजे आणि हे सर्व कागदपत्र नोटिसीच्या तारखे-पूर्वी रजिस्ट्रार ऑफ कंपनीज यांचेकडे पाठविले गेले पाहिजेत.

ज्या स्वखुषीच्या विसर्जनाचे कामीं वरीलप्रमाणें पतीचें आश्वासन दाखल करण्यांत येतें त्यास 'भागादारांचें खुषीचें विसर्जन' असें म्हणतात व ज्यांत असें आश्वासन दिलेलें नसतें तें 'सावकारांचें खुषीचें विसर्जन' असें म्हणतात.

**सावकारांची सभा**—सावकारांच्या खुषीच्या विसर्जनासाठी कंपनीला सावकारांची सभा बोलवावी लागते. कंपनीच्या ज्या सभेमध्यें विसर्जनाचा ठराव मांडून मंजूर व्हावयाचा त्याच दिवशीं अथवा त्यानंतरच्या दुसऱ्या दिवशीं ही सभा भरवावयाची असून ह्या दोन्हीं सभांचीं आमंत्रण एकाच वेळीं पोष्टानें पाठवावयाचीं असतात. शिवाय सरकारी गॅझेटमध्यें व स्थानिक वृत्तपत्रांतहि सावकारांच्या सभेची नोटीस जाहीर करावी लागते. सावकारांच्या सभेपुढें मांडण्यासाठी कंपनीच्या डायरेक्टरांनीं कंपनीच्या कारभाराबाबतचा संपूर्ण अहवाल व सर्व सावकारांचीं नांवें व त्यांच्या देण्याच्या रकमा यांच्या याद्या तयार करावयाच्या असून डायरेक्टरांपैकीं एका डायरेक्टरास सावकारांच्या सभेचें अध्यक्ष म्हणून काम करण्यास नेमावयाचें असतें. अशा नेमलेल्या डायरेक्टरास सभेला हजर राहून अध्यक्षाचें काम करावें लागतें. वरीलपैकीं कोणत्याहि कामांत कंपनीकडून अथवा डायरेक्टरांकडून कसूर झाल्यास त्याबद्दल शासन सांगण्यांत आलेलें आहे.

**( ३ ) कोर्टाच्या देखरेखीखालील विसर्जन**—कंपनीचें विसर्जन स्वखुषीनें करण्यासाठी खास किंवा असाधारण ठराव मंजूर झाल्यावर त्या खुषीच्या विसर्जनाचें काम कोर्टाच्या देखरेखीखालीं चालविण्याचा हुकूम कोर्टास करता येतो; व प्रसंगोपात्त केव्हांहि कोणत्याहि बाबतींत कोर्टाकडून आदेश घेतां येतात.

अशा प्रकारें कंपनी विसर्जनाचें काम तीन प्रकारांनीं सुरू करतां येतें.

## महाराष्ट्राचें स्फूर्ति व वैभवस्थान

इ. स. १८८८ सालीं अगदीं लहान प्रमाणावर सुरू केलेला किर्लोस्कर बंधूंचा यंत्रोत्पादनाचा कारखाना आज अखिल महाराष्ट्राचें एक स्फूर्ति आणि वैभवस्थान म्हणून ओळखला जातो. नुसत्या किर्लोस्करवाडीपुरतेंच आपलें उत्पादनाचें क्षेत्र मर्यादित न ठेवतां म्हैसूर संस्थानांतील हरिहर, बंगलोर व पुण्याजवळ खडकी येथेंही त्यांनीं आपले कारखाने सुरू केले आहेत. थोडक्यांत म्हणजे, भारताच्या दक्षिण भागांत त्यांनीं कारखान्यांची एक आघाडीच उघडली आहे.

एवढ्यावरच हें कार्य थांबत नसून आजपर्यंत महाराष्ट्रीय वा अन्य जनतेनें जसें सहकार्य केलें तसेंच सहकार्य अखिल भारतीय जनतेनें करावयास पाहिजे आहे. किर्लोस्करांच्या निरनिराळ्या ठिकाणच्या कारखान्यांत निरनिराळ्या तऱ्हेची यंत्रसामुग्री व शेतकी आयुधें तयार केलीं जातात. स्वातंत्र्य पूर्वकाल संपून ३ वर्षें पूर्ण होऊन गेलीं. तेव्हां इतर स्वतंत्र देशांतील नागरिकांचे प्रमाणें आपणही आतां एका स्वतंत्र देशाचे नागरिक आहोंत व त्यामुळें स्वतंत्र देशांतील नागरिकांचें एक प्रमुख कर्तव्य म्हणजे आपल्या देशांत तयार होणारा मालच आपण खरेदी केला पाहिजे; तरच आपल्या देशांतील उद्योगधंद्यांना चालना मिळेल. देशांतील संपत्ति देशांतच राहील आणि त्याचा परिणाम देशी उद्योगधंदे सध्यां आहे यापेक्षां अधिक उत्पादन व कार्यक्षेत्र वाढवूं शकतील.


बेडेकर मसाले

'अर्थ' ग्रन्थमाला.
१ बँका आणि त्यांचे व्यवहार
२ हिंदुस्थानची रिझर्व्ह बँक
३ व्यापारी उलाढाली
४ सहकार

Dr. WAMAN GOPAL'S SARSAPARILLA
BEST BLOOD PURIFIER


माधवाश्रम
(रजिस्टर्ड)
भोजनाची व रहाण्याची उत्कृष्ट सोय.
तारेचा पत्ता: माधवाश्रम, मुंबई. } गिरगांव, मुंबई ४.

आपल्या मोटारीचा विमा
विश्वभारती
मध्येंच उतरा.
★आयुर्विमा ★आग ★मोटार ★मरीन
अध्यक्ष व मॅ. डायरेक्टर श्री. रामराव गणपतराव विजयकर
मॅ. डायरेक्टर श्री. चंद्रशंकर गि. द्विवेदी
ब्रँच मॅनेजर पुणें: श्री. जी. के. मांजरेकर.
(ऑफिस १७१७ सदाशिव, लक्ष्मीरोड, पुणें २.)
एजन्सीसाठीं लिहा!
विश्वभारती इन्शुअरन्स कं. लि., फोर्ट, मुंबई.
हेड ऑफिस:
नोबल चेंबर्स, पारसी बझार स्ट्रीट, फोर्ट, मुंबई.

उंची कपड्याचा व स्नानाचा
उत्तम साबण
निर्मल सोप
दि माणिक सोप वर्क्स, कराड (सातारा)

# दि भारत इंडस्ट्रियल बँक लि., पुणें.

( स्थापना : १४ एप्रिल, १९३८ )




बँकेची नियोजित चार मजली इमारत

महाराष्ट्राच्या आर्थिक उन्नतीसाठीं प्रयत्न करणाऱ्या ज्या कांहीं संस्था आज दिसत आहेत त्यांपैकीं एक ही बँक आहे. बँकेचे प्रत्यक्ष कार्यास पुणें येथें सुरवात ता. २९ ऑक्टोबर १९३८, कार्तिक शु. ६ या सुमुहूर्तावर झाली. म्हणजे, चालू दिवाळीस तिला एक तप पूर्ण होत आहे. या बारा वर्षांत तिनें महाराष्ट्रांतील, विशेषत: पुणें, नगर, नाशिक वगैरे जिल्ह्यांत शाखा स्थापून व्यापार व उद्योगधंदे यांची जी सेवा केली आहे ती जनतेपुढें आहेच. तथापि, या तपांतील तिची झालेली प्रगति सर्वांपुढें मांडावयाची या दृष्टीनें खालीं माहिती व तक्ता दिला आहे त्यावरून पूर्ण कल्पना येईल.

बँकेची एकूण सात ऑफीसेस असून तिचें खेळतें भांडवल सुमारें ६० लक्ष रुपयांपर्यंन्त झालें आहे व सर्वतोपरी बँक प्रगतिपथावर आहे हें दिसून येत आहे.

बँकेचे बोर्ड ऑफ डायरेक्टर्समध्यें व्यापार उद्योगधंद्यांतील यशस्वी धनिक सुरवातीपासून लाभलेले असून सध्याचें बोर्ड ऑफ डायरेक्टर्समध्यें पुढीलप्रमाणें मंडळी आहेत.

## बोर्ड ऑफ डायरेक्टर्स

१. मा. बी. बी. साळवेकर, अध्यक्ष. २. मा. के. पी. जोशी, उपाध्यक्ष. ३. मा. बी. पी. केळकर. ४. मा. के. एम. महाजन. ५. सौ. इंदुमतीबाई फडके. ६. मा. आर. बी. गिरमे, एम. एल. ए. ७. मा. एच. बी. गिरमे. ८. मा. आर. पी. दामोदरे. त्याचप्रमाणें बँकेचे शाखांचे कामकाजाचे नियंत्रणासाठीं शाखानिहाय सल्लागार मंडळें असून त्यांत श्री. रा. ब. जी. जी. शेंबेकर, आ. रा. भ. गिरमे, रा. सा. पन्हाळे, लोणावळ्याचे डॉ. सोमण, श्री. मादन, बेलापूर रोड येथील श्री. नानासाहेब जगताप, श्री. शंकरराव बोरावके, खानसाहेब दाऊदसाहेब गुलाम महंमद, वगैरे मंडळी दिसत आहेत.

बँकेचे कार्याची धुरा संस्थापक श्री. नि. ना. क्षीरसागर व श्री. रा. बा. साळवेकर यांचेवर सुरवातीपासून असून ते उभयता मॅनेजिंग डायरेक्टर्स आहेत व त्यांच्या श्रमानें बँक सतत प्रगतिपथावर आहे.

पुण्यांतील महत्त्वाचा असा राजरस्ता जो लक्ष्मी रोड, त्यावर बँकेनें स्वत:चे ऑफीसचे इमारतीकरितां जागा घेतली असून त्यावर लवकरच टोलेजंग इमारत बांधली जाईल. त्याबाबतची पूर्वतयारीही पूर्ण झाल्याचें कळतें.

बारा वर्षांच्या कालखंडांत बँकेवर कांहीं संकटें आलीं आणि गेलीं, तथापि तिच्या प्रगतींत केव्हांही खंड पडला नाहीं; आणि यापुढेंही तिची अशीच भरभराट होईल असा भरंवसा वाटतो.

## भारत इंडस्ट्रिअल बँक लि., पुणें

### पहिल्या तपांतील प्रगतीचें तुलनात्मक आकडे

| ताळेबंदाचें वर्ष | मुदत | जमा शेअर भांडवल | रिझर्व्ह फंड | ठेवी | खेळतें भांडवल | एकूण उत्पन्न | निव्वळ नफा | एकूण डिव्हिडंडची रक्कम | डिव्हिडंडचा दर प्रेफरन्स | डिव्हिडंडचा दर ऑर्डीनरी | नव्या शाखा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १९३९ | इंटीरिम १० म. २ दि. | ६२,४७० | ४० | ६४,५०० | १,२८,१०० | ३,५०० | २०० | ... | ... | ... | ... |
| १९४० | म. १२ | ८४,२१० | ४४० | १,५९,२०० | २,४७,१०० | ७,९०० | १,९०० | १,२६० | ६ | ... | ... |
| १९४१ | म. १२ | ९०,७३० | ८३० | १,८५,६०० | २,९५,२०० | १२,००० | १,९०० | १,३५० | ६ | ... | ... |
| १९४२ | म. १२ | ९७,०३० | २,१७० | ३,७९,१०० | ५,१४,००० | १८,३०० | ५,६८० | ४,१६० | ६ | ३ | ... |
| १९४३ | म. १२ | ९९,४४० | ५,१९० | १५,८६,३०० | १७,७९,००० | ४८,१०० | १५,०४० | ४,१२० | ६ | ४ | १. कँन्टोन्मेंट पुणें २. बारामती खोपोली पे. ऑफिस |
| १९४४ | म. १२ | १,६९,३८० | ७,५२० | २२,१०,४०० | २५,१९,००० | ८१,६०० | ११,५७० | ४,६४० | ६ कर | ४ माफ | ३. लोणावळा ४. बेलापूर रोड ५. ओझर. |
| १९४५ | म. १२ | २,२९,८९० | ११,१२० | ३४,३३,२०० | ३९,४९,००० | १,१९,५०० | १७,९१० | ८,५१० | ६ कर | ४+२ माफ | |
| १९४६ | म. १२ | ३,९६,२४० | २२,००० | ४७,४१,८०० | ५५,४५,००० | १,९०,१०० | ५२,०८० | १३,८७० | ६ कर | ४+२ माफ | |
| १९४७ | म. १२ | ३,९८,२८५ | २३,००० | ४२,४१,५०० | ४९,८२,७०० | १,६३,५०० | ३,५७७ | ... | ६ | ... | |
| १९४८ | म. १२ | ३,९८,५३५ | ३१,००० | ४८,७३,१०० | ५६,६०,२०० | २,८२,४०० | ३९,७०० | १२,५९५ | ६ कर | ३ माफ | |
| १९४९ | म. १२ | ३,९९,१०५ | ४१,१०० | ५१,२८,६०० | ५९,५८,८१० | २,६५,६०० | ३५,३८० | १२,५९५ | ६ कर | ३ माफ | |




उत्कृष्ट
मनपसंत
दागिने.
टे. नं. ६०४१८

सोनें. चांदी. मोत्यें
जवाहिरांचे दागिन्यांचे व्यापारी

वामन गणेश हरचेकर

लेडी जमशेटजी रोड दादर मुंबई १४

नूतन वर्ष आमच्या हितचिंतकांस सुखाचें जावो.



# संतोष दुग्धालय, पुणें.

( रजिस्टर्ड )

भिलवडी सेंटर ग्रामीण विभागांतील शंभरटक्के हमखास कोरें दूध. गेली चार वर्षें सतत दररोज चारशें सुजाण कुटुंबांत वापरतात. आपणहि घ्या.

**म. गो. कुलकर्णी.**

फडतरे चौक, सदाशिव पेठ, पुणें २.

ही दिवाळी आमचें ग्राहकांस सुखाची जावो.



बेडेकर पापड





डोकेंदुखी व मेंदूच्या सर्व विकारांवर खात्रीचा इलाज

# रामतीर्थ ब्राम्ही तेल

[ स्पेशल नं. १ ]
( मेडिकेटेड )

पांढरे केस काळे होतात, स्मरणशक्ति वाढते, टक्कलावर केस उगवतात, शांत झोप येते, केस वाढतात, दृष्टीही सुधारते.

मोठी बाटली रु. ३-८-०
लहान बाटली रु. २-०-०

टपालानें मागविणारांनीं अनुक्रमें ५ रु. ५ आ. व ३ रु. ७ आ. ची मनिऑर्डर करावी. व्ही. पी. केली जाणार नाहीं.

## श्री रामतीर्थ योगाश्रम

"उमेशधाम," १७, व्हिन्सेंट स्क्वेअर स्ट्रीट, नं. २, दादर ( जी. आय. पी. ) रेल्वे स्टेशननजीक, मुंबई १४.

## दि सेंट्रल प्रॉव्हिन्सेस् अँण्ड बेरार प्रॉव्हिन्शल को-ऑपरेटिव्ह बँक, लि.

हेड ऑफिसः-टिळक पुतळ्याजवळ, नागपूर.

शाखाः—सीताबर्डी नागपूर, खामगांव, मलकापूर, अमरावती, बुलढाणा, वाम्शा, बेतूल, इटारसी, हर्दा, पिपरिया, नरसिंगपूर, जबलपूर, राजनान्दगांव, मंडला.

| | | |
|---|---|---|
| अधिकृत हिस्से भांडवल | रु. | १०,००,००० |
| जमा झालेलें हिस्से भांडवल | रु. | १०,५१,७८० |
| मुख्य गंगाजळी | रु. | ८,११,४०० |
| एकूण ठेवींची रक्कम | रु. | १०३,७८,०२६ |
| खेळतें भांडवल | रु. | १३५,५१,५१६ |
| सरकारी रोख्यांत गुंतविलेलें भांडवल | रु. | ७०,५१,४७८ |

सर माधवराव देशपांडे, के. बी. ई.

अध्यक्ष व मॅनेजिंग डायरेक्टर.

ठेवीः-मुदती, बचती व चालू ठेविल्या जातात.

बँकेचे हिस्से विकणे चालूच आहे.

सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.

नि. स. देव, मॅनेजर.



## श्री बलभीम को-ऑप. बँक लि., शिवाजी पेठ, कोल्हापूर डिस्ट्रिक्ट.

स्थापना १९१५ इ॥.

मेन ऑफिसः—श्री. श्रीपतराव शिंदे रोड, शिवाजी पेठ, कोल्हापूर.

सतत पस्तीस वर्षें "अ' वर्गांत व प्रगतिपथावर असलेली बँक.

| | |
|---|---|
| अधिकृत शेअर भांडवल | १,:०,००० |
| खपलेलें ,, ,, | ४१,११० |
| वसूल झालेलें ,, ,, | ४०,६०० |
| रिझर्व्ह व इतर फंडस् | ८३,८२८ |
| खेळतें भांडवल | ४,२०,२७४ |
| सभासद | ९८४ |

बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात. सरकारी रोखे, सोनें, माल, स्थावर मिळकत वगैरेंचे तारणावर कर्ज अगर कॅशक्रेडिट दिलें जातें. समक्ष चौकशी बँकेकडे करावी अगर लिहावें.

बी. डी. सरनाईक, मॅनेजर.     के. आय्. घाटगे, प्रेसिडेन्ट.

श्री बलभीम को-ऑ. बँक लि., कोल्हापूर.



फोनः ३४५१९     तारः SAHYOG

## दि प्रॉव्हिन्शिअल इंडस्ट्रिअल को-ऑपरेटिव्ह असोसिएशन, लि.

९, बेक हाऊस लेन, फोर्ट, मुंबई १.

उत्पादकांच्या ( प्रोड्यूसर्स ) सोसायट्यांना असोसिएशन खालील मालाचा पुरवठा करते:-

सूत, रसायनें, रंग, कच्चीं कातडीं व चामडीं,
कातडीं कमाविण्यास लागणारा माल,
कमावलेलें कातडें, इ., मशीन.
टूल्स आणि इक्विपमेंट इ.

आणि

खालील मालाच्या विक्रीस साहाय्य करते:—

हातमागावरील कापड ( सुती व लोंकरी ), धातूचें सामान, चंदनी लांकूड, रोजवुड आणि हस्तिदंती आर्टस् अँड क्रॅफ्टस्, रेशीम, जर, कातडीं व कातडी माल, खाद्य तेलें, लाकूड आणि कोळसा वगैरे.



( मिरज येथें १९२९ सालीं स्थापन झालेली भागीदारांची जवाबदारी मर्यादित )

## दि मिरज स्टेट बँक लि.

—मिरज—

शेड्यूल्ड बँक

( स्थापना : १९२९ )

| | | |
|---|---|---|
| अधिकृत भांडवल | ... | रु. २५,००,००० |
| विक्रीस काढलेलें व खपलेलें | ... | रु. १२,००,००० |
| रिझर्व्ह व इतर फंड | ... | रु. ५,७०,००० |
| एकूण खेळतें भांडवल | ... | रु. ७०,००,००० |

शाखा

★ लक्ष्मेश्वर ( जि. धारवाड )
★ कुर्डूवाडी, पंढरपूर व अकलूज ( पे ऑफिस )

बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात. सरकारी रोखे, शेअर्स, सोनें, माल, स्थावर मिळकत वगैरेचे तारणावर कर्ज अगर कॅश क्रेडिट दिलें जातें. समक्ष चौकशी बँकेकडे करावी अगर लिहावें.

डॉ. कृ. गो. गोसावी, चेअरमन.     के. डी. शिराळकर, मॅनेजर

## लोकरीच्या किंमती वधारल्या

ऑस्ट्रेलियाचे भारतांतील हाय कमिशनर मि. ओल्न हे कांहीं कामाकरितां भारतांत आले आहेत. ऑस्ट्रेलियांत संपत्तीचा आतिरेक झाला असल्याचें त्यांनीं सांगितलें. ऑस्ट्रेलियांत लोकरीच्या किंमतीं झपाट्यानें वाढत असल्यामुळें तेजीचें वातावरण पसरलें आहे असें सांगून ते पुढें म्हणाले कीं ऑस्ट्रेलियाच्या अर्थव्यवस्थेचा समतोलपणा बिघडण्याचा संभव निर्माण झाला आहे.

## ब्रिटनची अन्नविषयक परिस्थिती


ब्रिटनची अन्नविषयक परिस्थिती गेल्या वर्षाच्या मानानें सुधारलेली नसल्यानें सध्यांची शिधा–वांटपाची पद्धत तशीच चालू ठेवण्यांत येणार आहे. येत्या सहा महिन्यांत कांहीं पदार्थ सुलभतेनें मिळूं लागून त्यांचें वांटप रद्द करण्यांत येईल अशी आशा ब्रिटनच्या अन्नमंत्र्यांनीं व्यक्त केली होती. परंतु आतां आहे तीच परिस्थिति कायम राखण्याच्या प्रयत्नास ते लागले आहेत.

## ठेवींच्या आकारानुसार बँकांचें पृथक्करण (१९४८)

| ठेवी (लक्ष रु.) | वसूल भांडवल | रिझर्व्ह फंड | ठेवी: मुदती | ठेवी: सेव्हिंग्ज | ठेवी: करंट | ठेवी: इतर | ठेवी: एकूण | निव्वळ नफा-तोटा | खेळतें भांडवल | रोकड: तिजोरींत | रोकड: बँकांत | गुंतवणूक: सरकारी रोखे | गुंतवणूक: इतर | कर्जें |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | अ—७८ शेड्यूल्ड बँका | | | | | | | | |
| ५० चे खाली | १,७५ | ८० | २,४२ | ७१ | १,३४ | १९ | ४,६५ | —२१ | ८,६५ | ४४ | ९७ | १,१८ | ३८ | ४,३७ |
| ५०–१०० | १,६५ | २० | २,९१ | १,०० | २,३८ | ३२ | ६,५९ | ७ | ९,६४ | ६६ | ७२ | २,२८ | ४५ | ४,३७ |
| १००–१०,०० | १३,०६ | ५,२४ | ४५,७९ | २४,८० | ५८,१९ | १३,०० | १४१,७७ | १,०१ | १८६,०१ | १२,९२ | १९,२३ | ५४,१३ | ६,७० | ६७,२० |
| १०,००–२५,०० | ५,२८ | २,८३ | १८,६० | १६,७८ | ४३,१७ | ७,०५ | ८५,६१ | ८० | ११२,०९ | ९,६६ | १२,२३ | ३५,३५ | ३,०३ | ३६,४८ |
| २५,०० वर | १५,०९ | १९,६५ | १२०,४९ | ९३,०८ | ३६८,१३ | ५३,७९ | ६३५,४९ | ४,४४ | ७१८,६६ | ३८,२३ | ६७,६८ | ३००,०९ | ३७,१९ | २१९,८४ |
| एकूण | ३६,८२ | २४,७३ | १९०,२१ | १३६,३७ | ४७३,२१ | ७४,३४ | ८७४,१२ | ६,०९ | १,०३५,०५ | ६१,९ | १००,८२ | ३९३,०३ | ४७,७६ | ३३२,२७ |
| | | | | | | ब—५४१ बिगर शेड्यूल्ड बँका | | | | | | | | |
| ५० चे खाली | ६,७८ | १,५८ | १९,०४ | ५,०८ | ८,५५ | २,७१ | ३५,३६ | ३३ | ४९,२९ | ३,८५ | ३,१० | ६,६० | २,३१ | २७,५८ |
| ५०–१०० | १,०९ | ४३ | ७,१९ | ३,२२ | ३,३५ | ३८ | १४,११ | ८ | १७,४६ | १,५८ | १,०९ | ३,१५ | १,७८ | ८,३६ |
| १००–१०,०० | १,३७ | १,४० | १०,१४ | ३,२७ | १३,१२ | ६२ | २७,०८ | २६ | ३१,४३ | २,३८ | १,६९ | ९,३५ | १,५५ | १४,२५ |
| १०,००–२५,०० | — | — | — | — | — | — | — | — | — | — | — | — | — | — |
| २५,०० वर | — | — | — | — | — | — | — | — | — | — | — | — | — | — |
| एकूण | ९,२० | ३,४० | ३६,२८ | ११,५४ | २५,०१ | ३,७१ | ७६,५५ | ६८ | ९८,११ | ७,८१ | ५,८८ | १८,९० | ५,६५ | ५०,१८ |
| | | | | | | क—अ आणि ब ची बेरीज | | | | | | | | |
| ५० चे खाली | ८,५२ | २,३८ | २१,४५ | ५,७९ | ९,८९ | २,८९ | ४०,०२ | १२ | ५७,८८ | ४,२८ | ४,०७ | ७,७९ | २,६९ | ३१,९५ |
| ५०–१०० | २,७३ | ६२ | १०,०७ | ४,२१ | ५,७३ | ७० | २०,७१ | १५ | २७,१० | २,२४ | १,८१ | ५,४३ | २,२४ | १२,७४ |
| १००–१०,०० | १४,३९ | ६,६३ | ५५,९० | २८,०७ | ७१,३१ | १३,६२ | १६८,८६ | १,२६ | २१७,४४ | १५,३० | २०,९२ | ६३,२८ | ८,२५ | ८१,४४ |
| १०,००–२५,०० | ५,२८ | २,८३ | १८,६० | १६,७८ | ४३,१७ | ७,०५ | ८५,६१ | ८० | ११२,०९ | ९,६६ | १२,२३ | ३५,३५ | ३,०३ | ३६,४८ |
| २५,०० वर | १५,०९ | १९,६५ | १२०,४९ | ९३,०८ | ३६८,१३ | ५३,७९ | ६३५,४९ | ४,४४ | ७१८,६६ | ३८,२३ | ६७,६८ | ३००,०९ | ३७,१९ | २१९,८४ |
| एकूण | ४६,०२ | २९,१३ | २२६,४९ | १४७,९१ | ४९८,२२ | ७८,०५ | ९५०,६७ | ६,७७ | १,१३३,१५ | ६९,७२ | १०६,७२ | ४११,९३ | ५३,४१ | ३८२,४५ |


# आदर्श कृषि संस्था लि. धुळें (प. कान्हदेश)

## नंदनवन-योजना




१. औद्योगिक वसाहती करतां घेतलेल्या अंदाजी ६०० एकरांपैकीं ३१० एकराकरतां वस्ती झाली. आतां फक्त १२० एकरांची व्यवस्था करावयाची आहे.
२. डेअरी, पोल्ट्री, जनावरांची जोपासना इत्यादी व्यवसायांकरितां अत्यंत सोईची जागा.
३. संस्थेनें गेल्या दोन वर्षांत प्रतिवर्षी ६% करमाफ डिव्हिडंड दिला असून नुकत्याच संपलेल्या वर्षी ८% डिव्हिडंड दिला
४. रु. २५०/- गुंतवून संस्थेचे शेअर्स घेणाऱ्यास एक या प्रमाणांत अंदाजी एक एकराचा प्लॉट लांब मुदतीच्या भाड्यानें प्रतिवर्षी एक रुपया नाममात्र भाड्यानें दिला जाईल.
५. प्लॉट घेणारास त्याला मिळालेला प्लॉट कोणासही भाड्यानें देतां येईल. सामान्यतः वार्षिक रु. १२ ते २० कमीत कमी भाडें मिळूं शकेल. प्लॉट घेणाराकरितां भाडेकरी मिळवून देण्याची व्यवस्था संस्था करील
६. अशा रीतीनें संस्थेच्या शेअर्समध्यें रक्कम गुंतविणारास डिव्हिडंड व भाडें दोन्हींही मिळून वार्षिक कमाई शेकडा १२ पेक्षां अधिक मिळेल;
७. संस्थेचे रु. १०००/- अगर अधिक किंमतीचे शेअर्स घेणारा इसम संस्थेचा डायरेक्टर होण्यास पात्र ठरतो.

अधिक माहिती करितां लिहा:— द. वि. जावडेकर. मॅनेजिंग डायरेक्टर.

# श्री लक्ष्मी टेक्सटाइल मिल्स लि०

## पोस्ट— भाटघर (भोर)

अधिकृत भांडवल १५ लक्ष रु. खपलेलें भांडवल ११ लक्ष रु.

**कंपनीची मालमत्ता १८ लाखांचेवर.**

सध्यां घेतलेल्या मुदतीच्या ठेवी : ५½ लक्ष रुपये

नवीन चात्या बसविण्याचें काम सुरू झालें आहे व आणखी या वर्षी २ लाख रुपयांच्या ठेवी घेणें आहेत. व्याजाचा दर १ वर्ष ५%, २ वर्षें ५½%. व ३ वर्षें ६% व्याज दर सहामाहीस दिलें जातें.

महाराष्ट्रांतील पॉवरलूमचा धंदा हें महाराष्ट्राचें वैशिष्ट्य आहे. तो जगवावयाचा असेल व कापड उत्पादन वाढवून राष्ट्राचे संपत्तींत भर टाकावयाची असेल तर या पॉवरलूम कारखान्यांना सुताचा भरपूर पुरवठा होईल अशी व्यवस्था झाली पाहिजे व हें ध्येय डोळ्यांपुढें ठेऊन श्री लक्ष्मी टेक्सटाइल मिल्सचे चालक श्री. द. बा. फाटक उर्फ मामासाहेब फाटक ( मॅनेजिंग डायरेक्टर, पायोनियर डाइंग हाऊस लि. पुणें ) यांनीं एक अभिनव योजना आंखली आहे. त्या योजनेप्रमाणें:—

(१) राजा रघुनाथराव मिल, भोर
(२) सदर्न निटिंग वर्क्स् लि. पुणें
(३) विजय टेक्सटाइल्स लि., पुणें
(४) श्री सदानंद टेक्सटाइल मिल्स लि., बिलिमोरा

या कारखान्यांना सुताचा पुरवठा होत आहे.

व या खेरीज आणखी १०० पॉवरलूमना दोन पाळ्यांना पुरेल इतके सुताचे पुरवठ्याची सोय नवीन योजनेप्रमाणें जादा चात्या बसविण्याची व्यवस्था झाल्यास करितां येईल.

आमचे भागीदार व ठेवीदार यांनीं आमचेशीं जें सहकार्य केलें आहे त्यामुळेंच आतांपावेतों प्रगती आम्ही करूं शकलों व पुढील योजनाही पार पाडूं शकूं. त्यांना आमचे धन्यवाद आहेत.

### बोर्ड ऑफ डायरेक्टर्स.

श्री. बापूसाहेब विंचूरकर
श्री. हरिहर रामकृष्ण करंदीकर
श्री. माधव गणेश देसाई
श्री. वि. गो. उर्फ आबासाहेब पटवर्धन
श्री. त्रिं. वि. धारप, व्यापारी, मालक, अलका टॉकीज
श्री. माधव बाळकृष्ण हुदलीकर, M. Sc. ( Leeds )
रि. डे. डायरेक्टर ऑफ इंडस्ट्रीज ( यू. पी. )

मॅनेजिंग एजन्टसतर्फे डायरेक्टर, व्यवस्थापक—

**श्री. द. बा. फाटक**

—सतत एक तप आपली सेवा आम्ही करीत आहोंत !—

# दि भारत इंडस्ट्रिअल बँक लि.,

(स्थापना १९३८)
पो. बॉक्स ५८६

## पुणें शहर.

फोन नं. २०४६
ग्रॅम BHAIBANK

**शाखा—** [१] पुणें लष्कर (टेलिफोन ३६४६) [२] बारामती (टेलिग्रॅम Bhaibank) [३] लोणावळा (टेलिफोन ५१, टेलिग्रॅम Bhaibank) [४] श्रीरामपूर (टेलिफोन २८, टेलिग्रॅम Bhaibank) [५] ओझर (जिल्हा नाशिक) [६] खोपोली (जिल्हा कुलाबा) पे ऑफीस.

### —संचालक मंडळ—

(१) श्री. बी. बी. वाळवेकर, Ex. M. L. A., Ex. President, Poona City Municipality (अध्यक्ष)
(२) श्री. के. पां. जोशी, वकील, (उपाध्यक्ष)
(३) सौ. इंदुमतीबाई रघुनाथ फडके, B. A. (Hons.), B. T.
(४) श्री. भा. प. केळकर, (केळकर ब्रदर्स, पुणें व नाशिक)
(५) श्री. रा. भ. गिरमे, M. L. A., श्रीरामपूर.
(६) श्री. का. म. महाजन, वकील, पुणें.
(७) श्री. रा. प्र. दामोदरे, व्यापारी, बारामती.
(८) श्री. ह. ब. गिरमे, (मॅ. डायरेक्टर, सासवड माळी शुगर फॅक्टरी.)
(९) श्री. रा. बा. साळवेकर, B. A., LL. B., मॅ. डायरेक्टर.
(१०) श्री. नी. ना. क्षीरसागर, मॅ. डायरेक्टर.

### —भांडवल—

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल ... ... ... | रु. १५,४३,८१० |
| विक्रीस काढलेलें व खपलेलें भांडवल | रु. ७,९३,८१० |
| वसूल झालेलें भांडवल... ... ... | रु. ३,९९,३८५ |
| एकूण खेळतें भांडवल सुमारें ... | रु. ६०,००,००० |

**व्याजाचे दर:—** चालू खातीं ½ टक्का, सेव्हिंग्ज १½ टक्के. स्त्री-खातेदार २ टक्के.

**कायम ठेवी:—** ६ महिने २¼ टक्के. १ वर्ष ३ टक्के. २ वर्षें ३½ टक्के. ३ वर्षें ३¾ टक्के.

★ सेव्हिंग्ज खात्यांतील रकमा चेकनें काढतां येतात.
★ शॉर्ट टर्म डिपॉझिट्स स्वीकारलीं जातात.
★ बँकेच्या मुख्य कचेरींत स्त्री-खातेदारांकरितां स्वतंत्र स्त्री-शाखेची व्यवस्था.

**सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.**

रा. बा. साळवेकर, B. A., LL. B.
नी. ना. क्षीरसागर,
मॅनेजिंग डायरेक्टर्स.

आमचे खातेदार, भागीदार व हितचिंतक यांना
ही दीपावलि आनंददायक जावो !

हें पत्र पुणें, पेठ भांबुर्डा घ. नं. ९१५।१ आर्यभूषण छापखान्यांत केशव गणेश शारंगपाणी यांनीं छापिलें व
श्रीपाद वामन काळे, बी. ए. यांनीं 'दुर्गाधिवास', ८२३ शिवाजीनगर (पो. ऑ. डेक्कन जिमखाना) पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.